मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे मुखपत्र

# मुस्लीम सत्यशोधक पत्रिका

वर्ष : ९, अंक : ३
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२३

## ५३ वा वर्धापन दिन विशेषांक



**डोळ्याच्या बदल्यात डोळा,
या तत्त्वज्ञानाने जग तेवढे आंधळे होईल.....
मी त्याला धार्मिक म्हणतो,
जो इतरांच्या वेदना समजतो !**

- महात्मा गांधी




सत्यशोधक फातिमाबी शेख जयंती कार्यक्रम.

संविधान कार्यशाळा उद्घाटन सत्र :
मा. अशोक धिवरे आणि डॉ. नितीश नवसागरे.






मुस्लीम सत्यशोधक पत्रिका आणि समाजवादी
शिक्षणहक्क शिक्षणदिन विशेषांक प्रकाशन...
मा. अशोक धिवरे, मा. विश्वंभर चौधरी
यांचा सत्कार करताना...

खाजगी वितरणासाठी

# मुस्लीम सत्यशोधक पत्रिका

## ५३ वा वर्धापन दिन विशेषांक

**वर्ष : ९ जानेवारी, फेब्रुवारी, मार्च २०२३ अंक : ४**

**स्वागतमूल्य : रु. १००/-**

संस्थापक संपादक : **हमीद दलवाई**

संपादक : **डॉ. शमसुद्दीन तांबोळी**

■ ■

: संपादक मंडळ :

**प्रा. सायरा मुलाणी • प्रा. जमीर शेख • प्रा. दिलावर शेख**

**नबाब अल्तापहुसेन • जावेद शाह • प्रा. समिना पठाण**

संपादन साहाय्य : **डॉ. बेनझीर तांबोळी**

■ ■

पत्रव्यवहाराचा पत्ता : सी/८/२३ स्टेट बँक नगर, पंचवटी, पाषाण, पुणे ४११००८.

भ्रमणध्वनी : ९८२२६७९३९१ Email : tambolimm@rediffmail.com

**वार्षिक वर्गणी : रुपये २५०/- पंचवार्षिक वर्गणी : रुपये १,२००/-**

*या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.*

मुस्लीम समाजाचे प्रबोधन करणाऱ्या मुस्लीम सत्यशोधक मंडळाने ५२ व्या वर्षात पदार्पण केले आहे. मंडळासाठी आपली देणगी व मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचे वर्गणीदार होण्यासाठी, जाहिरात देण्यासाठी बँक खाते तपशील पुढीलप्रमाणे -

**मुस्लीम सत्यशोधक मंडळ**

कॅनरा बँक, भवानी पेठ, पुणे ४२.

**बचत खाते क्र.: 0361101010080**

**IFSC Code : CNRB0000361**

# अंतरंग....

सत्यशोधक समाजाचे मुख्य धोरण समाजातील धर्मभोळेपणा काढून टाकणे हे आहे; पण यापुढेही समाजाची कार्यमर्यादा परिस्थितीप्रमाणे वाढावी म्हणून झेपेल तो कार्यक्रम हाती घ्यावा. समाजातील स्वार्थमूलक कृत्रिम विषमता काढून समता व स्वातंत्र्य गाठणे हे अंतिम ध्येय असावे.

सध्याच्या परिस्थितीत सत्यशोधकांनी जागतिक घडामोडींचा, निरनिराळ्या धर्मांचा आणि शास्त्रांचा अभ्यास करून मानव समाजाची सर्वांगीण सुधारणा करण्याकरता संशोधन करून मार्ग काढला पाहिजे.

**- सत्यशोधक केशवराव विचारे**

# संपादकीय....

*आज मुस्लीम समाजात मोठ्या प्रमाणात अस्वस्थता अनुभवास येत आहे. एका बाजूला आर्थिक-शैक्षणिक दुरावस्था आणि दुसऱ्या बाजूला हिंदुत्ववाद्यांचे लव्ह जिहाद, लँड जिहाद, धर्मांतर विरोधी कायदा, गोहत्या असे विषय घेऊन आणि त्याचे अवास्तव चित्रण करून विविध शहरांत 'जनआक्रोश' मोर्चे काढण्यात येत आहेत. शासन प्रि-मॅट्रिक तसेच मौलाना आझाद संशोधन छात्रवृत्ती बंद करून मुस्लीम समाजाच्या विकासाबद्दल उदासीनताच नाही, तर दुजाभाव व्यक्त करीत आहे. हिंदुत्ववादी राजकारणामुळे सामाजिक ऐक्याला तडे जात असल्यामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले.*

*भारतातील सद्य:स्थितीस केवळ हिंदुत्ववादीच जबाबदार आहेत असे सांगणे हे अर्धसत्य ठरेल. मुस्लीम समाजातील धर्मवादी राजकारणाने हिंदुत्ववाद वाढवण्यास 'इंधन' पुरवले आहे. मुख्यत: सामाजिक सुधारणेस कायम विरोध करून हिंदुत्वादाच्या वाढीस खतपाणी दिले आहे. 'आपल्या दुरावस्थेस फक्त हिंदुत्ववादी राजकारण किंवा सरकार जबाबदार आहे,' असे इतरांच्या नावाने बोटे मोडून कदाचित आत्मसमाधान लाभेल; मात्र त्यामुळे परिस्थिती कधीच बदलणार नाही. समाजात तटस्थ किंवा निरपेक्ष आत्मपरीक्षण करण्याची आणि आपल्या सुधारणेची प्रेरणा निर्माण झाल्याशिवाय परिस्थितीत बदल होणार नाही. उलट आपण आपले भवितव्य अधिक अंधारमय करणार आहोत, ही जाणीव निर्माण करण्याची मोठी गरज आहे.*

*मुस्लीम धार्मिक संघटना 'खाली हात आये है, खाली हात जाना है, ये सब यहां छोड़कर जाना है !' 'शिकके क्या करने वाले ? उपर ये काम आनेवाला है क्या ? हमारे को कौन नोकऱ्या देने वाला है ? नौकऱ्या करेंगे तो नमाज कब पढोगे ?' वगैरे उपदेश किंवा 'पहले हिजाब फिर किताब' अशा घोषणांतून शिक्षण आणि एकूणच आधुनिकतेबद्दलची टोकाची उदासीनता निर्माण केल्यामुळे समाजाची दुरावस्था झाली हे आम्ही मान्य करणार आहोत का ?*

*तसा पैगंबरांनी ऐकलेला पहिला शब्द 'इकरा' (वाचन करा) आणि पैगंबरांनी सांगितलेले 'इल्म'चे महत्त्व केवळ पोथीपुराणात ठेवून प्रत्यक्षात पारलौकिक जीवनाचे आकर्षण बाळगणे हे ऐहिक प्रश्नावरील उपाय नाहीत.*

*आपल्या दु:खास आपणच जबाबदार आहोत ही जाणीव निर्माण होऊन आपल्या दु:खाचे ओझे कमी करण्यास प्रोत्साहित होणे आणि त्यासाठी प्रयत्न करणे बोटे मोडत बसण्यापेक्षा जास्त श्रेयस्कर आहेत.*

*मुस्लीम शेतात पोसला जात असलेला इस्लामिक मूलतत्त्ववाद आणि त्यातून निपजलेला जिहादी दहशतवाद आणि भारतीय मुस्लीम समाज यांचा काही एक संबंध नाही. काही धार्मिक अस्मितांचा वापर करून भारतात जमातवादी राजकरण करणाऱ्या धार्मिक संघटना आणि राजकीय पक्ष आहेत. क्रिया-प्रतिक्रियात्मक घटनेतून भारतात प्रासंगिक धार्मिक तणाव मुस्लीम धर्मवादी संघटनांनी केला आहे. हे वास्तव स्वीकारून अशा धर्मवादी संघटनांना बाजूला ठेवण्याचे शहाणपण सामान्य लोकांनी दाखवायला हवे. मात्र 'भारतात प्रत्येक मुसलमान 'गजवा-ए-हिंद'ने प्रेरीत आहे, भारतात इस्लामिक स्टेट निर्माण करण्याचे स्वप्न आहे. त्यासाठी लोकसंख्या वाढीबरोबरच लव्ह जिहाद, धर्मांतरे केली जातात,' अशा अवास्तव कल्पना रंगवून, प्रसारित करून मुस्लिमांना 'बागुलबुवा' करण्यात येत आहे. हे देशासाठी तसेच समाजासाठी आपत्ती वाढवणारे आहे.*

*मूळात प्रबोधनाची वाणवा, त्यात हिंदुत्ववाद्यांचा अपप्रचार यातून समाजाचे प्रश्न चिघळताना दिसत आहेत. यामुळे मुस्लीम सत्यशोधक चळवळीची गळचेपी होते. जे ध्येय, उद्दिष्ट समोर ठेवून चळवळीचा जन्म झाला. उद्दिष्ट्ये बाजूला ठेवून प्रतिक्रियात्मक विषयांवर कामे करावी लागतात.*

*इस्लामच्या उदारमतवादाचा प्रचार करणे हे मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे प्रथम किंवा प्राधान्यक्रमाचे उद्दिष्ट नाही. समाजाचे ऐहिक प्रश्न सोडवण्यासाठी धर्मापलीकडे जाण्याची, वैज्ञानिकदृष्टी बाळगण्यासाठी आधुनिकता स्वीकारण्याची पर्यायाने संविधानवादी बनवण्याची प्राथमिकता आहे. धर्म हा वैयक्तिक जीवनाचा भाग असून सामाजिक जीवनात धर्माचा हस्तक्षेप नसावा, असे मानणारी ही चळवळ आहे. मात्र जेव्हा बहुसंख्याक समाजच धर्माचा वापर*

*सार्वजनिक आणि राजकीय जीवनात करण्यास प्रवृत्त झाला, तर अल्पसंख्याक समाजावरील धर्माचा प्रभाव कमी करण्याचे प्रयत्न यशस्वी कसे होतील ? मुस्लीम सत्यशोधक मंडळाने सामाजिक सुधारणेसाठी महिलांना संविधानिक हक्क, आधुनिक शिक्षण, लोकसंख्या नियंत्रण, धर्मनिरपेक्षता, लोकशाही मूल्ये असे विषय हाती घेतले. आज मात्र हेच विषय हिंदुत्ववाद्यांनी मुस्लीम समाजाविरुद्ध वापरण्याची शस्त्रे बनवली आहेत. यातून निर्माण झालेले प्रबोधनाचे पेच अधिक गुंतागुंतीचे ठरत आहेत. एक धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी भारतीय नागरिक म्हणून मंडळाने अप्रस्तुत हिंदुत्ववादास विरोध केला की मुस्लीम सत्यशोधकला जमाते इस्लामी किंवा तबलिगची बी टीम म्हणून संबोधले जाते. तसेच सत्यशोधकने मुस्लीम प्रबोधनाचे विषय हातात घेतले की हे लोक हिंदुत्ववाद्यांची, संघाची 'बी टीम' म्हणून हिनवले जाते. परिणामी मुस्लीम प्रबोधनाचा विषय योग्य पद्धतीने पुढे जाण्याऐवजी तो मंडळाकडून अडगळीत पडतो आणि हिंदुत्ववाद्यांकडून उचलला जातो. अशा परिस्थितीत तारेवरची कसरत करीत चळवळ टिकवणे आणि वाढवणे कार्यकर्त्यांना कठीण जाते. अनेक कार्यकर्ते उदासीन होतात, नाउमेद होतात. परिणामी मंडळासमोरील आव्हाने वाढतात.*

*आज मुस्लीम ओळख दाखवणाऱ्या सांस्कृतिक प्रतिकांना पुसून टाकण्याचा सपाटा लावला आहे. गाव, शहर, स्मारक, बगीचे यांची नावे बदलण्याची अनेक उदाहरणे आहेत. इतिहासाची पुनर्मांडणी करण्याच्या नावाखाली संमिश्र संस्कृतीचा वारसा नामशेष करण्याचा चंग बांधला आहे. अस्मितांच्या मुद्याला महत्त्व दिले जात आहे. हे सर्व धर्मनिरपेक्ष - बहुसांस्कृतिकतेच्या खुणा मिटवून हिंदूराष्ट्र निर्माण करण्यासाठी एक आटापिटा आहे ? मानवांच्या अस्मितेपेक्षा जाती-धर्माच्या अस्तित्वाला केंद्रस्थानी आणले जात आहे. भारत हे हिंदूराष्ट्र म्हणून घोषित केल्याने भारतीयांचे ऐहिक प्रश्न सुटणार आहेत का ? की नव्या प्रश्नांना जन्माला घातले जाणार आहे ? आज प्राचीन वैभवाच्या नावाखाली कितीतरी अवैज्ञानिक गोष्टींना चालना देण्यात येत आहे. हे खरोखरच मानवाच्या हितासाठी फायद्याचे ठरणार आहे का ? याचा समाजधुरीणांनी गांभिर्याने विचार करून येत्या काळातील आपत्ती रोखण्यासाठी सरसावले पाहिजे.*

*मुस्लीम सत्यशोधक चळवळ, हमीद दलवाई यांच्याबद्दलची माहिती घेण्यासाठी*

रुईया महाविद्यालय, मुंबईच्या संशोधक विद्यार्थिनींनी माझी ऑनलाईन मुलाखत घेतली. या मुलाखतीत विचारण्यात आलेले काही प्रश्न आणि याचे संक्षिप्त प्रतिसाद मी मुद्दाम या संपादकीय लेखात उद्धृत करीत आहे. ही मुलाखत १ फेब्रुवारी २०२३ रोजी घेण्यात आली. यातील पहिला प्रश्न होता - मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना मूळ तत्त्वे कितपत साध्य झाली आहेत ? आणि मंडळाची सद्य उद्दिष्टे काय आहेत ? या प्रश्नाचे उत्तर काही प्रमाणात वरील भागात मांडले आहे. मात्र एखादी संघटना आणि चळवळ याची उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली आहेत ? या प्रश्नाचे नेमके उत्तर देणे माझ्यासाठी थोडे अवघड होते. चळवळीचे मोजमाप किंवा मूल्यमापन न करता आपण पुढे जात असतो आणि अशी कोणती साधने आहेत ज्याच्या मार्फत आपण मूल्यमापन करणार ? समाजातील काही बदल आणि प्रतिसाद दिसतात, मात्र नेमक्या पद्धतीने - अचूकपणे सांगता येत नाही. तरीही पण आज कुटुंब नियोजन करणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. मुस्लीम समाजातील जन्मदर घटला आहे, मराठी माध्यमातून आधुनिक शिक्षण आणि उच्चशिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. महिला सर्व क्षेत्रांत वावरताना दिसतात. मध्यंतरी एकाचवेळी पाच महिला सर्वोच्च न्यायालयात जाऊन तलाक, बहुपत्नीत्व, हलाला विरोधात दाद मागतात. तलाक-ए-बिद्दतवर कायद्याने बंदी आणली आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळास होणारा विरोध कमी झाला आहे. फतवे काढण्याचे प्रमाण कमी झाले आहे. तरुण-तरुणी मंडळाकडे आकर्षित होत आहेत. अंधश्रद्धा, धर्मांधता कमी होताना दिसतात; पण हे मांडताना मला उलट प्रश्न विचारावासा वाटला. तो प्रश्न म्हणजे, आज मुस्लीम सत्यशोधक मंडळ पन्नास-पंचावन्न वर्षांचे झाले आहे. तसेच महात्मा फुलेंचा सत्यशोधक समाज एकशे पन्नास वर्षांचा झाला आहे. भारतीय संविधनास जवळपास पंच्याहत्तर वर्षे झाले ? मग महात्मा फुले किंवा भारतीय संविधानास अपेक्षित उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली ? या प्रश्नाचे उत्तर काय आहे ? आजपर्यंत आपण जी प्रगती केली होती ती थांबून समाज उलट्या दिशेने जातोय का ? विज्ञानापेक्षा अवैज्ञानिक गोष्टींना महत्त्व येत आहे. धर्मसहिष्णूता कमी होऊन ध्रुवीकरण वाढत आहे. धार्मिक नीतिमूल्यांपेक्षा धर्मांधता, धर्मवाद वरचढ होत आहे. आजही महिलांना शबरीमालात बंदी आहे ? महिलांनी टिकली लावावी की नाही ? कपडे कोणते घातले ? कोणत्या रंगाचे घातले ? मंदिरपूजा, मंदिर बांधणे यात शासकीय

*हस्तक्षेप कमी झाले की वाढले ? सार्वजनिक ठिकाणी धर्माचे स्तोम वाढले की कमी झाले ? या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आशादायक आहेत की आपल्या पदरी निराशा घालतात ?*

*प्रबोधनाचे विषय संपणारे नसतात. या लढाईला अंत नसतो. 'मानवता' प्रस्थापित करणे आणि वैश्विक मूल्यांचे जतन करणे हीच अंतिम उद्दिष्टे असतात. त्या अनुषंगाने उपक्रम राबवणे आणि जनजागृती करीत लोकशिक्षण करणे हे प्रबोधनवादी चळवळींना अखंडीतपणे करावे लागते. भली प्राधान्याची यादी नवी असेल. जसे आज इस्लामबद्दल आणि मुस्लीम समाजाबद्दल गैरसमज वाढवणारे, अपप्रचार करणारे नवे मुद्दे पुढे आले आहेत. तेव्हा मुस्लीम म्हणून नव्हे; पण एक समंजस नागरिक म्हणून देशाच्या आणि समाजाच्या हितासाठी धर्माचा अभिमान नाही; पण अपप्रचाराचा भाग आणि वस्तुस्थिती मांडली पाहिजे. भले मुस्लीम अनुनयाचा आरोप लागला तरी ! वास्तविक हे अनुनय नाही तर धर्माकडे पाहण्याचा स्वधर्मियांचा आणि अन्यधर्मियांचा दृष्टिकोन बदलण्यासाठी असेल. मुस्लीम समाजात जातीव्यवस्था आहे. अनेक मागास जाती आहेत. अशा मागास जातींना ते मुस्लीम आहेत म्हणून बाजूला ठेवले जाऊ नये. तर त्यांच्या शैक्षणिक-आर्थिक विकासासाठी आरक्षणाचा लाभ मिळायला पाहिजे. असे काही नवे विषय आहेत ज्याकडे मंडळ बदलत्या काळाची उद्दिष्टे म्हणून पाहते.*

*या मुलाखतीत एकूण अकरा प्रश्न विचारण्यात आले होते. त्या सर्व प्रश्नांची यादी आणि प्रतिसाद येथे मांडता येणार नाही. या प्रश्नांच्या प्रतिसादावर एक स्वतंत्र पुस्तक किंवा पुस्तिका तयार करता येईल. मात्र यातील एक महत्त्वाचा प्रश्न होता दलवाई मुस्लीम आणि हिंदूंचे भारतीयकरण व्हावे यासाठी आग्रही होते. तुमच्या मते मुस्लीम हिंदू आणि अन्य धर्मियांनी 'स्वतंत्र भारताची राज्यघटना' शिरोधार्य मानायला हवी. भारतीय संविधानात 'इंडिया, दॅट इज भारत.....' असे जे म्हटले आहे. स्वतंत्र भारत ज्या मूल्यांवर उभे करण्याचे आश्वासन दिले आहे, तो समाज निर्माण करण्यासाठी भारताचे वैभव, भारताची संस्कृती आणि संविधानिक मूल्ये आचरणात आणणे म्हणजे 'भारतीयकरण' आहे. आपणास आजच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर हिंदू-मुस्लिमांच्या भारतीयकरणाची मांडणी जी दलवाईंनी केली ती किती द्रष्टेपणाची होती हे लक्षात*

*येईल. थोडक्यात धर्माधिष्ठित राष्ट्रवाद बाजूला ठेवून संविधानात्मक राष्ट्रवाद निर्माण करणे म्हणजे 'भारतीयकरण' होय !*

*मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे मुखपत्र असलेली 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' ही नियमितपणे प्रकाशित होत असते. या वर्धापनदिन विशेषांकात वीसपेक्षा जास्त लेख आहेत. मुस्लीम प्रश्न - भारतीय समाज आणि जागतिक संदर्भ असलेले हे लेख आहेत. सर्व लेखक, वर्गणीदार, देणगीदार, प्रकाशक आणि सहानुभूतीदार यांच्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत. भविष्यातही ही चळवळ कार्यरत राहावी, मुस्लीम सत्यशोधक मंडळास अधिक जोमाने कार्य करता यावे यासाठी आपल्या शुभेच्छांची आणि सहकार्याची अपेक्षा आहे.*

**– संपादक**


## फॉर्म ४ (नियम८) अन्वये निवेदन

१. प्रकाशनाचे नाव : मुस्लीम सत्यशोधक पत्रिका

२. प्रकाशनाचे स्थळ : पुणे

३. प्रकाशनाचा काळ : त्रैमासिक

४. प्रकाशनाची भाषा : मराठी

५. संपादक, मुद्रक व प्रकाशकाचे नाव व पत्ता :
प्रा. शमसुद्दीन तांबोळी, सी ८/२३ स्टेट बँक नगर, पंचवटी, पाषाण, पुणे ४११००८.

६. नागरिकत्व : भारतीय

७. मुद्रणस्थळ : साई समर्थ प्रिंटर्स, दुकान क्र. ४,
विठ्ठल हाईटस्, आनंदनगर, हिंगणे (खुर्द), पुणे ५१.

८. मालकाचे नाव : मुस्लीम सत्यशोधक मंडळ (महाराष्ट्र)

मी, प्रा. शमसुद्दीन तांबोळी जाहीर करतो, की वरील सर्व तपशील माझ्या माहिती व विश्वासाप्रमाणे खरा आहे.

पुणे — सही/-

दि. २८-२-२०२३ — **प्रा. शमसुद्दीन तांबोळी**

अंक विशेष

# समान नागरी कायदा : अनिवार्यता आणि ध्रुवीय राजकारण

• डॉ. शमसुद्दीन तांबोळी

*धर्माचा आपण केवळ एकमेकांचा द्वेष करण्यासाठीच वापर करतो,*
*एकमेकांवर प्रेम करण्यासाठी मात्र त्याचा पुरेसा उपयोग करीत नाही.*

**- जोनाथन स्विफ्ट**

स्वतंत्र भारताची घटना निर्माण काळापासून ते भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षातही सर्वाधिक चर्चेत राहिलेला विषय म्हणजे समान नागरी कायदा. समाजप्रबोधन आणि लोकशिक्षणाऐवजी हा विषय सत्ता संपादन राजकारणाच्या केंद्रस्थानी आल्यामुळे अधिक जटिल आणि अस्मितेचा बनला आहे. या संदर्भातील नकारात्मकता कमी होऊन सकारात्मकता कशी वाढवता येईल ? काही पर्याय सापडतात का ? यासाठी प्रामाणिक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थी असताना एक वाक्य ऐकायला मिळायचे, 'पावसाळा आला की रस्त्यावर छत्र्या दिसतात तसे निवडणुका आल्या की समान नागरी कायद्याची चर्चा होते.' आता पाऊस कधी पडेल हे सांगता येत नाही आणि कोणत्या निमित्ताने समान नागरी कायद्याचा विषय चर्चेला येईल याचा अंदाज बांधता येत नाही. अलीकडे सगळंच बेभरवशाचं झालं आहे.

समान नागरी कायदा किंवा अधिक योग्य शब्द वापरायचा झाला तर समान नागरी संहिता. ('कोड' या शब्दाचा अर्थ 'संहिता' आहे; परंतु लेखात 'कायदा' हा शब्द प्रचलित असल्याने तोही वापरण्यात आला आहे.) संविधान निर्मितीच्या काळापासून विरोध, वाद आणि प्रतिवादाचा आणि चिंतेचा विषय आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात तर हा विषय अधिक संवेदनशील बनला आहे. फरक एवढाच आहे की तेव्हा 'सर्वच धर्मांनी महिलांना दुय्यम स्थान दिले आहे, धार्मिक कायदे नियम महिलांवर अन्याय करतात, त्यामुळे शोषण होते आणि विषमता जोपासली जाते. स्वातंत्र्यानंतरचा भारत समता आणि आधुनिकतावादी बनवायचा असल्याने संपूर्ण भारतासाठी आणि सर्वधर्मीयांसाठी

समान नागरी संहिता अस्तित्वात आणावी.' अशी संविधानकर्त्यांची इच्छा होती. या संविधानाला 'इकडून तिकडून आणलेल्या कापडांची बनवलेली गोधडी' अशी संभावना करणारे आणि त्या काळात समान नागरी संहितेस विरोध करणारे हिंदुत्ववादी आज समान नागरी संहितेची भाषा करतात. हा जो फरक पडला आहे तो हिंदुत्ववाद्यांचे मतपरिवर्तन झाले, ते आधुनिकतावादी झाले किंवा समतावादी झाले म्हणून पडला आहे का ? हेही तपासून पाहायला पाहिजे आणि तशी शहानिशा व्हायला पाहिजे.

समान नागरी संहितेचे समर्थक आणि विरोधक कोण होते ? आणि का ? या प्रश्नाचे उत्तर अगदी उघड आणि सोपे आहे. समान नागरी संहितेच्या बाजूने ते होते जे समतावादी होते, समाजवादी होते, आधुनिकतावादी, विज्ञानवादी, उदारमतवादी, धर्मनिरपेक्ष, पुरोगामी आणि परिवर्तनवादी विचारांवर निष्ठा बाळगणारे होते. यात समतावादी डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते, समाजवादी डॉ. राममनोहर लोहिया होते, आधुनिकतावादी पंडित जवाहरलाल नेहरू होते, बुद्धिप्रामाण्यवादी बॅरिस्टर एम. सी. छगला होते आणि नंतरच्या काळात धर्मनिरपेक्षतावादी हमीद दलवाई होते. याची लांबलचक यादी होईल. समान नागरी संहितेचे विरोधक कोण होते ? त्याचे उत्तर, जे धर्मवादी होते तसेच विषमतावादी, अलगतावादी, मूलतत्त्ववादी, जमातवादी, संप्रदायवादी, परंपरावादी आणि प्रतिगामी होते. यात हिंदू होते, मुस्लीम होते, ख्रिश्चन होते. बहुतेक सर्व धर्मांचे, पंथांचे संघटना आणि राजकीय पक्ष होते. भारताला स्वातंत्र्य मिळत असताना धर्म वर्चस्ववाद्यांच्या अविवेकी वर्तनामुळे देशाची दुर्दैवी फाळणी झाली. या संवेदनशील परिस्थितीत समान नागरी संहिता अमलात आणताना पंडित जवाहरलाल नेहरूंनी अल्पसंख्याक समाजाची भावनिक असुरक्षितता विचारात घेतली आणि सर्वसमावेशकतेची धारणा समोर ठेवून हा विषय संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वांत ठेवण्यात आला. योग्य परिस्थिती निर्माण झाली की सर्व धर्मांसाठी, भारताच्या सर्व भागात समान नागरी संहिता अस्तित्वात आणण्याचा मानस व्यक्त केला. म्हणजेच देशात लोकशाही रुजली, धर्मनिरपेक्षता अंगीकारली, महिलांकडे सन्मान-समानतेने पाहण्याची दृष्टी विकसित झाली आणि भारतीय समाज आधुनिकतावादाच्या दिशेने वाटचाल करू लागला की समान नागरी संहिता अस्तित्वात आणणे हे धर्मनिरपेक्ष लोकशाहीचे एक प्रकारे अपत्य ठरेल. हा समान नागरी संहितेचा गर्भ विकसित करण्यासाठी संविधानात समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि आधुनिकतावादी मूल्ये

बाळगली. त्यानुसार एकानंतर एक कायदे निर्माण झाले. ऐच्छिक स्वरूपातील विशेष विवाह कायदा (१९५४) अस्तित्वात आणला. हिंदू कोड बिल मांडण्यात आले तेव्हा प्रचंड विरोध झाला. ५ फेब्रुवारी १९५१ रोजी हे विधेयक संसदेत मांडले असता चर्चेत भाग घेणाऱ्या २८ सदस्यांपैकी २३ सदस्यांनी विरोध केला. पाच दिवस वादळी चर्चा झाली. ज्या १४ सदस्यांनी भाषणे केली त्यांपैकी १३ सदस्यांनी विरोध केला. पश्चिम बंगालमधील सदस्य नझिरूद्दीन अहमद यांनी हे विधेयक भेदभाव करणारे असल्याचे सांगितले. हे विधेयक मुस्लीम समाजालाही लागू करावे अशी त्यांची मागणी होती. एकूणच विरोधाचे स्वरूप पाहून या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना राजीनामा द्यावा असे वाटले आणि त्यांनी मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. शेवटी १९५५ मध्ये हिंदू कोड बिल संमत करण्यात आले. नंतरच्या काळात पारशी, ख्रिश्चन, शिखांच्या व्यक्तिगत कायद्यात संविधान अनुरूप सुधारणा झाल्या. अनेक कायदे निर्माण झाले. अगदी कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायद्यापर्यंतची ही यादी आहे.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंना जेव्हा विचारण्यात आले की, 'पंतप्रधान म्हणून त्यांना देशातील सर्वात मोठे आव्हान कोणते वाटते?' तेव्हा नेहरू म्हणाले, 'अनेक धर्म असलेल्या या देशाला सेक्युलर बनवणं.' पंडित नेहरूंनी बाबासाहेब आंबेडकरांना कॅबिनेटमध्ये घेऊन देशाच्या धोरणनिर्मितीत आघाडीवर आणले. समान नागरी संहिता बनवण्यासाठी नेहरू डॉ. आंबेडकरांवर विसंबले होते. डॉ. आंबेडकरांनी कायम सेक्युलॅरिझम आणि समानता या तत्त्वांचा पुरस्कार केला. डॉ आंबेडकर म्हणतात, 'निवडणुका या अशा मुद्यांवर लढल्या जायला हव्यात की ज्यांचा धर्माशी काही संबंध नसेल. राजकीय पक्षाला कोणत्याही भावनेच्या आधारे ज्या भावनेचा लोकांच्या रोजच्या भौतिक जीवनाशी काही संबंध नसेल, अशा भावनेच्या आधारे आवाहन करण्यास परवानगी असता कामा नये.' पंडित नेहरू किंवा डॉ. आंबेडकर हे राष्ट्रवादी होते तेवढेच ते सेक्युलर आणि आधुनिकतावादी होते. समान नागरी संहिता आणण्याबाबत गंभीरपणे विचार करीत होते.

आजच्या राजकीय नेत्यांची वक्तव्ये विचारात घेतली तर स्वातंत्र्यानंतरच्या सात दशकात परिस्थिती पुढे गेली की पुन्हा शून्यावर आली हे लक्षात येईल. मा. नरेंद्र मोदी २०१४ च्या निवडणूक प्रचारादरम्यान म्हणाले, 'आपण हिंदू कुटुंबात जन्माला आलो, आपण एक राष्ट्रवादी आहोत आणि म्हणून हिंदू राष्ट्रवादी आहोत.'

भाजपचे केंद्रातील एक मंत्री अनंत कुमार हेगडे म्हणाले होते की, भाजपला संविधान बदलायचे असून सेक्युलर ओळख पुसून टाकायची आहे. तर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले की, सेक्युलर मूल्ये ही स्वतंत्र भारतातील सर्वात मोठी थाप आहे. वास्तविक धर्मनिरपेक्षता हा भारतीय राष्ट्रवाद संकल्पनेचा एक अविभाज्य घटक आहे. मात्र देशाला हिंदू राष्ट्र बनवण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. राममंदिर, गोरक्षा, लव्ह जिहाद, घरवापसी या विषयांच्या यादीत समान नागरी संहिता जर आणली जात असेल, तर त्या समान नागरी कायद्याची प्रत कशी असेल याची कल्पना करणे सहज शक्य आहे. सावरकरांनी हिंदूची व्याख्या करताना 'ज्यांची जन्मभूमी आणि पुण्यभूमी या दोन्ही सिंधू नदीच्या पूर्वेस आहेत तोच खरा हिंदू' असे म्हटले. तर संघप्रमुख मा. मोहन भागवत मुस्लीम आणि ख्रिश्चन समाजाला हिंदू धर्माच्या छत्राखाली आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत. समानतेऐवजी समरसता महत्त्वाची वाटते.

या पार्श्वभूमीवर प्रथम समान नागरी संहितेची आवश्यकता आणि समर्थन कशासाठी ? आणि नंतर समान नागरी संहितेची हिंदुत्ववाद्यांची जबरदस्ती कशासाठी ? या दोन मुद्यांवर प्रकाश टाकणे आवश्यक वाटते.

## समान नागरी संहितेची आवश्यकता

१) सर्व धर्माच्या महिलांना संविधानाने भारतीय नागरिक म्हणून दिलेल्या समता, समानता या मूल्यांची प्रस्थापना करण्यासाठी आणि शोषण आणि विषमतेच्या निर्मूलनासाठी.

२) सर्व महिलांचा सन्मान, कायद्याचे समान संरक्षण, समान संधी आणि समान न्यायाची हमी देण्यासाठी.

३) भारतातील सर्वधर्मीय नागरिकांना समान नागरिकत्व आणि समान नागरी हक्क उपभोगता यावेत यासाठी.

४) धर्मवादी, जमातवादी शक्तींचा प्रभाव कमी करून धर्मनिरपेक्षता अस्तित्वात आणण्यासाठी.

५) अलगतावादी मानसिकता कमी करून आधुनिक धर्मनिरपेक्ष एकात्म असा भारतीय समाज निर्माण करण्यासाठी.

## हिंदुत्ववाद्यांची समान नागरी कायद्यासाठी जबरदस्ती कशासाठी ?

आरंभीच्या काळात ज्या समान नागरी संहितेला विरोध केला तोच आजच्या अजेंड्यावरचा विषय कसा ठरला हे पाहायला पाहिजे.

१) भारतीय समाजाला आधुनिकतावादी बनवायचे असेल, तर या देशात बहुसंख्य असलेल्या हिंदू समाजातील महिलांवरील अन्याय, शोषण दूर करून त्यांना समान अधिकार देणारी संहिता अर्थात हिंदू कोड बिल अमलात येऊ नये यासाठी हिंदुत्ववादी संघटना आणि नेत्यांनी प्रचंड विरोध केला. तरीही पंतप्रधान नेहरूंनी तो अमलात आणला. सुधारणा आमच्यातच कशाला ती अन्य धर्मीयांच्या कायद्यातही असावी, ही एक भावना होती. ते झाले नाही. त्याचा राग आणि प्रतिक्रिया म्हणून समान नागरी संहितेची मागणी अजेंड्यावर आली.

२) आमच्या कायद्यात बदल केले. मात्र मुस्लिमांना त्यांचे स्वतंत्र कायदे. या भावनेतून मुस्लीम द्वेष निर्माण झाला. 'आम्हाला कायदा आणि तुम्हाला मात्र फायदा.' अशी स्पर्धात्मक ईर्ष्या निर्माण झाली. त्यामुळे मुस्लिमांना विरोध या भावनेतून समान नागरी कायद्याची मागणी .

३) मुस्लीम पुरुष आपल्या बायकोला कधीही तलाक देऊ शकतो. तो दुसरे-तिसरे लग्न करू शकतो. आमची ही सोय काढून घेतली. 'आम्हाला सवलत नाही तर तुम्हालाही सवलत नको.' पुढे आकस आणि मत्सराच्या भावनेने सहानुभूतीची जागा घेतली. 'मुस्लीम महिलांवर अन्याय होतो' अशी सबब पुढे आली.

४) एक मुस्लीम पुरुष चार-चार बायका करतो. एका बायकोला चार-पाच अपत्ये जन्माला येतात. असा गैरअर्थ काढून 'हम पांच हमारे पच्चीस' असा अतार्किक मुद्दा पुढे आणला गेला. मुस्लीम फोबीया तयार करण्यासाठी मुस्लीम व्यक्तिगत कायद्याचा वापर सुरू झाला.

५) मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील तरतुदींमुळे मुस्लिमांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून त्यांची लोकसंख्या हिंदूंपेक्षा जास्त होईल ही अवास्तव भीती निर्माण केली. मुस्लिमांना वठणीवर आणण्यासाठी समान नागरी कायदा हाच उपाय वाटला.

६) भारतात द्विभार्या प्रतिबंधक कायदा आहे, मात्र तो मुस्लिमांना लागू नाही. भारतात बालविवाह प्रतिबंधक कायदा आहे, मात्र तो मुस्लिमांना लागू नाही. हिंदूंसाठी मूल दत्तक घेण्याची सुविधा आहे, तर मुस्लीम कायदा मूल दत्तक घेण्यास विरोध करतो. त्यामुळे मुस्लीम पुरुषाला दुसरे लग्न करण्यास प्रोत्साहन मिळते अशी धारणा निर्माण झाली.

७) समान नागरी कायद्याचा विषय काढला की मुस्लीम समाज चिडून

उठतो, प्रतिक्रिया देतो, भडकतो, 'इस्लाम खतरे में है' म्हणतो म्हणून समान नागरी कायद्याचा मुद्दा डिवचण्यासाठी एक हत्यार बनते. तसेच मुस्लिमांविरुद्ध हिंदूंना एकत्र करता येते. हे एक ध्रुवीकरणाचे अवजार बनवता येते. हिंदू व्होट बँक तयार करण्याची संधी मिळते. यासाठी हिंदुत्ववाद्यांना समान नागरी कायद्याची आवश्यकता वाटते.

समाजवादी विचारवंत नेते डॉ. राममनोहर लोहिया यांनी 'चोखंबा' या मुखपत्रात १९५४ मध्ये दीर्घ लेख लिहून समान नागरी कायद्याची गरज व्यक्त केली होती. हमीद दलवाईंनी समान नागरी कायद्याची प्रेरणा डॉ. लोहियांपासून घेतली.

संघपरिवाराने जसा समान नागरी कायद्याचा विषय हातात घेतला तसा काही समाजवादी मंडळींनी आपले हात भाजतील या भीतीपोटी हा महत्त्वाचा विषय सोडून दिला. सर्वसमावेशकता, बहुविविधता, धर्मस्वातंत्र्य, अल्पसंख्याकांचे सांस्कृतिक हक्क अशा सबबीखाली डाव्यांनी आणि तथाकथित पुरोगाम्यांनी समान नागरी कायद्याचे जे शस्त्र टाकून दिले ते शस्त्र हिंदुत्ववाद्यांनी उचलले.

वास्तविक समान नागरी संहिता हा संविधानिक नैतिकतेचा आणि संविधानिक कर्तव्याचा भाग आहे. मुस्लीम महिलांना मानवी अधिकार देण्याचा मुद्दा आहे. धर्मापलीकडे जाऊन मानवतावादी विचार रुजवण्याचा तसेच अलगतावाद बाजूला सारून धर्मनिरपेक्ष एकात्म समाज निर्माण करण्याबाबतची कटीबद्धता आहे. याचसाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाने आरंभापासून आणि आजतागायत समान नागरी कायद्याचे केवळ समर्थन नाही, तर तो अस्तित्वात आणण्यासाठी जनजागृतीचे उपक्रम घेतले आणि आजतागायत सरकारदरबारी विनवण्या करीत आहे.

आजच्या घडीला संघपरिवार आणि भाजप निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून समान नागरी संहिता तयार करण्याबाबत बोलबाला करते तेव्हा या काही प्रश्नांची उत्तरे अपेक्षित आहेत.

१) भाजप आणि संघपरिवाराची भारतीय संविधानावर आणि संविधानिक मूल्यांवर निष्ठा आहे का ?

२) महिलांना समान अधिकार देऊन समानता प्रस्थापित करण्यासाठी कटीबद्ध आहेत का ? तशी असती तर शबरीमला संदर्भात न्यायालयाने दिलेल्या निवाड्यावर काय भूमिका घेतली ? बिल्कीसबानो बलात्कार प्रकरणातील

आरोपींच्या शिक्षेत सवलत देऊन सुटका करण्यात कोणती प्रेरणा आहे ?

३) भारतातील सर्व धर्मीयांबद्दल अपपरभाव, बंधुभाव व्यक्त करून समान नागरी हक्क आणि संधी दिली जाते का ? भाजपच्या निवडणुकीतील उमेदवारात मुस्लीम उमेदवार असतात का ? साध्वी निरंजन ज्योती जे हिंदू नाहीत ते 'हरामजादे' असे म्हणतात आणि योगी आदित्यनाथ 'मृत पावलेल्या मुस्लीम महिलेवरही बलात्कार करा' असे वादग्रस्त वक्तव्य करतात तेव्हा त्यांच्यावर काय कारवाई केली ? मुस्लिमांना दुय्यम नागरिक बनवण्याकडे जे प्रयत्न चालू आहेत. ते समान नागरी हक्कांसाठी दिलेली शाश्वती आहे ?

४) संविधानिक राष्ट्रवादापेक्षा उघडउघड हिंदू राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते म्हणवून घेणारे कोणत्या मूल्यावर समान नागरी संहिता आणू इच्छितात हे समजायला पाहिजे.

५) आज शहरांची, रस्त्यांची, बगिच्यांची, राष्ट्रीय वास्तूंची नावे बदलून सर्वसमावेशक इतिहासाची पाने पुसण्याचे प्रयोग कशाचे निर्देश आहेत ?

६) अनेक याचिका हाताळताना सर्वोच्च न्यायालयाला वेळोवेळी असे लक्षात आले की, मुस्लीम महिलांची होणारी मुस्कटदाबी आणि संविधानिक अधिकाराचे हनन मुस्लीम व्यक्तिगत कायद्यामुळे होते. अगदी शहाबानो प्रकरणाच्या निवाड्यातही समान नागरी कायदा अस्तित्वात येण्याची गरज व्यक्त केली. न्या. यशवंतराव चंद्रचूड आणि नंतर न्या. कुलदीपसिंग, न्या. व्ही. एन. खरे आणि इतरही न्यायाधीशांनी समान नागरी कायद्याची शिफारस केली. तसेच या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आजपर्यंत कोणते प्रयत्न केले याची सविस्तर माहिती १६ ऑगस्ट १९९६ पर्यंत सरकारने न्यायालयाला द्यावी असा आदेश दिला होता. तेव्हा सरकारने याचे सकारात्मक उत्तर देण्याऐवजी 'असा प्रश्न विचारण्याचा न्यायालयाला अधिकार नाही' असे उत्तर दिले. याचप्रमाणे भाजपप्रणित सरकार असताना भाजपचे गोरखपूरचे खासदार योगी आदित्यनाथ यांनी लोकसभेत समान नागरी कायद्याविषयी खाजगी विधेयक मांडले होते; परंतु तेव्हाही या विषयावर सर्व सहमतीचे वातावरण निर्माण होत नाही तोवर थांबणे आवश्यक आहे असे कारण जाहीररित्या देण्यात आले होते. ऑक्टोबर २०१५ मध्ये पुन्हा सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला सांगितले की नोव्हेंबर २०१५ पर्यंत सरकारने समान नागरी कायदा आणण्यासाठी काय प्रयत्न केले याचा तपशील सादर करावा. सरकारने कोणता व काय तपशील दिला किंवा दिलाच नाही ही

माहिती पुढे आली नाही. याचा अर्थ असा होतो की समान नागरी कायदा अस्तित्वात आणण्याबाबत राजकीय पक्षांकडे प्रामाणिकपणा नाही. त्यामुळे गंभीरतेचा अभाव आहे.

७) समान नागरी कायदा हा संविधानिक मुद्दा आहे, तो निवडणुकीत हिंदू किंवा मुस्लीम मतपेटीवर डोळा ठेवायचा नाही. मध्यंतरी उत्तराखंडच्या निवडणुका असताना आणि आता गुजरात, हिमाचल प्रदेशमध्ये निवडणुका तोंडावर असताना या विषयाला तोंड फुटले आहे. गुजरातमध्ये तर मंत्रिमंडळाने समान नागरी कायद्यासाठी समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला. खरं म्हणजे उत्तर प्रदेशात जर लव्ह जिहादचा मुद्दा पुढे करून धर्मांतर विरोधी कायदा आणला जातो तर समान नागरी संहितेबद्दल अद्याप प्रयत्न का झाले नाहीत ? विविध राज्यांच्या निवडणुका असताना हा विषय अजेंड्यावर आणण्याऐवजी केंद्र सरकार समान नागरी कायद्यासाठी समिती गठीत करून, त्याचा मसुदा तयार करून, तो जनतेसमोर ठेवून, त्यावर चर्चा का घडवून आणत नाही ? हा विषय जरी समवर्ती सूचीत असला आणि राज्य व केंद्र सरकार कायदा तयार करू शकत असले, तरी तो केंद्राने तयार करणे हे जास्त संयुक्तिक आहे. असे न करणे हा दुटप्पीपणा आहे का ? असा प्रश्न उपस्थित केला जातो. गोहत्या किंवा गोवंश हत्या प्रतिबंध कायदा काही सोईच्या राज्यांत आहे आणि गैरसोयीच्या राज्यांत नाही. याचा अर्थ कसा काढायचा ? पोर्तुगीजांनी तयार केलेला समान नागरी कायदा गोव्यात आहे. मात्र तेथे आज भाजप सरकार असतानाही गोहत्या प्रतिबंधक कायदा नाही. समान नागरी कायद्याला राजकीय मुद्दा ठरवून त्याचा संविधानिक आत्मा संपवण्यात येत आहे हे यावरून स्पष्ट होते.

एका उजव्या विचारसरणीच्या मित्राशी गप्पा मारताना, मुस्लीम सत्यशोधक मंडळ समान नागरी कायद्याची मागणी करते हे त्यांच्या लक्षात आले. तेव्हा ते म्हणाले, 'तुम्ही मुस्लिमांनी समान नागरी कायद्याची मागणी केली तर आम्ही कोणते राजकीय हत्यार वापरणार ?'

भारतातील मुस्लीम जमातवादी राजकारण आणि संसदेपेक्षा शरियत महत्त्वाची ही मानसिकता अनेक अनर्थाचे कारण आहे. मुस्लीम जमातवादी संघटना आणि राजकीय पक्षांनी याबाबत सतत आक्रमक भूमिका घेतली आहे. व्यक्ती प्रतिष्ठेपेक्षा धर्म प्रतिष्ठेला प्राधान्य दिले. अगदी अलीकडे मुस्लीम व्यक्तिगत कायदा मंडळाने मुस्लीम मुलीच्या विवाहासाठी सोळा वर्षांपर्यंतची अट असावी आणि

भारतात अस्तित्वात असलेला 'बालविवाह प्रतिबंधक कायद्यातून' मुस्लिमांना वगळावे अशी मागणी केली. तोंडी तलाक, बहुपत्नीत्व, हलाला आणि हिजाब सारख्या विषयांवर मध्ययुगीन भूमिका घेऊन केवळ महिलांना मानसिक गुलाम बनवले नाही, तर संविधान, संसद आणि सर्वोच्च न्यायालयाविरुद्ध आकांडतांडव केले. यातून मुस्लीम समाजाचे प्रश्न वाढले. त्याचा फायदा हिंदुत्ववाद्यांना घेता आला.

मुस्लीम सत्यशोधक मंडळासाठी समान नागरी कायदा हा समाज प्रबोधनाचा मुद्दा आहे. भारतीय समाजाच्या अनेकअंगी समस्या सोडवण्यासाठी समान नागरी कायद्याची मागणी मंडळ करते. समाजाचे आधुनिकीकरण आणि भारतीयकरण करण्यासाठी समान नागरी कायदा हवा आहे. असा शुद्ध हेतू ठेवून समान नागरी कायदा अस्तित्वात येणार असेल तर मुस्लीम सत्यशोधक मंडळ त्याचे स्वागतच करणार. मात्र मुस्लीम द्वेष, धृवीकरण, निवडणुका, हिंदू मतपेटी आणि हिंदू राष्ट्र निर्माण करण्यासाठी एक हत्यार म्हणून समान नागरी कायद्याचा वापर होत असेल आणि त्यात धर्मनिरपेक्षता, समता आणि संविधानिक मूल्यांचा बळी जाणार असेल, तर येऊ घातलेला समान नागरी कायदा 'औषधापेक्षा रोग बरा' असे म्हणण्याजोगा असेल का ? आय. एल. एस. विधी महाविद्यालयाचे दिवंगत प्राचार्य आणि विधीतज्ज्ञ डॉ. सत्यरंजन साठे यांनी त्यांचे प्राध्यापक डॉ. जया सागडे आणि डॉ. वैजयंती जोशी या सहकाऱ्यांसमवेत समान नागरी कायद्याचा एक मसूदा तयार केला आहे. ऐच्छिक स्वरूपात अस्तित्वात असलेल्या विशेष विवाह कायदा (१९५४) आणि गोव्यात अस्तित्वात असलेल्या समान नागरी कायद्यातील त्रुटींचा अभ्यास आणि आवश्यक त्या सुधारणा कराव्यात. विविध धर्मातील अभ्यासकांची आणि कायदेतज्ज्ञांची समिती स्थापन करून लोकांसमोर सर्वसमावेशक मसुदा ठेवून समान नागरी कायद्यावर चर्चा घडवून आणण्यासाठी केंद्र सरकारनेच पुढाकार घेणे हिताचे ठरणार आहे. तांत्रिकदृष्ट्या समान नागरी कायदा हा जरी समवर्ती सुचीत असला आणि राज्य किंवा केंद्राला असा कायदा करण्याचा अधिकार असला, तरी यात सुसंगतता आणण्यासाठी आणि संपूर्ण भारतीय समाजासाठी असा कायदा असणे संविधानास अपेक्षित असल्याने त्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घेणे अधिक उचीत ठरेल अन्यथा अनेक संभ्रम निर्माण होण्याची शक्यता पाहिजे.

स्वतंत्र भारताची घटना तयार होताना ते या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी

वर्षातही समान नागरी कायद्यावर चर्चा होत राहिली. इतिहास असे सांगतो की, या संदर्भात शासनाने सकारात्मक असे लोकशिक्षण, जनजागृती करण्याऐवजी मतलबी राजकारण केले गेले.

'समान नागरी कायद्यास सर्व धर्मीय नेत्यांचा विरोध आहे, समान नागरी कायदा अस्तित्वात येताना अस्तित्वात असलेल्या सर्व धर्मीयांच्या व्यक्तिगत कायद्यात बदल अपेक्षित आहे. आज फक्त मुस्लीम विरोध पटलावर दिसतो.' हे असे बोलले जात असले, तरी एक सत्य नाकारता येणार नाही. आजपर्यंत जवळपास सर्व धर्म समूहांच्या व्यक्तिगत कायद्यात सुधारणा झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सर्वप्रथम हिंदू कोड बिल अस्तित्वात आणून सर्व समाजातील कायद्यात सुधारणा घडवून आणण्याची एक पार्श्वभूमी तयार केली होती. बहुसंख्याक समाजाच्या कायद्यात प्रथम सुधारणा केली की तो आदर्श समोर ठेवून अन्य व्यक्तिगत कायद्यात सुधारणा घडवून आणणे किंवा समान नागरी कायदा अस्तित्वात आणणे सोपे जाईल, अशी एक धारणा होती. सामाजिक सुधारणेस बहुसंख्याक समाजातून सुरुवात झाली तर त्याचा परिणाम अल्पसंख्याक समाजात सुधारणा करण्यात होऊ शकेल, अशी नैतिक जबाबदारी आणि कर्तव्याची भावनाही हिंदू कोड बिल अस्तित्वात आणताना होती. तो बहुसंख्याक समाजातील नेत्यांच्या विरोधाला तोंड देत अस्तित्वात आला. मात्र नेहरू-आंबेडकर नंतरच्या काळातील राजकारण्यांनी या विषयाला बगल दिल्याचे दिसून येते. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी कदाचित असे प्रयत्न केले असते. किमान त्यांनी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला शहाबानो निवाडा संसदेत फिरवला नसता. जो पंतप्रधान राजीव गांधी यांनी फिरवला. परिणामी भारतातील राजकारणाला आपली कूस बदलण्यास संधी मिळाली. शहाबानो प्रकरण, रथयात्रा, बाबरी पाडाव, साखळी बॉम्बस्फोट, धार्मिक दंगली आणि गुजरात हिंसाचार या घटना दोन दशकात घडल्या. (साधारणपणे १९८५ ते २००५) या काळात हिंदुत्ववादी शक्तीने जोर धरला आणि भाजप सत्तेत आला. सत्ता टिकवण्यासाठी जसे काँग्रेसकडून मुस्लीम अनुनय करण्यात आला, तसे भाजपकडून हिंदू-मुस्लीम धृविकरण वाढवण्यात आले.

शहाबानो प्रकरणापासून ते तोंडी तलाक बंदी आणि हिजाबबंदी प्रकरणाकडे पाहिल्यास असे लक्षात येते की, मुस्लीम समाज प्रबोधनाच्या अशा विषयावर उदारमतवादी काँग्रेसने प्रतिगामी भूमिका घेतली, तर धर्मवादी भाजपने

सुधारणावादी चादर पांघरूण हिंदू व्होट बँक मजबूत केली.

समान नागरी संहितेशी संबंधित विवाह, घटस्फोट, मूल दत्तक, पोटगी, विवाहाचे वय, वडिलोपार्जित मालमत्ता आणि यांसारखे कौटुंबिक कायद्याच्या बाबतीत सर्वाधिक विषमता ही मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात आहे. अन्य धर्मीयांच्या व्यक्तिगत कायद्यात काही अपवाद वगळता वेळोवेळी सुधारणा झाल्या आहेत. त्यामुळे आजतरी जेव्हा जेव्हा समान नागरी कायदा विषय पटलावर येतो तेव्हा तेव्हा त्यास मुस्लीम संदर्भ असणे स्वाभाविक आहे.

आजही अशी स्थिती आहे की, धर्मनिरपेक्षतेशी बांधिलकी आहे असे सांगणारे काँग्रेस किंवा अन्य राजकीय पक्ष सत्तेवर आल्यास ते समान नागरी संहिता आणण्याचे धाडस करणार नाहीत. कारण हे पक्ष जर सत्तेवर आले तर ते मुस्लिमांच्या मतावरच येण्याची शक्यता आहे. यात विरोधाभास असा आहे की, धर्मनिरपेक्षतेशी बांधिलकी नसणाऱ्या भारतीय जनता पक्षाकडून समान नागरी संहिता अस्तित्वात येण्याची शक्यता जास्त आहे.

'संविधान बचाओ' म्हणणाऱ्यांना समान नागरी कायदा अस्तित्वात आणण्याचे संविधानिक कर्तव्य बजावता येत नाही. संविधानिक मूल्यांवर गदा आणणारे मात्र संविधानिक नैतिकता असणाऱ्या समान नागरी कायद्यासाठी आग्रही आहेत.

## प्रबोधनाचा हा पेच सोडवणार कसा ?

तलाकबंदी झाल्यानंतर तलाक प्रश्नाची तीव्रता कमी झाली आहे, मात्र मुस्लीम समाजातील तलाकचा विषय संपला असे म्हणण्याजोगी स्थिती नाही. आजही तलाक घर बसल्याच होतात. फक्त तीन मिनिटांऐवजी तीन महिने लागतात. तलाक-ए-बिद्दत (तोंडी एकतर्फी एका दमात दिलेला तलाक) संपुष्टात आला. मात्र तलाक-ए-सुन्नत मधील तलाक-ए-हसन, तलाक-ए-अहसन, तलाक-ए-खुलाह हे तलाकचे प्रकार वापरण्यासाठी न्यायालयात जावे लागत नाही. आजही एक पत्नी असताना दुसरा विवाह बेकायदेशीर नाही, हलालाचे प्रकार होत आहेतच. यासाठी एकतर मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करून या तरतुदींवर मर्यादा आणाव्या लागतील किंवा संविधानास अपेक्षित समान नागरी संहितेसाठी आग्रह धरावा लागेल.

या सर्व चर्चेवर पांघरूण घालण्याचे दोन सोपे उपाय म्हणजे सर्वांना विशेष विवाह कायद्यांतर्गत (१९५४) विवाह नोंदणी अनिवार्य करणे. दुसरा उपाय

तलाकची प्रकरणे न्यायालयीन प्रक्रियेतून सोडवणे अनिवार्य करणे. न्यायालयातून तलाक झाल्याशिवाय दुसरा विवाह बेकायदेशीर ठरवणे. हे एवढे झाले तरी आजमितीस समान नागरी संहितेचा ९०% प्रश्न सुटलेला असेल. प्रश्न आहे हे होणार कसे आणि कोणाकडून ? राजकीय पक्ष आपापली भूमिका पार पाडतील, त्यासाठी समाजाची मनोभूमिका तयार करण्यासाठी अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे.

*(लेखक मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष आहेत.)*

■ ■

धर्मनिरपेक्षतेची कल्पना इस्लामशी सुसंगत नाही, कारण धर्मनिरपेक्ष राज्यात परमेश्वराने निर्माण केलेल्या कायद्यांना काहीच स्थान नाही आणि धर्मनिरपेक्ष कायदे इस्लामला मान्य नाहीत. इस्लाममध्ये धर्म आणि राजकारण यांची फारकत करता येत नाही, असे मानले जाते. म्हणून परंपरावादी मुसलमान धर्मनिरपेक्षता मान्य करीत नाहीत. धर्मनिरपेक्षता म्हणजे निरीश्वरवाद असेही त्यांना वाटते आणि निरीश्वरवादाला इस्लाममध्ये अजिबात स्थान नाही. इस्लाममध्ये अल्लावर विश्वास ठेवण्यावर भर दिला जातो. या सर्व कारणांमुळे परंपरावादी मुसलमानांना 'धर्मनिरपेक्षता' हा शब्दही अस्वस्थ करतो. इस्लाममध्ये मृत्यूनंतरच्या जीवनावर भर दिला आहे आणि धर्मनिरपेक्षतेत केवळ सध्याच्या वास्तव जगातील बाबींचा संबंध आहे. धर्मनिरपेक्ष तत्त्वज्ञानात मृत्यूनंतरच्या जगाला काहीच स्थान नाही.

**- असगरअली इंजिनिअर**

*(भारताची धर्मनिरपेक्षता : धोक्याच्या वळणावर - माधव गोडबोले, पृष्ठ क्र. ३७)*

अंक विशेष

# समान नागरी कायदा आणि वास्तव

• ॲड. संदीप ताम्हणकर

'समान नागरी कायदा हवा' असे म्हणणाऱ्यांना आणि त्याला विरोध करणाऱ्यांना अशा दोघांनाही याबाबत नीट आणि पुरेशी माहिती आहे, असे म्हणता येत नाही. याबाबत काही अंधश्रद्धा आहेत. समान नागरी कायदा हा शब्दप्रयोगही चुकीचा आहे. काही लोक तर याला समान 'नागरिक' कायदा असेही म्हणतात आणि असा कायदा आला, तर सगळे नागरिक समान होणार आणि जातीनिहाय आरक्षण संपणार असेही मला एका वकील मित्राने ठामपणे सांगितले. उत्तरांचल समितीला सर्वात जास्त सूचना लोकसंख्या नियंत्रणाबाबत आलेल्या आहेत, ज्याचा ह्या कायद्याशी काहीच संबंध नाही. गोळवलकर गुरुजींनीपण अशा कायद्याला विरोध केला होता, कारण त्यामुळे मुसलमान आणि हिंदूंमधील फरक नष्ट होईल, जे त्यांना नको आहे. काही लोक इंग्रजीत 'युनिफॉर्म सिव्हिल कोड' असा शब्दप्रयोग करतात; पण आपल्या देशात १९०८ पासून सिव्हिल कोड लागू असून तो सगळ्या धर्माच्या लोकांना सारखाच लागू आहे.

खरं तर याला 'समान कौटुंबिक कायदा' असं म्हटलं पाहिजे किंवा 'समान वैयक्तिक कायदा' असंही म्हणता येईल, कारण यामध्ये असलेले विषय हे मुख्यत्वेकरून पाच विषयांशी संबंधित आहेत. ते विषय म्हणजे १) विवाह २) घटस्फोट आणि पोटगी ३) संतती ४) दत्तकविधान आणि ५) वारसाहक्क. हे सगळे कौटुंबिक विषय आहेत. त्यामुळे यांना 'कौटुंबिक कायदे' असं म्हणणं जास्त बरोबर आहे. 'युनिफॉर्म पर्सनल कोड' किंवा 'फॅमिली कोड' असे इंग्रजीत म्हटले पाहिजे. असो....

आजच्या संघराज्य सरकारला या विषयाचे राजकारण करायचे आहे. म्हणूनच 'एका राज्यापुरता' समान नागरी कायदा आणण्यासाठी 'अभ्यास समित्या' नेमल्या जातात. अशा समितीची घोषणा गुजरातने नुकतीच केली, तर उत्तराखंडमध्ये नवीन समान नागरी कायदा लागू करणार आहे अशा बातम्याही गृहमंत्री अमित शहा यांच्या संदर्भाने येऊन गेल्या. असा कायदा बनवण्यासाठी उत्तराखंड राज्यात एक उच्चस्तरीय समितीही बनवली असून गेले आठ महिने

'अभ्यास' सुरूच असून, समितीकडे एकंदर २.५ लाख हजारांहून अधिक 'ऑनलाईन' सूचना आल्या आहेत. नुकतीच दिल्ली उच्च न्यायालयाने सरकारला असा कायदा करण्यासंदर्भात पावले उचलण्याची सूचना केली. महाराष्ट्र राज्य सरकारनेही याबाबत पावले उचलणार असे जाहीर केले आहे.

उत्तराखंड या हिंदुबहुल, धार्मिक आणि पहाडी राज्यामध्ये चाचणी स्वरूपात अंमलबजावणी करून गरज पडल्यास काही बदलांसह संपूर्ण देशभर, पुढील सार्वजनिक निवडणुकांपूर्वी संपूर्ण देशात समान नागरी कायदा लागू करण्याचा मोदी सरकारचा मानस आहे हे उघड गुपित आहे.

वास्तविक प्रत्येक राज्याने स्वतःचा वेगळा समान कौटुंबिक कायदा करणे राज्यघटनेला कलम ४४ नुसार बिलकुलच अपेक्षित नाही. असा कायदा संघराज्य सरकारने करावा असे म्हटलेले आहे. आजवर आपल्या देशातील 'वैयक्तिक कायदे' हे सर्व राज्यांमधील नागरिकांना सारखेच लागू आहेत. प्रत्येक राज्याचा वेगळा समान नागरी कायदा झाल्यास अभूतपूर्व गोंधळ होईल हे स्पष्ट आहे. तरीही भारताचे सरन्यायाधीश असताना न्या. शरद अरविंद बोबडे यांनी गोवा राज्यात असलेल्या समान नागरी कायद्याची असा कायदा केवळ आहे म्हणून, पण त्याच्या गुणदोषांचे मूल्यमापन न करता भलावण केली आहे.

भारतीय राज्यघटनेने दिलेला समानतेचा अधिकार सर्व जातीधर्मांच्या स्त्री-पुरुष आणि आबालवृद्धांना मिळालाच पाहिजे यासाठी देशामध्ये समान कौटुंबिक कायदा असणे आवश्यक आहे. समान नागरी कायद्याबद्दल संपूर्ण देशात इच्छा, अपेक्षा आणि उत्कंठा दाटून आलेली आहे असे दिसते. हिंदू कोड बिलापासूनच देशात समान नागरी कायदा असला पाहिजे, अशी आग्रही मागणी संघ परिवार करतो आहे. तसेच या मागणीच्या निमित्ताने कधी छुपे तर कधी उघड असे मुस्लिमद्वेषाचे आणि हिंदुत्वाचे राजकारणही केले जात आहे.

असा कायदा आणला की जातीय आरक्षणाची देशाला लागलेली कीड कशी एका दिवसात नष्ट होणार आहे याचे ग्यान फुकट वाटणारे कायप्पा विद्यापीठाचे निबंध समाजमाध्यमांवर जोरात फिरत आहेत. माझे एक राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेले मित्र म्हणाले की, 'मोदी सरकारला आरक्षण संपवून टाकायचे आहे म्हणून ते समान कायदा करणारच.' मी त्यांना विचारले की, 'समान नागरी कायदा आला की आरक्षण कसे काय संपेल ?' तर ते म्हणाले की, 'मग सगळे समान होणार आणि मग कोणालाच आरक्षण मिळणार नाही.' त्यावर मी

त्यांना म्हणालो की, ‘संविधान स्वीकारल्यापासून सगळे भारतीय समानच आहेत.’ समान नागरी कायदा सर्वधर्मीयांच्या विवाह, संतती, वारसा याच्याशी संबंधित आहे आणि आरक्षण हे हिंदूंमधील जातीप्रथेशी संबंधित आहे. प्रस्तावित कायदा विविध धर्मियांना एकसारखा लागू असेल; पण आरक्षण हे केवळ हिंदू धर्मातील वंचित, भटक्या आणि मागास जाती-जमातींना, सामाजिक न्यायाच्या भावनेतून आणि संविधानाने दिलेले आहे.

त्यामुळे असा कायदा आला तर आरक्षण नष्ट होईल, हा केवळ दिशाभूल करणारा प्रचार दिसतो, ज्याला चांगले शिकले-सवरलेले लोकही बळी पडतात.

या सगळ्या पार्श्वभूमीवर ‘समान नागरी कायदा’ या विषयाबाबत संतुलित माहिती, ज्ञान, अपेक्षा, स्वरूप या मुद्द्यांची नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना धरून आणि भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत चर्चा व्हावी या उद्देशाने मांडणी झाली पाहिजे. समान नागरी कायद्याची जर वेळ आलेली आहे, तर सहिष्णू भारतीय नागरिक म्हणून आपण याला कसे सामोरे जाणार ? का बहुसंख्याकांच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या दडपशाहीखाली हिंदू कौटुंबिक कायदाच समान नागरी कायदा म्हणून इतर धर्मियांवर लादणार ? असे ऐतिहासिक प्रश्न आपल्या समोर आहेत.

तसेच प्रस्तावित कायदा हा सर्व भारतीय नागरिकांना पटला पाहिजे आणि मान्य झाला पाहिजे तरच त्याची अंमलबजावणी होईल. लोकमान्यतेशिवाय अशा कायद्याला काहीच अर्थ राहणार नाही आणि जनता परत रूढी, परंपरा, शरियत कोर्ट, जात पंचायत यांच्याकडे वळेल. याबाबत इतर प्रगत आणि सामाजिक दृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्रांनी कसे कायदे केले हेही पाहावे लागेल.

समान नागरी कायद्यावर देशात सत्तर वर्षे नुसती चर्चा सुरू ठेवण्यामागे अल्पसंख्याकांना डिवचण्याचा छुपा अजेंडा असतो असेच म्हणावे लागेल. अन्यथा मुसलमान धर्मीय नागरिक शरीयतनुसार किती लग्ने करू शकतात ? मुसलमान महिलांना समान वारसा हक्क मिळतो का ? घटस्फोट मिळू शकतो का ? विनाअपत्य मुसलमान व्यक्ती दत्तक घेऊ शकते का ? पारशी धर्मीय इतर धर्माच्या व्यक्तीशी विवाह करू शकतो का ? ख्रिश्चन धर्मियांत विवाह, घटस्फोट, वारसा आणि दत्तक विधानाबाबत काय तरतुदी आहेत ? भटक्या विमुक्त जातीजमाती आणि आदिवासी यांच्यामध्ये याबाबत काय चालीरीती आहेत ? याबद्दल हिंदुत्ववादी संघटनांनी उठाठेव करण्याचे इतर कोणतेही कारण दिसत नाही.

पुरुषप्रधान वर्णवर्चस्ववादी आणि उजव्या विचारांच्या ब्राह्मणी हिंदू

संघटनांना इतर धर्मांतील महिला आणि अवर्ण लोकांचा या बाबतीतच एवढा पुळका कसा काय येतो ? तर या निमित्ताने धार्मिक ध्रुवीकरण करून निवडणूक आणि मतांचे राजकारण करण्याचा हेतू मात्र स्पष्ट दिसतो हे कोणताही सुजाण नागरिक मान्य करेल. तरीही या मागणीचे तटस्थ मूल्यमापन झाले पाहिजे. भारतात प्रत्येक धर्माचा स्वतंत्र असा नागरी किंवा वैयक्तिक कायदा आहे. तो सगळ्या भारतीय नागरिकांसाठी एकसमान असावा अशी मागणी आहे. जसा फौजदारी कायदा सर्व नागरिकांना समान लागू आहे, तसा नागरी कायदाही समान असावा अशी ही मागणी आहे.

भारतीय राज्यघटनेला जी उद्दिष्टे सुरुवातीपासून अमलात आणता आली नाहीत त्यांचा समावेश राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये (अनुच्छेद ४४ मध्ये) करण्यात आला आहे. उदा. शिक्षणाचा मूलभूत हक्कामध्ये समावेश हे मार्गदर्शक तत्त्व होते, ज्याची कोणत्याही सरकारने अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला सन २००५ मध्ये शिक्षणहक्क कायदा करण्याची सरकारला सूचना द्यावी लागली. तसेच सरकारने शक्य तेवढ्या लवकर समान नागरी कायदा करावा असे घटनेला अपेक्षित होते आणि अजूनही आहे. हिंदू, ख्रिस्ती आणि पारशी धर्मियांचे वैयक्तिक कायदे संहिताबद्ध आहेत. मुसलमान धर्मियांच्या कायद्यांचे पुरेसे संहितीकरण अजून झालेले नाही. ज्यू धर्मियांसाठी कोणताही कायदाच नाही. काही केसेसमध्ये कोर्टांनी दिलेले निकाल हाच ज्यू वैयक्तिक कायदा आहे.

नागरी किंवा वैयक्तिक किंवा कौटुंबिक कायदा (Personal Law) व्यक्तीच्या धर्मानुसार वेगवेगळा आहे; पण मुख्यत्वे केवळ पाच गोष्टींशी संबंधित आहे. १) विवाह २) विवाहविच्छेद (घटस्फोट), ३) दत्तकविधान, ४) संतती आणि ५) वंशपरंपरेने वारसांना संपत्तीचे हक्क. या व्यतिरिक्त वादाचा किंवा महत्त्वाचा इतर कोणताही मुद्दा सध्या नाही. अर्थात येणाऱ्या काळात समलिंगी विवाह, एकल दत्तकविधान, एकलमातृत्व, सरोगसी, लिव्ह इन रिलेशन, फसवून झालेला विवाह आणि संतती आणि त्याचे नियम, अत्याचारातून जन्मलेली अपत्ये, अंत्यसंस्काराची शास्त्रीय पद्धत असे अनेक नवीन मुद्दे असणार आहेतच आणि त्यांचाही विचार असा परिपूर्ण कौटुंबिक कायदा बनवताना करावा लागेल.

समान कौटुंबिक कायदा झाल्यास हिंदू धर्मीयांना जे एकत्र कुटुंब संस्थेचे (HUF चे) जे करविषयक लाभ, म्हणजे (२ PAN) मिळतात. ते एकतर सोडून द्यावे लागतील अथवा तसे लाभ इतर धर्मियांनापण द्यावे लागतील. हिंदू वारसा

कायद्यानुसार मुलाच्या संपत्तीत वडिलांना वर्ग १ चा वारसाहक्क असत नाही. समान नागरी कायद्यानुसार असा हक्क देणार का ? हाही मुद्दा विचारात घ्यावा लागेल.

## भारतातील कौटुंबिक कायद्यांची सद्य:परिस्थिती

समान नागरी कायदा म्हणजे अल्पसंख्याकांना (मुस्लिमांना) त्यांच्या शरियत कायद्यात ढवळाढवळ वाटते आणि खासगी, कौटुंबिक, धार्मिक बाबींवर आणि पुरुषी अधिकारांवर अतिक्रमण वाटते आणि त्यामुळे या विषयावर सर्वसहमती होत नाही, केवळ भावनिक राजकारण होते. मुसलमान चार लग्ने करतात हिंदू पुरुषांची केवळ फँटसी आहे. कारण ४ लग्ने करणे आणि अनेक मुले जन्माला घालणे हे केवळ आर्थिक स्थितीवर अवलंबून नसून लोकसंख्येतील महिलांच्या प्रमाणावर अवलंबून आहे. २०११ च्या जनगणनेनुसार मुस्लिम धर्मियांत दर हजार मुस्लिम पुरुषांमागे केवळ ९५१ इतक्याच महिला आहेत. म्हणजे दर हजार मुसलमान पुरुषांमागे पन्नास पुरुष अविवाहित राहणार आहेत. मुसलमान पुरुष एकापेक्षा जास्त लग्ने करतात आणि भरमसाठ मुले जन्माला घालतात, असा विषारी प्रचार केला जातो; पण तसे तर काही हिंदू पुरुषदेखील उघड बेकायदेशीरपणे दोन-दोन लग्ने करतात. पुण्यातील दिवाळखोर बांधकाम व्यावसायिक आणि सुप्रसिद्ध हिंदी नट आणि नटी यांचे विवाह ही उदाहरणे आहेतच. लव्ह जिहादच्या घटना एकूण लोकसंख्येत नगण्य आहेत.

आश्चर्याची बाब म्हणजे समान नागरी कायद्याच्या मागणीसाठी कंठशोष करणाऱ्या एकाही समाज घटकाने इतक्या वर्षांत सदर कायद्याचा एकही प्रस्तावित मसुदा मागील सत्तर-पंचाहत्तर वर्षांपासून आजतागायत सादर केलेला नाही. केवळ चर्चा आणि ध्रुवीकरण सुरू आहे.

सध्या भारतात कोणत्या धर्मियांना कोणता वैयक्तिक कायदा लागू आहे ते पाहू - हिंदू, बौद्ध, जैन, शीख, वीरशैव लिंगायत, ब्राह्मो/प्रार्थना/आर्य समाजी या धर्माच्या लोकांसाठी - १) हिंदू विवाह कायदा - Hindu Marriage Act १९५५, २) हिंदू वारसाहक्क कायदा - Hindu Succession Act १९५६, ३) हिंदू अल्पसंख्याक आणि पालकत्व कायदा - Hindu Minority and Guardianship Act १९५६, ४) हिंदू दत्तक आणि निर्वाह कायदा - Hindu Adoption and Maintenance Act १९५६, ५) हिंदू मालमत्ता व्यवस्था कायदा - १९१६, ६) हिंदू स्वअर्जित मालमता व्यवस्था कायदा - १९३०, ७) हिंदू वारसा कायदा - १९२८ ८) हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा - १८५६, ९) हिंदू महिलांचा

मालमत्तेचा हक्क कायदा - १९३७ १०) द्वी भार्या प्रतिबंधक कायदा - १९४६.

या कायद्यांनुसार महत्त्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत. हिंदूंमध्ये विवाह हा धार्मिक संस्कार आहे. बहुपत्नीत्व तसेच बहुपतित्व कायद्याने मान्य नाही आणि तो गुन्हा असून फिर्यादीचा अधिकार केवळ बाधित व्यक्तीलाच आहे. हिंदू विवाहानंतर पराकोटीचे गंभीर कारण असल्याशिवाय किमान एक वर्ष घटस्फोटाचा दावा करताच येत नाही. हिंदू महिलांना मातापित्याच्या आणि पतीच्या वंशपरंपरागत संपत्तीमध्ये समान वारसा हक्क आणि वाटपाचा अधिकार आहे आणि त्यांनी मृत्युपत्र केलेले नसल्यास त्यांच्या स्वकष्टार्जित संपत्तीतही समान हक्क आहे. हिंदू स्त्री-पुरुषांना कायद्यात दिलेल्या कारणांसाठी आणि प्रक्रियेनुसार घटस्फोट घेण्याचा आणि पोटगी मिळण्याचा अधिकार आहे. तसेच हिंदू स्त्री-पुरुषांना वरील कायद्यानुसार मुलं दत्तक घेण्याचा अधिकार आहे.

मुसलमान धर्मीय व्यक्तींना पुढील वैयक्तिक कायदे लागू आहेत. १) मुसलमान व्यक्तिविषयक (शरियत) प्रयुक्ती कायदा १९३७, २) मुस्लीम विवाहविच्छेद कायदा १९३९, ३) मुस्लीम महिला (तलाक संबंधी हक्क संरक्षण) कायदा १९८६. याशिवाय सुन्नी पंथीयांसाठी शरियतचा अन्वयार्थ लावणारे चार उपपंथ आहेत, हनाफी, मलिकी, शैफी आणि हंबाली तर शिया पंथाचे जाफरी आणि झैदीया हे उपपंथ आहेत.

यानुसार महत्त्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे - मुसलमान व्यक्तीच्या मालमत्तेचे स्वकष्टार्जित आणि वंशपरंपरागत असे वर्गीकरण करण्यात येत नाही. वारसा हक्क जन्मतः मिळत नसून आधीच्या पिढीतील व्यक्तीचा मृत्यू झाल्यावरच वारसा हक्क अस्तित्वात येतो. जरी स्त्री-पुरुषांना शरियतनुसार समान वारसा हक्क दिलेला असला तरी प्रत्यक्षात महिलांना अर्धाच वाटा दिला जातो, कारण त्यांना पिता आणि पती या दोघांच्याही संपत्तीत वारसा हक्क आहे असे कारण दिले जाते. मुसलमानांमध्ये शादी अथवा निकाह हा (समजुतींचा) करार आहे. लग्नाच्या आधी महिलांना मेहेरची किती रक्कम देणार हे ठरवले जाते. साक्षीदार म्हणून किमान एक पुरुष व्यक्ती असणे आवश्यक आहे. मुसलमान पुरुषांना बहुपत्नीत्वाची मुभा आहे आणि ते चार स्त्रियांशी विवाह करू शकतात. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने २०१७ मध्ये शायराबानू खटल्यात मुसलमान पुरुषांनी पत्नीला तडकाफडकी घटस्फोट देण्याची तिहेरी तलाक (तलाक-ए-बिद्दत) ही प्रथा रद्द ठरवली आणि सरकारला याबद्दल यथायोग्य कायदा करण्याची सूचना

केली. त्यानुसार भारत सरकारने २०१९ मध्ये कायदा करून तिहेरी तलाक प्रथा रद्द, बेकायदेशीर आणि दखलपात्र गुन्हा ठरवली. सध्या शरियत कायद्यानुसार मुस्लीम महिलांना 'खुला' पद्धतीने मेहेर रक्कम परत करून घटस्फोट घेता येतो. तसेच मुस्लीम विवाहविच्छेद कायद्यानुसारही कोर्टामार्फत घटस्फोट घेता येतो. मुसलमान पुरुषांना शरियत कायद्यानुसार 'तलाक-ए-एहसान' प्रथेनुसार इद्दतची (गर्भधारणा न होता तीन मासिक चक्र पूर्ण होणे) मुदत पाळून आणि मध्यस्तीचे प्रयत्न असफल ठरल्यानंतर पत्नीपासून घटस्फोट घेता येतो. घटस्फोटानंतर स्त्रीला त्याच पुरुषाशी परत विवाह करायचा असल्यास आधी दुसऱ्या पुरुषाबरोबर निकाह करून शारीरिक संबंध प्रथापित करून नंतर घटस्फोट घेऊन, मगच आधीच्या शौहर बरोबर निकाह करता येतो. याला 'हलाला' म्हणतात. ही प्रथाही अन्याय्य आणि अतार्किक असून यावरही कोर्टाने अथवा कायदा करून सरकारने बंदी आणणे गरजेचे आहे. मुसलमान धर्मियांना शरियतनुसार मुले दत्तक घेण्याची तरतूद नाही. केवळ एखाद्या मुलाचा सांभाळ आणि पालनपोषण करता येते; पण त्याला कायदेशीर वारसा हक्क नाही. त्यासाठी भारतीय पालक आणि पाल्य कायदा १८९० प्रमाणे कोर्टाकडून दत्तक मंजूर करून घ्यावा लागतो.

भारतीयख्रिश्चन नागरिकांसाठीचे वैयक्तिक कायदे पुढीलप्रमाणे आहेत. १) भारतीय ख्रिश्चन विवाह कायदा १८७२, २) भारतीय विवाहविच्छेद कायदा १८६९, ३) भारतीय वारसाहक्क कायदा १९२५. यातील महत्त्वाच्या तरतुदी म्हणजे विधवेला पतीची एक तृतीयांश संपत्ती मिळते आणि उर्वरित दोन तृतीयांश मालमत्ता इतर वारसदारांमध्ये समान वाटली जाते. विवाह आणि घटस्फोटासंबंधी वरील कायद्यांमध्ये तरतुदी आहेत. दत्तकविधानासाठीच्या तरतुदी मुसलमानांसाठी ज्या आहेत त्याच ख्रिश्चनांसाठीही आहेत.

भारतात पारशी धर्मीय संख्येने अगदीच कमी आहेत आणि त्यांचाही स्वतंत्र वैयक्तिक कायदा १) पारशी विवाह आणि विवाहविच्छेद कायदा १९३६ आहे. पारशी धर्मियांच्या तरतुदी पुढील प्रमाणे - पारशी धर्म परिवर्तन मान्य करत नाहीत. पारशी धर्म सोडल्यास संपत्तीमधील वारसा हक्क संपुष्टात येतो. पारशी पुरुषाच्या बिगर पारशी धर्मीय पत्नीला वारसा हक्क मिळत नाही; पण मुलांना मिळतो. पारशी महिलेने बिगर पारशी धर्मीय पुरुषाशी विवाह केला, तर ती आणि तिची अपत्ये पारशी होत नाहीत. विवाह त्यांच्या धार्मिकरीतीने होतो आणि नंतर किमान दोन वर्षे घटस्फोटासाठी दावा करता येत नाही. परस्पर सहमतीने घटस्फोट घेता

येत नाही. नपुंसकत्व आहे म्हणूनही घटस्फोट घेता येत नाही. महिलांना पोटगीची तरतूद आहे. पारशी कायद्यात दत्तक घेण्याची मुभा नाही.

**राज्यघटनेने सामान नागरी कायद्याचे आव्हान कसे पेलले ?**

समान नागरी कायद्याकडे टाकलेले महत्त्वाचे पाऊल म्हणून ओळखले जाणारे आणि सर्व भारतीय नागरिकांना लागू असणारे महत्त्वाचे कायदे म्हणजे १) भारतीय विशेष विवाह कायदा १९५४ २) भारतीय परकीय विवाह कायदा १९६९ ३) भारतीय जन्म, मृत्यू, विवाह नोंदणी कायदा १९६९ नुसार कोणत्याही धर्मीय व्यक्तीचा जन्म, मृत्यू आणि धार्मिक रितीनुसार झालेला असला तरीही विवाह नोंदवणे अनिवार्य आहे. ४) बालविवाह प्रतिबंधक कायदा १९२९ - बालविवाह हा सर्वधर्मियांमध्ये बेकायदेशीर असून गुन्हा आहे. याशिवाय भारतातील विविध जमाती आणि आदिवासी यांच्या प्रत्येक प्रांतात वेगवेगळ्या चालीरीती प्रचलित असून त्या कायद्याला मान्य आहेत.

भारतातील सर्व नागरिकांसाठी परिपूर्ण आणि सर्वमान्य समान नागरी कायदा करणे हे आव्हानात्मक आणि क्लिष्ट काम असले, तरी अशक्य नाही. तसेच ही जबाबदारी केवळ सरकार आणि न्यायालयांची नाही. समान नागरी कायद्याची सर्व धर्मियांना मान्य असेल अशी तार्किक, न्याय्य आणि आदर्श संहिता तयार करायची असेल, तर त्यामध्ये कोणत्या तरतुदी असणे आवश्यक आहे. (ते पुढील लेखात संकलित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मुख्य उद्देश हा असला पाहिजे की सर्वांना समान कायदा लागू होईल.) याबाबत आपल्या देशात झालेल्या घटनांची आपण थोडक्यात उजळणी करू.

मुसलमान धर्मीय गेली सुमारे १४०० वर्षं शरियतचा वैयक्तिक कायदा पाळतात. भारतामध्ये मुसलमान राजवट सुमारे ८०० वर्षं होती. नंतर ब्रिटिश राजवट आली. ब्रिटिशांनी यामध्ये विशेष हस्तक्षेप न करता केवळ रूढी, प्रथा, परंपरा आणि धर्मशास्त्रांचे संकलन केले. यासाठी श्रुती, स्मृती आणि पुराणे यांचा आधार घेण्यात आला. सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक भारत देशाची सुरुवात २६ जानेवारी १९५० रोजी संविधान लागू झाल्यापासून झाली. हे संविधान बनवणाऱ्या संविधान सभेमध्ये १९४६ पासून समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणी आणि मसुद्यावर भरपूर चर्चा झाल्या. दरम्यान देशाची फाळणी आणि हिंदू-मुस्लीम लोकसंख्येची अदलाबदल होणार या ब्रिटिशांच्या निर्णयामुळे देशभर दंगे उसळले, लक्षावधी लोक दंगलीत मारले गेले, निर्वासित झाले आणि गृहयुद्धासारखी

परिस्थिती निर्माण झाली. त्यानंतर लगेच देश स्वतंत्र झाला. अशा संवेदनशील कालखंडात अजून समान नागरी कायद्याचा नवीन विवाद नको आणि अल्पसंख्याकांना देशात अजून असुरक्षित वाटू नये म्हणून तेव्हा राज्यघटनेत याचा समावेश न करता सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये याचा उल्लेख केला गेला. भारतात धर्मसत्ता चालणार का राज्यसत्ता, याचा स्पष्ट निर्णय होऊन भारत देश हा धर्मनिरपेक्ष असेल याबाबत संविधानसभेचे मोठे समर्थन होते. देश जेव्हा पारतंत्र्यात होता तेव्हा ब्रिटिश राज्यकर्त्यांचे हिंदू आणि मुसलमानांबाबत 'फोडा आणि झोडा' असे सत्ता कायम ठेवण्यासाठीचे धोरण असे; पण देश स्वतंत्र झाल्यावर याची काहीच गरज नव्हती. जे भारत देशामध्ये राहिले ते सगळे भारतीय नागरिक बनले आणि सर्वांना समान हक्क आणि जबाबदाऱ्या देण्यात आल्या. आजचे राज्यकर्तेही जेव्हा त्यांच्या मूळ मालकांचे 'फोडा आणि झोडा' हेच धोरण वापरताना दिसतात तेव्हा त्यांच्या राज्य करण्याच्या संकल्पना दारिद्र्याचा विषाद वाटतो.

ब्रिटिश राजवटीखालील भारतीय उपखंडात सर्वांना समान फौजदारी कायदे लागू होणे हा एक क्रांतिकारी बदल होता. त्यापूर्वी एकाच प्रकारच्या गुन्ह्यासाठी वेगवेगळ्या व्यक्तींना त्यांच्या जातींच्या उतरंडीनुसार वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षा होत्या. उदा. आधीच्या श्रुतीस्मृतीपुराणोक्त हिंदू परंपरेनुसार खुनाच्या गुन्ह्याबद्दल ब्राह्मणाला देहदंडाची शिक्षा नसे, तर ब्राह्मणेतर व्यक्तींना मात्र देहदंड दिला जात असे. बॅरन थॉमस बबींग्टन मेकॉले यांनी भारतीय दंड संहितेचा पहिला मसुदा १८३४ मध्येच लिहून सादर केला होता. १८५७ च्या बंडानंतर देशात ईस्ट इंडिया कंपनीची राजवट संपून इंग्लंडच्या राणीची राजवट सुरू झाली. त्यानंतर मात्र ब्रिटिशांना भारतात फौजदारी कायदा असण्याची निकड जाणवू लागली. १८६० मध्ये इंडियन पीनल कोड स्वीकारण्यात आला. भारतीय दंड प्रक्रिया संहिता १८६१ मध्ये तर भारतीय पुरावा कायदा १८७२ मध्ये अमलात आला. दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ मध्ये लागू करण्यात आली. हे सगळे कायदे आणि प्रक्रिया या सर्व जातीधर्मांच्या एतद्देशीयांना समान किंवा सारख्या लागू होत्या. त्यामध्ये व्यक्तीच्या धर्मानुसार वेगवेगळे कायदे नव्हते. हा एक मोठा बदल होता जो तत्कालीन भारतीयांनी कुरकुरत का होईना पण स्वीकारला.

भारत देश स्वतंत्र झाला त्याआधीपासूनच राज्यघटना बनवण्याचे काम सुरू झाले होते. घटना समितीच्या मूलभूत हक्क उपसमितीमध्ये १२ सदस्य होते. डॉ. आंबेडकर, कन्हैयालाल मुन्शी, मिनू मसानी हे सगळे कायदा शिकलेले,

उत्तम अभ्यासक आणि लेखक होते. त्यांच्यामध्ये याबाबत चर्चा झाली, अहवाल तयार झाला. समितीने भारतीयांना समान नागरी कायदा लागू असावा अशी शिफारस केली होती. डॉ. आंबेडकर आणि मुन्शी यांनी मार्च १९४२ मध्ये अशा कायद्याची मसुदा संहिताही लिहून सादर केली होती. हा मसुदा घटना समितीच्या सल्लागार समितीपुढे मांडला जाऊन नंतर संविधान सभेमध्ये चर्चेला येणार होता. फाळणीच्या जखमांमुळे सगळीच परिस्थिती बदलली. भारतात राहिलेल्या मुसलमानांना हिंदूंच्या दबावाखाली राहावे लागेल अशी चिथावणी जिना देत असत. फाळणीचे अनन्वित चटके सोसलेल्या मुसलमान आणि शीख धर्मियांना त्यांच्या धार्मिक कायद्यात बहुसंख्य हिंदू ढवळाढवळ करायला लागले आहेत असे वाटू नये अशी नेहरूंची तीव्र इच्छा होती. दरम्यान १९४५ च्या केंद्रीय आणि १९४६ च्या प्रांतिक निवडणुकींमध्ये देशातील बहुतांश मुस्लीम राखीव जागा मुस्लीम लीगने जिंकल्या होत्या. मध्य प्रांतातील बहुतांश मुस्लीम राखीव जागा मुस्लीम लीगने जिंकल्या. उर्वरित भारतात काँग्रेसने ९०% जागा जिंकल्या; पण तरीही काँग्रेस ही भारतातील हिंदू आणि मुस्लिमांचे समान प्रतिनिधित्व करते या दाव्याला धक्का बसला. मार्च १९४७ पर्यंत फाळणीची अपरिहार्यता समोर येऊ लागली. मुस्लिमबहुल पंजाब आणि बंगाल विभाजित होणार हे स्पष्ट झाले. जून १९४७ मध्ये काँग्रेसच्या नेत्यांनी माउंटबॅटन यांची स्वातंत्र्याची तारीख आणि देशाच्या फाळणीची योजना हताशपणे स्वीकारली.

या घडामोडींमध्ये घटनेच्या मसुद्यात सरकारसाठीची मार्गदर्शक तत्त्वे असे नवे कलम जोडावे असा प्रस्ताव मान्य झाला. आंबेडकर, मुन्शी, मसानी, अमित कौर, हंसा मेहता या सगळ्या प्रागतिक विचारांच्या सदस्यांना फाळणीपश्चात देशामध्ये एक मूलभूत सामाजिक, राजकीय आणि आर्थिक बदल घेण्याची संधी आत्ताच घेतली पाहिजे असे वाटत होते. समान नागरी कायदा हा नागरिकांच्या मूलभूत हक्कामध्ये समाविष्ट करावा असे या समितीच्या सदस्यांचे मत होते; पण याच्या विरोधी घटना समितीच्या अल्पसंख्याक उपसमितीच्या मुस्लीम सदस्यांनी समान नागरी कायदा ऐच्छिक ठेवावा असा अहवाल मांडला.

## समान नागरी कायद्याबाबत प्रागतिक विचार करण्याची हीच वेळ

१९४८ मध्ये घटनेच्या मसुद्याला अंतिम स्वरूप देण्याच्या चर्चांमध्ये या विषयावर अतिशय घमासान आणि वादळी चर्चा झाली. ब्रिटिशांनी १७५ वर्षांत कौटुंबिक कायद्यांना हात लावला नाही, तर आत्ता यामध्ये दखल देण्याची काय

गरज आहे, असा युक्तिवाद मुस्लीम बाजूने केला गेला. तेव्हाच्या मसुद्यात समान नागरी कायदा हा कलम ३५ मध्ये होता जो प्रस्तावित घटनेच्या कलम १९ मधील धर्मस्वातंत्र्याच्या हक्काच्या विरोधी आहे असेही मत मांडले गेले. मुस्लीम कौटुंबिक परंपरा हा त्यांच्या धर्माचा अविभाज्य भाग आहे आणि त्यामध्ये हस्तक्षेप करणे हे धार्मिक अत्याचार केल्यासारखे होईल असे आग्रही प्रतिपादन केले गेले. एकतेतून अखंडता साधण्याचा असा प्रयोग घातकही ठरू शकतो. मुसलमान धर्मामध्ये निकाह हा करार आहे आणि जगातील सर्व मुसलमान त्यांच्या धर्माचा भाग म्हणून तो पाळतात. आता जर समान कायद्याच्या नावाखाली मुसलमानांना एखाद्या वेगळ्या प्रकाराने विवाह करा असे जर सांगू लागलो, तर मुसलमान ते कदापि मान्य करणार नाहीत. जरी बहुतांश हिंदू सदस्य कलम ३५ च्या बाजूने होते, तरी त्यामुळे अल्पसंख्याकांची गळचेपी किंवा नाराजी होऊ नये आणि त्यांची इच्छा असेल, तर त्यांना त्यांचे धार्मिक रीतीरिवाज, रूढी-परंपरा पाळण्याची मुभा असावी असे त्यांचे मत होते. काही हिंदू गटांचा मात्र समान नागरी कायद्याला विरोध होता. तसेच साक्षरतेचे प्रमाण वाढून समाज अजून पुढारला, की मग असा कायदा आणावा असेही काही मुस्लीम सदस्यांचे मत होते. त्यामुळे केवळ अल्पसंख्याक समाजांनाच नव्हे तर सर्वांना त्यांचे धार्मिक कौटुंबिक कायदे पाळण्याची मुभा असावी आणि समान नागरी कायद्याच्या दिशेने सर्वसहमतीने हळूहळू आणि टप्प्याटप्प्याने वाटचाल करावी असा प्रस्ताव पुढे आला. समान नागरी कायदा हा नागरिकांचा न्याय्य हक्क न ठेवता मार्गदर्शक तत्त्व म्हणून ठेवण्याकडे सदस्यांचा कल वाढू लागला.

याच काळात देशाची फाळणी झाली होती. लाखो हिंदू, मुस्लीम आणि शीख लोकांची कत्तल झाली होती. सर्वस्व गमावलेल्या निर्वासितांचे लोंढे येत होते. संस्थानांचे विलीनीकरण चालू होते. पाकिस्तानने काश्मीरमध्ये टोळीवाले घुसवले, भारत-पाक युद्ध झाले आणि काश्मीर राष्ट्रसंघात गेला होता. राष्ट्रपिता महात्मा गांधींची अतिरेकी हिंदू विचाराने हत्या केली होती. देश या सगळ्या आघातातून सावरत होता.

आंबेडकर, मुन्शी, अय्यर यांनी या सगळ्या हरकतींना तपशीलवार उत्तरे दिली. तुर्कस्थान आणि इजिप्तमध्ये अल्पसंख्याकांना वैयक्तिक कायदा पाळता येत नाही. युरोपातील बहुतेक देशांनी धर्मनिरपेक्ष वैयक्तिक कायदे बनवले आहेत. भारतात खोजा आणि कच्छी मेमन यांना हिंदू रीतिरिवाज पाळायचे आहेत; पण

त्यांच्यावर मुसलमान प्रथांची १९३७ च्या कायद्याने सक्ती केली आहे असे अनेक मुद्दे मांडले गेले. मुन्शी यांनी देशाच्या अखंडतेसाठी कौटुंबिक कायदे धर्मापासून वेगळे केले पाहिजेत असे मत मांडले. मुस्लीम नेत्यांना पारंपरिक विचार सोडून पुढे यावे असे आवाहन त्यांनी केले. धर्म हा फक्त धार्मिक बाबींपुरताच असावा, बाकीच्या आयुष्यातील गोष्टी या सर्वांसाठी समान असाव्यात ज्यामुळे देशाचा एकजिनसीपणा वाढेल. तेव्हाच्या हिंदू कोड बिलातील तरतुदी या मनू आणि याज्ञवल्क्य यांच्या विचारांतून भिन्न आहेत, तरीही हिंदू त्या स्वीकारत आहेत असेही उदाहरण त्यांनी दिले. ब्रिटिशांनी कौटुंबिक कायदे हे परंपरांवर आधारित ठेवले कारण त्यांना देशात एकी होऊ द्यायची नव्हती. समान नागरी कायद्यामुळे इस्लाम खतरेमे येणार नाही कारण हे कायदे समान आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना अनुसरून बनवले आहेत, त्यामुळे ते मुसलमानांसाठीही फायद्याचेच ठरतील असे मुन्शी यांनी सांगितले. ब्रिटिशांवर जास्त विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतंत्र, सार्वभौम भारत देशावर जास्त विश्वास ठेवला पाहिजे.

यानंतर डॉ. आंबेडकर यांनी आपले विचार मांडले. मुस्लीम सदस्यांच्या प्रतिगामी वर्तनाने त्यांना धक्का बसल्याचे ते म्हणाले. बाकी सर्व बाबतीत सर्व धर्मियांना समान कायदे लागू आहेत. फौजदारी कायदा, पुरावा कायदा, मालमत्ता हस्तांतरण कायदा, आर्थिक आणि व्यापारी कायदे सगळ्यांना समान आहेत. तर मग कौटुंबिक कायदे समान का नसावेत ? मुस्लीम कौटुंबिक कायदा अपरिवर्तनीय नाही. सन १९३५ पर्यंत वायव्य प्रांतातील मुस्लीम हे शरियत पाळत नसत. मुंबई प्रांत, मध्य प्रांत आणि संयुक्त प्रांतातील मुसलमान हे हिंदू वारसा कायदा वापरत. मलबारी मुसलमान मातृसत्ताक कुटुंब पद्धती पाळत. आंबेडकरांनी मुस्लीम सदस्यांना आश्वस्त करण्याचा प्रयत्न केला, की यामध्ये मुसलमान नागरिकांवर अन्यायकारक अशी एकही तरतूद नसेल. तसेच कदाचित येणारे सरकार सुरुवातीच्या काळात हा कायदा ऐच्छिक ठेवून काही वर्षांनी त्याची संपूर्ण देशात अंमलबजावणी करू शकेल. मानवी जीवनाच्या सर्व बाजूंना स्पर्श करणाऱ्या एवढ्या महत्त्वाच्या कौटुंबिक कायद्याबाबत धर्मसंस्थेला अनियंत्रित अधिकार सुपूर्द करायला डॉ. आंबेडकरांचा तीव्र विरोध होता. यामुळे या सगळ्या बाबतीत कायदे करण्याच्या संसदेच्या सार्वभौम अधिकारालाही मर्यादा येणार होत्या. या सगळ्या चर्चेनंतर मुस्लीम सदस्यांनी घेतलेल्या हरकती नाकारण्यात आल्या; पण केवळ एका वाक्यात 'भारत देशाच्या क्षेत्रातील नागरिकांना सर्वत्र एकरूप नागरी संहिता मिळावी यासाठी हे गणराज्य

प्रयत्नशील राहील.' कलम ४४ मध्ये याचा राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये समावेश करण्यात आला. तेव्हापासून आजपर्यंत हे मार्गदर्शक तत्त्व नुसते पोकळ वाक्य म्हणून राज्यघटनेमध्ये राहिले आहे, ज्याची न्याय्य हक्क म्हणून अंमलबजावणीची कोणतीही सोय नाही; पण ज्या नागरिकांना स्वेच्छेने समान नागरी कायदा पाळायचा आहे त्यांच्यासाठी असलेला विशेष विवाह कायदा हा एक पर्याय आहे.

या संपूर्ण चर्चेच्या पार्श्वभूमीवर असा निष्कर्ष निघतो की, भारतात हिंदू, बौद्ध, जैन, शीख, ख्रिस्ती आणि पारशी धर्मियांचे कायदे हे समान नसले, तरी किमान संहिताबद्ध तरी आहेत. मुस्लीम धर्मियांचा कायदा हा लिंगभेद करणारा, पुरुषसत्ताक आणि मुल्ला-मौलवींच्या धर्मनिर्णयावर आधारित आहे. यामध्ये सर्वात जास्त अन्याय हा मुस्लीम महिलांवर होतो आहे. ही परिस्थिती अशीच ठेवता येणार नाही आणि बदलावीच लागेल. सध्याच्या काळात भारतीय मुस्लीम हा दबाव आणि दडपणाखाली आहे. त्यात कट्टर उजव्या विचारसरणीच्या हिंदुत्ववादी पक्षाचे मोठ्या बहुसंख्येने निवडून आलेले केंद्र सरकार सत्तेत आहे. अनेक राज्यांमध्येही त्याच पक्षाची सत्ता आहे. राज्यकर्त्या पक्षाच्या मातृसंघटनेसाठी तर हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. समान नागरी कायदा हा बहुसंख्याकांचा राष्ट्रवाद कुरवाळणारा आणि हमखास निवडणूक जिंकून देणारा मुद्दा आहे, त्यामुळे तो येणारच. अशा वेळी सुजाण मुस्लीम नागरिक, संघटना आणि धर्म नेत्यांनी या प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभागी होऊन मुसलमान धर्मियांच्या प्रातिनिधिक इच्छा-आकांक्षा आणि अपेक्षा सरकारपुढे स्पष्टपणे मांडाव्या, ज्या भारतीय राज्यघटनेच्या समानतेच्या तत्त्वांशी सुसंबद्ध असतील. भारतीय मुसलमानांना सामाजिक पुनरुत्थानाची अशी ऐतिहासिक संधी कदाचित पुन्हा कधीच मिळणार नाही. तसेच बहुसंख्याक धर्माच्या सजग नागरिकांनीही अशी प्रस्तावित संहिता संपूर्णपणे निर्दोष आणि आदर्श कशी होईल यासाठी पुढे येऊन आपले विचार व्यक्त केले पाहिजेत.

*(लेखक पुणेस्थित ज्येष्ठ विधिज्ञ आणि कार्यकर्ते आहेत.)*

■ ■

मोठी साम्राज्ये व लहान अंत:करणे एकत्र राहू शकत नाहीत.

**- एडमंड बर्क**

# अल्पसंख्याकांच्या शिष्यवृत्त्यांवर कुऱ्हाड

● डॉ. शरद जावडेकर

१८ डिसेंबर १९९२ रोजी यु. एन.ने 'राज्याने, राष्ट्रीय, वांशिक, सांस्कृतिक, धार्मिक व भाषिक अल्पसंख्याकांच्या स्वतंत्र ओळखीचे संरक्षण करावे' असे आवाहन केले होते व तेव्हापासून १८ डिसेंबर हा दिवस 'जागतिक अल्पसंख्याक हक्क दिवस' म्हणून जगभर साजरा होतो. भारतीय संविधानाने अल्पसंख्याकांना 'स्वतंत्र पण समान' असा दर्जा दिला आहे. कलम १५, १६, २९ मध्ये अल्पसंख्याकांना समान अधिकार दिले आहेत. तसेच कोणत्याही कारणाने भेदभाव होणार नाही, असे आश्वासन दिले आहे; पण कोणत्याही समाज घटकाचे मागासलेपण दूर करण्यासाठी 'सकारात्मक भेदभाव' करण्याचा अधिकार संविधानाने शासनाला दिला आहे व त्यानुसार सामाजिक व शैक्षणिक मागास घटकांना पुढे आणण्यासाठी विशेष सवलतीच्या योजना राबविल्या जात आहेत. पण सध्या 'सब का विकास' अशा चर्चा केल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात 'काही समाज घटकांना वगळण्याचे धोरण' अमलात आणले जात आहे. अल्पसंख्याकांच्या व सामाजिक मागासलेल्यांच्या शिष्यवृत्त्या बंद करणे हा 'वगळण्याच्या' धोरणाचाच भाग आहे.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'मध्ये एका बाजूला सरकार शिक्षणाच्या महत्त्वाची विद्वतापूर्ण चर्चा करते व दुसऱ्या बाजूला शिक्षणावरचा खर्च कमी करण्यासाठी सरकार नवे नवे मार्ग शोधत आहे ! मग ते शाळा समायोजनाचे धोरण असो की शिष्यवृत्त्या बंद करण्याचे धोरण असो ! २९ नोव्हेंबर २०२२ रोजी 'केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार' मंत्रालयाने आदेश काढून अल्पसंख्याक समाजाच्या मुलांसाठी असलेल्या पहिली ते दहावीच्या मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्त्या आता फक्त ९वी व १०वी च्या वर्गासाठी असतील व पहिली ते आठवीचे वर्ग यातून वगळण्यात आल्याचे जाहीर केले आहे.

बालकांचा 'सक्तीचा व मोफत प्राथमिक शिक्षणहक्क कायदा २००९' प्रमाणे पहिली ते आठवी मोफत शिक्षण देणे ही शासनाची जबाबदारी असल्याने, पहिली ते आठवीचे वर्ग शिष्यवृत्ती योजनेतून वगळल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे.

'सामाजिक न्याय मंत्रालयाने व आदिवासी मंत्रालयाने' असा निर्णय पूर्वीच घेतला आहे. त्या नुसार अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे, असे या मंत्रालयाचे म्हणणे आहे ! तसेच ८ डिसेंबर २०२२ रोजी अल्पसंख्याक विभागाच्या मंत्री स्मृती इराणी यांनी अल्पसंख्याकांसाठी असलेल्या मौलाना आझाद शिष्यवृत्त्या २०२२-२३ पासून बंद करण्याची घोषणा लोकसभेत केली आहे. याला कारण देताना त्या म्हणतात की, यु. जी. सी.च्या शिष्यवृत्त्या व मौलाना आझाद शिष्यवृत्त्या यात द्विरुक्ती होत आहे !

भारतातील अल्पसंख्याकांमध्ये मुस्लीम अल्पसंख्याकांचा गट मोठा आहे (७५ टक्के). या संदर्भात न्या. सच्चर समितीने असे म्हटले आहे की, 'मुस्लीम समाज हा एकूण विकासाच्या संदर्भात अ. जा. पेक्षा किंचित वर तर हिंदू ओ. बो. सी. पेक्षा पुष्कळ मागे आहे. मुस्लीम समाजाचं शैक्षणिक मागासलेपण सच्चर समितीने अधोरखित केले आहे.' (२००६). भारतीय संविधानाने मान्य केलेल्या मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध, शिख, जैन व पारशी या अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी २००६ मध्ये 'अल्पसंख्याक कार्य मंत्रालय' स्थापन करण्यात आले आहे. तसेच केंद्रीय अंदाजपत्रकात अल्पसंख्याक कार्य मंत्रालयासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात येत आहे. सन २०१८-१९ मध्ये अल्पसंख्याक कार्य मंत्रालयासाठी रु. ४,७०० कोटींची तरतूद करण्यात आली होती व ही तरतूद एकूण अंदाजपत्रकीय खर्चाच्या ०.१९ टक्के आहे. या मंत्रालयाच्या एकूण तरतुदीपैकी रु. २,४५३ कोटी शैक्षणिक योजनांसाठी होते व मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती व मौ. आझाद शिष्यवृत्तीसाठी तरतूद अनुक्रमे रु. ९६० कोटी व रु. १५३ कोटी इतकी होती. सन २०२१-२२ च्या केंद्रीय अंदाजपत्रकात या मंत्रालयासाठी रु. ४,३४६ कोटींची तरतूद करण्यात आली होती व ही तरतूद केंद्रीय अंदाजपत्रकाच्या एकूण खर्चाच्या ०.१२ टक्के इतकी आहे. म्हणजे अल्पसंख्याक कार्य मंत्रालयासाठीची तरतूद सरकारने कमी केली आहे. त्याचबरोबर शिक्षणासाठीची तरतूदपण सरकारने कमी केली आहे व ती रु. २,३३९ कोटी इतकी २०२१-२२ साठी आहे व २०२२-२३ साठी ही तरतूद रु. २,५१५ कोटी इतकी आहे. मौ. आझाद शिष्यवृत्तीसाठी २०२२-२३ ची तरतूद ही रुपये ९९ कोटी इतकी आहे. वरील आकडेवारीचा निष्कर्ष असा की, शासनाने अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाच्या तरतुदी घटवल्या आहेत.

अल्पसंख्याक समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी 'पंतप्रधान

१५ कलमी कार्यक्रम' राबविण्यात येतो. यात 'मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती' व एम. फिल. व पी. एच. डी.साठी मौ. आझाद शिष्यवृत्ती अल्पसंख्य समाजाच्या मुलांसाठी देण्यात येत आहे. मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती २००८ पासून देण्यात येत आहे. यासाठी पालकांचे उत्पन्न रु. १ लाखापेक्षा कमी असावे, विद्यार्थ्याला मागील परीक्षेत ५० टक्क्यापेक्षा जास्त गुण असावेत व विद्यार्थी हा अल्पसंख्य समाजातील असावा एवढ्याच अटी या योजनेत आहेत. केंद्र सरकारने लोकसभेत दिलेल्या माहितीप्रमाणे २०१४-१५ ते २०२१-२२ या काळात समाजनिहाय मुलांना लाभ झाला तो असा - मुस्लीम ३.३६ कोटी, ख्रिश्चन ५३.१३ लाख, शिख ३५.९० लाख, बौद्ध १२.९८ लाख व जैन ४.५० लाख !

सर्व अल्पसंख्याक समाजातील मुलांच्या शाळेतील 'गळतीचा अभ्यास' नॅशनल प्रॉडक्टिव्हीटी कौन्सिलने २०१७-१८ मध्ये केला आहे. त्याचा निष्कर्ष असा आहे की, शालेय शिक्षणातील मुलांच्या गळतीची कारणे अशी आहेत- 'पालकांची गरिबी ९२ टक्के व पालकांची निरक्षरता ७८ टक्के, मुस्लीम मुलींचे लवकर लग्न ३७ टक्के, मुलींसाठी शाळेत स्वतंत्र स्वच्छतागृहे नसणे ३२ टक्के, स्थलांतरीत कामगार २४ टक्के.' या पार्श्वभूमीवर मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्त्यांच्या प्रोत्साहनाची गरज अधोरिखित होते !

मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्त्यांच्या योजनेच्या मूल्यमापनाचे दोन अभ्यास अल्पसंख्याक विभाग मंत्रालयाकडून झाले आहेत. 'मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, त्याचा परिणाम व मूल्यमापन' हा अहवाल 'रिसर्च अँड डेव्हलपमेंट इनिशिएटिव्ह', नवी दिल्ली यांनी २०१३ मध्ये केला तर 'पंतप्रधान १५ कलमी, अल्पसंख्याकांच्या कल्याणकारी कार्यक्रम योजनांचे मूल्यमापन' हा अभ्यास 'मार्केटिंग रिसर्च अँड डेव्हलपमेंट-नवी दिल्ली' या संस्थेने २०१६ मध्ये केला आहे. या दोन्ही अभ्यासांचा सारांश हाच आहे की 'मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीचा फायदा अल्पसंख्याक गरीब मुलांना मिळत आहे. यातील बहुसंख्य पालक हे भूमिहीन व बिगारीकाम करणारे, दारिद्र्यरेषेखालचे आहेत. या योजनेचा प्रचार पुरेसा झालेला नाही. त्यात प्रशासकीस त्रुटी आहेत; पण या योजनेमुळे अल्पसंख्य समाजाच्या मुलांची शाळेत उपस्थिती, सहयोग व प्रगती वाढली आहे !' यातून अल्पसंख्य समाजातील मुलांच्या दृष्टीने या शिष्यवृत्तीचे महत्त्व लक्षात येते.

मौ. आझाद राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना २००९ पासून सुरू झाली आहे. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना एम. फील., पी. एच. डी.साठी या

## तक्ता १

## अल्पसंख्याक कार्य मंत्रालयासाठी अंदाजपत्रकीय तरतूद (रु. कोटी)

| तपशील | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|---|---|
| १. तरतूद | ४७०० | ४७०० | ५०२९ | ४३४६ | ५०२० |
| २. शिक्षणासाठी तरतूद | २४५३ | २२४९ | २५३० | २३३९ | २५१५ |
| २.१ मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती | ९६० | १२०० | १३३० | १३७८ | १४२५ |
| २.२ मॅट्रिकपश्चात शिष्यवृत्ती | ६९२ | ४८३ | ५३५ | ४६६ | ५१५ |
| २.३ मेरिट कम मिन बेस शिष्यवृत्ती | ५२२ | ३६२ | ४०० | ३२५ | ३६५ |
| २.४ मौ. आझाद शिष्यवृत्ती | १५३ | १३० | १७५ | ९९ | ९९ |
| २.५ मोफत प्रशिक्षण | ७४ | ४० | ५० | ३९.२५ | ७९ |
| २.६ शिक्षण कर्जावरील व्याजात सवलत | २४ | २५ | ३० | २४ | २४ |
| २.७ स्पर्धा परीक्षेसाठी आर्थिक मदत | ८ | १० | १० | ६ | ८ |
| ३. एकूण अंदाजपत्रकीय खर्च (रु. लाख कोटी) | २४.४२ | २७.८६ | ३०.४२ | ३४.८३ | ३९.४४ |
| ४. एकूण खर्चाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयासाठी खर्च (टक्के) | ०.१९ | ०.१६ | ०.१८ | ०.१२ | ०.१२ |
| ५. राष्ट्रीय उत्पन्नाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयासाठी खर्च (टक्के) | ०.०२ | ०.०२ | ०.०२ | ०.०१८ | ०.०१९ |

**संदर्भ :**

- केंद्रीय अंदाजपत्रके 2018-14 to 2022-23 (Expenditure Budget)

● Ministry of Minority Affairs GOI : Evaluation of PM's New 15 Point program for Welfare of Minorities (2016)
● Ministry of Minority Affairs GOI : Study to find out the Reasons for High Drop-out Rates among All Minority Communities (2017-18)
● Ministry of Minority Affairs GOI : Evaluation and Impact Assesesments of Pre-Matric Scholarship Schemes (2013)
● Ministry of Minority Affairs GOI : Annual Reports.

योजनेतून शिष्यवृत्ती मिळते. मार्केटिंग रिसर्च व डेव्हलपमेंट संस्थेने २०१६ मध्ये असे निरीक्षण नोंदवले की, या योजनेची परिणामकारकता अतिशय असमाधानकारक आहे. अ. भा. उच्चशिक्षण पाहणी अहवाल (२०१९-२०) नुसार उच्चशिक्षणात मुस्लीम मुलांची एकूण विद्यार्थ्यांत टक्केवारी ५.५ आहे, तर इतर अल्पसंख्याकांची टक्केवारी २.५ आहे. १८ ते २३ वयोगटातील मुस्लीम मुलांचा, मुलींचा ग्रॉस एनरॉलमेंट रेशो हा १६ टक्के आहे. भारतात एकूण रेशो २७ टक्के आहे व अनुसूचित जातींमध्ये हे प्रमाण १८ टक्के आहे. या पार्श्वभूमीवर अल्पसंख्याकांसाठी असणाऱ्या प्रोत्साहन योजना किती आवश्यक आहेत हेच दिसून येते, म्हणून या शिष्यवृत्या बंद करणे अन्यायाचे आहे.

पहिली ते आठवीच्या शिष्यवृत्त्या बंद करताना मंत्रालयाची अशी भूमिका आहे की, शिक्षणहक्क कायद्यानुसार मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारची आहे; पण ही जबाबदारी गेल्या १४ वर्षांत शासनाने किती कार्यक्षमतेने पार पाडली आहे याचा शास्त्रशुद्ध अभ्यास झालेला नाही. पहिली ते आठवीपर्यंत शासन सर्वांना मोफत शिक्षण देत आहे, हे गृहितकच चुकीचे आहे. २०२१-२२ च्या युडीसच्या आकडेवारीप्रमाणे पहिली ते आठवीची एकूण पटनोंदणी १८.८५ कोटी आहे. यातील सरकारी शाळेतील पटनोंदणी ११.१० कोटी आहे तर अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेची पटनोंदणी अनुक्रमे १.२८ कोटी ५.८९ कोटी आहे. या सर्व शाळांत निरनिराळ्या कारणांनी पालकांकडून पैसे उकळले जातात हे वास्तव आहे. वेतनेतर अनुदान गेले २० वर्षे बंद झाल्यामुळे शिक्षणखात्याच्या मूकसंमतीने सर्व शाळा फिया गोळा करतात हे उघड वास्तव आहे. शिक्षणहक्क कायद्याच्या २५ टक्के आरक्षणाची फी प्रतिपूर्ती सरकार करत नाही म्हणून पालकांकडून विनाअनुदान शिक्षण संस्था फिया गोळा करतात. त्यामुळे पहिली ते आठवीपर्यंत सरकार मोफत शिक्षण देते हेच मुळात

'मिथ' आहे. एका बाजूला सरकारने समाजातल्या वरच्या पण आर्थिक कमकुवत घटकांसाठी आरक्षण दिले आहे व त्यांच्यासाठी आर्थिक उत्पन्नाची मर्यादा वार्षिक रु. आठ लाख आहे व दुसऱ्या बाजूला अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय व अल्पसंख्य यांच्या शिष्यवृत्त्या २०२२-२३ पासून बंद करत आहे व यांच्या शिष्यवृत्त्यांसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा रु. २.५ लाख आहे. त्यामुळे चुकीच्या गृहितावर मागासवर्गीय व अल्पसंख्य समाजाच्या मुलांच्या शिष्यवृत्त्या बंद करणे म्हणजे त्यांना ठरवून शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर काढण्याचे कारस्थान आहे असेच म्हणावे लागेल. भारतात सध्या लोकशाही बहुमताचे 'बहुसंख्याकवादात' रूपांतर होत आहे म्हणून जागतिक ह्युमन राईटस् वॉच, २०२१ च्या अहवालात असे निरीक्षण नोंदविले आहे की, भारत सरकार धार्मिक अल्पसंख्य व विशेष करून मुसलमानांच्या संदर्भात कायदा व धोरणे या बाबत भेदभाव करत आहे. शिष्यवृत्त्या बंद करण्याचे धोरण हा त्यातलाच एक भाग आहे.

*(लेखक अ. भा. समाजवादी शिक्षणहक्क सभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आहेत.)*

■ ■

मी मुसलमान संस्कृती किंवा हिंदू संस्कृती मानत नाही. मनुष्याने कसे वागावे हे निश्चितपणे सांगणारे एखादे पुस्तक या जगात असेल, यावर माझा विश्वास नाही. वेद किंवा कुराण हे मानवी तत्त्वज्ञानातील अखेरचा शब्द आहे, असे मी मानत नाही..... गरजेप्रमाणे आवश्यक असलेली ठराविक मर्यादेतील विविधता राखून साधता येईल तेवढी सर्वंकष एकजूट राखणे हा माझ्या मनातील सर्वात महत्त्वाचा राजकीय विचार आहे. हिंदू-मुसलमान विवाहांचा मी उघडपणे पुरस्कार करतो आणि तुम्हाला माहीतच आहे की, सनातन जातिव्यवस्थेला माझ्या जीवनात मी स्थान देत नाही.

**- सरदार वल्लभभाई पटेल**

*(१२ ऑगस्ट १९५० रोजी नेहरूंना पाठवलेल्या पत्रातून...)*

अंक विशेष

# केंद्रशासनाचे शिष्यवृत्ती रद्द करण्याचे धोरण अल्पसंख्याक समुदायावर अन्याय करणारे !

**• शहेबाज फारूख मनियार**

केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक मंत्रालयाने अल्पसंख्याक समाजातील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दिली जाणारी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बंद करण्याचा निर्णय दिनांक २५ नोव्हेंबर २०२२ रोजी घेतला. यासाठी कारण असे देण्यात आले की, '२००९ च्या शिक्षणाचा अधिकार कायद्यान्वये पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी ही शासनाची आहे.' त्यामुळे त्यांना वेगळी शिष्यवृत्ती देण्याची आवश्यकता आता शासनाला वाटत नाही असे दिसते. तसेच तामिळनाडू राज्यातील खासदार टी. एन. प्रतापन यांच्या प्रश्नाला गुरुवार दिनांक ८ डिसेंबर २०२२ रोजी लोकसभेत उत्तर देताना केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री श्रीमती स्मृती इराणी यांनी जाहीर केले की, केंद्रीय अल्पसंख्याक मंत्रालयातर्फे एम. फिल. आणि पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना दिली जाणारी मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती (एम. ए. एन. एफ.) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बंद करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. याचे कारण देताना त्या म्हणाल्या की, 'मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती ही केंद्र शासनाच्या इतर अधिछात्रवृत्ती (फेलोशिप) कार्यक्रमाशी ओव्हरलॅप होते आहे आणि तसेही अल्पसंख्याक विद्यार्थी हे इतर अधिछात्रवृत्तीमध्ये समाविष्ट होतात.' यासोबतच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांच्या प्राथमिक (प्रिलिमिनरी) परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना 'नई उडान' या योजने अंतर्गत दिले जाणारे अर्थसाहाय्य देखील अनौपचारिकरित्या बंद करण्यात आल्याचे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून सांगण्यात आले आहे.

२००७ सालच्या सच्चर समिती अहवालाच्या पार्श्वभूमीवर मुस्लीम आणि इतर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे प्राथमिक शिक्षणातील, उच्चशिक्षणातील आणि शासकीय नोकरीतील प्रमाण वाढावे यासाठी यूपीए शासनाने अनुक्रमे २००८ साली मॅट्रिकपूर्व - मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, २००९ साली अल्पसंख्याक समाजातील एम. फिल. आणि पीएच. डी. अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ

आणि उच्चशिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यासाठी मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती आणि २०१४ साली 'नई उडान' योजनेची सुरुवात केली. मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती योजनेमध्ये मुस्लीम समुदायासोबतच इतर पाच अल्पसंख्याक ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन आणि पारसी या समुदायांचा देखील समावेश आहे. विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पात्रता चाचणी (नेट) परीक्षेतील अल्पसंख्याक समाजातील गुणवत्ताधारक १००० विद्यार्थ्यांना दरवर्षी ही अधिछात्रवृत्ती पुढील पाच वर्षांसाठी दिली जात असे. दरवर्षी पात्र ठरलेल्या १००० विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन काळातील पहिल्या दोन वर्षांसाठी प्रती महिना रु. ३१,०००/- आणि पुढील तीन वर्षांसाठी प्रती महिना रु. ३५,०००/- अधिछात्रवृत्ती मिळते. तसेच नई उडान योजनेअंतर्गत केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग आणि स्टाफ सिलेक्शन कमिशन द्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेत प्राथमिक (प्रिलिमिनरी) परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेतील पुढील टप्प्यांच्या अभ्यासासाठी एकरकमी अनुक्रमे एक लाख, पन्नास हजार आणि पंचवीस हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जात असे.

या सर्व योजनेचा मोठ्या प्रमाणात फायदा हा अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना विशेषतः मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांना होत होता. मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती आणि नई उडान योजनेसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अल्पसंख्याक समाजातील लोकसंख्येच्या प्रमाणात शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती आणि आर्थिक लाभाचे वितरण होत असे. भारतातील एकूण अल्पसंख्याकांमध्ये मुस्लीम समाजाचे प्रमाण हे ७३% आहे. त्यांच्या या लोकसंख्येतील प्रमाणानुसार सरासरी १००० जागांपैकी ७३% (७३३) विद्यार्थ्यांना दरवर्षी मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती मिळत होती. ख्रिश्चन ११.९% (११९), शीख ९% (९०), बौद्ध ३.६% (३७), जैन २% (२०) या इतर अल्पसंख्याक समाजांना देखील त्यांच्या लोखसंख्येच्या प्रमाणात जागा मिळत. यात आणखी महत्त्वाचे म्हणजे या १००० पैकी जवळपास ३०% (३००) जागा या महिलांसाठी राखीव असल्याने २१० जागा या मुस्लीम विद्यार्थिनींना मिळत. नई उडान योजनेमध्ये देखील ५१०० जागांपैकी ३७२३ जागा या मुस्लीम समुदायातील विद्यार्थ्यांना मिळत. यामुळे गरिबी आणि विषम आर्थिक परिस्थितीमुळे शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणात मागास

असलेल्या मुस्लीम समाजाचे शैक्षणिक मागासलेपण काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली आहे. उच्चशिक्षणापासून मोठ्या प्रमाणात वंचित असलेल्या मुस्लीम समाजाचे उच्चशिक्षणातील सकल नोंदणी प्रमाण (जी. ई. आर.) गेल्या दहा वर्षांत आश्वासकपणे वाढले आहे. २०१० साली ते केवळ ५.२% होते; पण आता ते वाढून १६.६% वर आले आहे. पण तरीसुद्धा राष्ट्रीय सरासरी २६.३% पेक्षा ते फार कमी आहे.

मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती ही अल्पसंख्याक समाजातील वंचित आणि मागास समूह गटांच्या शिक्षणाचा प्रमुख आधार होता. अल्पसंख्याक मंत्रालयाच्या मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती मूल्यमापन आणि परिणाम मूल्यांकन अहवालानुसार (२०१३) या योजनेतील एकूण लाभार्थींपैकी ५२.८% लाभार्थी हे दारिद्र्य रेषेखालील आहेत, ७२.६% लाभार्थी हे भूमिहीन कुटुंबातील आहेत, तर ७७% लाभार्थी हे महिना ५००० पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील आहेत. मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीचा लाभ मिळणाऱ्या ५५.२% विद्यार्थ्यांना वाटते की या शिष्यवृत्तीशिवाय शिक्षण सुरू ठेवणे त्यांना शक्यच झाले नसते. यातील ३८.६% लाभार्थींना वाटते की मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती नसती, तर त्यांनी शाळा सोडली असती. वरील आकडेवारीवर लक्ष दिल्यास आपल्याला स्पष्ट होते की, अल्पसंख्याक समाजातील अतिमागास आणि वंचित समूह गटातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना एकप्रकारे संजीवनी सारखी होती. अत्यंत कमी उत्पन्न असणाऱ्या पालकांसाठी आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक गरजा भागवण्यासाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना मोठ्या प्रमाणात मदत करत होती; पण एकाएकी शासनाने ही योजना बंद करण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे लाखो मागास विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागण्याची शक्यता बळावली आहे. तसेच प्राथमिक शिक्षणातील ड्रॉप आऊट रेट मोठ्या प्रमाणावर वाढण्याची भीती आहे. या सर्व शक्यतांचा विचार करता कल्याणकारी राज्यात शासनाने शिष्यवृत्ती सुरू ठेवणे नितांत आवश्यक आहे, कारण ते शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य करते.

शासकीय नोकऱ्यांमध्ये अल्पसंख्याकांचे त्यातल्या त्यात मुस्लीम समाजाचे प्रतिनिधित्व हे त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ४.४% इतके अत्यंत कमी आहे. सच्चर समितीच्या अहवालात हे प्रकर्षाने समोर आले आहे. अल्पसंख्याक समाजातील उमेदवारांचे शासकीय नोकरीतील प्रमाण वाढावे यासाठी २०१४ साली अल्पसंख्याक मंत्रालयाने 'नई उडान' योजना सुरू केली होती. ही

योजना देखील अनौपचारिकरित्या बंद केली गेली आहे. स्पर्धा परीक्षांचे टप्पे, त्याची कोचिंग, लागणारा वेळ आणि आर्थिक खर्च यांचे गणित पाहिल्यास सर्वसामान्य, मागास आणि वंचित समूहातील विद्यार्थ्यांना हे जास्त काळ परवडणारे नाही. जर गुणवंत विद्यार्थ्यांना दिली जाणारी आर्थिक मदत बंद झाली, तर त्यांच्या शासकीय सेवेत जाण्याच्या अपेक्षांना मोठा धक्का लागणार आहे. प्राथमिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मुख्य परीक्षा आणि मुलाखतीच्या तयारीसाठीचा आर्थिक भार नई उडान योजनेमुळे मोठ्या प्रमाणात कमी होत असे; पण आता ही योजना देखील बंद केल्याने जीवघेण्या स्पर्धेमध्ये टिकून राहणे त्यांना अवघड होणार आहे. यामुळे अंतिम निवड यादीत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचा टक्का आपोआप कमी होईल, जो आधीच निम्न स्तरावर आहे.

मुस्लीम समाजाची उच्चशिक्षणातील स्थिती सुधारत असतानाच केंद्र शासनाने मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती बंद करण्याचा घेतलेला निर्णय हा निश्चितच स्वागतार्ह नाही, किंबहुना अधिछात्रवृत्ती बंद करण्यासाठी दिलेले कारण देखील तथ्यांना पूर्णपणे धरून नाही. अधिछात्रवृत्ती बंद करण्याचे कारण देताना स्मृती इराणी म्हणाल्या की, 'मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती ही केंद्र शासनाच्या इतर अधिछात्रवृत्ती कार्यक्रमाशी ओव्हरलॅप होत आहे आणि अल्पसंख्याक विद्यार्थी हे इतर अधिछात्रवृत्तींमध्ये समाविष्ट होतात.' हे कारण पूर्णपणे सत्यही नाही आणि पूर्णपणे असत्यही नाही. मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्तीसारख्या केंद्र शासनातर्फे इतरही अधिछात्रवृत्ती दिल्या जातात हे खरे आहे. त्यात प्रामुख्याने केंद्रीय शिक्षण मंत्रालय - विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे जे. आर. एफ. दिली जाते. जे. आर. एफ. ही पूर्णपणे गुणवत्तेच्या आधारावर दिली जाते आणि ती सर्वांसाठी खुली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे वर्षातून दोनदा घेतल्या जाणाऱ्या नेट परीक्षेतील गुणानुक्रमे सर्वात वरच्या स्थानी असलेल्या काही विद्यार्थ्यांना ही अधिछात्रवृत्ती मिळते. यामध्ये वेगवेगळ्या समूह गटांना आरक्षणदेखील आहे.

नेट परीक्षेच्या स्पर्धेमध्ये काही गुणांमुळे मागे राहिलेल्या सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास व वंचित समूह गटातील विद्यार्थ्यांना देखील उच्चशिक्षणाच्या संधी प्राप्त व्हाव्यात या हेतूने केंद्र शासनाच्या विविध मंत्रालयांकडून विविध मागास समाज घटकांतील गुणवंत विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ देण्यात येते. यामध्ये केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयातर्फे ओबीसी समूह

गटातील १००० गुणवंत विद्यार्थ्यांना दरवर्षी इतर मागासवर्गीयांसाठी राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती (एन. एफ. ओ. बी. सी.) देण्यात येते, अनुसूचित जाती समूहातील २००० गुणवंत विद्यार्थ्यांना दरवर्षी अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती (एन. एफ. एस. सी.) देण्यात येते आणि २०० दिव्यांग विद्यार्थ्यांना दरवर्षी दिव्यांग व्यक्तींसाठी राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती (एन. एफ. पी. डब्लु. डी.) देण्यात येते. आदिवासी कार्य मंत्रालयातर्फे आदिवासी समूह गटातील ७५० गुणवंत विद्यार्थ्यांना दरवर्षी अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती (एन. एफ. एस. टी.) देण्यात येते. केंद्रीय अल्पसंख्याक मंत्रालयातर्फे अल्पसंख्याक समूह गटातील १००० गुणवंत विद्यार्थ्यांना दरवर्षी मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती देण्यात येत होती, जी आता रद्द करण्यात आली आहे.

आता आपण केंद्र शासनाने मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती रद्द करण्यासाठी दिलेल्या कारणाचा म्हणजेच मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती ही इतर उपलब्ध फेलोशिपशी ओव्हरलॅप होत आहे याचा विचार करू. उदा. मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, जैन, पारसी समुदायातील खुला घटक हा जे. आर. एफ. मध्ये समाविष्ट होतो. मुस्लीम, ख्रिश्चन, शीख , बौद्ध, जैन समुदायातील ओबीसी घटक हे जे. आर. एफ. आणि एन. एफ. ओ. बी. सी. अधिछात्रवृत्तीमध्ये समाविष्ट आहेत. शीख आणि बौद्ध समुदायातील अनुसूचित जाती या जे. आर. एफ. आणि एन. एफ. एस. सी. अधिछात्रवृत्तीमध्ये समाविष्ट आहेत. मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध समाजातील अनुसूचित जमाती हे जे. आर. एफ. आणि एन. एफ. एस. टी. अधिछात्रवृत्तीमध्ये देखील समाविष्ट आहेत. वरवर पाहता हे कारण खरे वाटू लागते आणि वेगळी अल्पसंख्याकांसाठी अधिछात्रवृत्ती सुरू ठेवण्याची गरज काय असा प्रश्न उपस्थित होतो; पण खोलात जाऊन याची पडताळणी केल्यास एक वेगळेच सत्य आपल्या समोर येते.

१) दोन्ही अधिछात्रवृत्तींचा मूळ उद्देश वेगळा : नेट - जे. आर. एफ. आणि मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती हा ओव्हरलॅप नाहीच !

मुळात जे. आर. एफ. ही गुणवत्तेवर आधारित दिली जाणारी आणि गुणवत्तापूर्ण संशोधनाला प्रवृत्त करणारी अधिछात्रवृत्ती आहे. नेट उत्तीर्ण झालेल्या अत्यंत गुणवंत उमेदवारांनी संशोधनक्षेत्रात यावे आणि ॲडव्हान्स स्टडी करावी हा त्यामागचा उद्देश आहे. तर इतर सर्व अधिछात्रवृत्ती या त्या त्या वंचित मागास समूह गटातील गुणवंत विद्यार्थ्यांचा उच्चशिक्षणातील टक्का वाढविण्यासाठी त्यांना

दिलेले ‘अर्थसाहाय्य’ आहे. मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्तीची निर्मितीच मुळात सच्चर समितीच्या शिफारशींच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली होती आणि मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांचा उच्चशिक्षणातील टक्का वाढवून त्यांचे शैक्षणिक मागासलेपण दूर करण्याचा तो एक प्रयत्न होता. वंचित आणि मागास समूहगटातील विद्यार्थी एम. फिल., पीएच. डी. सारखे संशोधन कार्य आणि उच्चशिक्षण हे विना आर्थिक पाठबळ पूर्ण करणे अवघड आहे याची जाण शासनाला होती; पण मुळात हा उद्देश समजून न घेता सरसकट उद्देशांची सरमिसळ करून मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती बंद करण्याचा निर्णय घेतला गेल्याचे दिसते.

या निर्णयाचा थेट फटका मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन या अल्पसंख्याक समुदायातील खुल्या प्रवर्गात मोडणाऱ्या विद्यार्थ्यांवर पडणार आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या (५५ वी आणि ६१वी फेरी) अहवालानुसार ६०% मुस्लीम, ४०% ख्रिश्चन, ६४% शीख आणि ९४.३% जैन हे खुल्या प्रवर्गात मोडतात. मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्तीमध्ये मोडणारा आणि जे. आर. एफ. सोडून इतर कोणत्याही अधिछात्रवृत्तीमध्ये न मोडणारा सर्वधर्मीय एवढा मोठा खुला गट केंद्र शासनाच्या या निर्णयामुळे सरसकटपणे वगळला जाणार आहे. त्यांच्यासाठी आता नेट - जे. आर. एफ. परीक्षेत खुल्या गटामध्ये स्पर्धा करून जे. आर. एफ. अधिछात्रवृत्ती मिळवणे हाच एकमेव मार्ग असेल. इथे एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे की, इतर दुसऱ्या मागास आणि वंचित घटकांना नेट - जे. आर. एफ. व्यतिरिक्त समूह गट विशिष्ट इतर अधिछात्रवृत्तींचा पर्याय उपलब्ध असणार आहे; पण खुल्या गटातील अल्पसंख्याकांसाठी जे. आर. एफ. शिवाय तसा इतर कोणताही पर्याय उपलब्ध नसेल.

त्यातल्या त्यात मुस्लीम समुदाय हा आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या अनुसूचित जाती आणि जमातींपेक्षासुद्धा मागास असल्याचे सच्चर समिती अहवालात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्तीचा सर्वाधिक फायदा हा लोकसंख्येच्या प्रमाणात जास्त असल्याने मुस्लीम समुदायास होत होता (दरवर्षी १००० पैकी ७३३ विद्यार्थ्यांना), पण ते बंद केल्याने सर्वात जास्त नुकसानदेखील त्याच मुस्लीम समाजातील खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे होणार आहे. गुणवत्तेच्या आधारावर जे. आर. एफ. अधिछात्रवृत्ती मिळवणाऱ्या मुस्लीम विद्यार्थ्यांचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे हे शासनाने समजून घेणे आवश्यक आहे. किंबहुना त्यामुळेच मौलाना आझाद राष्ट्रीय

अधिछात्रवृत्ती ही अल्पसंख्याक गटासाठी वेगळी अधिछात्रवृत्ती योजना शासनाने सुरू केली होती.

२) एन. एफ. ओ. बी. सी. आणि मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती मधील ओव्हरलॅप हा मूळ मुद्दा; पण खरंच किती विद्यार्थ्यांना लाभ मिळतो ?

१९८० सालच्या मंडल आयोगानुसार ५२% भारतीय हे ओबीसी आहेत. संविधानानुसार सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास समूहाला ओबीसी म्हटले जाते. या ओबीसी समूहातील १००० विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी एन. एफ. ओ. बी. सी. ही अधिछात्रवृत्ती केंद्र शासनातर्फे दिली जाते. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या (५५वी आणि ६१वी फेरी) अहवालानुसार अल्पसंख्याक समूहातील ३९.२% मुस्लीम आणि ४१% ख्रिश्चन हे प्रामुख्याने ओबीसी समूहात मोडतात. उर्वरित शीख धर्मात २.४% , बौद्ध धर्मात ०.४% आणि जैन धर्मात ३% ओबीसी आहेत. ज्यांचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. मूळ ओव्हरलॅपचा मुद्दा येतो मुस्लीम आणि ख्रिश्चन ओबीसींचा. ते त्यांच्या लोकसंख्येच्या जरी सरासरी ४०% असले तरी भारतातील एकूण ओबीसींच्या प्रमाणात त्यांची तुलना केली तर मुस्लीम ओबीसी हे केवळ ११.६% आहेत आणि ख्रिश्चन ओबीसी हे १.८०% इतके नगण्य आहेत. आता एन. एफ. ओ. बी. सी.च्या १००० जागांमध्ये जर लोकसंख्येच्या प्रमाणात अधिछात्रवृत्तीचे न्याय्य वाटप झाले, तरी दोघांना मिळून १३.४% म्हणजे केवळ १३४ जागा येतात.

पण खरंच लोकसंख्येच्या प्रमाणात एन. एफ. ओ. बी. सी.चे न्याय्य वाटप होते का ? तर मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्तीसारखा डाटा एन. एफ. ओ. बी. सी.च्या संकेतस्थळावर उपलब्ध नाही; पण महाराष्ट्र शासनसुद्धा महाज्योतीच्या माध्यमातून राज्यातील ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना एन. एफ. ओ. बी. सी.सारखी समांतर अधिछात्रवृत्ती देते, त्याचा डाटा संकेतस्थळावर उपलब्ध आहे. २०२१ साली महाज्योतीच्या माध्यमातून ९५३ ओबीसी विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती दिली गेली. त्यात फक्त ३५ मुस्लीम विद्यार्थ्यांनाच अधिछात्रवृत्ती प्राप्त झाली, म्हणजे ३.६७%. महाराष्ट्रातील एकूण ओबीसींच्या प्रमाणात मुस्लीम ओबीसी हे ९.२% आहेत. याचाच अर्थ फेलोशीपचे न्याय्य वाटप झाले, तरी ८७ जागा मुस्लीम ओबीसीच्या वाट्याला आल्या असत्या आणि तसे ते होत नसल्यामुळे फक्त ३५ मुस्लीम ओबीसी विद्यार्थ्यांनाच फेलोशीप प्राप्त झाली. या विषम वाटपासाठी व्यवस्थात्मक आणि सामाजिक अशी अनेक

कारणे आहेत आणि तो एक वेगळा चर्चेचा मुद्दा आहे.

तसेच इतर मागासवर्गीयांतील अंतर्गत वर्गीकरण करण्यासाठी शासनाने नेमलेल्या न्या. जी. रोहिणी समितीच्या शोधानुसार (द प्रिंटची बातमी ११ जुलै २०२०) २०१४ ते २०१८ या कालखंडात एक टक्क्यापेक्षा कमी असलेल्या काही ओबीसी जातींनी ओबीसी आरक्षणामध्ये जवळपास ५०% आरक्षणाचा फायदा उचलला, तर २०% ओबीसी जातींना ओबीसी आरक्षणाचा काहीही फायदा झाला नाही. याचाच अर्थ ओबीसी आरक्षणामध्येदेखील अंतर्गत न्याय्य वाटप झालेले नाही आणि त्यातल्या त्यात सशक्त असलेल्या जातींनीच या आरक्षणाचा जास्त फायदा घेतल्याचे आणि मागास व वंचित समूह आरक्षणाच्या फायद्यापासून वंचित राहिल्याचे दिसून येते. त्यामुळे एन. एफ. ओ. बी. सी. आणि मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती हे काही प्रमाणात ओव्हरलॅप जरी होत असेल, तरी त्यामध्ये किती प्रमाणात आधीच मागास असलेल्या मुस्लीम आणि ख्रिश्चन ओबीसी यांना न्याय मिळेल हा गहन प्रश्न आहे. ओबीसी आरक्षणच मूळात विषम वाटपाच्या विळख्यात अडकलेले असताना मुस्लीम आणि ख्रिश्चन ओबीसी यांना एन. एफ. ओ. बी. सी.च्या आधारावर सोडणे कितपत योग्य असेल. मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्तीमध्ये त्यांना किमान आपल्या हक्काच्या जागा मिळत होत्या.

३) एन. एफ. एस. सी. आणि मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्तीमधील ओव्हरलॅप : अगदी किरकोळ

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात १६.६% लोकसंख्या ही अनुसूचित जाती समूहात मोडते. या समूह गटातील २००० विद्यार्थ्यांना दरवर्षी एन. एफ. एस. सी. योजनेद्वारे अधिछात्रवृत्ती दिली जाते तसेच जे. आर. एफ.मध्ये देखील अनुसूचित जातींना आरक्षण देण्यात आले आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या (५५वी आणि ६१वी फेरी) अहवालानुसार अल्पसंख्याक समूहातील ३३% शीख आणि ८९.५% बौद्ध हे प्रामुख्याने अनुसूचित जाती समूहात मोडतात. उर्वरित मुस्लीम, ख्रिश्चन, जैन समुदाय अनुसूचित जातींमध्ये मोडत नाही. म्हणजेच एकूण ९३.५% अल्पसंख्याक अनुसूचित जमातीमध्ये मोडतच नाहीत. याचाच अर्थ मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्तीमधील केवळ ६.५% जागा (६५) जागा या एन. एफ. एस. सी. सोबत ओव्हरलॅप होत आहेत. अनुसूचित जातीच्या एन. एफ. एस. सी. मार्फत २००० जागा आहेतच त्यात जर आणखी ६५ जागांची भर

पडली तर जास्त काही नुकसान होणार नाही; पण या ६५ जागांमुळे मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्तीच्या पूर्ण १००० जागा रद्द करणे हा काही तार्किक निर्णय होऊ शकत नाही. याचा थेट परिणाम हा संख्येने सर्वात जास्त असलेल्या मुस्लीम आणि ख्रिश्चन अल्पसंख्याक समूहावर पडेल.

४) एन. एफ. एस. टी. आणि मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती मधील ओव्हरलॅप : नगण्य

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात ८.६% लोकसंख्या ही अनुसूचित जमाती समूहात मोडते. या समूह गटातील ७५० विद्यार्थ्यांना दरवर्षी एन. एफ. एस. टी. योजने द्वारे अधिछात्रवृत्ती दिली जाते तसेच जे. आर. एफ.मध्ये देखील अनुसूचित जमातींना आरक्षण देण्यात आले आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या (५५वी आणि ६१वी फेरी) अहवालानुसार अल्पसंख्याक समूहातील २३.८% ख्रिश्चन प्रामुख्याने अनुसूचित जमाती समूहात मोडतात. ०.५% मुस्लीम, ०.९% शीख, २.६% जैन आणि ७.४% बौद्ध समुदायसुद्धा अनुसूचित जमातीमध्ये मोडतात; पण त्यांचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. म्हणजेच एकूण ९७% अल्पसंख्याक अनुसूचित जमातीमध्ये मोडतच नाहीत. याचाच अर्थ मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्तीमधील केवळ ३% जागा (३०) या एन. एफ. एस. टी. सोबत ओव्हरलॅप होत आहेत. अनुसूचित जामातीला एन. एफ. एस. टी. मार्फत ७५० जागा आहेतच त्यात जर आणखी ३० जागांची भर पडली तर उलट अनुसूचित जमातींमधील काही विद्यार्थ्यांचा फायदाच होईल.

ओव्हरलॅप होणाऱ्या सर्व जागा एकत्रित केल्यास त्या २२९ होतात म्हणजे एकूण जागांच्या २३%. उपयुक्ततावादानुसार ओव्हरलॅप होणाऱ्या २२९ जागांसाठी ७७१ जागा रद्द करणे हे न्याय्य होणार नाही. त्यातही मुस्लीम ओबीसींमुळे ओव्हरलॅप होणाऱ्या जागा या ११६ आहेत आणि एकूण मुस्लीम कोटा हा ७३३ जागांचा आहे. म्हणजे ओव्हरलॅप न होता रद्द होणाऱ्या ७७१ जागांपैकी ६१७ जागा या एकट्या मुस्लीम समाजाच्या कोट्यातील आहेत, ज्यांना इतर कोणताही पर्याय उपलब्ध नाही. त्यामुळे हा निर्णय मुस्लीम समाजावर सर्वात जास्त अन्याय करणारा असेल. तसेच इतर अल्पसंख्याक समाजातील ओव्हरलॅप नसलेल्या १५४ जागा देखील रद्द होतील. त्यांचा आकडा कमी आहे म्हणून त्यांना नजरेआड करणेदेखील चुकीचे होईल. लोकशाहीमध्ये सामाजिक न्याय हा सर्वांसाठी समान लागू होतो किंबहुना वंचित मागास घटकांसाठी सकारात्मक

कृती करण्याचे स्वतः संविधान सुचवते; पण शासनाच्या या निर्णयाने सर्वात जास्त अन्याय हा तुलनेने सर्वात जास्त मागास आणि वंचित असलेल्या घटकांवरच होणार आहे.

महाराष्ट्रातील मुस्लीम आणि ख्रिश्चन विद्यार्थ्यांसाठी तर हा निर्णय आणखीनच जास्त मारक ठरणार आहे. कारण काही राज्यांत केंद्र शासनाच्या अधिछात्रवृत्ती सारखीच राज्यस्तरावर समांतर अधिछात्रवृत्ती दिली जाते. तशी ती महाराष्ट्रातसुद्धा दिली जाते. महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांसाठी बार्टी ही संस्था, मराठा समुदायासाठी सारथी ही संस्था आणि इतर मागासवर्गीयांसाठी महाज्योती ही संस्था अधिछात्रवृत्ती देते. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी अशी कोणतीही अधिछात्रवृत्ती महाराष्ट्र शासनातर्फे दिली जात नाही. त्यामुळे खुल्या गटातील अल्पसंख्याक विद्यार्थी हे पूर्णतः केंद्र शासनाच्या अधिछात्रवृत्ती योजनेवर अवलंबून होते. तसेच ओबीसींसाठी महाज्योतीतर्फे दिल्या जाणाऱ्या अधिछात्रवृत्ती योजनेत मुस्लीम ओबीसींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा मिळत नाहीत हेही आपण वर पाहिले आहे. त्यामुळे शासनाचा मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती रद्द करण्याचा मोठा विपरीत परिणाम महाराष्ट्रातील अल्पसंख्याक विशेषतः मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांवर होणार आहे.

भारताचा संशोधनावरील खर्च हा तसाही फार कमी आहे आणि तो वाढवण्याची गरज रिझर्व्ह बँक, विविध संस्था आणि विचारवंतांनी वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. नीती आयोगाच्या इंडिया इनोवेशन इंडेक्स २०२१ च्या अहवालानुसार भारत आपल्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ ०.७% खर्च हा संशोधनावर करतो, जो जगात सर्वात कमी मध्ये गणला जातो. तसेच  दिवसेंदिवस हा खर्च कमी कमी होत आहे, २००८-०९ मध्ये तो सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ०.८% इतका होता; पण २०१७-१८ मध्ये तो ०.७% इतका कमी झाला. खाजगीक्षेत्र हे सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या फक्त ०.१% इतका खर्च हा संशोधनावर करतात. उर्वरित सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ०.६% खर्च हा शासनाद्वारे केला जातो. अशात शासनाने मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती बंद केली तर शासनाचा संशोधनावरील खर्च हा आणखी कमी होईल जो की उलट वाढायला हवा होता, म्हणून केंद्र शासनाचा मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती रद्द करण्याचा निर्णय हा अधोगतीकडे जाणारा आहे. भारताला जर पाच ट्रिलियन

अर्थव्यवस्थेचे स्वप्न पूर्ण करायचे असेल, तर आपला संशोधनावरील खर्च हा सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान २% असावा लागेल. चीन हा संशोधनावर सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या २% खर्च करतो, अमेरिका २.९% तर इस्त्राईल ४.५% खर्च करतो; पण दुर्दैवाने भारतात हा खर्च वाढण्याऐवजी कमी कमी होत आहे आणि तो एक वेगळा चिंतेचा आणि संशोधनाचा विषय आहे.

सामाजिक न्याय आणि अल्पसंख्याक न्याय साधण्यासाठी, मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांचा प्राथमिक आणि उच्चशिक्षणातील टक्का वाढविण्यासाठी, अल्पसंख्याक समाजाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासकीय नोकऱ्यांमध्ये प्रतिनिधित्व देण्यासाठी, अल्पसंख्याक समुदायातील भीतीचे वातावरण दूर करून विश्वास निर्माण करण्यासाठी आणि भारतात एकूणच शिक्षण आणि संशोधनाच्या वातावरणनिर्मितीसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, मौलाना आझाद राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती आणि नई उडान योजना सुरू राहणे आणि शिक्षण - संशोधनाला प्रोत्साहन देणे अत्यंत आवश्यक आहे. भारताचा आर्थिक आणि जागतिक महासत्ता बनण्याचा मार्ग हा देशात गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन प्रक्रिया वाढवण्यातून आणि लोकसंख्या लाभांशाचा वेळीच योग्य वापर करण्यातून जातो. त्यामुळे लोकसंख्येच्या २०% असलेल्या अल्पसंख्याक समुदायाची शैक्षणिक प्रगती सुरू राहील याची शासनाने गांभीर्याने काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

*(लेखक हे संशोधक विद्यार्थी असून ते डॉ. चंद्रकांत गोंधळी यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकशास्त्र आणि राज्यशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ येथे पीएच. डी. करीत आहेत.)*

■ ■

*मुस्लीम सत्यशोधक मंडळ वर्धापनदिनानिमित्त देणगी, जाहिरात आणि शुभेच्छा देणाऱ्या पुढील मान्यवरांचे आभार !*

**मा. जगदीश काबरे**

**मा. अशोक नांदकर**

**मा. सुरेश शिपूरकर**

**मा. असीम सय्यद**

# अल्पसंख्याकांसमोरील अस्मिता आणि अस्तित्वाचे चित्र

● डॉ. शमसुद्दीन तांबोळी

संयुक्त राष्ट्र संघटनेने १८ डिसेंबर १९९२ रोजी धार्मिक, भाषिक आणि वांशिक अल्पसंख्याक समाजातील व्यक्तींना अधिकार देणारी घोषणा जाहीर केली. विविध राष्ट्रांनी आपल्या देशातील अल्पसंख्याकांच्या अधिकाराची स्थिती समजून घेऊन त्याचा पाठपुरावा करण्यासाठी आपल्या सोयीनुसार असा दिवस निश्चित करण्याचे आवाहन केले. त्यानुसार भारतात अल्पसंख्याक अधिकार दिन १८ डिसेंबर, २०१३ मध्ये प्रथम साजरा करण्यात आला आणि नंतर वाढत्या राजकीय उदासीनतेचा अनुभव येत गेला.

'बळी तो कान पिळी' किंवा 'मोठा मासा छोट्या माशाला गिळतो, बलवानच जगात शिल्लक उरतो' अशा आशयाच्या म्हणी आणि वाक्प्रचार भारतासह जगभरात पूर्वापार वापरले जातात. मोठा मासा छोट्या माशाला गिळतो हे कटू सत्य आहे; परंतु मोठ्या माशाने छोट्या माशाला गिळू नये किंवा छोट्या माशालाही सन्मानाने जगता आले पाहिजे ही लोकशाही आणि समानतेच्या युगाची नैतिकता आहे. आज आपण ज्या काळात राहतो त्यात मानवी प्रतिष्ठा आणि व्यक्तिस्वातंत्र्य याला महत्त्व आहे.

बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक समाजातील सामंजस्य, परस्परांचा आदरपूर्वक स्वीकार आणि सन्मान ही आदर्श स्थिती निर्माण व्हावी. अल्पसंख्याक समाजाला बहुसंख्याकांची भीती वाटू नये. विकासाच्या प्रक्रियेत अल्पसंख्याकांना समान संधी मिळावी तसेच राष्ट्राच्या विकासात अल्पसंख्याकांना हातभार लावता येईल अशी संधी निर्माण करावी असा सारासार विचार करून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अल्पसंख्याकांच्या अधिकाराचा मुद्दा जागतिक समुदायासमोर मांडला. अल्पसंख्याक-बहुसंख्याक हा मुद्दा जागतिक असल्याने विविध देशांत अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेचा आणि त्यांच्या अधिकाराचा विचार करण्यासाठी अल्पसंख्याक हक्कदिनाची कल्पना पुढे आली.

१८ डिसेंबर हा दिवस 'अल्पसंख्याक अधिकार दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रत्येक देशात वांशिक, भाषिक आणि धार्मिक

अल्पसंख्याक समूह आहेत. लोकशाही असलेल्या देशात धर्म आणि लोकसंख्येचे प्रमाण विचारात न घेता त्यांना समान अधिकार उपभोगता येतात का ? हा महत्त्वाचा प्रश्न समजण्यात येतो. जगात अशा अनेक घटना घडतात जेथे खास नियोजनाअभावी अल्पसंख्याक समाजाला विषमतेशी संघर्ष करावा लागतो. अशा विषमतेला आळा घालता यावा म्हणून संयुक्त राष्ट्र संघटनेने अल्पसंख्याकांच्या अधिकार विषयक धोरण स्वीकारले आणि ते जागतिक समुदायासमोर मांडले. ज्यात स्पष्ट केले आहे की, 'राज्यांनी वांशिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि भाषिक अस्मितांचे अस्तित्व टिकविण्यासाठी, त्याचा प्रसार आणि संरक्षणासाठी आपापल्या देशात उत्तेजन द्यावेत. भारताच्या दृष्टीने या दिनाला फार महत्त्व आहे कारण येथे बहुसंख्याक-अल्पसंख्याक मुद्यांवर सातत्याने चर्चा, वाद-प्रतिवाद होत असतात. भारतीय संविधानाने जरी सर्व नागरिकांना समान दिलेले असले आणि धर्मनिरपेक्षता, विविधतेत एकता हे भारताचे खास वैशिष्ट्य असले तरी भारतात बहुसंख्याक - अल्पसंख्याक हा मतभेदाचा आणि वादाचा मुद्दा सातत्याने छेडला जातो. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाने १८ डिसेंबर हा अल्पसंख्याक अधिकार दिन घोषित करून अल्पसंख्याकांच्या अधिकारांचे संरक्षण आणि भिन्न समुदायांचे परस्परांशी सामंजस्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले असले, तरी आज अशा प्रयत्नांची गरज वाढली असताना त्याबाबत उदासीनता किंवा हेतुपुरस्सर दुर्लक्ष होताना दिसते.

भारत सरकारच्या अल्पसंख्याक मंत्रालयाने शीख, मुस्लीम, ख्रिश्चन, पारशी, बुद्धिस्ट आणि जैन समाजाचा अल्पसंख्याक समुदायात समावेश केला आहे. हे सर्व घोषित अल्पसंख्याक समुदाय भारताच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास २०% आहेत. भारतात किमान २५% अल्पसंख्याकांची लोकसंख्या असणारे १२१ जिल्हे आहेत. यात केंद्रशासीत आणि जेथे अल्पसंख्याक बहुसंख्याक आहेत असे पंजाब, मेघालय, मिझोराम, जम्मू- काश्मीर अशी काही राज्ये वगळली आहेत.

आजतागायत भारत सरकारने राष्ट्रीय व राज्य अल्पसंख्याक आयोग, मौलाना आझाद अल्पसंख्याक महामंडळ, शालेय शिक्षणासाठी नई मंझिल योजना, कौशल्य विकासासाठी उस्ताद योजना, इथपासून ते अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी पंतप्रधानांच्या पंधरा कलमी कार्यक्रमाद्वारे अल्पसंख्याकांच्या विकास योजना घोषित केल्या. या योजना समाजात किती प्रमाणात पोहचल्या ?

का पोहचल्या नाहीत हा पुन्हा संशोधनाचा विषय आहे.

भारतातील अल्पसंख्याक समाजाच्या प्रश्नांचा अभ्यास करून त्यांची स्थिती सुधारण्यासाठी न्या. रंगनाथ मिश्रा आयोगाची स्थापना झाली. मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक स्थितीचा अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी न्या. सच्चर समितीचे गठन करण्यात आले. (२००५) या आयोगाचे आणि अभ्यास समितीचे गठन होतानाच त्यास प्रचंड प्रमाणात विरोध करण्यात आला. मुस्लीम आणि इतर अल्पसंख्याक समाजाबद्दल रोष वाढवण्यात आला. परिणामी या राष्ट्रीय आयोगाने सादर केलेला शिफारशींचा अहवाल (२००७) बासनात गुंडाळून ठेवावा लागला. अल्पसंख्याकांच्या समस्यांकडे सहानुभूती किंवा संवेदनशीलपणे पाहण्याऐवजी त्याकडे संप्रदायवादाच्या चष्म्यातून पाहण्याची दृष्टी विकसित करण्यात आली. हिंदुत्ववादी गटांनी याला शासनाचे लांगुलचालन म्हणून पाहिले. न्या. सच्चर समितीने मुस्लीम समाजाची स्थिती समजून घेऊन उपाय योजना करण्यासाठी तीन शिफारशी केल्या होत्या. १. राष्ट्रीय माहिती संकलन संस्था निर्माण करावी. (नॅशनल डाटा बँक) २. मूल्यमापन आणि मार्गदर्शन आयोग असावा. ३. समान संधी आयोग असावा. वास्तविक या शिफारशीबाबतीत सकारात्मकता दाखवून तसे प्रयत्न झाले असते, तर या समाजाच्या स्थितीबद्दल पारदर्शक माहिती उपलब्ध होऊन काही कृतिकार्यक्रम निश्चित करणे शक्य होते. तर न्या. रंगनाथ मिश्रा आयोगाने १९५० च्या राष्ट्रपतींच्या संविधानात्मक आदेशात दुरुस्ती करून मुस्लीम समाजातील मागास जातींना आरक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याची शिफारस केली होती. मात्र राजकीय फायदे-तोटे विचारात घेऊन कोणत्याही राजकीय पक्षांनी या शिफारशी स्वीकारण्याचे धाडस दाखवले नाही. उलट हिंदुत्ववाद्यांनी याकडे देशासमोरील आपत्ती किंवा अफजल गुरूने लावलेल्या सुरूंगापेक्षा संसदेने लावलेला मोठा सुरूंग म्हणून आरडाओरड केली.

हा झाला मागील दीड दशकातील प्रकार.

आजमितीला १८ डिसेंबर हा अल्पसंख्याक अधिकार दिन आहे याचे विस्मरण झाले आहे. किंबहुना विस्मरणात घालण्याची मानसिकता आहे. स्वातंत्र्यसेनानी भारताचे पहिले शिक्षणमंत्री भारतरत्न मौलाना आझाद यांचा जन्मदिवस ११ नोव्हेंबर हा 'राष्ट्रीय शिक्षणदिन' म्हणून साजरा करण्याचे २००८ मध्ये घोषित करण्यात आले. गेल्या आठ-दहा वर्षांपासून हळूहळू याचे विस्मरण वाढताना दिसत आहे. मागील वर्षी महाराष्ट्र शासनाने २०२२ मध्ये कोणकोणत्या

राष्ट्रीय महापुरुषांची जयंती आणि कोणते राष्ट्रीय दिन साजरे करायचे याची यादी जाहीर केली. मात्र या यादीत देशाचे पहिले शिक्षणमंत्री, स्वातंत्र्यसैनिक भारतरत्न मौलाना आझाद यांचे नाव, तसेच राष्ट्रीय दिन गायब झाले आहे. हे लक्षात आणून दिल्यानंतरही तशी सुधारणा करण्याची तसदी घेतली नाही. अल्पसंख्याक नेते म्हणून नाही; पण देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारे, राष्ट्रीय एकात्मता जोपासणारे आणि देशाच्या शैक्षणिक विकासाची पायाभरणी करणारे एक राष्ट्रीय नेते म्हणून तरी मौलाना आझादांचा आदर का होत नाही ?

अल्पसंख्याक समाजात शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मुस्लीम समाज अधिक मागासलेला आहे हे विविध अभ्यासकांनी अहवालातून स्पष्ट केले आहे. या समाजातील विद्यार्थी पटसंख्या कमी होत असते, त्यांची गळती मोठ्या प्रमाणात असते. तसेच ही मुले विविध कारणांमुळे मदरसा या पारंपरिक शिक्षणाकडे वळतात. हे लक्षात घेऊन अशा मुलामुलींना मुख्य प्रवाहातील शिक्षणाकडे वळवण्यासाठी प्रिमॅट्रिक आणि उच्चशिक्षणासाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती देण्यास सुरुवात केली. ही अशी योजना आहे हे समजण्यात अनेक वर्षे गेली. आता कुठे जाणीव जागृती झाली. विद्यार्थ्यांनी अर्ज केले, वंचित विद्यार्थ्यांना संधी मिळावी म्हणून तारीख वाढवून दिली. मात्र अल्पसंख्याक मंत्रालयाने अचानक घोषित केले की, प्राथमिक शिक्षण मुफ्त असल्याने ही शिष्यवृत्ती रद्द करण्यात येत आहे. वास्तविक गरीब पालक आपल्या मुलांना कामाला जुंपतात, मदरशात घालतात त्यांना काही प्रोत्साहन मिळावे यासाठी ही तोडकी शिष्यवृत्ती मिळत असे. भले शिक्षण मुफ्त असले तरी पुस्तके, शैक्षणिक साहित्य, प्रवास असा इतर खर्च असतोच ना ? हा अत्यंत दुर्दैवी निर्णय घेऊन सरकारने आपण अल्पसंख्याकांच्या विकासाबद्दल कटिबद्ध नाही, अशी भावना वाढवण्यास हातभार लावला आहे.

याच पद्धतीने अल्पसंख्याक समाजातील विशेषतः मुस्लीम समाजातील विद्यार्थी उच्चशिक्षण-संशोधनाकडे वळतात. त्यांना उत्तेजन देण्यासाठी भारत सरकारच्या अल्पसंख्याक मंत्रालयाकडून मौलाना आझाद राष्ट्रीय छात्रवृत्ती देण्यात येत असे. यामुळे विद्यार्थी संशोधनाकडे वळण्यास गती मिळाली होती. मात्र अगदी अलीकडेच म्हणजे ८ डिसेंबर, २०२२ रोजी भारत सरकारच्या अल्पसंख्याक मंत्रालयाने ही अधिछात्रवृत्ती इतर शिष्यवृत्तींना ओव्हरलॅप करते असे कारण दाखवत ही अधिछात्रवृत्ती रद्द करण्यात येत असल्याचे सांगितले

आहे. अशा या घटना अल्पसंख्याक समाजाबद्दल शासन दुजाभाव बाळगते हा जो समज आहे त्यास पुष्टी मिळते. एका बाजूला 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' अशा घोषवाक्यांचा वापर करायचा आणि प्रत्यक्षात विकास आणि विश्वासाच्या मुद्याला बगल देणारे निर्णय घ्यायचे धोरण पक्षपाती वाटल्यास त्यात कसले आश्चर्य !

मागील काही वर्षांत मुस्लिमांची अवस्था अधिकाधिक खालावत असताना दिसत आहे. हिंसाचार, मॉब लिंचींग, लव्ह जिहादच्या नावाने होणारा अपप्रचार आणि धमकी, घरवापसी, इतिहासाच्या पुनर्मांडणीच्या निमित्ताने होणारा पक्षपात, गाव, शहर, वास्तू यांची होणारी नामांतरे अशा घटनांमुळे समाजात अस्वस्थता आणि असुरक्षितता वाढताना दिसत आहे.

भारतीय संविधानाला बहुविविधतावादी, धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी, समाज हवा आहे, तर हिंदुत्ववादी संघटना आणि राजकीय पक्ष देशाची धर्मनिरपेक्ष प्रतिमा पुसून भारताला हिंदू राष्ट्र बनवण्यासाठी आक्रमक झाले आहेत. मध्यंतरी कोरोना काळात तर 'कोरोना जिहाद, कोरोना बॉम्ब, जामिया जिहादी' संबोधून मुस्लिमांबद्दल शत्रूभाव निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. अल्पसंख्याक अधिकार दिनाच्या पार्श्वभूमीवर दिसणारे हे चित्र भारतीय समाजाच्या भविष्यकालीन दिशा दाखवते. मुस्लीम समाजाची ही दुरावस्था निर्माण होण्यास निश्चितपणे या समाजातील धर्मवादी राजकारण जबाबदार आहे. समाजातील पुराणमतवादी, जमातवादी शक्तींनी ऐहिक प्रश्न सोडवण्यास प्राधान्य देण्यापेक्षा भावनिक प्रश्न पुढे केले. सुधारणेस विरोध केला आणि ही दुरावस्था निर्माण होण्यास हातभार लावला.

अल्पसंख्याक अधिकार दिनी देशातील अल्पसंख्याकांच्या प्रश्नांवर सर्वांगीण अशी निकोप चर्चा होऊन आत्मसुधारणेस गती मिळाली असती; पण तीही संधी मावळताना दिसते आहे. एखादा धोरणात्मक विचार यशस्वी करण्यासाठी धोरणकर्त्यांपेक्षा धोरण राबवणाऱ्यांची इच्छाशक्ती महत्त्वाची असते. अल्पसंख्याक समाजाप्रती आकसभाव बाळगणारे जेव्हा सत्तेवर येतात तेव्हा त्यांच्याकडून अल्पसंख्याकांच्या अस्मितांचे विषय दुय्यम ठरतात. आजमितीला तर अस्तित्वाचे विषय ऐरणीवर आहेत. आपल्याला पटो वा न पटो आजचे हे वास्तव एका प्रदीर्घ जमातवादी विचार प्रसाराची निष्पत्ती आहे. संप्रदायवादी राजकारणाला हे साजेसे आहे. मात्र हताशपणे या परिस्थितीकडे पाहत राहणे हे भारतीय समाजापुढे अधिक उग्र स्वरूपाच्या समस्यांना आमंत्रण देण्यासारखे ठरेल.

अल्पसंख्याक समाजाने आपल्या तथाकथित अस्मितांना बगल देत संविधान सापेक्ष समाज उभा करण्यास प्राधान्य दिले पाहिजे.

भारतीय समाजासाठी सर्वाधिक पाठबळ भारतीय संविधानाचे आहे. भारतीय संविधानाला अपेक्षित समाज उभा करणे हे तसे सोपे राहिले नाही. मात्र त्यास पर्याय नाही. भारतीय संविधान, प्रबोधनाची सत्यशोधक परंपरा आणि न्याय यंत्रणा ही आपली बलस्थाने आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायमूर्ती मा. टी. एस. ठाकूर यांनी ७ डिसेंबर २०१५ रोजी इंडियन एक्स्प्रेसमध्ये लिहिलेला लेख या दृष्टीने फार सूचक आहे. ते म्हणतात, 'कोणत्याही समाजाने आपला छळ होईल अशी भीती बाळगण्याची किंवा आपल्याला धोका आहे असे मानण्याची गरज नाही, कारण न्यायपालिका सर्व समाजाच्या व वर्गाच्या हक्कांचे रक्षण करण्यास समर्थ आहे... जोपर्यंत कायद्याचे राज्य आहे आणि घटनेनेच सर्वांना हक्कांची हमी दिलेली आहे, तोपर्यंत काळजी करण्याचे काही कारण नाही. असहिष्णूतेच्या बाबीला राजकीय आयाम असू शकतील; परंतु न्यायपालिकेच्या दृष्टीने कायद्याच्या राज्याचे आणि नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करणे यांबाबत कोणताही संदेह अथवा शंका नाही... देशाच्या विकासासाठी सहिष्णू समाजाची जोपासना करायला हवी.'

*(लेखक मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष आहेत.)*

■ ■

काही वेळा आपले शत्रू आपले खच्चीकरण करतात, हे खरे असले, तरी अनेकदा आपल्या मनोदुर्बलतेमुळे आपण स्वतःच आपले खच्चीकरण करून घेतो. स्वतःच स्वतःला खचवण्याचा असला आत्मघातकी प्रकार आपण कधीही करू नये. जगात स्वत:चा उद्धार स्वतः करणारी माणसे जशी आढळतात, तशीच स्वतःचे खच्चीकरण करणारी माणसेही आढळतात. पहिल्या प्रकारची माणसे स्वतःचे उद्धारकर्ते बनतात. याउलट दुसऱ्या प्रकारची माणसे स्वतःच स्वतःची शत्रू बनतात.

**- डॉ. आ. ह. साळुंखे**

*('बहुजनांसाठी जीवनवादी सुभाषिते' पुस्तकातून...)*

# हमीद दलवाई यांचं वैश्विक साहित्य

• युवराज मोहिते



आपल्या अल्प आयुष्यात भारतात साहित्यिक ठसा उमटवणारे समाजसुधारक हमीद दलवाई यांची 'साहित्यिक' म्हणून फारशी चर्चा होत नाही. कथा-कादंबरी ते वैचारिक साहित्य असे अनेक प्रकार त्यांनी हाताळले. हमीद दलवाई यांच्या साहित्यातील योगदानाविषयी......

हमीदभाई दलवाईंची सगळ्यांना ओळख आहे ती धर्मसुधारणेसाठी लढणारे क्रांतिकारक म्हणूनच. हमीदभाईंनी मुस्लीम धर्मातील अनिष्ट प्रथा आणि परंपरा यांच्याविरोधात भूमिका घेऊन सुधारणेसाठी जोरकसपणे चळवळ उभी केली. मुस्लीम समाजातील मागासलेपण, धर्माचा दैनंदिन जीवनातील हस्तक्षेप, धर्माच्या जोखडाखाली होणारी पिळवणूक, मुल्ला-मौलवींची दादागिरी, धर्माचा मन मानेल तसा होणारा दुरुपयोग, महिलांचे जटिल प्रश्न, तलाकप्रथा.... अशा अनेक विषयांवर स्वतंत्र भारतात जोरकसपणे आवाज उठवला तो हमीदभाईंनी. एक वेगळ्या प्रकारची क्रांतीच त्यांनी या देशात निर्माण केली. हा लढवय्या माणूस प्रत्येक कार्यकर्त्याला प्रेरणा आणि बळ देतो. प्रतिकूल परिस्थितीतही कसं लढावं, ते हमीदभाईंची ही चळवळ समजून घेताना लक्षात येतं.

मुळात हमीदभाईंच्या चळवळीचा एक अजरामर इतिहास आहे. त्याबाबत नेहमी चर्चा होत असते; मात्र 'साहित्यिक' म्हणून हमीद दलवाई यांची चर्चा फारशी होत नाही. बरं, यातही जी काही चर्चा होत होती, तीही तशी मर्यादितच. त्यांची 'इंधन' नावाची कादंबरी आणि 'मुस्लीम जमातवाद : कारणे आणि मीमांसा' हा वैचारिक ग्रंथ यापलीकडे या साहित्याची चर्चा होत नव्हती. चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी हमीदभाई हे लेखक असण्यापेक्षा ते समाजसुधारक

आहेत, हे अधिक महत्त्वाचं वाटत असावं.

चिपळूणच्या साहित्य संमेलनात हमीद दलवाई यांच्या घरावरून निघणारी दिंडी संयोजकांनी काहीही कारण न देता रद्द केली आणि वाद उभा राहिला. मूठभर स्थानिक मुस्लीम लोकांना हाताशी धरण्याचा संयोजकांचा डाव तेव्हाही उघड झाला होता. एका हाती परशुराम आणि दुसऱ्या हाती धर्मवादी मुस्लीम, अशी साहित्य संमेलन संयोजकांची खेळी होती.

मात्र राष्ट्र सेवा दलाच्या सर्व कार्यकर्त्यांनी आपण समांतर दिंडी काढायची असा संकल्प केला आणि दिंडी निघाली तेव्हा सगळेच त्यात सामील झाले. संमेलनाध्यक्ष प्रा. नागनाथ कोत्तापल्ले यांनीही पुढे येत आपल्या खांद्यावर ती हमीदभाईंची दिंडी घेतली. अनेक साहित्यिक, माध्यमं आणि मान्यवरांनी याचं स्वागत केलं. संयोजकांना मोठी चपराक बसली. याच विषयावर सगळं साहित्य संमेलन फिरत राहिलं.

खरं तर धार्मिक सुधारणेचा आग्रह धरणाऱ्या हमीद दलवाईंना हिंदुत्ववाद्यांचं हस्तक ठरवलं गेलं होतं. हमीदभाई यांच्याबाबत दोन्ही बाजूचे धर्मवादी एक होतात. साहित्य संमेलनातही तसंच झालं होतं. या दिंडीला विरोध करणाऱ्या काही मुस्लीम कार्यकर्त्यांना भेटल्यानंतर त्यांचा लटका विरोध लक्षात येतो. मुळात दलवाईंच्या घरावरून निघणाऱ्या दिंडीला आम्ही कधीच विरोध केला नाही. ती आमची मागणीच नव्हती. दिंडीची घोषणा करताना संयोजकांनी ‘मुस्लीम समाजसुधारक’ हमीद दलवाई, असं म्हटल्याने त्याला आमचा आक्षेप होता. त्यांच्या समाजसुधारणेविषयी आमचे मतभेद आहेत. ‘साहित्यिक’ म्हणून हमीद दलवाईंच्या घरावरून दिंडी काढण्यास आमचा विरोध नव्हता, असं ही मंडळी म्हणू लागली.

खरं तर या संमेलनाच्या निमित्ताने दोन मुद्दे अधोरेखित झाले. एक परशुराम आणि दुसरं हमीदभाईंचं क्रांतिकारी काम. काही का असेना, यानिमित्ताने धर्मसुधारणेसोबतच हमीदभाईंच्या साहित्यावर चर्चा सुरू झाली. सध्याच्या काळात हे महत्त्वाचं आहे. या संमेलनाच्या निमित्ताने हमीदभाईंच्या साहित्यालाही अकस्मात मागणी वाढली, हेही नमूद करायला हवं. टी. व्ही.वर त्याची बरीच चर्चा झाली. ‘साहित्यिक’ हमीदभाई पुन्हा एकदा पटलावर आले.

हमीदभाईंनी ललित आणि वैचारिक अशा दोन्ही पद्धतीचं लिखाण केलंय. त्यांनी हाताळलेले विषय, त्यांच्या भाषेचा पोत, त्यांची ओघवती शैली... हे सारं

विस्मयचकित करणारं आहे. खरं तर प्रा. शमसुद्दीन तांबोळी वगळता यावर नीट विश्लेषण करणारं लेखन कुणी केलेलं वाचनात आलेलं नाही. हमीदभाईंच्या जीवनावर, मैत्रेयावर अनेकांनी लिहिलंय; पण साहित्याची मीमांसा तशी झाली नाही. तथाकथित लेखकांनी ते टाळलं की जमलं नाही, हा वादाचा विषय आहे. हमीदभाई तसे उच्चशिक्षित, प्राध्यापकी करणारे, भाषाविद्यावाचस्पती वगैरे पठडीतील कुणी नाहीत. मात्र तरीही त्यांचं लिखाण हे प्रस्थापित लेखकांना अंतर्मुख करायला लावणारं ठरलं. मला वाटतं, त्या काळातही त्यांनी काय लिहिलं यापेक्षा या माणसाला ही साहित्यनिर्मिती कशी शक्य झाली याचंच कोडं लेखकांना पडलं असावं.

हमीदभाईंच्या लिखाणाला कोकणातील अस्सल मातीचा वास आहे. या मातीचं वैशिष्ट्यच असं आहे. माणूस लिहायला बसला की शैली त्याचा हात धरते. मग डॉ. बाबासाहेब आंबेडकर असोत की लोकमान्य टिळक असोत... वेगवेगळ्या धाटणीचे लेखक या मातीतून घडलेत. बाळशास्त्री जांभेकरांपासून ते साने गुरुजींपर्यंत आपल्या सिद्धहस्त लेखणीतून समताधिष्ठित मूल्यव्यवस्था टिकवून ठेवण्याचं काम या लेखकांनी केलंय. साने गुरुजींची लेखनशैली ही मराठी साहित्यातील मापदंड ठरली आहे. शब्दजंजाळ टाळत, साधी सोपी; पण मनाला भिडणारी भाषा हे त्यांचं वैशिष्ट्य. याच धाटणीची शैली हमीदभाईंची आहे. त्यांच्या लेखनाला ललित आणि वैचारिक अशा दोन भागांत विभागलं जात असलं, तरी दोन्हीचा पाया हा वास्तववादी होता. त्यांच्या लिखाणातील पानं, फुलं, नदी, समुद्र, निसर्ग हे सारे उल्लेख हे एक वेगळ्या विद्रोही सौंदर्याचं प्रतीक होऊन येतं.

एकोणिसाव्या शतकात पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आणि विज्ञानाच्या विकासात आपल्या धार्मिक श्रद्धा, चालीरीती, सामाजिक प्रथांना पुन्हा तपासून पाहण्यास सुरुवात झाली. यातूनच धर्म या संकल्पनेलाच आव्हान देण्यात येऊ लागलं. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, थिऑसॉफिकल सोसायटी, रामकृष्ण मिशन आणि पुढे महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाज इत्यादींची स्थापना केली. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर करून धर्मातील जातीप्रथा, अस्पृश्यता आणि अनिष्ट प्रथांना थेट आव्हान दिलं. इतर धर्म, समाजातही या सुधारणावादी विचारांची बीजं रोवली जाऊ लागली.

खरं तर हमीदभाईंच्या सगळ्या जीवनाचा पट पाहिला, तर लहानपणापासूनच आजूबाजूला घडणाऱ्या घटनांकडे सूक्ष्मपणे ते पाहत होते. ते

पाहत असतानाच काय घ्यायचं आणि कशाला नाही म्हणायचं, याची भूमिकाही ठरत होती. गंमत म्हणजे मुस्लीम लीगची कोकणातील पहिली स्थापना हमीदभाईंच्या वडिलांनी चिपळूणमध्ये केली. नारळ वाढवून याचं उद्घाटन झालं. हमीदभाईंनी शाळेत 'वंदे मातरम्' म्हटलं म्हणून वडिलांनी छडीने मारलं होतं. फाळणीच्या घटनांचा हा परिणाम होता.

या सगळ्या वातावरणाच्या प्रभावातच हमीदभाई लिखाण करू लागले. 'किर्लोस्कर', 'वसुधा', 'मनोहर' या नियतकालिकांमधून ते लिखाण करीत. आपल्या अल्प जीवनात त्यांनी वेगवेगळे साहित्यिक प्रकार हाताळलेत. अगदी पु. ल. देशपांडे यांनी त्यांच्याकडून आकाशवाणीसाठी श्रुतिकाही लिहून घेतल्यात. खरं तर हमीदभाई यांच्याकडे असलेली माहिती, त्यांनी अनुभवलेलं भावविश्व आणि लेखनशैली याचं पु. लं.ना अप्रूप होतं. त्यामुळे आकाशवाणीवर हे सगळं यावं यासाठी त्यांनी हमीदभाईंकडून श्रुतिका लिहून घेतल्या. यामुळे मराठी-मुस्लीम जगातील वातावरण पहिल्यांदा आकाशवाणीवर श्रोत्यांनी अनुभवलं. हमीदभाईंवर जो लेख पु. लं.नी लिहिला आहे तो वाचण्यासारखा आहे.

'डायरी' हा प्रकारही हमीदभाई लिहीत होते. त्यांनी देशभर भ्रमण करून मुस्लीम समाजासोबत एक संवाद-यात्रा केली. या यात्रेत ते कुणाला भेटले, त्यांनी काय वातावरण पाहिलं, सामान्य मुस्लीम समाज आणि मुल्ला-मौलवी यातील निरीक्षणं हमीदभाईंनी नीट टिपून ठेवली होती. त्यामुळे संवाद-यात्रेवर आधारित ही डायरी म्हणजे महत्त्वाचा दस्तऐवज होता. त्यांच्या निधनानंतर प्रसिद्ध झालेली ही डायरीही वाचण्यासारखी आहे. बारीक बारीक नोंदी या डायरीत त्यांनी नमूद केल्या आहेत. हे काम करताना आपल्यावरील जबाबदारीची जाणीव त्यांना कायम होती.

हमीदभाईंनी लेखनाला सुरुवात केली ती १९६० च्या दशकात. कथा या प्रकारातून त्यांनी लिखाण सुरू केलं. कुठल्याही लेखकाला आपलं माध्यमही सापडायला लागतं. कथा हा खरा तर कल्पनाविष्कार; पण आपल्या आजूबाजूला घडलेल्या घटनांनाच कथेच्या रूपाने हमीदभाईंनी मांडलं. 'लाट' हा त्यांचा एकमेव कथासंग्रह; पण यातील कोणतीही कथा उघडा आणि वाचा, ती वेगळी अनुभूती देते. आपला भोवताल, आपला समाज, आपलं घर, आपले नातेवाईक या सगळ्यांतील ताणेबाणे, त्यातील विसंगती... हे सगळं कथांमधून हमीदभाईंनी ताकदीने मांडलं. कथा लिहिताना मोठी ताकद लागते. भूमिका घ्यावी लागते.

म्हणूनच हे केवळ ललित लेखन राहत नाही, ते वैचारिक आंदोलन उभं करतं.

'लाट'मधील 'कफनचोर' या कथेने वादळ उभं केलं. परिस्थितीच्या गर्तेत सापडलेला माणूस पोटाच्या खळग्यासाठी कोणत्या पातळीला जाईल, ते सांगता येत नाही. अमानुष आणि बेदरकारपणे काम करणाऱ्या माणसाच्या मनात निर्जीव देहही भाव-भावनांचा कल्लोळ कसा उडवतो, याचं प्रभावी चित्रण या कथेत आहे. या कथेची तुलना काहींनी अण्णा भाऊंच्या 'स्मशानातील सोनं' या कथेशी केलीय. ते आहेच; पण मला वाटतं, बाबुराव बागूल यांच्या शैलीसोबत जाणारी ही कथा आहे. एकदम आरपार आणि टणक. शब्दांतून जे वर्णन आणि वातावरण उभं केलंय त्याला तोड नाही. ही कथा वाचताना आपलाच श्वासोच्छवास कधी वेग घेतो हे आपल्यालाच कळत नाही.

'तळपट' या कथेत तर गावातील गावकी, संशय, शपथेवरील न्यायनिवाडा, अंधश्रद्धा यांचं चित्रण बेमालूम आहे. खरं तर कोकणातील मुस्लीम समाज हा तसा आक्रमक नाही. भिडस्त स्वभावाची ही गोरीगोमटी मराठी माणसं. या कथेवरून अनेक गोष्टी आपल्या लक्षात येतात. 'लाट' ही शीर्षककथा लेखक आणि त्याच्यावर प्रेम करणाऱ्या वाचक महिलेच्या तरल संबंधांवर आहे. लिहिलेल्या कथेचं बीज खोटं आहे, हे कळल्यानंतर उद्विग्न झालेल्या लेखकाच्या मनातील आंदोलन यात प्रकटलेलं आहे... 'लाट'मधील प्रत्येक कथा वेगळी, प्रत्येक अनुभव वेगळा.

'इंधन'ने असाच नवा इतिहास रचला. यापूर्वी कादंबरीतून असं वातावरण, अनुभव मांडले गेले नव्हते. हिंदू-मुस्लीम यांच्या संबधांवर इतक्या सूक्ष्मपणे कुणी लिहिलं नव्हतं. त्याची दखल साहित्यविश्वाला घ्यावी लागली. यातून हमीद दलवाई नावाचा लेखक ताकदीनिशी समोर आला.

आडपडदा न ठेवता स्वतःचीच गोष्ट सांगणारा. गोष्ट सांगता सांगता समाजातील मागासलेपणाची मीमांसा करीत अंतर्मुख करायला लावणारा... हा लेखक मानवीमुक्तीवर भाष्य करतो. यात आपण कुठे, काय व्हायला हवं, याबाबत वाचकाला विचार करायला प्रवृत्त करतो. असं साहित्य एका समाजाचं, एका भाषेचं, प्रदेशाचं राहत नाही. ते वैश्विक असतं.

हो, हमीदभाईंचं साहित्य हे वैश्विक आहे.

'मुस्लीम जातीयतेचे स्वरूप - कारणे व उपाय' हा ग्रंथ किंवा त्यानंतर 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान' या ग्रंथाने सशक्त वैचारिक लिखाणाने

हमीदभाई तळपले. एक नवा जाहीरनामाच त्यांनी मांडला. भारतातील धार्मिकता आणि इतिहासाच्या पार्श्वभूमीवर मुस्लीम समाजाचा धांडोळा त्यांनी घेतला आहे. अशा पद्धतीचं संशोधन पहिल्यांदाच त्यांनी केलं. मुस्लीम समाजाच्या मागासलेपणाची नेमकी मीमांसा त्यांनी त्यावेळीच केली होती. याबाबतचे अभ्यासक म्हणतात तेच खरं आहे. न्या. सच्चर आयोगानेही या ग्रंथाचा हवाला घेतला असेल. हमीदभाईंनी मांडलेलं हे वास्तव समाजाने स्वीकारलं असतं तर प्रश्न मार्गी लागण्यास आधीच सुरुवात झाली असती. मुस्लीम समाजात परिवर्तनही जलद गतीने झालं असतं.

लोकशाही, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रवाद, स्वातंत्र्य हा हमीदभाईंच्या संशोधनाचा पाया आहे. मात्र यातील वास्तव समजून घेण्यात मुल्ला-मौलवी सोडाच; पण सेक्युलर म्हणून गळे काढणाऱ्या कॉंग्रेसच्या पचनीही हे विचार पडले नाहीत. अगदी पहिला समाजवादी पंतप्रधान म्हणवणाऱ्या मोरारजीभाई देसाईंनीही त्याची दखल घेतली नाही. ज्या पीडित महिलांचं शिष्टमंडळ घेऊन हमीदभाई मोरारजींना भेटायला गेले, तेव्हा त्या महिलांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं. निधर्मीवादाच्या नावाखाली मुस्लीम समाजातील सुधारणाच या सर्व मंडळींनी रोखल्या. त्याचाच परिणाम आज दिसतो आहे.

सामाजिक, वैयक्तिक समता, स्वातंत्र्य, तर्क, बुद्धिवाद, उदारता या आधारावर समाजनिर्मितीचं स्वप्न या ग्रंथातून हमीदभाईंनी मांडलं; पण ज्यांच्या भल्याची ब्ल्यू प्रिंट हमीदभाईंनी मांडली, त्यांनीच त्यांना काफिर, हिंदूंचा हस्तक ठरवलं. एकदा असा शिक्का मारला की त्याने काही सांगितलं तरी ते चूकच ठरवलं गेलं. या सगळ्याला हमीदभाईंनी 'हिंदुत्ववाद' या प्रकरणात चपखल उत्तर दिलंय.

आपल्या हिंदू आणि मुस्लीम या समाजाबाबतची भूमिका त्यांनी स्पष्टपणे आणि पुराव्यासहित मांडली; पण ते समजून देतो कोण आणि घेतो कोण ?

हमीदभाईंना मुस्लीम समाज समजून घेण्यात मौलवींचा, त्यांच्या पीठांचा अडसर आहे, तर दुसरीकडे हिंदुत्ववादी संघटना त्यांचा दुरुपयोग करीत आहेत. हिंदू विवेक केंद्राची वेबसाईट आहे. त्यावर 'विटस ऍण्ड विस्डम ऑफ हमीद दलवाई' असं नाव देत संदर्भहीन उतारे दिले जात आहेत. यातून मुस्लीम समाजाला डिवचत हमीदभाईंची बदनामीही सुरू आहे. हे भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेसमोरील आव्हान आहे.

हिंदू-मुस्लीम धार्मिक सुधारणा चळवळीत काही परस्परविरोधी तत्त्वं

होती. जुन्या टाकाऊ प्रथा-परंपरांना बाजूला सारून धर्माची चिकित्सा करून जे सत्य आहे ते स्वीकारणं आणि जे त्याज्य आहे ते अव्हेरणं, हा या चळवळींचा उद्देश होता. या सगळ्याची मांडणी हमीदभाईंनी आपल्या दोन्ही ग्रंथांतून केली आहे; पण त्यातून एकमेकांना समजून घेऊन पूरक गोष्टी करण्यापेक्षा अनिष्ट तत्त्वं निर्माण झाली. अश्रफी म्हणजे श्रीमंत मुस्लीम आणि वहाबींनी सर्व बिगरमुसलमान जनतेविरुद्ध जिहादची भाषा केली. दार-उल-इस्लामची घोषणा झाली. त्यातून हिंदू समाजही प्रतिक्रिया देऊ लागला. धर्मांतरित मुसलमानांना शुद्ध करून पुन्हा हिंदू होण्यासाठी हाकारे होऊ लागले. यातून मुस्लीम समाज बिथरणं स्वाभाविकच होतं. इथल्या गौरवशाली परंपरेचा उल्लेख तेव्हाही होऊ लागला. आताही मोदी करताहेत, याला उत्तर म्हणून मुस्लीम समाज आपल्या परंपरांसाठी पश्चिम आशियायी इतिहासाकडे पाहतोय. 'आयएसआयएस' या जिहादी संघटनेकडे कल्याणमधील तरुण जाताहेत ही ताजी घटना आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर हमीद दलवाई यांची मांडणी हाच एक उपाय आणि तोडगा आहे. या भूमिकेची मांडणी पुनःपुन्हा करीत राहायला हवी. यावर शिक्कामोर्तब केलं ते ज्येष्ठ इतिहासकार रामचंद्र गुहा यांनी. हमीदभाईंचे ग्रंथ त्यांना मुंबईच्या फुटपाथवर सापडले. त्यातील मांडणीने ते थक्क झाले. 'मेकर्स ऑफ मॉडर्न इंडिया' या ग्रंथात 'लास्ट मॉडर्निस्ट' असा हमीदभाईंचा गौरव करून त्यांच्या कार्याचा गौरव केलाय. गुहा यांनी समाजावर हे उपकारच केले आहेत.

मराठी साहित्याला हमीद दलवाईंचं जेवढं योगदान मिळायला हवं, तेवढं मिळालं नाही कारण वयाच्या ४५ व्या वर्षी त्यांचं निधन झालं. मात्र या अल्प काळातच लिखाण आणि चळवळ या दोन्ही पातळींवर त्यांनी जे काम केलंय तो इतिहासच ठरला.

खरं तर त्यांचं स्वतःशीच द्वंद्व होतं. त्यांच्यातील लेखक आणि त्यांच्यातील समाजसुधारक यांच्यातील हे द्वंद्व होतं. समाजसुधारणेत त्यांच्यातल्या लेखकाला त्यांनी मारून टाकलं. अगदी पंडित नेहरूंचंही असंच झालं. राजकारणात नेहरू नावाचा लेखक हरवला. तेच हमीदभाईंचं झालं. त्यांनी जे लिखाण केलं तो मात्र वैचारिक समृद्धीचा खजाना आहे.

*(लेखक सामाजिक कार्यकर्ते आणि*
*साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकचे माजी पदाधिकारी आहेत)*

■ ■

विचारमंथन

# हिंदू-मुस्लीम समस्या आणि स्वरूप

**• समीर शेख**

१५ ऑगस्ट २०२२ रोजी भारताने स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केला. गेल्या ७५ वर्षांतील राजकारणाचा बदलता आलेख म्हणजे बदलत्या भारताचे प्रातिनिधिक चित्र आहे असे निश्चितच म्हणता येईल. देशाचे राजकारण आणि समाजकारण यांच्या बदलत्या चित्रावर दृष्टिक्षेप टाकत असतानाच देशातील दुसऱ्या क्रमांकाचा बहुसंख्य समाज (किंवा सर्वांत मोठा अल्पसंख्य समाज) असलेल्या मुस्लिमांवर आणि या बदलानुसार त्यांच्या बदलत जाणाऱ्या प्रतिक्रियेचा आढावा घेणे गरजेचे आणि महत्त्वाचे आहे. देशातील बदलते धर्मकारण, राजकारण आणि त्यांचा मुस्लीम समाजावर होणारा बरावाईट परिणाम यांचा उहापोह करण्याचा हा प्रयत्न...

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताने नियतीशी एक करार केला आणि देशात स्वातंत्र्याची पहाट उगवली. ही सकाळ अनेक इच्छा-अपेक्षांसोबतच नवे प्रश्नही घेऊन आली. धर्माच्या नावाने या देशाचे दोन तुकडे झाले होते. वेगळा पाकिस्तान अस्तित्वात आला. फाळणीचा निर्णय झाला तेव्हा आणखी एक महत्त्वाचा निर्णय इथल्या राज्यकर्त्यांनी घेतला. तो म्हणजे पाकिस्तानप्रमाणे भारत हे धर्मावर आधारलेले राष्ट्र असणार नाही. इथे बहुसंख्य हिंदू असले तरी अस्तित्वात येणारे राष्ट्र हे निधर्मी असेल, सेक्युलर असेल असे जाहीर करण्यात आले.

पुढे अडीच वर्षांनी म्हणजे २६ जानेवारी १९५० रोजी या देशाने राज्यघटना स्वीकारली आणि एक धर्मनिरपेक्ष, एकसंध समाजनिर्मिती प्रक्रियेला सुरुवात झाली. घटना समितीतील विद्वानांच्या चर्चांमधून ही घटना आकाराला आली. परंपरावादी, धार्मिक आणि काहीशा अशिक्षित समाजासाठी एक उदारमतवादी (लिबरल कॉन्स्टीट्यूशन फॉर इल्लीब्रल पिपल) राज्यघटना अस्तित्वात आली. त्यात समूहासोबतच व्यक्तिस्वातंत्र्यालाही विशेष महत्त्व देण्यात आले.

धर्माच्या आधारावर देशाची फाळणी झाली असली तरी लोकसंख्येची पूर्णपणे अदलाबदल झाली नाही. बहुसंख्य (विशेषतः बहुजन) मुस्लीम समाजाने इस्लामी पाकिस्तान ऐवजी निधर्मी भारताची निवड केली. निधर्मी राष्ट्राचा आणि

सर्वसमावेशकतेचा जाहीरनामा असलेल्या संविधानावर आपली श्रद्धा ठेवली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांनी मग त्यात जवाहरलाल नेहरू असतील, सरदार पटेल असतील की डॉ. बाबासाहेब आंबेडकर - निधर्मी राष्ट्राच्या प्रतिमेला आणि त्यावरील समाजाच्या विश्वासाला अधिक बळकटी दिली. त्यादृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न केले. आपल्या व्यवहारातून आणि वक्तव्यांमधून त्यांनी निधर्मी राष्ट्राची आणि राष्ट्रवादाची बैठक अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांना तत्कालीन परंपरावाद्यांशी दोन हात करावे लागले. त्यावेळी झालेल्या विरोधाला ही मंडळी धैर्याने सामोरे गेली.

या महापुरुषांनी दाखवलेल्या मार्गानेच देश आणि समाज मार्गक्रमण करत राहिला. काही अपवाद वगळता त्यात बऱ्यापैकी यशही आले. अपवाद म्हणजे अर्थातच धर्मवादी, धर्मांध, परंपरावादी विचारांची निधर्मी विचारांवर झालेली सरशी. गेल्या ७५ वर्षांत परंपरावाद्यांनी आपले हेतू साध्य करण्यासाठी समाजाला, देशाला, राजकारणाला वेठीस धरण्याचे अनेक प्रसंग आले. निधर्मी राष्ट्रवाद आणि लोकशाही यांबाबत मुत्सद्दी राजकीय नेतृत्वाची वैचारिक बैठक पक्की असल्यामुळे बरेचदा हे प्रयत्न तात्कालिक ठरले. अपवाद वगळता समाजमनावर त्याचे दूरगामी परिणाम झाले नाहीत. मात्र कचखाऊ नेतृत्वामुळे आणि अदूरदर्शीपणामुळे तात्कालिक मलमपट्टी करण्याचे प्रयत्न झाले. साहजिकच ते अयशस्वी ठरले. त्यातून निधर्मी प्रजासत्ताकाला गहिरी जखम झाली आणि उत्तरोत्तर ती चिघळतच गेली.

## हिंदू-मुस्लीम संबंध

मोहम्मद पैगंबर यांच्या हयातीतच अरबी व्यापाऱ्यांसोबत भारतात इस्लामचे आगमन झाले. इसवी सन ६२९ मध्ये भारतातील पहिली मस्जिद केरळमध्ये बांधण्यात आली. तिथल्या चेरामन पेरूमल राजाने इस्लाम धर्म स्वीकारला. अशाप्रकारे या धर्माचे आगमन शांततेच्या मार्गाने झाले. मात्र उत्तरेकडून आलेल्या इस्लामला अर्थातच आक्रमणाची पार्श्वभूमी आहे. पुढे अनेक सुफी संतांचे भारतात आगमन झाले. त्यांच्या सहानुभूतीपूर्ण आणि संवेदनशील वागण्याने समाजाला भुरळ घातली आणि सामाजिक समतेसाठी बहुजनांनी त्यांच्या हातावर बैत केली. म्हणजे त्यांच्याकडून इस्लामची दीक्षा घेतली. जबरदस्तीनेही धर्मपरिवर्तन झाले असले तरी ते अपवादानेच झाले. हजार वर्षे मुस्लीम शासकांनी राज्य करूनही उपखंडातील मुस्लिमांची लोकसंख्या ३० टक्क्यांच्या पुढे कधीही गेली नाही. ही

आकडेवारी पुरेशी बोलकी नाही का ?

इस्लाम मानणारे एकेश्वरवादी शासक आणि मूर्तिपूजक बहुसंख्याक प्रजा अशी एकमेवाद्वितीय समाजरचना येथे अस्तित्वात आली. काही वेळा या राज्यकर्त्यांनी आक्रीत केले; मात्र बहुतांशवेळा त्यांचे वर्तन 'लकुम दिनकुम वलीयादिन' (तुमचा धर्म तुम्हाला, माझा धर्म मला) या कुराणातील उक्तीप्रमाणे राहिले. त्यामुळेच इस्लामच्या विरोधात जाणाऱ्या इथल्या प्रथा (आणि कुप्रथा) यांच्या विरोधात राज्यकर्त्यांनी फारशी कठोर भूमिका घेतली नाही. हिंदू धर्मात झालेल्या सुधारणेत खुद्द हिंदू धर्मियांचा पुढाकार होता. मुस्लीम राज्यकर्त्यांनी त्यात हस्तक्षेप केल्याची अपवाद वगळता उदाहरणे सापडत नाहीत. मात्र मध्ययुगातील ऐतिहासिक पार्श्वभूमीचे विश्लेषण प्रत्येक विचारधारेने आपल्या पद्धतीने (आणि आपल्या फायद्याप्रमाणे) केले. काही वेळा अपवादांना उदाहरणाचे स्वरूप देण्यात आले तर काही ठिकाणी उदाहरणांना अपवाद बनवण्यात आले.

## धार्मिक आणि राजकीय संघटनांचा उदय

मध्ययुगीन इतिहासाचे पडसाद आधुनिक युगातही पडत राहिले. एकेबाजूला साझी विरासत, गंगा-जमनी तहजीब म्हणत हिंदू-मुस्लिमांच्या या मिश्र संस्कृतीचे गोडवे गायले गेले, तर दुसरीकडे मध्ययुगातील या 'अतिक्रमणामुळे' वा सांस्कृतिक संकरामुळे धर्म भ्रष्ट झाला असून त्याला मूळ स्थितीत आणण्यासाठी काही पुनरुत्थानवादी (revivalist) धार्मिक संस्था उदयाला आल्या तर राजकीय हितसंबंध जपणाऱ्या, अन्याय दूर करण्यासाठी लढणाऱ्या मूलतत्त्ववादी (fundamentalist) राजकीय संघटना आकाराला आल्या. १९ व्या शतकामध्ये हिंदू आणि मुस्लीम अशा दोन्ही समाजांत अशा संस्था उदयाला आल्या.

या संघटनांचा कमीअधिक प्रभाव या दोन्ही समाजांवर राहिला असला तरी त्या कधीही मुख्य प्रवाहात येऊ शकल्या नाहीत. दोन्ही समाजांमध्ये राजकीय पटलावर उत्तुंग निधर्मी नेतृत्व असल्यामुळे या धार्मिक संगठनांना कायम परीघावर राहूनच त्यांना राजकारण करावे लागले. त्यांना लोकप्रियता अशी लाभली नाही. असे असले तरी या संघटना कार्यप्रवण राहिल्या आणि त्यांनी वेळोवेळी आपले उपद्रवमूल्य दाखवून दिले. स्वातंत्र्यपूर्व काळात बहुसंख्य आणि अल्पसंख्य असा सरळ फरक नसल्यामुळे दोन्ही बाजूला अशा संघटनांची रेलचेल होती. काहींना केवळ धर्म सुधारणा करायची होती, तर काहींना धर्माचा आधार घेऊन राजकीय सत्ता मिळवायची होती. काहीवेळा धर्मातच वैचारिक संघर्षातून संघटना आकाराला

आल्या. मुस्लिमांमधील देवबंद विचारपीठातून आलेली देवबंदी विचारधारा किंवा तिची वैचारिक विरोधक बरेलीची बरेलवी विचारधारा असो किंवा केवळ राजकीय हेतूने प्रेरित मुस्लीम एकीकडे तर हिंदूमधील आर्य समाज असो, हिंदू महासभा वा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ असो; निधर्मी, सर्वसमावेशक विचाराला आणि नेतृत्वाला सुरुवातीपासूनच आव्हाने मिळतच होती. मात्र वर म्हटल्याप्रमाणे वैचारिक स्पष्टता आणि लोकमत विरोधात असल्यामुळे अपवाद वगळता अशा संघटना 'विविधतेतील एकते'ला नख लावू शकल्या नाहीत.

## स्वातंत्र्योत्तर काळातले धार्मिक राजकारण

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्याला फाळणीची काळी किनार होती. हिंदू मुस्लीम ही दोन वेगळी राष्ट्र आहेत, अशी मांडणी हिंदूराष्ट्रवादी आणि इस्लामवादी अशा दोहोंकडून केली जात होती. धर्माधिष्ठित राष्ट्र ही संकल्पना हिंदूसाठी नवीनच असली, तरी मुस्लिमांसाठी ती नव्हती. इस्लाममधून मूळात राज्यव्यवस्था वा राजकारण वेगळे काढता येत नाहीत. सेक्युलरीजमला अभिप्रेत असलेली धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्यातील फारकत इस्लामच्या विरोधात जाणारी आहे असे भासवण्यात मुस्लीम धर्मवाद्यांना यश आले. मुहम्मद पैगंबर हे आध्यात्मिक प्रमुख होते मात्र ते राज्यकर्तेही होते. त्यांनी चालवलेली राज्यव्यवस्था म्हणजे आदर्श राज्यव्यवस्था. तिला निजाम-ए-मुस्तफा असे म्हणतात. तर या निजाम-ए-मुस्तफाची हाक देऊनच मुस्लीम लीगने पाकिस्तानचा ठराव मांडला. बहुतांश उच्चवर्णीय आणि उच्चवर्गीय मुस्लिमांनी या मागणीला उचलून धरले आणि पाकिस्तानची निर्मिती झाली.

पाकिस्तानच्या निर्मितीमुळे मुस्लीम लोकसंख्या विभागली गेल्यामुळे हिंदुत्ववाद्यांमधील एका वर्गाला हायसे वाटले, तर दुसरा वर्ग अखंड हिंदुराष्ट्राचे स्वप्न भंगल्यामुळे निराश होता. वर उल्लेख केल्याप्रमाणे इस्लाममध्ये मुळातच असलेली राजकीय विचारधारा आणि धर्माधिष्टीत राज्य ही संकल्पना हिंदू समाजात नव्हती. विनायक सावरकर यांनी पुण्यभू, पितृभू आणि हिंदुत्व या व्याख्या करून राजकीय इस्लामला समांतर असे राजकीय हिंदुत्व जन्माला घातले. निजाम-ए-मुस्तफाप्रमाणेच (थोडीशी मवाळ का होईना) रामराज्याची संकल्पना आकाराला आली.

मुस्लीम धर्मवाद्यांना पाकिस्तान बनवण्यात यश आले असले तरी हिंदू धर्मवादी धर्माधिष्ठीत हिंदू राष्ट्र बनवण्यात सपशेल अपयश आले. जनमतही मागे नसल्याने स्वातंत्रोत्तर समाजकारणात आणि राजकारणात या संघटना आकुंचन

पावू लागल्या, मात्र कासवगतीने का होईना ते कार्यप्रवण राहिले.

## प्रतिक्रियावादी ते महत्त्वाकांक्षी हिंदुत्व

मुस्लीम मूलतत्त्ववादाला प्रतिक्रिया म्हणून १९ व्या शतकात हिंदुत्व ही राजकीय विचारधारा उदयाला आली. प्रतिक्रियावादी असल्यामुळे व बहुसंख्याक समजाचा पाठिंबा नसल्यामुळे हिंदुत्ववादी राजकारणाला मर्यादा आल्या. स्वातंत्र्यलढ्यात लोकप्रियता मिळवणारे पहिल्या आणि दुसऱ्या पिढीतले हिंदू नेतृत्व लयाला जात होते, त्यांच्या जागी अपरिपक्व आणि अपघाताने राजकारणात आलेल्या तिसऱ्या पिढीतल्या नेतृत्वाला इतकी वर्षे डूख धरून बसलेल्या जमातवाद्यांनी खिंडीत गाठले. शहाबानोला १२७ रुपये पोटगी देण्याचा सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला. 'शरियतमध्ये हस्तक्षेप केला तर कुतुबमिनार इतका मृतदेहांचा खच पाडू' असे आव्हान देणाऱ्या मुस्लीम जमातवाद्यांच्या दबावाला बळी पडून राजीव सरकारने संसदेत कायदा करून बदलला. हिंदुत्ववाद्यांना आयतेच कोलीत मिळाले. 'मुस्लिमांचे लांगूलचालन' हा नवा शब्दप्रयोग आकाराला आला. (आजतागायत हा शब्दप्रयोग रामबाण ठरत आलाय.) मुठभर मुल्लामौलवींच्या आक्रस्ताळेपणाचा फटका संपूर्ण समाजाला व पुढे देशाला बसला. हिंदुत्ववाद्यांना शांत करण्यासाठी अयोध्येतील रामजन्मभूमीचे दरवाजे उघडले गेले आणि हिंदुत्वाला सुगीचे दिवस आले. जनमानसात रामजन्मभूमी आंदोलन रुजले. त्यातून हिंदू वोट बँक आकाराला येऊ लागली. डिसेंबर ९२ ला बाबरी पाडण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने या कृतीला गुन्हेगारी कृत्ये म्हटले तरी या आंदोलनाने भारतीय राजकरणात हिंदुत्वाला नवसंजीवनी मिळाली. प्रतिक्रियावादी हिंदुत्ववाद आता महत्त्वाकांक्षी झाला आणि हिंदुत्वाच्या नावावर सत्तेत येण्याचे स्वप्न अगदी आवाक्यात असल्याचा साक्षात्कार या मंडळींना झाला.

## हिंदू वोट बँकेचे बळकटीकरण म्हणजेच बहुसंख्याकवाद

धर्माधारित राजकारण या देशात यशस्वी होऊ शकते हे लक्षात आल्यामुळे 'पंथनिरपेक्ष' समाजाला हिंदू (हिंदुत्व) म्हणून एका झेंड्याखाली आणण्याची कवायत जोरात सुरू झाली. लोकांना संघटित करण्यासाठी विविध सेना, दल सुरू झाले. त्यांना एकत्रित ठेवायचे असेल तर धर्म संकटात आहे, त्याचे रक्षण करायचे आहे, तो संकटात आणणाऱ्या शत्रूंना ओळखणे असा कृतिकार्यक्रम हाती घेण्यात आला. मनुस्मृतीतील 'धर्मो रक्षति रक्षितः' (तुम्ही धर्माचे रक्षण करा म्हणजे धर्म तुमचे रक्षण करेल) ही विश्व हिंदू परिषदेची tag line बरंच काही सांगून जाते.

जनमानस तयार करण्यासाठी, कार्यकर्ते संघटित करण्यासाठी धर्म संकटात आल्याची हाकाटी पेटवली जाते. धर्माला कुणापासून वाचवायचे ? मुस्लिमांपासून. पण हे पटवून कसे द्यायचे फुट सोल्जर्सना, स्वयंसेवकांना ? तर या समाजाचे राक्षसीकरण करायचे. अतिशय संघटितपणे आणि सूत्रबद्धरित्या ते केले जाते. मुस्लीम समाजाविषयी असलेल्या अज्ञानाचा उपयोग करून त्यांच्याविषयी भीती निर्माण केली की त्या भीतीचे द्वेषात रूपांतर व्हायला फारसा वेळ लागत नाही. जोडीला हिंदू-मुस्लीम संघर्षाची ऐतिहासिक आणि अर्वाचीन पार्श्वभूमी असतेच.

नव्वदीच्या दशकातली ही प्रयोगशाळा सुरू झाली. जन्मभूमी आंदोलनाने महत्त्वकांक्षेला धुमारे फुटले. २००२ च्या गुजरात प्रयोगशाळेत राक्षसीकरणाचा प्रयोग पुरता यशस्वी झाला. आता हा उपक्रम देशपातळीवर राबवायला सुरुवात झाली. कासवाच्या गतीने सर्व सुरू असले तरी त्याचा चिवटपणाही जोडीला होताच. सुरुवातीला जोड मिळाली ती शालेय पुस्तकांची. त्यातून मुस्लीम राक्षसीकरणाचे बाळकडू पाजले जाऊ लागले. इतके की गुजरातेत लहान-लहान मुलेदेखील 'फायनल सोल्युशन'ची भाषा करू लागले.

बहुसंख्याकवाद पूरक अशी आणखी एक गोष्ट गेल्या दीड दशकात समाजात रुजली. हिंदू संस्कृतीचे राष्ट्रीयीकरण ही ती बाब होय. जणू हिंदू प्रतीके आणि संस्कृतीच या बहुविधता असलेल्या देशाची संस्कृती आहे असे बहुसंख्याकांच्या मनात बिंबवण्यात यश आले. याचे अगदी ताजे उदाहरण पाहा- गणपती मिरवणुकीत वर्दीतले पोलीस नाचले. त्यात बहुतेकांना (आणि शासनालाही) काही आक्षेपार्ह वाटले नाही. नुकत्याच झालेल्या ईद-ए-मिलादच्या मिरवणुकीत झेंडा फिरवत नाचल्यामुळे मात्र पोलीस शिपायाला बडतर्फ केल्याची बातमी नुकतीच वर्तमानपत्रात आली होती.

जवाहरलाल नेहरू असोत की महान समाजसुधारक आणि विचारवंत हमीद दलवाई, या दोघांनीही बहुसंख्याकवादाचे धोके ओळखले होते. नेहरू म्हणतात की, बहुसंख्याकवाद हीच राष्ट्रीय संस्कृती म्हणून स्वीकारली जाण्याचा धोका असतो. तर हिंदूकरण म्हणजे भारतीयीकरण नाही, असे म्हणताना दलवाई अतिशय तीक्ष्ण निरीक्षण नोंदवताना म्हणतात, 'इथल्या मुस्लिमांसोबतच हिंदूंचेही भारतीयकरण गरजेचे आहे.'

## जमातवादाचे आणि जमातवाद्यांचे सामान्यीकरण

तथाकथित मुस्लीम वोट बँकेचा बागुलबुआ उभा केला जात असताना

हिंदू वोट बँक आकाराला येऊ लागली. मुस्लिमांच्या राक्षसीकरणाला खतपाणी घालणाऱ्या व्यक्ती आणि त्यांचे विखारी विचार हे कानांवर पडणे नित्याचे झाले. मुस्लीम द्वेषाचा न्यू नॉर्मल सेट झाला. त्याचे सामान्यीकरण झाले. समाजाला काहीच वाटेनासे झाले. साहजिकच मुस्लीम विरोधी घटनांना ऊत येऊ लागला. आपण एका निधर्मी समाजात राहतो आहोत, भारतीय राज्यघटनेने सांगितलेले धर्मनिरपेक्ष राष्ट्र आकाराला आलेले नसून ते आणावयाचे आहे हेच लोक विसरले. आठवण करून देणारे देशद्रोही ठरू लागले.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपला अभूतपूर्व बहुमत मिळाले. मुस्लीम द्वेषाचे विष तोवर पुरते भिनले होते. दोनच महिन्यांत पुण्यात एका निष्पाप मुस्लीम मुलाचे मॉब लीन्चींग झाले. त्यानंतर गोहत्येच्या आरोपावरून लींचींगच्या शेकडो केसेस झाल्या. जोडीला लव्ह जिहाद, लोकसंख्यावाढ यांसारख्या बिनबुडाच्या कॉन्स्पीरसी थेयरीज तयार करून हिंदू तरुणांमध्ये न्यूनगंड आणि भीती कशी वाढीस लागेल याकडे लक्ष पुरवण्यात आले. हरिशंकर परसाई या हिंदीतील श्रेष्ठ लेखकाने सांगितलेले 'आवारा भीड के खतरे' स्पष्टपणे समोर दिसू लागले. रोजच्या गप्पांमध्ये, whatsapp ग्रुप्समध्ये मुस्लीम द्वेषाचे पाट वाहू लागले.

सत्ताधारी आमदार, खासदार मुस्लिमांच्या सामाजिक आणि आर्थिक बहिष्काराची भाषा बोलू लागले. तथाकथित धर्मसंसदेत मुस्लीम नरसंहार-जीनोसाईडच्या खुलेआम धमक्या देण्यात येऊ लागल्या. आपली मते मांडणाऱ्या बेबाक मुस्लीम महिलांचे तोंड बंद करण्यासाठी apps तयार करण्यात आले. Online ट्रोलिंगसाठी नवनवीन डिजिटल हत्यारे तयार करण्यात आली.

लोकशाहीचा चौथा खांब असणाऱ्या माध्यमांनीही निधर्मी राष्ट्राला बहुसंख्याकवादी बनवण्याचा जणू विडाच उचलला. रोजचे जगण्यामरण्याचे प्रश्न मागे पडले (की पाडले ?) आणि हिंदू-मुस्लीम बॉयरनीवर प्राईम टाईम खर्ची घातले जाऊ लागले. अतिशय पद्धतशीरपणे आणि अर्थातच संघटितपणे सामाजिक जीवनातून मुस्लिमांचे राक्षसीकरण केले जाऊ लागले. ते आणि आपण अशी विभागणी करण्यात यांना बऱ्यापैकी यश आले.

## राजकीय अस्पृश्यता

सामाजिक स्तरावर मुस्लिमांचे राक्षसीकरण करून हा प्रवास थांबलेला नाही. भारतात सहभागी लोकशाहीची (participatory democracy) असूनही

राजकारणात मुस्लिमांना प्रतिनिधित्व देण्यात अक्षम्य कुचराई होत असल्याचे आकड्यांवरून स्पष्टपणे समोर येते. बहुसंख्याकवादी राजकारणाचाच हा परिपाक आहे असे म्हणणे गैर ठरू नये. गुजरातेत अनेक वर्षे सत्तेत असलेल्या भाजपाने १९८९ पासून एकही मुस्लीम उमेदवार (हरण्यासाठी का होईना) उभा केला नाही. मुस्लिमांची सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या उत्तर प्रदेशातून लोकसभा निवडणुकीत एकही मुस्लीम उमेदवार भाजपने दिला नाही. लोकसंख्येचा विचार करता लोकसभा आणि राज्यसभा यांमध्ये मुस्लीम प्रतिनिधींची संख्या ७४ असणे आदर्शवत होते. ऐंशीच्या दशकात हे प्रमाण पन्नास इतके होते. २०१४ मध्ये ही संख्या २३ इतकी कमी आहे. देशातील २८ राज्यांपैकी एकही मुख्यमंत्री मुस्लीम नाही. पंधरा राज्यांत एकही मुस्लीम मंत्री नाही. १० राज्यांत केवळ एक मुस्लीम मंत्री आहे. म्हणजेच निवडणुकीद्वारे मुस्लिमांचे राजकीय खच्चीकरण करण्याची एक नवीन राजकीय संस्कृती देशात आकाराला आली.

## चहूबाजूंनी कोंडी

निधर्मी राष्ट्रातील धर्मवादी राजकारण आता निर्णायक टप्प्यावर येऊन पोहोचले आहे. एकीकडे बहुसंख्याकांची धर्मावर आधारित वोट बँक तयार करण्यात, तर दुसरीकडे मुस्लिमांची सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक कोंडी करण्यात आणि त्यांचे सामान्यीकरण करण्यात जमातवादी यशस्वी ठरले आहेत. एकेकाळी ज्यांना 'फ्रिंज' किंवा समाज कंटक म्हटले जायचे ते आता मुख्य प्रवाहात आले आहेत.

## मुस्लीम समाजाकडून विलक्षण प्रत्युत्तर

चहूबाजूंनी कोंडी होत असूनही या बहुसंख्याकवादी मानसिकतेला उत्तर देताना मुस्लीम समाजाने कमालीचे धैर्य आणि समजूतदारपणा दाखवला आहे, असे म्हणणे अतिशयोक्तीपूर्ण ठरणार नाही. अपवाद वगळता या कठीण काळातील त्यांचे वागणे आजवर मुस्लीम समाजाविषयी बांधण्यात आलेल्या आडाख्यांना छेद देणारे आहे. कसे त्यावर नजर टाकूयात...

## आंतरराष्ट्रीय घडामोडीवरील प्रतिक्रिया

एकेकाळी जगभरात मुस्लीम समाजाशी निगडित काही बऱ्यावाईट गोष्टी घडल्या की त्याचे पडसाद भारतात पडताना दिसायचे. बहुतांशवेळा ते नकारात्मक असायचे. रोहिंग्याविषयी मुंबईतला आझाद मैदानावरील मोर्चा आणि मुस्लिमांनी घातलेला धुमाकूळ आठवून पाहा. मात्र गेल्या काळी काळापासून अशा टोकाच्या

किंवा हिंसक प्रतिक्रिया पाहायला मिळत नाहीत. आयसीससारखी दहशतवादी संघटना जगभर आपले जाळे पसरत असताना भारतातून मात्र तुरळक अपवाद वगळता त्यांना अजिबात समर्थन मिळाले नाही. आयसीसने सर्वांत कमी प्रभावित झालेला प्रदेश म्हणजे भारत अशी पुस्ती खुद्द केंद्रीय गृह मंत्रालयाचा २०१७ च्या अहवालाने जोडली आहे. जगभरातील मुस्लीम तरुण मोठ्या प्रमाणात आयसीसकडे आकर्षित होत होते, मात्र जगातली दुसरी मोठी मुस्लीम लोकसंख्या असलेल्या आपल्या देशातून मात्र आयसीसला जॉईन झालेल्यांचे प्रमाण नगण्य होते. त्यातही अनेक 'न्यू कन्व्हर्टस'चे प्रमाण लक्षणीय होते.

## समाजभानाचे बदलते परिमाण

बाबरीचा निकाल असो, काश्मीरमधील ३७०वे कलम हटवणे असो की कोरोना काळात मुस्लिमांना (विशेषतः तबलीगी जमातला) बळीचा बकरा बनवणे असो (हा शब्द न्यायालयाचा) किंवा दररोज फेक मेसेजेस आणि बातम्यांचा महापूर असो... मुस्लीम समाजाने या सर्वांच्या बाबतीत संयमित प्रतिक्रिया दिल्याचे आढळेल. बहुसंख्याकवादाच्या भीतीने ही संयमित प्रतिक्रिया आहे असेही काहीजण म्हणतील; पण मुस्लीम समाजातल्या या बदलाचे स्वागत करायला हवे.

## बहुसंख्याकातील तरुणाई विरुद्ध मुस्लीम तरुणाई: एक निरीक्षण

वर उल्लेख केल्याप्रमाणे बहुसंख्याक समाजातील मुस्लीम विषयक अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांच्यात आधी भीती आणि मग द्वेष उत्पन्न करण्याचा कार्यक्रम राष्ट्रीय स्तरावर अतिशय सूत्रबद्धपणे हाती घेण्यात आला. त्यामुळे समाजात विशेषतः बहुसंख्य तरुणाईत परधर्मियांविषयी विशेषतः मुस्लिमांविषयी द्वेष, भीती, नकारात्मकता यांचे डेडली कॉम्बीनेशन पाहायला मिळेल. सोशल मिडियावर अशा प्रकारच्या विखारी माहिती आणि वक्तव्यांचा महापूर आल्याचे आणि प्रशासन, यंत्रणा त्यावर चाप लावण्यात (जाणीवपूर्वक) अयशस्वी ठरल्याचे अभ्यासातून दिसून आले आहे. हे उदाहरण पाहा -

भारतात ३५ कोटी फेसबुक युजर्स आहेत. भारत फेसबुकचे सर्वांत मोठे मार्केट आहे. मात्र तरीही फेसबुकवरील हिंदुत्ववाद्यांच्या विखारी, जहरी, जमातवादी, xenophobic (भयगंड पसरवणारा), contentला चाप लावण्यात फेसबुक सपशेल अपयशी ठरले आहे. ही भविष्यातल्या संकटाची नांदी आहे.

'द लंडन स्टोरी' या स्वयंसेवी संस्थेने नुकताच एक विस्तृत अहवाल प्रसिद्ध केला आहे. या संस्थेच्या अभ्यासकांनी १ जानेवारी २०१९ ते ३१ डिसेंबर

२०२१ या काळात ६३४ हिंदुत्ववादी फेसबुक पेजेसचं विश्लेषण केलं. ही सगळी माहिती तीन प्रकारची असल्याचे अभ्यासकांना आढळले. त्या 3 themes या -

१. मुस्लिमांविरोधात हिंदूंचे संघटन करणे. २. मुस्लिमांबाबत xeno-phobic (म्हणजे या समाजाविषयी भयगंड निर्माण करणारी) वक्तव्ये करणे आणि त्यांना अपमानस्पद वागणूक देणे. ३. मुस्लिमांना नष्ट करण्याचे आवाहन करणे.

या विखारी फेसबुक पेजेसवर १६ कोटी impressions नोंदवण्यात आले. म्हणजे दिवसाला जवळपास ४९ हजार लोक या पेजेसवर प्रतिक्रिया देत होते. या पेजेसपैकी काहींची लोकप्रियता ४००% ने वाढली तर काहींची ८००% ने. मुस्लिमद्वेष पसरवणारी इतकी माहिती text, audio, video स्वरूपात अगदी सहजपणे उपलब्ध झाल्याचे आणि ती पसरवणाऱ्यांना मोकळे रान मिळाल्याचे आणि त्यामुळे बहुसंख्याक समाजात मुस्लिमद्वेषाचे विष पुरते भिनल्याचे या आकडेवारीवरून स्पष्टपणे दिसते.

हे सामाजिक चित्र भीतीदायक आहे आणि मुस्लिमांना परिस्थितीचे पुरेसे गांभीर्य असल्यामुळे त्यांनी 'जशास तसे' उत्तर देण्यासाठी मुस्लीम जमातवादी संस्था किंवा संघटना यांच्या आश्रयाला जाणे टाळले असल्याचे दिसते. त्याऐवजी त्यांचा दृष्टिकोन अतिशय सकारात्मक असल्याचे दिसते. मुस्लिमद्वेषातून घडणाऱ्या घटनांना, बनवल्या जात असलेल्या कायद्यांना त्यांनी संवैधानिक मार्गाने विरोध केल्याचे दिसते. नागरिकत्व विधेयकाला झालेला अभूतपूर्व विरोध आणि त्यातील महिलांचा लक्षणीय सहभाग हा बदलेल्या दृष्टिकोनाचे द्योतक आहे.

सरकारी नोकऱ्यामध्ये मुस्लिमांचे प्रमाण अगदी अत्यल्प असल्याचे अभ्यासातून पुढे आले आहे. राज्य आणि केंद्र यातील नोकऱ्यांत त्यांचे प्रमाण केवळ ४.९ टक्के आहे. Para मिलिटरीमध्ये हे प्रमाण ४.६ टक्के, सनदी सेवेत केवळ ३.२ टक्के तर सैन्यदलात केवळ १ टक्के इतके आहे. याला सरकारी यंत्रणाही जबाबदार असली तरी मुस्लिमांनी शिक्षणाकडे आणि प्रशासनात सहभागी होण्यात कुचराई केल्याचे हे द्योतक आहे. आनंदाची बाब म्हणजे आता हे चित्र मोठ्या प्रमाणात बदलते आहे. त्यात मुलींचा आणि महिलांचा वाटा मोठा आहे. आपण अल्पसंख्याक असल्यामुळे हिंदू-मुस्लीम संघर्षात सर्वाधिक नुकसान आपलेच होणार असल्याचे आजवरच्या अनुभवावरून या समाजाच्या लक्षात आले आहे.

## मुस्लीम जमातवाद आणि जमातवादी संघटना

मुस्लिमांचे राक्षसीकरण आणि त्यांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय

आणि सांस्कृतिक कोंडी केली जात असताना त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी समाज मुस्लीम जमातवादाकडे वळेल की काय अशी भीती होती. मात्र भूतकाळातील घटनांमधून समाजाने मोठा धडा घेतला आहे. 'अल्पसंख्याकांची धर्मांधता ही त्यांच्या स्वतःसाठी आत्मघातकी असते' या जवाहरलाल नेहरू यांच्या मताचा प्रत्यय या समाजाला वेळोवेळी आला आहे.

मुस्लीम समाजाने जिहाद, राजकीय इस्लाम, इस्लामी राज्य यांना आवाहन करणाऱ्या संघटनांशी चार हात लांब राहणे पसंद केले आहे. हा देश इस्लामी राष्ट्र करण्याची स्वप्ने त्याला पडत नाहीत. तशा संघटनाही पूर्वीसारख्या अस्तित्वात नाहीत. जरा कुठे अशी हालचाल सुरू झाली की तपास यंत्रणा त्यांच्या मुसक्या आवळतात. मुस्लीम मूलतत्त्ववादी संघटनांवर यंत्रणांची असलेली खप्पामर्जी ही खुद्द मुस्लीम समाजाच्या पथ्यावर पडणारी आहे, हे आता समाजाच्या लक्षात आले असल्यामुळे अशा संघटनांना समाजातून तितकेसे पाठबळ मिळत नाही.

## धार्मिक संघटना आणि राजकारण

मुस्लीम समाज धार्मिकदृष्ट्या अधिक परंपरावादी आहे. मुस्लिमांमधील पुनरुत्थानवादी संघटना आणि चळवळी यांची लोकप्रियता मात्र वाढते आहे. तबलिगी जमात आणि अहले हदीस सारख्या संघटना पूर्णत: अराजकीय असल्यामुळे त्यांचे कार्यक्षेत्र अध्यात्मापुरते मर्यादित आहे. यातील एक मजेशीर बाब म्हणजे कलम ३७० हटवल्याबद्दल प्रधानमंत्री आणि सत्ताधारी पक्षाचे अभिनंदन करणारे पहिले पत्र अहले हदीस या संस्थेने लिहिले होते.

'जिहाद इन इस्लाम' नावाची पुस्तिका लिहून आधुनिक जगात राजकीय इस्लामचे पुनरुज्जीवन करणारे मौलाना मौदुदी हे मूळचे औरंगाबादचे. त्यांनी वीसच्या दशकात जमात-ए-इस्लामीची स्थापना केली. पुढे ते पाकिस्तानात गेले. भारतातील त्यांच्या संघटनेने आपले नाव आणि घटना बदलून घेतल्या आणि राजकीय इस्लामला थारा देणार नसल्याचे स्पष्ट केले. या मौदुदी यांच्याविषयीची एक मजेशीर (आणि विचार करायला लावणारी) एक नोंद - पाकिस्तानात अहमदी मुस्लिमांविरोधात दंगली झाल्या आणि ठपका जमात-ए-इस्लामीच्या कार्यकर्त्यांवर ठेवण्यात आला. चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या जस्टीस मुनीर कमिशनने मौदुदी यांना बोलावले. पाकिस्तानात इस्लामी शरियत प्रमाणे राज्य चालवले जावे, अशी त्यांची मागणी होती. तेव्हा जस्टीस मुनीर यांनी विचारले, 'आपल्या शेजारील देशात, भारतात निधर्मी शासन व्यवस्था आहे. तिथे मुस्लिमांना तितकेच अधिकार

आहेत जितके हिंदूंना आहेत. याबद्दल तुमचे काय मत आहे ?' त्यावर क्षणाचाही विलंब न करता मौदुदी म्हणाले, 'मी भारतातील हिंदूंना आवाहन करतो की त्यांनी दैवी कायद्यावर आधारित राज्य चालवावे. मनुस्मृती हा हिंदूंचा दैवी कायदा आहे. त्यानुसार त्यांनी राज्य चालवावे. भले त्यानुसार भारतातले मुस्लीम अस्पृश्य का ठरेनात !' जस्टीस मुनीर यांनी आपल्या अहवालात हे नोंदवले आहे. 'समान शिलेषु व्यसनेषु सख्यं' या संस्कृत सुभाषिताची इथे आठवण झाल्यावाचून राहत नाही.

मुस्लीम समाज धार्मिकदृष्ट्या पारंपरिक किंवा रूढीवादी असला तरी राजकीयदृष्ट्या त्याने नेहमी सेक्युलर म्हणवणाऱ्या पक्षांना मतदान केल्याचे आपल्याला दिसते. त्याबाबत तो पक्षनिरपेक्ष राहिला आहे. अनेकदा तर इतिहासातील कटुत्व विसरून सर्वसमावेशक होऊ पाहणाऱ्या पक्षांनाही पाठिंबा दिला आहे. शिवसेनेला गेल्या काही काळापासून मुस्लिमांचे मिळणारे लक्षणीय समर्थन हे याचेच द्योतक आहे. महाराष्ट्र आणि हैदराबाद येथील एमायेम असो की केरळ मधील मुस्लीम लीग... मुस्लीम या पक्षांना एक गठ्ठा मतदान करत नाहीत. उलट या पक्षांविषयी समाजात संमिश्र प्रतिक्रिया पाहायला मिळतात. अल्पसंख्याक असल्यामुळे राजकीय इस्लामची विचारधारा इथे रूजू शकणार नाही आणि यशस्वीही होणार नाही इतके शहाणपण त्याला आता आलेले आहे. त्यामुळे तो सेक्युलर पक्षांनाच पहिली पसंती देताना दिसतो.

वर म्हटल्याप्रमाणे जवाहरलाल नेहरूंचे अल्पसंख्याक समाजातील धर्मांधतेविषयीचे वक्तव्य मुस्लीम समाजाने उशिरा का होईना स्वीकारले आहे. मात्र नेहरूंचे हे वक्तव्य अर्धवट आहे. आपल्या पूर्ण वक्तव्यात त्यांनी बहुसंख्याक समुदाय आणि त्यातील धर्मांधतेविषयीही भाष्य केले आहे आणि इशारा दिला आहे. या इशाऱ्याला गांभीर्याने घेणे अतिशय आवश्यक आणि तातडीचे आहे. नेहरू म्हणतात, 'अल्पसंख्याकांची धर्मांधता ही खुद्द त्यांच्यासाठी आत्मघातकी ठरते, तर बहुसंख्याकांची धर्मांधता ही राष्ट्रासाठी घातक असते.' राष्ट्रासाठी आणि लोकशाहीसाठी घातक ठरू पाहणाऱ्या या बहुसंख्याकवादी धर्मांधतेवर रामबाण उपाय करणे हे पवित्र राष्ट्रीय कार्य असून त्यासाठी सर्व देशभक्तांनी विशेषतः बहुसंख्य असलेल्या हिंदू समाजाने कंबर कसणे गरजेचे आहे.

*(लेखक पत्रकार आणि मुस्लीम सत्यशोधक युवामंच प्रमुख आहेत.)*

■ ■

विचारमंथन

# धर्म, राष्ट्रवाद आणि देशभक्ती समजून घेताना...

**● कबीर तथा सलीम मोमीन**

धर्म म्हणजे काय ? एकमेकांना उपयुक्त वर्तनबद्धता ! ! सगळेच धर्म ज्या त्या वेळेला नवनवीन तर्कांवर आधारित, लोकसमूह, सामाजिक, प्रकृत्तिक, प्राकृतिक, तसेच त्यावेळेच्या विज्ञानाच्या अनुकूल अशा विषयावर किंवा पूर्व प्रस्थापित लोकसमूहाचे अनुकरण करून एक सामाजिक एकोपा व नियम, नियंत्रण, नियोजन निर्माण करण्यासाठी धर्माची उत्पत्ती केली असावी असे ढोबळपणे मान्य करावे लागेल; परंतु काही लोकसमुदायांनी आक्रमण करून आपले अधिपत्य ठेवण्यासाठी भेदाभेद केला असावा, तसेच वर्ण अनुषंगानेसुद्धा यासाठी काही काल्पनिक कथा निर्माण करून धर्मनिर्मिती केली असावी.

मनुष्याने सद्विवेकबुद्धी बाळगावी, नीतीने राहावे, नैतिकता पाळावी हाच हेतू असावा. त्यासाठी एक आचार-विचार पद्धती अवलंबली गेली असावी. समाजरचना तयार केली असावी, नवीन अधिष्ठाने बनविली, निर्मिक नावाचे अधिष्ठान बनविले असेल. त्या निर्मिकांचं नामकरण केलं, अन् मानवाची वाटचाल 'धर्म' ह्या आचरण पद्धतीने सुरू झाली असावी. धर्मानेच संस्कृतीनामक कृतीची व्याप्ती वाढली, संस्कृतीने नवनवीन धार्मिक नियम बनविले. मानवाने आपापल्या कृतिशील गटाला वेगवेगळे धर्मांअंतर्गत जात/पंथ अशी रचना केली असावी. प्रत्येक धर्मात स्वर्गाची फार मोठी आमिषे दाखविली गेली. (स्वर्ग प्रत्येक धर्म अधिरेखीत पुण्य या संहिते/कल्पनेवर आधारित असतो) आपापल्या सद्कृत्यांची, पापकृत्यांची नोंद घेतली जाते. त्या त्या अनुषंगाने धर्मानुसार स्वर्ग व नरक याची व्याख्या केली गेली. सर्व धर्म प्रकारांमध्ये एक सामायिक कथा किंवा आमिष व भीती दाखविली जाते. पाप, पुण्य, स्वर्ग, नरक, काही धर्मांत पुनर्जन्म आहे, तर काहींमध्ये नाहीसुद्धा. त्यानुसार धर्माच्या अधीन झालेल्यास स्वर्गाची महती अन् नरकाची भीती देण्याचं काम सुरू झाले. या कोणत्याही सत्य-असत्य अशी माहिती घेणाऱ्याला तथ्य शोधणाऱ्यास बहिष्कृत करण्याची भीती निर्माण केली गेली. वास्तव जगापेक्षा स्वर्गातील जगाची (प्रचिती) आभास निर्माण केला, स्वर्गसुखाची प्रत्येक धर्माची वेगळी देवलोक, स्वर्गरचनेची आमिषे तयार केली. (यावर लिहिता

येते पण टाळणेच योग्य आहे) अन् अशा धर्माचा मानव गुलाम झाला असेल.

काही हजारो वर्षांपासून प्रगत झालेल्या मानवाला इथपर्यंत (विसाव्या शतकात) पोहचत असता विज्ञानाच्या कक्षा रुंदावताना दिसत असतानासुद्धा प्रगत होण्यासाठी तर्कांवर आधारलेले धर्मकर्मठ होत चाललेत हेच वैषम्य. हा अर्धविराम आहे. प्रगतशील चिकित्सक विज्ञानाला कधीही पूर्णविराम नसतो. (काही धर्मांत त्या वेळेस असणाऱ्या माहितीनुसार विज्ञान सोयीस्करपणे वापरले गेले; पण आव्हान देण्याचं धाडस केले तर त्याचे प्रायश्चित्त द्यावे लागत होते.)

प्रत्येक धर्माचा एक ग्रंथ, पुस्तक असतेच. त्यामध्ये त्या धर्माची आचारसंहिता असते, त्यानुसार धर्मपालन होत असते, तर काही धर्म आचरण शास्त्राची अनेक पुस्तके आहेत. यामुळे पंथ निर्माण झाले असावेत. जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था निर्माण झाली असेल, याचाच रूढी परंपरेत बदल झाला असेल, तद्नुसार धर्म !

आता प्रत्येक धर्मातील त्रुटी, दोष, काळानुसार झालेला बदल याबरोबरच बदलाची मानसिकता तयार व्हायला हवी. शेवटी माणसानेच धर्माची उत्पत्ती केली. मानवाने निसर्गनिर्मिती केली नाही. याच एका कारणाने धर्माशी निगडित असणारे निर्मिक आहे अशी ठाम भूमिका मांडत असतात. अजूनही काही गोष्टी विज्ञानाच्या कक्षेत आहेत; पण अनाकलनीय नक्कीच नाहीत. आदिमानवाच्या प्रक्रियेमधून आजचा मानव प्रगत झाला आहे. ही प्रगती विज्ञाननिष्ठच आहे, चमत्कारिक पद्धतीने बदल झालेला नाही. आता सर्व धर्मांच्या त्रुटी शोधण्यापेक्षा, टीकाटिप्पणी करण्यापेक्षा आपणच आपले वर्तन, विवेक, नीती सदाचाराने केल्यास धर्माची गरज भासणार नाही. चिकित्सकपणे नवीन समाजरचना करणे शक्य आहे. लिहिण्याचे प्रयोजन एवढेच की धर्म मानवी मेंदूच्या बुद्धिवादी प्रकियेचाच एक भाग !

## २. राष्ट्रवाद आणि देशभक्ती समजून घेताना....

मानवी वर्तनाचे एक अविभाज्य अंग म्हणजेच पूर्वीपासून टोळ्यांनी राहणारा, समूहात वावरणारा, आपापल्या समस्या सोडविण्यासाठी, आपली खाद्य वंद्य संस्कृती, वंशवृद्धी जोपासण्यासाठी, वसाहतवाद वाढविण्यासाठी किंवा अपूर्णता पूर्ण करण्यासाठी नवीन भौगोलिक प्रांतरचना वाढविण्यासाठी इतर प्रस्थापित टोळ्यांशी युद्ध करणे, आपले समूह अधिपत्य राखणे या प्रक्रियेमध्ये जो वर्ग ज्याच्या त्याच्या संस्कृती बरोबर घेऊन किंवा धर्मासह सामील झाला व आपली

संस्कृती जपतच नवीन वसाहतवाद मान्य केला. नंतरच्या काळात राज्य, राष्ट्र ही संकल्पना आणि यातूनच मानवी सांस्कृतिक वर्ग तयार झाला. यात न्याय, नियमावली तयार झाली, हाच प्रादेशिक अस्मितेचा मूळ गाभा. त्यापरी असणारं प्रेम भौगोलिक, सांस्कृतिक अस्मितेचा गर्व बाळगणे म्हणजेच या सर्व रचनेची रक्षा करणे. त्यासाठी सीमारेषा निश्चित करण्यात आल्या, संरक्षण साधने निर्माण करण्यात आली, संरक्षक समूह निर्माण करण्यात आला, जबाबदारीचे वाटप करण्यात आले. अन् प्रादेशिक अस्मिता, देशभक्ती, राष्ट्रभक्ती, राष्ट्रवाद उदयास आला.

यात अंतर्गत मतांतरेसुद्धा झाली, आपापली मते मांडण्याचा प्रयन झाला, प्रत्येक मतांच्या विचारांचे गट निर्माण झाले (पक्ष). काही ठिकाणी दडपशाही, दंडुकेशाही, वैचारिक, सामाजिक क्रांतीचा उदय झाला. ज्या व्यवस्थेमध्ये आपआपली मते मांडण्याचा अधिकार मिळाला, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उदय खऱ्या अर्थाने झाला. यात लोकशाही (लोकांनी लोकांसाठी स्थापन केलेली व्यवस्था) हेच अभिप्रेत होते.

राष्ट्रवाद हा असा विषय आहे की, लोकांचा समूह इतिहास, परंपरा, भाषा, वंश आणि संस्कृतीच्या आधारावर स्वतःला एकत्र करतो. या मर्यादांमुळे ते या निष्कर्षाप्रत आले आहेत की त्यांना त्यांच्या स्वतःच्या निर्णयांवर आधारित स्वतःचा सार्वभौम राजकीय समुदाय 'राष्ट्र' स्थापन करण्याचा अधिकार देतो. हा निकष संपूर्ण भारतवर्षास लागू होतो. जगाचा नकाशा घ्यायचा झाला तर पृथ्वीचा प्रत्येक इंच राष्ट्राच्या सीमांमध्ये विभागला गेला आहे. राष्ट्रवादाच्या पायावर उभारलेले राष्ट्र हीच संकल्पना आत्मसन्मान, राष्ट्रप्रेम, राष्ट्रप्रगती हा ध्यासच देश हा विचार होऊन जातो.

अतंर्गत असलेले वादविवाद, धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक हा देशाच्या सीमारेषेचा विषय होऊ शकणार नाही किंवा कलह होणार नाही याची काळजी त्या देशाचा नागरिक त्याच्या आंतरिक प्रेरणेतून घेऊ शकतो. त्याची राष्ट्रभावना पराकोटीचे देशप्रेम निर्माण करून जाते. अर्थिक, सामाजिक, शैक्षणिक धोरणे निश्चित असावीत. राज्यघटनेचं, संविधानाचं प्रमाण हेच अंतिमतः श्रेष्ठ, विना वादविवादाचं असावं हेच राष्ट्रधर्माला प्रेरीत करत असते.

जगात आपण ज्यावेळी एकाच धर्माची अनेक राष्ट्रे पाहतो त्यावेळी धर्म व राष्ट्र यांची कल्पना विसंगत वाटू लागते. एकाच धर्माची राष्ट्रे सीमावादाची

लढाई लढतात. जीवित हानी होते, धर्म श्रेष्ठ का देश ? जे सांस्कृतिक म्हणजे समायोजित, प्राकृतिक, प्रादेशिक, भाषिक, वांशिक अस्मिता बाळगतात ते धर्मापेक्षा राष्ट्र मोठे या विचारांनीच इंच इंच भूमीसाठी प्राण देत असतात.

राष्ट्रवाद, पुरोगामी, प्रतिगामी, आस्तिक, नास्तिक, ऐतिहासिक रचना (इतिहास) या संकल्पना राष्ट्रहिताच्या धारणांचा धोरणांचा विरोध ही भावना निर्माण किंवा व्यक्त करू शकतच नाहीत ही विसंगती तर्कहीन असते. उगीचच कविमनाच्या मानवतेच्या कल्पना शब्दांचाच खेळ असतो हा सिद्धांत भूमी, प्रादेशिक अस्मितेला सुसंगत असू शकत नाही. असो, म्हणजे कवी, लेखक, गायक, शाहीर, शायर, साहित्यिक यांची भूमिका आजपर्यंत जगामध्ये देशभावनेचा हुंकार जगविण्यासाठी याबाबत प्रथम असतातच.

राष्ट्राची निर्मिती केवळ भाषा, वंश, धर्म किंवा प्रदेश यातूनच होते हे तत्त्व त्यावेळी दिले गेले; पण जेव्हा-जेव्हा या आधारावर धर्मवाद प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला, तेव्हा तणाव आणि दहशतवादाला बळ मिळाले. जेव्हा राष्ट्रवादाची सांस्कृतिक संकल्पना सक्तीने अंमलात आणली जाते, तेव्हा त्याला 'अति-राष्ट्रवाद' किंवा 'अराजकता' म्हणतात. याचा अर्थ असा की जेव्हा राष्ट्रवाद हे टोकाचे मूल्य बनते तेव्हा सांस्कृतिक विविधता नष्ट होण्याचा धोका निर्माण होतो.

राष्ट्रवादाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे कारण तो जागतिक घडामोडींमध्ये खूप महत्त्वाची भूमिका बजावतो. गेल्या दोन दशकांमध्ये, राष्ट्रवाद हा एक आकर्षक राजकीय सिद्धांत म्हणून उदयास आला आहे ज्याने इतिहासाच्या निर्मितीमध्ये योगदान दिले आहे. याने उत्कट निष्ठा तसेच खोल प्रतिद्वंद्वांना प्रेरणा दिली आहे.

राष्ट्रीय सीमांच्या आत राहणाऱ्या लोकांना आपापल्या राष्ट्राचे अस्तित्व नैसर्गिक, प्राचीन, शाश्वत आणि स्थिर वाटते. या कल्पनेच्या ताकदीचा अंदाज या वस्तुस्थितीवरूनही लावता येतो की तिच्या आधारे निर्माण झालेले राष्ट्रीय समुदाय, वर्ग, जात आणि धार्मिक विभागणी यांच्या पलीकडे जातात. जेव्हा राष्ट्रवादावर आधारित कार्यक्रम आणि राजकीय प्रकल्पानुसार राष्ट्र-राज्य स्थापन केले जाते, तेव्हा त्याच्या सीमेवर राहणाऱ्या लोकांनी त्यांच्या विविध अस्मितेपेक्षा राष्ट्राप्रती असलेल्या निष्ठेला महत्त्व देणे अपेक्षित असते. ते राष्ट्राच्या कायद्याचे पालन करतील आणि देशाच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेसाठी आपल्या प्राणांची

आहुती देतील. येथे हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की अनेक साम्य असले तरी राष्ट्रवाद आणि देशभक्ती यात फरक आहे. राष्ट्रवाद हा काही कार्यक्रम आणि प्रकल्पांचा मूलत: वाहक असतो, तर देशभक्तीची भावना अशा कोणत्याही स्थितीवर राष्ट्रहितावरच अवलंबून असते. राष्ट्रवाद कोणत्याही धर्मात जन्म घेत नसतो तो फक्त अस्मितेचा प्रश्न होऊन राहतो.

देशभक्ती सर्व धर्मांत जन्म घेत असतेच, ती प्रादेशिक, प्राकृतिक, भौगोलिक फक्त अस्मिताच नसते तर जगण्याचे, स्वाभिमानाचे अत्यंत भावनिक स्वरूप असते. हीच अस्मिता !

एक देश फक्त दोन प्रदेशात वेगवेगळ्या प्रादेशिक भौगोलिक अस्मितेचं विलयीकरण करण्यासाठी एकच भाषेचा दर्जा देऊन, देशाचे विलगिकरणाची सुरुवात करून घेतली आणि त्या देशाचे (प्रांताचे) युद्ध परिस्थितीत वेगळ्या देशाची निर्मिती झाली जसे बांगला देश !

जयहिंद माझी देशभावना आहे. तशीच जय महाराष्ट्र माझी प्रादेशिक, सांस्कृतिक भावना आहे.

*(लेखक हे सांगली येथील कार्यकर्ते आहेत.)*

■ ■

बुरखा, बालविवाह, पुरुषप्रधान तलाक पद्धत, बहुपत्नीत्व, हलाला तसेच अस्पृश्यता, देवदासी, सतीप्रथा, जातीय उच्चता या आणि अशा विषमतावादी परंपरा धर्माधिष्ठित आहेत. या प्रथा धर्माच्या अंगभूत मर्यादाच दर्शवतात. तथापि समता, बहुविविधता, वैज्ञानिकता, आधुनिकता हे सेक्युलॅरिझमचे अंगभूत घटक आहेत, म्हणून सेक्युलॅरिझम धर्म संकल्पनेपेक्षा जास्त मानवतावादी आहे. हिंदू धर्मातील अशा विषमतांचे उच्चाटन करणारे कायदे अस्तित्वात आले आहेत. आता मुस्लीम समाजातील विषमतावादी प्रथांचे उच्चाटन झाले पाहिजे.

**- डॉ. शमसुद्दीन तांबोळी**

विचारमंथन

# गांधींची हत्या की सत्याचा वध....?

• जनार्दन कदम

*भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या ७५ व्या पुण्यतिथीप्रीत्यर्थ भावपूर्ण श्रद्धांजली......*

बालपणापासूनच माझ्या मनात नथुराम गोडसे नामक व्यक्तीविषयी एक वेगळेच कुतूहल होतं. गांधींसारख्या महात्म्याचा ह्या माणसानं खून का केला ? हा प्रश्न मनात घर करून राहायचा. तारुण्यात जेव्हा नथुराम गोडसे लिखित 'पन्नास कोटींचे बळी' आणि त्याचा भाऊ गोपाळ गोडसे लिखित 'गांधी हत्या आणि मी' ही दोन पुस्तकं मला वाचण्यास मिळाली तेव्हा 'पन्नास कोटींचे बळी' हा नथुरामने न्यायालयात दिलेला बचावनामा आहे असे जाणवते आणि 'गांधी हत्या आणि मी' गोपाळ गोडसेने आजीवन कारावासाची शिक्षा झाल्यानंतर लिहिलेलं पुस्तक आहे. ही दोन्हीं पुस्तकं वाचल्यानंतर मला जाणवलं की, नथुराम गोडसे सनातनी जरूर होता, पण वेडा नव्हता. आपण ज्याला माथेफिरू म्हणतो, तसा तर तो नव्हताच नव्हता. आणि जेव्हा जगन फडणीस यांचे 'महात्म्याची अखेर' हे पुस्तक वाचलं तेव्हा मेंदू सुन्न झाला.

नथुराम आणि त्याच्या साथीदारांनी जाणीवपूर्वक षड्‌यंत्र करून गांधींची हत्या केली होती. ह्या सनातनी धर्मवेड्यांनी गांधींची हत्या का केली..?

ह्या प्रश्नाच्या उत्तराच्या शोधात हळूहळू गांधींचं राजकारण आणि हिंदुत्ववाद्यांच्या राजकारणामधलं अंतर मला समजू लागलं. 'मुसलमानांनी भारताचे विभाजन केलं, तरीही मुसलमान, त्यांची संघटना मुस्लीम लीग व नवनिर्मित पाकिस्तानसाठी गांधींनी नेहमीच नरमाई दाखवली,' अशी विधानं त्या पुस्तकांमध्ये आणि इतरत्रही हिंदुत्ववादी करत आले आहेत. त्यांच्या दृष्टीने तेव्हा तर हद्दच झाली की गांधींनी पाकिस्तानला त्यांच्या वाटणीचे ५५ कोटी रुपये देण्याचा आग्रह धरला, आणि उपवासाची धमकीही दिली.

पाकिस्तानात हिंदूंवर होणारे अत्याचार व काश्मीरवर हल्ला करणाऱ्यांना ५५ कोटी रुपये देणार म्हणून ह्या गोष्टीवर उत्तेजित होऊन नथुराम गोडसेने गांधींची हत्या केली, असं त्या पुस्तकांच्या माध्यमातून सांगण्यात आलं.

खरं पाहता गांधीजींच्या हत्येसंबंधी सामान्य जणांचीसुद्धा हीच धारणा आहे. अनेक इतिहास संशोधक आणि पत्रकारसुद्धा असंच मानतात. शिवाय इतिहासाच्या पाट्यपुस्तकातसुद्धा हेच कारण सांगितलं गेलंय.

गोडसे बंधूंची पुस्तकं वाचल्यानंतर हत्येचं खरं कारण जाणून घेण्यासाठी मी अन्य अनेक ग्रंथांचं वाचन केले. प्यारेलाल लिखित 'द लास्ट फेज', गांधी हत्येची केस ज्यांच्या न्यायालयात चालली होती त्या न्यायमूर्ती खोसलांनी लिहिलेलं पुस्तक, ग्वालियर बचाओ पक्षाचे वकील अॅडव्होकेट इनामदारांचं संस्मरण आणि गोडसे बंधूंचं प्रतिवाद करणारी अन्य दुसरी पुस्तके वाचल्यानंतर मला विश्वास वाटला की, गांधींची हत्या ५५ कोटी रुपये प्रकरणी उत्तेजित होऊन केली गेली नव्हती.

भारताचे विभाजन आणि ५५ कोटी रुपयांचा प्रश्न उभा राहण्याआधी, फार आधी ह्या टोळीने गांधींची हत्या करण्याचा निश्चय केला होता आणि तसा प्रयत्नही ते वारंवार करत आले होते.

गांधीहत्येच्या केसमधील आरोपीपैकी गोपाळ गोडसे आणि मदनलाल पाहवा यांच्या संदर्भातील साहित्य वाचल्यानंतर मला विश्वास पटला की, ही मंडळी धादांत खोटं बोलत आहेत, वास्तविकता लपविण्याचा प्रयत्न करीत आहेत. गांधी हत्येविषयी हिंदुत्ववादी सनातनी आपले विचार वेगवेगळ्या पद्धतीने घोटून घुसळून लोकांना पाजण्याचे प्रयत्न करीत आहेत. असत्याला वेगवेगळ्या स्थानांमध्ये, वेगवेगळ्या पद्धतीने, वारंवार उच्चार केल्याने एक दिवस ते असत्य सत्य होईल अशा गोबेल्स थियरीमध्ये ह्या फाशीवाद्यांचा विश्वास होता. म्हणूनच हे लोक तीन कारणं नेहमीच समोर ठेवण्याचा प्रयत्न करीत आले आहेत.

पहिले कारण हे की, गांधीजी मुसलमान व पाकिस्तान समर्थक होते. दुसरं कारण हे की, गांधींची हत्या ५५ कोटी रुपयांसाठी केली होती. आणि तिसरे कारण गांधींची हत्या करणारे देशभक्त व प्रामाणिक व्यक्ती होत्या. परंतु सत्य हे आहे की, तिन्ही कारणं आळवावरच्या पानावरील पाण्याच्या थेंबासारखीच होती.

आता राहता राहिला प्रश्न महात्मा गांधींचा... ते खरोखर मुस्लीमधार्जिणे व पाकिस्तान समर्थक होते का...? का भारत-पाकिस्तान विभाजनासाठी जबाबदार होते...? म्हणून महात्मा गांधींच्या हत्येसंबंधी हिंदुत्ववाद्यांच्या थिसिसमध्ये किती खोटारडेपणा आहे हे समजून घेण्यासाठी उपरोक्त तिन्ही कारणांच्या मुळाशी जाणं आणि ते समजून घेणं महत्त्वाचे आहे.

## लोकमान्य टिळकांच्या मर्यादा

९ जानेवारी १९१५ रोजी महात्मा गांधी जेव्हा भारतात परत आले तेव्हा कॉंग्रेसचे नेतृत्व लोकमान्य टिळकांकडे होते. तेव्हा टिळकांचे विचार हिंदुत्ववादी, ब्राह्मणवादी आणि रूढीवादी सनातनी सारखेच होते. गोपाळ कृष्ण गोखलेंच्या अस्वस्थतेमुळे प्रगतीशील, सुधारणावादी शक्ती कमजोर पडू लागल्या होत्या. त्यावेळी लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वामध्ये काही हिंदुत्ववादी खुले आंदोलन चालवत होते, तर काही विनायक दामोदर सावरकरांसारखे हिंदुत्ववादी क्रांतिकारी लोकं भूमिगत राहून हिंसक आंदोलनाची तयारी करीत होते. ह्या दोन्हीं प्रकारच्या आंदोलनाची एकूण ताकद किती होती ? हे समजून घेणं गरजेचं आहे.

लोकमान्य टिळकांनी घोषणा केली की, स्वराज्य मिळवणं हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे. यात 'स्वराज्य' शब्द येतो आणि त्या वेळी याचा अर्थ पूर्ण स्वराज्य नव्हता. लोकमान्यांच्या मनात 'स्वराज्य'चा आशय होता तो ब्रिटिश साम्राज्याच्या अंतर्गत स्वायत्ता (होमरूल) आणि हीच त्यांची मागणी होती. (हे लोकमान्य टिळकांच्याविषयी पूर्ण आदर-सन्मान ठेवून; पण कट्टर हिंदुत्ववादी राजकारणाची मर्यादा कळावी म्हणून लिहीत आहे.) हिंदुत्ववादी - ब्राह्मणवादी दृष्टिकोनामुळे ते कॉंग्रेसच्या प्रभावाचा विस्तार करू शकले नाहीत. एकीकडे महाराष्ट्र व इतर प्रांतांत ब्राह्मणविरोधी आंदोलन जोर पकडू लागले होते. ज्यामुळे कॉंग्रेसचे हिंदुत्ववादी नेतृत्व प्रभावहीन ठरत होते. प्रत्येक समाज एक दुसऱ्याकडे शंकेने पाहू लागला. कॉंग्रेसच्या नेत्यांचा झुकाव ब्राह्मणवादी असल्याकारणाने बहुजन (दलित) समाज कॉंग्रेस व स्वराज्य आंदोलनापासून वेगळा राहत होता. आणि जेथे बहुजन समाजाची साथ नाही, तेथे भूमिगत आंदोलन कसे यशस्वी होईल ? अधिकतर क्रांतिकारी एखाद लहान-मोठी घटना केल्यानंतर पकडले जायचे.....

## सावरकरांना ओळखणं समजणं

हे लोक ज्यांना 'क्रांतिवीर' म्हणून सन्मानित करतात, ते विनायक दामोदर सावरकर लंडनमध्ये राहून 'अभिनव भारत' नावाची पत्रिका प्रकाशित करायचे. भाषण तथा लिखाणावर प्रभुत्व असल्यानं काही तरुण त्यांच्याकडे आकर्षित झाले होते. शिवाय ह्या त्यांच्या अनुयायांनी भूमिगत राहून तोडफोडीच्या काही घटनाही केल्या होत्या; पण इंग्रजांविरुद्ध व्यापक विद्रोह करू शकले नाहीत. अंततः परिस्थिती अशी झाली की, वि. डी. सावरकर स्वतः कुठलीच जोखीम घ्यायचे

नाही. हा असंतोष आणि अविश्वास त्यांच्या अनुयायांमध्ये पसरू लागला. जर अजूनही काही केले नाही, तर अभिनव भारत पत्रिका बंद होईल, अशी आशंका त्यांना होऊ लागली होती. तेव्हा त्यांनी आपल्या जीवनात पहिल्यांदा आणि शेवटचं एक छोटंसं साहस करून दाखवले. त्यांना जेव्हा ब्रिटन वरून भारतात आणत होते त्यावेळी त्यांनी फ्रान्सच्या सीमेत समुद्रात उडी घेऊन पलायन करण्याचा प्रयत्न केला होता. पण केवळ १० मिनिटांमध्येच पकडण्यात आले. सत्य तर हे आहे की, सावरकर फ्रान्सच्या सीमेत पलायन करण्याचा गुन्हा करून ते फ्रान्सच्या सरकारचे आरोपी बनणार होते. म्हणजेच इंग्रज सरकारच्या सजेपासून त्यांची मुक्तता होईल; पण त्यांचा हा मनसुबा यशस्वी होऊ शकला नाही. नंतर सावरकरांनी माफीनामा लिहून अंदमानच्या कैदेतून मुक्तता करून घेतली. इंग्रज सरकारद्वारे निर्धारित मुदती पर्यंत ते रत्नागिरी जिल्ह्याच्या सीमेबाहेर जाणार नाही, अशी लिखित अट त्यांनी इंग्रजांना दिली होती. सावरकरांच्या ह्या महान क्रांती (?) नंतर तीन दशकं तरी भारताच्या स्वातंत्र्याच्या कुठल्याच आंदोलनात त्यांनी सहभाग दिला अथवा स्वातंत्र्यलढ्यात स्वतः कुठलं एकही आंदोलन केलं असेल असं कुठलंच प्रमाण मिळत नाही.

## महात्मा गांधीजींना सामान्य जनतेचे सहकार्य

ही होती देशाची राजनैतिक परिस्थिती. ९ जानेवारी १९१५ रोजी गांधीजी मुंबईच्या बंदरावर उतरले. त्यावेळचे अधिकांश नेते भारताच्या सामाजिक वास्तविकतेपासून अजाण होते, हे एक कटू सत्य आहे. या बाबी भारतीय मातीत पाय ठेवताच क्षणी (गांधींच्या अंतर्मनाने) ओळखल्या होत्या. गांधींनी काँग्रेसचं व्यापक जन संगठणात परिवर्तित करण्याचं काम सुरू केलं. पहिल्यांदा दलित-आदिवासी, मागासवर्गीय वर्गातील लोक, महिलावर्ग काँग्रेसला आपलं समजू लागली. राष्ट्राच्या राजकारणात आमचंही महत्वाचं स्थान आहे, असा विश्वास शोषित जनतेच्या मनात सर्वात प्रथम गांधीजींनी निर्माण केला.

## काँग्रेसचा कायापालट

गांधीजींनी काँग्रेस नावाच्या संघटनेला जन-आंदोलनामध्ये परिवर्तित केलं. तेव्हा भूमिगत क्रांतीला कुठलंच महत्त्व राहत नाही, चंपारण्याच्या आधी, देशाच्या कुठल्याही जिल्ह्यात, कुठल्याही मुद्याला घेऊन जिल्हाव्यापी जनआंदोलन झालं नव्हतं. अखंड देशात साधारण संप होऊ शकतो, याची कल्पनादेखील गांधींच्या आधीचे काँग्रेसी नेते करू शकत नव्हते. खिलाफत आंदोलनाला समर्थन

देऊन मुसलमान बांधवांना सोबत घेण्याचा धाडसी प्रयोगाचा प्रयत्न गांधीजींनी केला. वेगवेगळ्या संकुचित अस्मितेच्या जागी राष्ट्रीय अस्मितेचा जन्म गांधीजींनीच केला. जर गांधीजींनी ह्या राष्ट्रीय अस्मितेला जन्म दिला नसता तर देशाला अजूनही स्वतंत्रता मिळाली नसती. (हे कालच्या आणि आजच्या कर्मठ धर्मवेड्या सनातन्यांना मान्य करावं लागेल.) देशात सर्वधर्म समभावची भावना निर्माण करून देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याची किमया गांधीच करू शकले. खरं पाहता त्यांना स्वतः हिंदू असण्याचा गर्व होता, पण ते 'हिंद'चे बापू होते. म्हणून तर हिंदुत्ववादींचे अनेक अनुयायी तथा भूमिगत आंदोलनकर्ते गांधीजींच्या ह्या उदार राष्ट्रवादाने प्रेरित होऊन त्यांच्याबरोबर सहभागी झाले होते. गांधीवादी बनले होते.

## किती देशहितात आहे हिंदुसांप्रदायिक भावना

जे आतून कट्टर सांप्रदायिक होते, त्यांनी गांधींचा कधीच खऱ्या मनाने स्वीकार केला नाही; पण गांधींच्या उदार राष्ट्रवादासमोर संकुचित हिंदु-राष्ट्रवाद तग धरेल, असंही शक्य नव्हते. ह्याच परिस्थितीत गांधीविरोधी भावना निर्माण झाली. काही लोकं हिंदू महासभेत गेली तर काहींनी १९२५ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. काय केलं ह्या महाभागांनी...? आयुष्यभर फक्त गांधींजींना, पददलितांना व मुसलमानांना शिव्या-शाप देण्याचेच कार्य यांनी केले, किंबहुना स्वतःचा वेळ वाया घालवला. ह्या महान राष्ट्रभक्तांनी स्वातंत्र्यासाठी एकाही आंदोलनात कधी भागसुद्धा घेतला नाही. मुळात त्यांना गांधींचं नेतृत्वच मान्य नव्हतं. पण गांधी तथा काँग्रेस पासून वेगळं, स्वतंत्रपणे कुठलेच (स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी) एकसुद्धा आंदोलन ह्या लोकांनी केलं नाही. विशाल आंदोलन तर सोडाच, कुठलं लहानात लहान आंदोलनसुद्धा यशसवीरित्या पार पाडून दाखवण्याची हिम्मत ही ह्या राष्ट्रभक्तांनी दाखवली नाही. सावरकरांव्यतिरिक्त ह्या मातृभूमीच्या लाडक्या सपुतांपैकी कुणीच समाज सुधारणेचं कामही केलं नाही. अरे, कामाचं काय, याच्यासाठी विचारविमर्शसुद्धा यांना करता आला नाही.

## पाकिस्तानची निर्मिती कोणी केली ?

१९३७ मध्ये हिंदू महासभेच्या अहमदाबाद अधिवेशनात खुद्द सावरकरांनी द्विराष्ट्रवादाचे समर्थन केलं होतं. मुस्लीम लीगने पाकिस्तानसाठी प्रस्ताव मांडला, त्याच्या तीन वर्षांपूर्वीच (१९३४) सावरकरांनी हिंदू आणि मुसलमान ही दोन वेगवेगळी राष्ट्रीयता आहेत, हे प्रतिपादन केलं होतं. जेव्हा दोन सांप्रदायिक शक्ती या एक दुसऱ्या विरुद्ध काम करतात, तेव्हा दोन्हीं शक्ती या एकच लक्ष्य ठेवून पुढे

सरसावतात आणि ते असतं आत्मविनाशाचं. हिंदु सांप्रदायिकवाद्यांनी असं करून इंग्रज आणि भारत-विभाजन करणाऱ्या मुसलमानांचा फायदाच केला होता. ह्या महान देशभक्तांनी १९४२ रोजीच्या स्वातंत्र्य आंदोलनात तर भागच घेतला नव्हता उलट ब्रिटिश शासनास पत्र लिहून कळवलं होतं की, आम्ही सदर स्वातंत्र्य आंदोलनाचं समर्थन करत नाही. गांधीजी येण्याअगोदर (१९१५) राष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्व त्यांच्याच जवळ होतं; पण तेव्हा ही त्यांनी त्यावेळी कुठलाच मोठा पराक्रम केला नव्हता, हे आपणा सर्वांच्याच स्मरणात आहेच. गांधी आल्यानंतरही ह्या लोकांनी राष्ट्रहितासाठी कुठलेच साधारण काम करण्याची तसदीसुद्धा घेतली नाही. गुरू गोळवलकर यांनी ॲडॉल्फ हिटलरचं अभिनंदन केलं; पण तरीही इंग्रजांनी त्यांना कैद केलं नाही. कारण हे की, इंग्रज यांना दोन कवडी इतकीही किंमत देत नव्हते, त्यांना माहीत होतं की, या लोकांच्या हातून तळलेला पापडही तोडण्याची हिम्मत नाहीये, त्यांच्या ताकदीविषयी इंग्रजांना पूर्ण कल्पना होती. भारत-विभाजनासाठी मुस्लीम लीग जेवढी जबाबदार तथा इंग्रज आहे, तेवढेच हे कर्मठ हिंदुत्ववादीसुद्धा जबाबदार आहेत. स्वतंत्र भारतावर हिंदूंचं राज्य राहील, असा गाजावाजा करून हिंदुत्ववाद्यांनी विभाजनासाठी मुसलमानांना एक ठोस आधार दिला होता. किंबहुना त्यांना निमंत्रणच देऊन टाकलं. विभाजनाला समर्थन करणारे लोक, कधी मुहंमद अली जिन्ना, कधी सावरकर, हेडगेवार, गोळवलकर आणि कधी शामाप्रसाद मुखर्जी सारख्यां भय दाखवून त्यांचा चलाखीपूर्वक उपयोग करायचे. आणि आजही हे हिंदुत्ववादी आपल्या मूर्खतेवर गर्व असल्यासारखे भासवतात. ब्रिटिश सरकारला ज्यांना कधी जेलमध्ये ठेवण्याची गरजही वाटली नाही, त्या गोळवलकरांच्या गुपित शक्त्यांचा उपयोग इंग्रज गांधींविरुद्ध करायचे. शहाबुद्दीन राठोडच्या भाषेत म्हणायचे झाले तर त्यावेळच्या राष्ट्रीय राजकारणातील हीच लोकं 'जयचंद' होते. भारताचे विभाजन गांधींमुळे अजिबात झाले नाही, ह्या अशाच लोकांमुळे झालं आहे. गांधींनी तर शेवटपर्यंत भारत-विभाजनासाठी विरोधच केला होता. आपल्या अंतिम समयीसुद्धा त्यांनी जिन्नां बरोबर क्रमवार, त्यांचं मत वळवण्याचा प्रयत्न केला. शिवाय गांधीजी पाकिस्तानला भारतीय देशाचे एक राज्य म्हणूनच मानायचे. (प्यारेलाल लिखित लास्ट फेज) गांधी सर्वसमावेशक उदार राष्ट्रवादी होते म्हणूनच त्यांनी सर्व धर्मांच्या लोकांचा स्वीकार केला होता, फक्त मुसलमानांनाच नाही, तर सर्व जाती-धर्मांच्या लोकांनी एकत्र येऊन स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होऊन पारतंत्र्याच्या हातातून

आपल्या अखंड भारताला स्वातंत्र्य मिळावं, ही गांधींची इच्छा होती, एका राष्ट्रीय नेत्याची ही दूरदृष्टी होती. महात्माजींचा हा वात्सल्यभाव होता सर्वांसाठीच. दुर्दैवाने हे हिंदुराष्ट्रवाद्यांना समजूनच घ्यायचं नव्हतं.

## विभाजन थांबवण्यासाठी ह्यांनी काय केलं ?

आता अंतिम गोष्ट. गांधींनी भारत-विभाजन थांबवावं, ही मागणी ही लोकं कुठल्या तोंडाने करतात ? गांधींनी विभाजन थांबवण्यासाठी उपोषण करायला हवं होतं, अशी अपेक्षा करण्याचा ह्यांना काय नैतिक अधिकार आहे ? ज्यांना तुम्ही देशाचं कलंक समजता, ज्यांची हत्या (वध) करणं योग्य मानता, त्यांच्याचकडून तुम्ही अशी अपेक्षासुद्धा ठेवता ? तुम्ही का नाही देशाचे विभाजन थांबवण्यासाठी काही केलं ? सावरकर, हेडगेवार, गोळवलकर यांनी विभाजन विरुद्ध का नाही आमरण उपोषण केलं ? का नाही ह्याच्यासाठी त्यांनी हिंदूंचं मोठं आंदोलन केलं ? ज्यांना शिव्याशाप देता, त्यांच्याचकडून देश वाचवण्याची विनंतीही करता ? आणि जेव्हा गांधीजी एकटे पडल्या कारणाने देशाचं विभाजन थांबवू शकले नाही, तेव्हा तुम्ही त्यांना राक्षस (असूर) समजून त्यांचा वध करण्याचा कट रचता ? आता तुम्हीच ठरवा, ह्याला मर्दांगी म्हणाल की नपुंसकता ? सत्य जाणूनही जे असत्याचा प्रचार करतात, त्यांना मूर्खच (मर्कट) म्हणावे लागेल. आणि याचा जर सारासार विचार केला तर हिंदुत्ववादी हे पहिल्या दर्जाचे मूर्ख ठरतात.

गांधींच्या हत्येची, जे सलग तीन खोटी कारणं सांगतात, त्यापैकी ह्या पहिल्या खोट्या कारणाची वास्तविकता आपण पाहिली. भारत-विभाजनासाठी गांधी जबाबदार नव्हते आणि दुरान्वये त्यांचा ह्या गोष्टीशी संबंधही नव्हता हे अगदी छातीठोकपणे मी सांगू शकेन.

भारत-विभाजनासाठी कित्येक ऐतिहासिक व सामाजिक तत्त्वं आणि शक्त्या जबाबदार होत्या. विभाजनाला समर्थन करणारे मुसलमान जबाबदार होते, इंग्रज जबाबदार होते व त्यांच्या मनसुब्याला अनुकूल वाट बनवणारे, दाखवणारे मूर्ख हिंदुत्ववादी जबाबदार होते. हे आता तरी मान्य व्हायला हवं.....

## हिंदुराष्ट्रवाद्यांना ओळखा

गांधीद्वेषानं आणि मुस्लीमद्वेषानं हे हिंदुराष्ट्रवादी इतके हैराण होते की, राष्ट्रहित कशात आहे हेही त्यांच्या लक्षात यायचे नाही. त्यांची पोटदुखी ह्याच गोष्टीने वाढली की, गांधीजी आल्यानंतर त्यांच्या हातातील नेतृत्व गेले होते. एवढंच नाही तर, त्यांची हिंदू-ब्रँड राजकारणही कालबाह्य झालं होतं. ब्राह्मणवादी

राष्ट्रवादाची जागा उदार गांधीवादी राष्ट्रवादाने घेतली होती. जात-धर्म, पंथ, लिंग आदी भेदभावना विसरून अखंड जनता गांधींच्या मागे चालू लागली. राजकारणाच्या मुळापासून सांप्रदायिकतेला काढून, गांधींनी त्याच्या जागी अध्यात्माला प्रस्थापित केलं. अध्यात्माच्या मुळावर मानवतावादी राजकीय ह्या नवीन धारेनं गांधीजींना महात्मा (राष्ट्रपिता) बनवलं.

जे जास्त महत्त्वाकांक्षी नव्हते, असे कित्येक सांप्रदायिक लोक राजकारणापासून विभक्त झाले. हिंसक आणि महत्त्वाकांक्षी सांप्रदायवादी कमजोर होऊ लागले, ते गांधींजीं बरोबर जाऊ शकत नव्हते आणि सामान्य जनता त्यांच्या बरोबर येऊ इच्छित नव्हती.

## गांधी हत्येची प्रेरक शक्ती

ज्या व्यक्तीमुळे आपल्या अस्तित्वावर संकट येतं, ती व्यक्ती काट्याप्रमाणे टोचू लागते आणि मग त्या काट्यास काढण्याचा प्रयत्न होतो. हिंदुत्ववादी वृत्तपत्रांमध्ये गांधींविषयी कटू शब्दांचा वापर करून त्यांची आलोचना छापण्यात यायची. गांधींविषयी अश्लील शब्दांचा वापर करून अभद्र लिखाण छोटछोटी वृत्तपत्रे,पत्रिका आणि मासिकांमध्ये छापून प्रकाशित करायचे, जर त्यांचा संग्रह केला असता तर एक खोलीच भरून गेली असती. काही महान देशभक्त इतके शूरवीर होते की, ते आपलं स्वतःचे नावसुद्धा छापण्याची हिम्मत करायचे नाहीत. गांधी सर्वांच्याच पाठीवरून हात फिरवून आपला स्नेह व्यक्त करायचे. पण आमच्याच पाठीवरून हात का फिरवत नाही, ह्याचंच त्यांना दुःख होतं.

गांधीजी एकदा रत्नागिरीमध्ये सावरकरांना भेटले होते आणि वर्धामध्ये आर. एस. एस.च्या स्वयंसेवकांना एकदा त्यांच्या समारंभात जाऊन, त्यांना संबोधितही केले होते. ह्या दोन्हीं घटनांचा पुरेपूर लाभ उचलण्यामध्ये हिंदुत्ववाद्यांनी कधी दिरंगाई केली नाही. ज्यांना दिवसरात्र शिव्याशाप देता, स्वप्नातसुद्धा त्यांचा चेहरा पाहिला की लालबुंद होता, त्यांची एक मधुर स्मृती इतकी मौल्यवान !

हिंदुत्ववाद्यांच्या डोळ्यांत गांधीजी खड्यासारखे सलायचे. ५५ कोटी रुपयांचा प्रश्नच काय, पाकिस्तान कोणाच्या स्वप्नातही नव्हता, तेव्हापासून हे गांधीजींची हत्या करण्याच्या प्रयत्नात होते. खेदजनक बाब ही आहे की, भारतात गांधींच्या हत्येचे प्रयत्न झाले, त्यात पुण्याच्याच लोकांचा अधिक सहभाग होता. अशा प्रकारच्या तीन प्रयत्नांमध्ये आणि शेवटी हत्येमध्ये स्वतः नथुराम गोडसेचा सहभाग होता. मुळात ५५ कोटी रुपयांचा प्रश्न कधी निर्माण झाला ? तर १२

जानेवारी १९४८ रोजी म्हणजेच महात्मा गांधींची हत्या होण्याच्या १८ दिवस आधी. निदान ह्या गोष्टीवर तरी आपला विश्वास बसावा, कारण हेच खरं सत्य आहे. बरं मग याच्या आधी चार वेळा गांधींच्या हत्येचा प्रयत्न ह्या सनातनी हिंदुत्ववाद्यांनी का केला ? ह्याचं उत्तर त्यांना द्यायलाच हवं, किंबहुना आता तरी द्या.....!

## १९३४ पासून गांधींच्या हत्येचा प्रयत्न

घटनाक्रम पुढीप्रमाणे - गांधीजी भारतात आले त्यानंतर त्यांच्या हत्येचा पाहिला प्रयत्न २५ जून, १९३४ रोजी केला गेला होता. प्रमुख पाहुणे म्हणून ते पुण्यास जात असता, त्यांच्या मोटारीवर बॉम्ब फेकण्यात आला होता. गांधीजी मागील मोटारीत होते म्हणून थोडक्यात बचावले. हत्येचा हा प्रयत्न हिंदुत्ववाद्यांच्या एका गटाने केला होता. बॉम्ब फेकणाऱ्याच्या बुटांत गांधीजी व नेहरूंचे फोटो सापडले, असं पोलीस तपासात नमूद आहे. आता प्रश्न असा १९३४ मध्ये तर पाकिस्तान नावाची कुठली वस्तू क्षितिजावर नव्हती, मग ५५ कोटी रुपयांचा प्रश्न कुठून निर्माण होतो ?

गांधीजींच्या हत्येचा दुसरा प्रयत्न १९४४ मध्ये पाचगणीत करण्यात आला होता. १९४४ च्या जुलैमध्ये गांधीजी आजारानंतर आराम करण्यास पाचगणीला गेले होते. तेव्हा पुण्याहून २० युवकांचा एक गट बस घेऊन पाचगणीत दाखल झाला. दिवसभर ते गांधींविरोधी घोषणा देऊ लागले, गटाचा नेता नथुराम गोडसेला गांधीजींनी बोलणी करण्यास बोलावलं; पण नथुरामने गांधींची भेट नाकारली. संध्याकाळी प्रार्थनासभेत नथुराम हातात सुरा घेऊन गांधीजींच्या दिशेने आला. पुण्याचे सुर्ती लॉजचे मालक मणिशंकर पुरोहित आणि (भिलारे गुरुजी) नामक व्यक्तीने नथुरामला पकडलं. पोलीस रेकॉर्डमध्ये नथुरामचे नाव नाहीये, पण मणिशंकर पुरोहित व भिलारे गुरुजींनी गांधीहत्येची चौकशी करणारे कपूर कमिशनच्या समक्ष स्पष्ट शब्दांत सदर घटनेबाबत आपली जबानी देताना नथुराम गोडसेचे नाव घेतले होते. १९४४ ला पाकिस्तानची निर्मिती होईल, ही शाश्वती खुद्द जिन्नालासुद्धा नव्हती. ऐतिहासिक तथ्य हे आहे की, १९४६ पर्यंत मोहंमद अली जिन्ना पाकिस्तानचा उपयोग सत्तेत अधिक भागीदारी मिळवण्यासाठीच करायचे. मग प्रश्न असा आहे की, पाकिस्तानचा काडीमात्रही संबंध नसताना १९४४ मध्ये नथुराम गोडसेने महात्मा गांधींची हत्या करण्याचा प्रयत्न का केला ? (ह्याच भिलारे गुरुजींबरोबर माझी वैयक्तिक भेट ही बॅरिस्टर शरद पालवांमुळे माझ्या

गांधीहत्येवरील 'हत्या एका महात्म्याची' नाटकाच्या प्रयोगा दरम्यान नेहरू सेंटर वरळी येथे झाली होती.)

गांधींच्या हत्येचा तिसरा प्रयत्न १९४४ च्याच सप्टेंबरमध्ये वर्धा येथे करण्यात आला होता. गांधीजी मोहंमद अली जिन्नाशी बोलणी करण्यास मुंबईला जाणार होते. गांधींना मुंबईला जाता येऊ नये म्हणून पुण्याहून एक गट वर्ध्याला आला. त्याचंही नेतृत्व नथुरामच करत होता. त्या गटातील ग. ल. थत्ते नामक व्यक्तीकडे सुरा हस्तगत झाला होता. सदर घटना पोलीस तपासात नमूद आहे. हा सुरा गांधींच्या मोटारीचे टायर पंक्चर करण्यासाठी आणला होता, अशी जबानी थत्तेने आपल्या बचावासाठी दिली होती. ह्या घटनेसंबंधी प्यारेलाल (गांधींचे सचिव) ने लिहिलंय, 'आज सकाळी मला दूरध्वनीवर जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून सूचना मिळाली की, स्वयंसेवक काही तरी गंभीर पाऊल उचलणार आहेत. म्हणून नाईलाजाने पोलिसांना आवश्यक कारवाई करावी लागेल.' यावर बापू म्हणाले, 'मी त्यांच्या मध्ये एकटा जाईन आणि वर्धा (रेल्वे स्टेशन) पर्यंत पायी चालेन,' स्वयंसेवकांनी स्वतः आपला विचार बदलला आणि मला मोटारीत येण्यास सांगितले तरी ही दुसरी बाब आहे बापू इथून रवाना होण्याच्या आधी अधिक्षक आले आणि म्हणाले की, धरण्यावर बसलेल्यांना प्रत्येक बाजूने समजावण्याचा प्रयत्न विफल ठरला, तेव्हा पूर्ण चेतावणी दिल्यानंतर मी त्या सर्वांना अटक केली आहे. धरण्यावर बसलेल्यांचा प्रमुख अधिक उत्साहित स्वभावाचा, अविवेकी आणि अस्थिर मनाचा माणूस दिसत होता, याची चिंता वाटत होती. अटकेनंतर झडतीत त्याच्याजवळ सुरा सापडला.' (महात्मा गांधी पूर्णाहुती : प्रथम खंड, पृष्ठ ११४)

अशा प्रकारे प्रदर्शनकारी स्वयंसेवकांची ही योजना विफल झाली. १९४४ च्या सप्टेंबरमध्येसुद्धा पाकिस्तानचा प्रश्न तितकाच दूर होता, जेवढा जुलैमध्ये होता.

गांधींच्या हत्येचा चौथा प्रयत्न - हा चौथा प्रयत्न २९ जून, १९४६ रोजी करण्यात आला होता. ते एका विशेष रेल्वेने मुंबईहून पुण्याला जात होते, त्यावेळी नेरळ आणि कर्जत स्थानका दरम्यान रूळावर मोठा दगड ठेवण्यात आला होता. त्या रात्री मोटरमनच्या सावधगिरीमुळे गांधीजी बचावले. दुसऱ्या दिवशी ३० जूनला प्रार्थनासभेत गांधींनी सदर घटनेचा उल्लेख करताना सांगितले, 'परमेश्वराच्या कृपेने मी अक्षरशः ७ वेळा मृत्यूच्या दाढेतून सुखरूप परत आलो. मी कधीच कुणाला दुखावले नाही किंव्हा कुणाबरोबर माझं वैरही नाही, तरीही बऱ्याचदा

माझे प्राण घेण्याचा प्रयत्न का करण्यात आला ? हेच माझ्या लक्षात येत नाही, माझे प्राण घेण्याचा कालचा प्रयत्न,अयशस्वी झाला.'

नथुराम गोडसे त्यावेळी पुण्याहून 'अग्रणी' नावाचे मराठी मासिक प्रकाशित करायचा. गांधीजींनी जेव्हा १२५ वर्षे जीवित राहण्याची इच्छा जाहीर केली, त्यानंतर 'अग्रणी'मधील एका अंकात नथुरामने लिहिलं, '....पण जीवित कोण ठेवील ?' म्हणजे १२५ वर्षे तुम्हाला जगू कोण देईल..? गांधीजींच्या हत्येच्या दिड वर्ष आधी नथुरामने लिहिलेलं हे वाक्य आहे. ह्या वाक्प्रचाराने हे सिद्ध होतं की, तो गांधींची हत्या करण्यासाठी फार पूर्वीपासून प्रयत्न करीत होता. 'अग्रणी' चा हा अंक शोधकर्त्यांसाठी उपलब्ध असेलच. १९४६ च्या जूनमध्ये पाकिस्तानची निर्मिती होईल, अशी शक्यता दिसू लागली होती; पण ५५ कोटी रुपयांचा तर त्यावेळी कुठला प्रश्नच नव्हता. या नंतर २० जानेवारी १९४८ रोजी मदनलाल पाहवाने गांधीजींवर, प्रार्थनासभेत बॉम्ब फेकला आणि ३० जानेवारी १९४८ ला गोडसेने गांधीजींची निर्मम हत्या केली.

आता इथे ५५ कोटी रुपयांप्रकरणी आणखी एक सत्य जाणून घेणं गरजेचं आहे. देश-विभाजनानंतर भारत सरकारची संपूर्ण संपत्ती आणि रोख १७५ कोटी (कदाचित आकडा चुकीचा असू शकेल) रकमेचा, जनसंख्येच्या आधारे वाटणी केली होती. त्यानुसार पाकिस्तानला एकूण ७५ कोटी रुपये देण्याचे (दोन्हीं देशांच्या पहिल्या करारा नुसार) ठरले होते. त्या. मधून २० कोटी रुपये आधीच देण्यात आले होते आणि उर्वरित रक्कम ५५ कोटी रुपये देणे शिल्लक होते.

काश्मीरवर हल्ला करणाऱ्या पाकिस्तानला जर उर्वरित ५५ कोटी रुपये दिले, तर ते सैनिकांवर खर्च करतील, असे कारण पुढे करून भारत सरकारने पाकिस्तानची रक्कम रोखली. लॉर्ड माऊंटबॅटनचे हे म्हणणे होते की, ही रक्कम पाकिस्तानची आहे आणि ती त्यांना दोन्ही देशांच्या पहिल्या करारानुसार द्यायला हवी. जेव्हा ह्याची माहिती गांधीजींना मिळाली, तेव्हा त्यांनी लॉर्ड माऊंटबॅटनच्या ह्या शब्दाचे समर्थन केलं. १२ जानेवारीला गांधीजींनी आपल्या प्रार्थनासभेत उपोषणाची घोषणा केली होती आणि त्याच दिवशी ५५ कोटी रुपयांचा प्रश्नही निर्माण झाला. पण गांधीजींनी तर उपरोक्त रकमेसाठी अजिबात उपोषणाची घोषणा केलीच नव्हती. वास्तविकता ही आहे की, दिल्लीतील जातीय दंगल थांबवून तेथे शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून उपोषणाची घोषणा केली होती. ५५ कोटी रुपयांसाठी नाही.

## उपोषणासंदर्भात थोडे सविस्तर

जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात एक मौलाना गांधींना भेटायला आले व म्हणाले की, 'पाकिस्तानला विरोध करणारे आमच्यासारखे राष्ट्रवादी मुसलमान पाकिस्तानात जाऊ इच्छित नाही आणि हिंदू सांप्रदायिक शक्ती या आम्हांस येथे जगू देत नाही. आमच्यासाठी ह्या दिल्लीत नरकमय स्थिती झाली आहे. तुम्ही कलकत्त्यात उपोषण करू शकता, पण दिल्लीत नाही करत...?' अशी विनंतीवजा तक्रारही त्यांनी गांधींजवळ केली. गांधीजी मौलानाचे शब्द ऐकून दुःखी झाले होते. दिल्लीत शांतीस्थापनेचे अनेक प्रयत्न होऊनसुद्धा शांती प्रस्थापित झाली नाही. शेवटी १३ जानेवारी, १९४८ पासून दिल्लीतील जातीय दंगल शमण्यासाठी उपोषणास सुरुवात केली. हे उपोषण केवळ सांप्रदायिक शांती प्रस्थापित होण्यासाठीच त्यांनी केले होते, ५५ कोटी रुपयांसाठी नव्हे. ह्या रुपयांचा प्रश्न तर त्या दिवशी योगायोगाने निर्माण झाला होता. गांधीजींनी आपल्या प्रार्थनासभेतच उपोषणाचा मूळ उद्देश स्पष्टपणे घोषितही केला होता आणि त्याच्यानंतर उपोषण समाप्तीसाठी डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेमध्ये सर्व जाती-धर्मातील १०७ जणांच्या शांतता कमिटीने शांती अपिलावर सह्याही केल्या होत्या. या व्यतिरिक्तही हिंदुत्ववादी खोटा प्रचार थांबवत नाही.

गांधींची हत्या करणारे हा दावा करतात की, त्यांनी ५५ कोटी रुपयांच्या घटनेवर उत्तेजित होऊन गांधींची हत्या करण्याचं षडयंत्र केलं होतं. आता याचा अर्थ असा होतो की, हा कट १३ जानेवारी नंतर रचण्यात आला होता, मग काय केवळ ७ दिवसांत गांधीजींवर बॉम्ब फेकण्याची घटना त्या काळी शक्य होऊ शकते...? केवळ १७ दिवसांतच हत्येत सहभागी होणारे आरोपी एकत्र आले, कट रचण्यात आला, ग्वालियर येथून पिस्तूल मिळवून दिल्लीत आले आणि गांधीजींची हत्याही केली..? एवढ्या कमी वेळेत षडयंत्र केलं आणि त्याची अंमलबजावणी ही झाली....? ही बाब विश्वासपात्र तर अजिबात नाही. १३ जानेवारीला नथुरामने आपली विम्याची पॉलिसी नाना आपटेच्या पत्नीच्या नावे केली होती. न्यायालयानेसुद्धा आपल्या निर्णयात १ जानेवारी, १९४८ ला षडयंत्र रचण्याचा दिवस मान्य केला आहे.

आता मुद्दा असा आहे की, ५५ कोटी रुपयांचा प्रश्न निर्माण होण्याआधीपासूनच गांधीजींच्या हत्येचे प्रयत्न का करण्यात आले...? हा प्रश्न अजूनही अनुत्तरीत राहून जातो. एक घटनेला सोडून, बाकी सर्व प्रयत्न महाराष्ट्रात

आणि तेसुद्धा पुण्याच्याच हिंदुत्ववाद्यांद्वारे का झाला....? तीन प्रयत्न तर स्वतः नथूरामने केले. म्हणजेच ५५ कोटी प्रकरण साफ खोटे आहे.

## असे असतात देशभक्त ?

आता हिंदुत्ववाद्यांद्वारे तिसऱ्या कारणाचीसुद्धा चर्चा करू... तिसरे कारण असं आहे की, गांधींची हत्या करणारे प्रामाणिक देशभक्त आणि शूरवीर होते. जसं हे आजपर्यंत प्रचार करत आले आहेत. 'मी नथुराम गोडसे बोलतोय ' नाटकात काहीसं असंच पात्र रंगवण्याचा प्रयत्न केला गेला आहे. जी लोकं असत्य व अपूर्ण सत्याचं पांघरूण घेतात, त्यांना प्रामाणिक आणि देशभक्त म्हणणं योग्य आहे का....? जी लोकं संदर्भाला तोडून-मोडून नुसतं खोटं पसरवतात, त्यांना भामटे म्हणावं का शूरवीर....? ह्यांनी गांधींच्या हत्येचं खरं कारण सांगण्याचं साहस जरी केलं असतं तरी त्यांना नक्कीच प्रामाणिक म्हणता आलं असतं. गांधींच्या हत्येसाठी करण्यात आलेल्या मागील निष्फळ प्रयत्नांची जबाबदारीसुद्धा ह्यांनी मान्य केली असती, तर ही वेगळी बाब झाली असती. एक अहिंसावादी निःशस्त्र आणि वृद्ध व्यक्तीची हत्या करणं ह्याला मर्दानगी म्हणत नाही. नपुंसकता, कोरी नपुंसकता म्हणतात. जी लोकं तर्कनिष्ठेने आपलं म्हणणं दुसऱ्यांना समजावू शकत नाही, तीच लोकं हिंसेचा मार्ग स्वीकारतात. 'हिंसा' भ्याडपणाचा मार्ग आहे, शूरविरांचा नाही. स्वतःचा निष्फळतेपणा आणि हताशपणामध्ये हिंदुत्ववाद्यांनी गांधींची हत्या केली होती. नथुरामने गांधींची हत्या करण्याचा प्रयत्न बऱ्याचदा प्रार्थनासभेतच केला होता. जेव्हा सर्वजण प्रार्थनेत तल्लीन असतील, त्यावेळी हे नराधम 'नरभक्ष' गांधींची हत्या करू इच्छित होते. पूजाअर्चना करीत असलेल्या व्यक्तीवर चाल करू नये, मग वृद्ध असला तरीही, असं हिंदू शास्त्रात सांगितले आहे. ह्यांना तर स्वतःच्या संस्कृतीचंसुद्धा अनुकरण करता येत नाही. हजारो लोकांच्या उपस्थितीत प्रार्थनासभेत बॉम्ब फेकण्याचीसुद्धा ह्या लोकांना लाज वाटली नाही. ज्या लोकांना हजारो लोकांच्या, निष्पाप व्यक्तींच्या जीवाची किंमत कळत नाही, त्यांना काय प्रामाणिक, शूरवीर आणि देशभक्त म्हणता येईल ?

## सरदार पटेल आणि आर. एस. एस.

या लोकांनी योजनाबद्ध पद्धतीने सरदार पटेलांना हिंदुत्ववादी सिद्ध करण्याचा कुटील डावही रचला. नथूराम गोडसेचा आर. एस. एस.शी संबंध नव्हता, अशा घोषणेची भीक ह्याच आर. एस. एस.च्या नेत्यांनी नथूरामकडेच मागितली होती. सत्य हे आहे की, गांधीहत्येच्या पाच वर्षांपूर्वी नथुराम वरील

संघटनेचा प्रचारक होता. सदर संघटनेवरून निर्बंध उठावे म्हणून सरदार पटेलांनीच नथुरामला असे घोषित करण्यास सांगितले होते म्हणे...! अशाप्रकारे सरदार पटेल हिंदुत्ववादी होते आणि आर. एस. एस.शी त्यांचा संबंध होता, असा घाणेरडा संकेत हे लोक नालायकरित्या अजूनही करतात, ह्यात तिळमात्र शंका नाही. गोळवलकर गुरुजींचे पुस्तक 'अवर नेशनहुड डिफाइंड'चे प्रकाशन १९३९ रोजी झालं होतं. ह्या पुस्तकामुळे जेव्हा आर. एस. एस.वर टिकासत्र वाढू लागले, तेव्हा ताबडतोब गोळवलकर गुरुजींनी पुस्तकाच्या लेखकाचे नाव बदलून बाबाराव सावरकर ठेवले व त्यापासून स्वतःची मुक्तता करून घेतली. दुसऱ्याचे पुस्तक स्वतःच्या नावे घेण्याची बाब आपण ऐकतो पण ह्या माणसानं स्वतःची चामडी वाचवण्यासाठी स्वतःचंच पुस्तक दुसऱ्याच्या नावे केले. अशा भित्र्या आणि कपटी माणसाला प्रामाणिक, शूरवीर आणि देशभक्त म्हणता येईल का ? गोपाळ गोडसेने तर जेलमधून सुटका व्हावी म्हणून भारत सरकारला एक दोन वेळा नाही तर २२ वेळा अर्ज दिला होता आणि अशी लोकं स्वतःला शूरवीर म्हणवतात. (नेल्सन मंडेला तर ३२ वर्ष तुरुंगात राहिले; पण एकदाही त्यांनी कधी तुरुंगातून सुटका व्हावी म्हणून माफीचा किंव्हा दयेचा अर्ज केला नाही.) भारत सरकारने गोपाळ गोडसेची सजा पूर्ण झाल्याशिवाय त्याला मुक्त केले नाही. म्हणून गोपाळ गोडसे म्हणतात की, सरकारने त्यांच्यावर अन्याय केला. त्यानंतर लगेच म्हणतात की, सरदार पटेल असते तर आमच्यावर हा अन्याय झाला नसता. एका निःशस्त्र माणसाची प्रार्थनेच्या वेळी हत्या करणारे, बेधडक खोटे बोलणारे, निर्दोष व्यक्तीला (सरदार पटेल) स्वतःबरोबर चिखलात माखवण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांना काय कधीही प्रामाणिक, शूरवीर आणि देशभक्त म्हणता येईल..?

ही आहे गांधीहत्येची वस्तुस्थिती....! मित्र हो, सदर लेख मुद्दाम राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या ७५ व्या स्मृतिदिनी (हुतात्मा दिन) येणाऱ्या नवीन पिढीस वास्तव सत्य कळावे ह्याच हेतूने लिहिण्याचे धाडस केलं आहे. उमेद आहे, आपणही माझा हा लेख अभ्यासपूर्ण वाचून किंवा लेखात दिलेल्या पुस्तकांचे व लेखकांची नावे व त्यातील संदर्भाची पडताळणी करूनच आपण आपले मत द्यावे. उगाच काहीही टीपणी करू नये. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या ७५ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांना आदरांजली प्रित्यर्थ सदर लेख माझे आदरणीय गुरुवर्य मा. बॅरिस्टर शरद पालव सरांस सप्रेम भेट. जय हिंद !

*(लेखक समाज अभ्यासक आणि मुंबईस्थित सिनेनाट्य कलाकार आहेत.)*

■ ■

# समाज, राज्यसंस्था आणि जोडीदार निवडण्याचं स्वातंत्र्य !

● हिनाकौसर खान

*Liberty, taking the word in its concrete sense consists in the ability to choose.*

**- सायमन वेल,** फ्रेंच तत्त्ववेत्ता

'स्वातंत्र्य' या शब्दातच 'निवड करण्याची मोकळीकता' हा मुद्दा अध्याहृत आहे, किती महत्त्वाची बाब अधोरेखित केली आहे. आपल्याला हवं ते निवडण्याची, आपल्याला हवं ते टिपण्याची मुभा नसेल तर त्या स्वातंत्र्याला कसला अर्थ ? म्हणजे तुम्ही स्वतंत्र देशाचे नागरिक आहात; पण तुमचं खानपान, पेहराव सगळं अन्य कुणीतरी ठरवणार, हे 'स्वातंत्र्य' कसं ठरेल ना ?

भारतात, साधारणपणे १८ वर्षे पूर्ण झाल्यावर मतदानाचा अधिकार मिळतो म्हणजे अगदी आपले प्रातिनिधी - आपला कारभारी निवडण्याचा अधिकार मिळतो. आयुष्याचा कारभारी किंवा कारभारीण निवडायची असेल तर.... प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार किंबहुना आपल्याकडे ती समज आली असणार असा आपण अर्थ घेतो. वाहन चालवण्याचा परवाना मिळतो; पण आपण अगदी तिशीचे झालो तरी जोडीदार निवडण्याची वेळ आली की तरुण-तरुणींना काय कळणार आहे, असाच तोऱ्यात आपली भारतीय कुटुंबं असतात.

कुटुंबातल्या एखाद्या व्यक्तीचा जोडीदार निवडायचा असतो; पण कुटुंब, नातेवाईक सगळ्यांना त्यांची मते, अपेक्षा असं थोपवायचं असतं. अशा वेळी माणूस कमी आणि सर्वगुणसंपन्न मशीन हवीये, असा फील अल्यावाचून राहत नाही. सर्वगुणसंपन्न म्हणल्यावर कोण दिसलं स्त्री ना ! हे असे आहे, बिचारे पुरुष सर्वगुणसंपन्न असतील यावर बहुदा आपला विश्वासच नाही, नाही का ? जोक्स अपार्ट ! पण स्त्री-जोडीदार निवडीबाबत असं पाहिलं जातंच ना. आपण समतेचे वाटेकरी त्यामुळं आपल्यासाठी मुळी हे कुणी एकाने भारी असावं हेच नकोय, हेही खरं. चुकतमाकत चालणारा माणूस सोबती म्हणून असावा, अन्यथा मशीन्स तर सगळ्याच प्रकारच्या आनंद पूर्ततसाठी बाजारात उपलब्ध आहेत. असो.

भारतात अजूनही बहुसंख्य प्रमाणात जोडीदार आणि लग्न ही एकमेकांना

चिकटून येणारी गोष्ट आहे. त्यामुळं जोडीदार निवड आणि लग्न करण्याचा हक्क या मुद्यांना एकत्रित पाहण्याशिवाय गत्यंतर नाही. भारतीय परिप्रेक्ष्यात विचार केला तर आपल्याकडे लग्नाला अनन्यसाधारण महत्त्व. आपल्याकडे बहुतांश वेळा मुलगी वयात येत नाही... तर ती थेट लग्नासाठीच तयार होते आणि मग तिच्यासाठी शिक्षण-नोकरी-स्वप्नं याला काहीही अर्थ न उरता तिचं लग्न 'उरकणे' एवढाच सोपस्कार महत्त्वाचा ठरतो. मुलांच्याही बाबत असंच काहीसं. बऱ्याचदा तर कामधंदा-नोकरी-शिक्षण-स्वप्नं असं मुलाकडे काहीही नसलं तरी तो एका गोष्टीसाठी कायम पात्र असतो, ते म्हणजे लग्न ! उलट कंगालावस्थेत किंवा व्यसनाधीनतेत लग्न झाल्यास लग्नकर्त्याला आपोआप 'अक्कल' येते, अशी पिढ्यान्‌पिढ्या समजूत आहे... आणि या सगळ्या प्रक्रियेत 'प्रेम' या भावनेला नावापुरतासुद्धा थारा देण्याची कुणाला जरुरी वाटत नाही. किंबहुना लग्न ठरवताना प्रेमाचा विचार केला जातो असं फारच कमी वेळा दिसतं. आयुष्यभराच्या सहजीवनाची जिथं सुरुवात होणार आहे, तिथं प्रेम-जिव्हाळा-ओढ-आकर्षण यातलं काहीही असलं काय अन् नसलं काय काहीही फरक पडणार नाही, अशी आपली समाजरचना ! प्रेमच जेव्हा दुय्यम ठरतं तेव्हा जोडीदार निवडण्याची मुभा किंवा मोकळीकतेचा अधिक संकोच होतो. त्यातून 'जोडीदाराची निवड' हा वैयक्तिक नसून एकदम कौटुंबिक आणि सार्वजनिक प्रश्न होऊन जातो. लग्न, ज्यामुळं दोन व्यक्ती एकमेकांच्या आयुष्याचे भाग होणार आहेत... एक-दोन दिवस किंवा वर्ष नव्हे तर संपूर्ण आयुष्य शेअर करणार आहेत... त्याबाबतचा निर्णय विवेकी असावा. जोडीदाराची निवड समजून-उमजून व्हावी, इतक्या मूलभूत अपेक्षाही समाज म्हणून आपण विचारात घेत नाही.

### घटनात्मक हक्क

जोडीदार निवडण्याचं स्वातंत्र्य आपल्याला घटनेच्या अनुच्छेद २१ मध्ये मिळते. जीवित आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचा हक्क यात अंतर्भूत. यानुसार आंतरजातीय असो वा आंतरधर्मिय विवाह करता येतो. या अनुषंगाने शक्तिवाहिनी विरुद्ध केंद्र सरकार या केसमध्ये २०१८ मध्ये सुप्रीम कोर्टानं नमूद केलंय, प्रत्येकाला जोडीदार निवडण्याचा अधिकार आहे आणि आपल्या निवडलेल्या व्यक्तीसोबत लग्न करण्याचा अधिकार तर २१ मध्येच समविष्ट आहे. जर दोन सज्ञान व्यक्तींनी एकमेकांची निवड केली असेल तर कुठलाही समाज, समूह, वर्ग आणि इतकंच काय कुटुंबाच्या परवानगीची गरज नाही. २०२० मध्ये सलामत अन्सारी विरुद्ध

युपी सरकार यातही पुन्हा हेच म्हटले आहे.  जोडीदाराची निवड करण्याचा किंवा निवडलेल्या व्यक्तीसोबत राहण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला आहे आणि तो आपल्या मूलभूत हक्काचा अंतर्भूतच भाग आहे. त्याचप्रमाणे लता सिंग विरुद्ध युपी सरकार या केसमध्येही न्यायालयाने  स्त्रियांना तिचा जोडीदार निवडण्याचा हक्क आहे आणि ती जातीबाहेरच्या व्यक्तीची निवड करूच शकते, असं म्हटलं आहे.

देशभर हादिया केस गाजली. हादिया उर्फ अखिला अशोकनने मुस्लीम धर्म स्वीकारत शफी जहाँ नावाच्या इसमासोबत लग्न केलं होतं. यानंतर तिचे वडील अशोकन के. एम. यांनी तिच्या या लग्नाविरोधात न्यायालयात दाद मागितली होती. केरळ हायकोर्टाने या प्रकरणाला 'लव्ह जिहाद' मानत हे लग्न अवैध ठरवलं होतं. हादियाचे पती शफी यांनी हायकोर्टाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. सर्वोच्च  न्यायालयानं स्पष्ट केलं की, या प्रकरणात 'लव जिहाद' झालेला नाही. निवडलेल्या जोडीदारासोबत लग्नाचा प्रत्येकाला हक्क आहे. थोडक्यात काय, भारताच्या राज्यघटनेनं व्यक्तिस्वातंत्र्याची पूर्ण जपणूक केली आणि त्याला विविध केसेसमधून बळकटीदेखील मिळाली.

## 'लव जिहाद'चे कथानक

आवडीच्या व्यक्तीची निवड हा आपला मूलभूत हक्क आहे. मात्र त्यावर सध्या मोठ्या प्रमाणात हल्ला होत आहे. लव जिहाद narrative हे त्याच हल्ल्याचे मोठे हत्यार. मुस्लीम पुरुष, हिंदू स्त्री यांच्या प्रेमविवाहालाच 'लव जिहाद' म्हणण्याचा हिंदुत्ववादी कावा आहे. मुस्लीम पुरुष फूस लावून हिंदू स्त्रियांना पळवतात, प्रेमाच्या जाळ्यात अडकवतात आणि त्यांचे धर्मांतर करतात, असा सतत प्रोपागंडा केला जातो. हेच उलट असेल म्हणजे मुस्लीम स्त्री आणि हिंदू पुरुष तर त्या विवाहांना 'लव जिहाद' म्हणत नाहीत, इथं मात्र मुस्लीम स्त्रीला तिच्या शोषित समाजातून मुक्त केले, असा भाव राखला जातो. इथं आणखी दोन मुद्दे येतात. एक म्हणजे हिंदू स्त्रिया/मुली यांना फूस लावले जाते, याचा अर्थ त्या निर्बुद्ध आहेत असं म्हणायचं आहे का ? त्यांना कुणीही फूस लावावी इतक्या त्या असाहाय्य आणि भोळ्या आहेत किबहुना अक्कलशून्य आहेत असा पितृसत्ताक विचार यात दडलेला आहे. तो इतपतच थांबत नाही, अशा तऱ्हेने हा विचार पुढं रेटण्याचं आणखी एक कारण म्हणजे स्त्रियांच्या निर्णयक्षमतेवर बांध घालणे. हिंदू धर्मातील स्त्री तिचा जोडीदार कसा काय निवडू शकते आणि पुन्हा तो मुस्लीम ?

स्वतंत्र विचार करू शकणाऱ्या, स्त्रियांचा आत्मविश्वास मोडून काढण्यासाठी, एकप्रकारे स्वतंत्रपणाच्या मुसक्या आवळण्यासाठी हे कथानक मजबूत रेटणे हिंदुत्ववादी विचाराला महत्त्वाचं वाटत होतं.

लव जिहादचे मिथक आपल्याला अलीकडचे वाटत असेल, मात्र हा अलीकडचा विचार नसून त्याची मुळे ब्रिटिशकाळात जातात. स्त्रीवादी इतिहासकार चारू गुप्ता १९२०-३०च्या काळात असल्याचं नोंदवतात. त्या काळात उत्तरप्रदेशमध्ये हिंदू आणि मुस्लीम यांच्यातील विभाजन तीव्र करण्यासाठी हिंदू स्त्रियांच्या अपहरणाचे अभियान छेडले होते. स्त्रियांच्या लैंगिकतेला महत्त्वाचं हत्यार म्हणून वापरण्यात आलं. लव जिहादच्या मिथकामध्ये इतर दडलेल्या मुद्यांविषयी देखील चारू गुप्ता मांडणी करतात. त्यांच्या मते, हे मिथक केवळ उत्तरप्रदेशाच्या मतबँकेपोटी केलेला मुद्दा नसून त्यात मुस्लीम पुरुषाची कामुक, लंपट पुरुष म्हणून प्रतिमा उभं करणं, त्यातून तो व्यभिचारी, कामांध, कट्टर आणि हिंसक दाखवणं हा हेतू होताच, त्यासोबत हिंदू स्त्रियांवर पूर्ण नियंत्रण मिळवून हिंदू पितृसत्तेची पुनर्रचना करणं हेही मुद्दे अंतर्भूत होते. थोडक्यात स्त्रीचे शरीर हिंदू प्रचारकांसाठी मध्यवर्ती प्रतीक बनल्याचे गुप्ता सांगतात.

लव जिहादचे narrative प्रसारित करण्यासाठी साहित्य निर्मितीही केली जात होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मार्फत प्रकाशित केल्या जाणाऱ्या 'पांचजन्य' आणि 'ऑर्गनायझर'चा ७ सप्टेंबर, १९१४चा अंक हा लव्ह जिहाद केंद्रीत आहे. 'पांचजन्य'चं मुखपृष्ठही भडक आहे. त्यात अरबी पोशाख घातलेला पुरुष आहे. त्याची दाढी हृदयाच्या आकाराची आहे आणि कुटील काळ्याचष्म्यातून प्रश्न केला आहे - 'प्रेम अंधा या धंदा ?'

पुढं हेच कथानक वापरून मुस्लीम लोकसंख्या वाढवली जात आहे, अशा चर्चा सुरू झाल्या. मात्र हे कथानक वापरून केवळ हिंदू-मुस्लीम फूट आणि जोडीदार निवडण्यावर गदा इतकाच मुद्दा नाही तर दलित समूहालादेखील हिंदू या मोठ्या संकल्पनेत सामावून घेण्याचा आणि आपल्या पंखाखाली घेऊन हिंदुत्व लादण्याचा छुपा भाग आहे. दंगली करून, मशिदीवर हमले करून सर्व दलितांना आकर्षित नाही करता येणार; पण स्त्रियांच्या रक्षणासाठी म्हणून एकत्र आणता येणं शक्य आहे, हे बरोबर हिंदुत्ववादी संघटनानी ओळखले.

लव जिहादचा हा मुद्दा चर्चेत आला तो २००९ मध्ये. सप्टेंबर २००९ मध्ये केरळ कॅथलिक बिशप कौन्सिलने ४,५०० मुलींचे धर्मपरिवर्तन करून त्यांना

गायब करण्यात आले असल्याचा मुद्दा उपस्थित केला. चर्चचे म्हणणे ख्रिश्चन मुलींबद्दल होते; पण ऑक्टोबर २००९ मध्ये हिंदुत्ववादी गटाने या प्रकरणाला 'लव्ह जिहाद'चे नाव दिले. ख्रिश्चनऐवजी हिंदू मुली धर्मांतरित किंवा गायब करण्यात आल्याची अफवा उठवण्यात आली. त्यानंतर कर्नाटकातून ३० हजार मुली गायब असल्याचा आकडा जाहीर केला गेला.

धर्मांतराचा मुद्दा सतत पुढे येऊ लागला. केरळ विधानसभेत तत्कालीन मुख्यमंत्री ओमेन चंडी यांनी २५ जून, २०१४ रोजी लेखी निवेदन केले की, २००६ पासून इस्लाम धर्म स्वीकारणाऱ्यांमध्ये २,६६७ तरुणींचा समावेश आहे. मात्र राज्यात सक्तीने धर्मांतर केल्याचा कोणताही पुरावा नाही आणि लव्ह जिहादची भीती निराधार आहे. आम्ही जबरदस्तीने धर्मांतराला परवानगी देणार नाही. तसेच आम्ही लव्ह जिहादच्या नावाखाली मुस्लिमांविरुद्ध द्वेषाची मोहीम पसरवू देणार नाही. २०१४ मध्ये तत्कालीन गृहमंत्री राजनाथ सिंह यांना 'लव्ह जिहाद' प्रकरणांबद्दल विचारण्यात आले, तेव्हा ते म्हणाले होते, 'लव्ह जिहाद म्हणजे काय ? त्याची व्याख्या समजून घेणे आवश्यक आहे.' फेब्रुवारी २०२० मध्ये भाजप नेते आणि गृह राज्यमंत्री जी. किशन रेड्डी यांनी लोकसभेत सांगितले की, 'लव्ह जिहाद हा शब्द सध्याच्या कायद्यानुसार परिभाषित केलेला नाही. 'लव्ह जिहाद'चे एकही प्रकरण केंद्रिय एजन्सीने नोंदवलेले नाही. Article 25 of the Constitution provides for the freedom to profess, practice and propagate religion subject to puclic order, morality and health. हेही म्हटले आहे.

थोडक्यात कुठलाही आधार नसलेल्या मुद्याला देशाचा प्रश्न करणं यामागचं राजकारण स्पष्ट आहे. असं असतानाही राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष रेखा शर्मा यांनी ऑक्टोबर २०२० मध्ये त्यांनी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांची भेट घेतली आणि ट्वीट केले की, इतर मुद्यांसह महाराष्ट्रात 'लव्ह जिहाद प्रकरणांमध्ये वाढ' या विषयावर चर्चा केली. परंतु याविषयी जेव्हा आयोगाकडे माहिती अधिकार दाखल केला आणि आकडेवारी विचारण्यात आली, तेव्हा आपल्याकडे अशी एकही तक्रार नोंदवली नसल्याचे म्हटले. म्हणजे थोडक्यात राज्यसंस्थादेखील लव जिहादचे मिथक पेटते ठेवते, त्यातून फुटीरतेचा विषाणू पसरवणे आणि कलहाचे वातावरण निर्माण करणे पेटते ठेवणे एवढा स्वच्छ उद्देश दिसून येतो.

मुस्लीम लोकसंख्या, धर्मांतर आणि म्हणून लव जिहादला विरोध असा हा एकात एक गुंतवून ठेवलेला प्रश्न आहे आणि तो जणू जीवनमरणाचा प्रश्न आहे अशा तऱ्हेनं त्यावर आवाज केला जात आहे. या सर्वात खरी आकडेवारी कुणी विचारतच नाही. धर्मांतराचा मुद्दा असा आहे की आपल्या देशात केवळ २ टक्के धर्मांतरे होतात.

## धर्मांतर, लग्न आणि कायदा

धर्मांतराविरोधी आपल्या देशात पहिला कायदा ओरिसामध्ये १९६७ मध्ये झाला. त्यानंतर मध्यप्रदेश, अरुणाचल प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, राजस्थान, हिमाचल प्रदेश मध्ये झाले. जबरदस्तीने होणारे धर्मांतर रोखण्यासाठी हे कायदे होते. मात्र २०१४ नंतर भाजप शासित प्रदेशांत (झारखंड, उत्तराखंड, उत्तरप्रदेश, हरियाना) जे कायदे आले त्यात त्यांनी लग्नासाठी होणाऱ्या धर्मांतराचा विरोध केला आहे. आपल्या देशात हिंदू, मुस्लीम, शीख, ख्रिश्चन यांचे विवाहाबाबत वैयक्तिक कायदे आहेत. कुठल्याही कायद्यात आंतरधर्मीय विवाहाची मुभा नाही. केवळ विशेष विवाह कायद्यानुसारच आंतरधर्मीय विवाह होऊ शकतात. मात्र त्यासाठी विवाहपूर्व नोंदणी करावी लागते. त्यासाठी एक महिन्याची नोटीस देऊन हरकती मागवल्या जातात. प्रेमविवाहात मुळात अडचणी अधिक, त्यात एक महिन्याची नोटीस देणं रिस्की काम ! अशावेळी पारंपरिक विवाह करणं भाग होतं त्यासाठी दाम्पत्यातील एक जण दुसऱ्या जोडीदाराचा धर्म तात्पुरता स्वीकारतो. त्यात कथित धर्मांतर नसून ती केवळ सोय असते; पण यावरही अटकाव आणण्याचा प्रयत्न कायद्याने केला जात आहे.

खरंतर घटनेनं जो व्यक्तीला निवडीनुसार लग्न करण्याचा मूलभूत हक्क दिला आहे, तोच भंग करण्याचा प्रकार नव्यानं लागू धर्मांतरविरोधी कायदा करत आहे.

महाराष्ट्रात तर कथित लव्ह जिहादविरोधी कायदा करण्याची पूर्वतयारी म्हणून १३ डिसेंबर, २०२२ रोजी आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह समन्वय समिती गठित करण्याचा आदेश पारित करण्यात आला आहे. या आदेशानुसार आंतरधर्मीय, आंतरजातीय विवाह केलेल्यांची माहिती गोळा करणे, या जोडप्यांचे आई-वडील लग्नाबाबत इच्छुक नसतील तर त्यांचे समुपदेशन करणे, राज्यातील आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहामधील समस्या व उपाययोजना याबाबत शिफारस करणे आदी कामे समितीला देण्यात आलेली आहेत. समितीकडे नोंदणी केल्यावर

दोन महिन्यांची तपासणी होणार. मग त्याला जिल्हाधिकारी परवानगी देणार. म्हणजे प्रेम किंवा जोडीदार आपण निवडून झाल्यावर त्याच्याशी लग्न करण्याबाबतची परवानगी अन्य कोणी तरी देणार हे किती हास्यास्पद आहे.

अशा सर्व स्थितीत जोडीदार निवडण्याचा हक्क कसा अबाधित राहील ? राज्यसंस्थेकडून हिंदुत्ववादी गटाकडून विरोध होत आहे, वैयक्तिक निवडीचा आदर न होता त्याला राजकीय वळण दिलं जातंय वगैरे सगळं बोललं जात आहे; पण खरं सांगा, आपल्याला कुटुंब स्तरावर तरी किती मान्य आहे ? आपलं कूळ, मूळ सोडून, जातपात सोडून वेगळ्या जातीतली मुलगी / मुलगा हे किती कुटुंबांना हवे असते ?

वेगळ्या जात अन् धर्माचे मुद्दे तर वेगळेच राहिले. लहानपणापासून हेच सांगितलं जातं ना जातीतलीच पाहिजे. लव जिहादचे narrative घेऊन शासन दुहीकरण करत आहे किंवा व्यक्तीच्या जोडीदार निवडण्यावरच नियंत्रण करण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र त्याआधी कुटुंब स्तरावर किंवा समाजस्तरावर आंतरजातीय वा आंतरधर्मिय विवाहासाठीची मानसिकता किती आहे ? मोकळेपणा आहे का ? जातीतला जोडीदार शोधण्याचा आणि निवडण्याची तरी आहे का मोकळीक ? समाज म्हणून आपण अजून खूप पाळण्यात आहोत. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह हे अजूनही पचनी पडत नाहीतच. ऑनर किलिंग सारखे प्रकार हे त्याचाच परिणाम आहे ना. म्हणजे आपल्याला एकाच वेळी दोन स्तरावर जोडीदार निवडण्याच्या हक्काचं संरक्षण करावं लागेल, एक कुटुंब स्तरावर आणि दुसरं आपल्या कट्टर सामाजिक स्तरावर. त्यासाठी वेगळं प्रशिक्षणच घ्यावं लागेल. नोकरीधंद्यासाठी लागणारी सगळी कौशल्ये आणि प्रशिक्षणं आपण घेतो. पण जोडीदार कसा निवडावा, कुटुंब कसं घडवावं, सहजीवनासाठी लागणाऱ्या कौशल्यांबाबत कुठलंही शिक्षण दिलं जात नाही. सहजीवनातील समज-समंजसपणा रुजेल, वाढेल, समतेचं मूल्य त्यात अंतर्भूत राहील आणि जगणं दिलखुलास आनंददायी होईल यासाठी शिकवणी घेण्याची, मार्गदर्शन देण्याची आपल्याकडे रीत नाही आणि तशी सोयही. ती देखील उभी करण्याची जरूर आहे हे नक्की.

*(लेखिका पुणेस्थित पत्रकार, सामाजिक कार्यकर्त्या आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या सदस्य आहेत.)*

■ ■

विचारमंथन

# स्त्री-शिक्षण : सामाजिक दृष्टिकोन

• प्रा. समिना पठाण-जाधव

नुकतीच ३ जानेवारी आणि ९ जानेवारी रोजी अनुक्रमे सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांची जयंती साजरी झाली. त्या निमित्ताने त्यांनी स्त्री-शिक्षणासाठी केलेले कार्य आणि संघर्ष यांची प्रकर्षाने जाणीव होते. त्यांच्या प्रयत्नाने स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे खुली झाली आहेत. आज समाजातील सर्व मुली, महिला शिक्षण घेत आहेत, नोकरी करत आहेत आणि स्वावलंबी बनत आहेत; परंतु स्त्री-शिक्षण विषयक सामाजिक दृष्टिकोन काय आहे, याचे निरीक्षण करणे गरजेचे आहे. समाजाचा स्त्री-शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन संकुचित आहे की व्यापक आहे ? याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. पूर्वी मुलींना घरकाम, शेतीकाम किंवा लहान भावंडांचा सांभाळ करण्यासाठी तत्सम पितृसत्ताक विचारसरणीमुळे शिक्षणापासून वंचित ठेवले जात असे; परंतु आज अशी परिस्थिती नाही. खेड्यापाड्यातही मुलींना शिक्षणाची संधी मिळते आहे. उच्च स्तरावरील शिक्षणापर्यंत मुलींच्या गळतीचे प्रमाण वाढत जाते, हा भाग वेगळा. सर्व मुली शिक्षणाच्या प्रवाहात सामील होत आहेत, असे आशादायी चित्र जरी आपल्याला दिसत असले तरी समाजावरील पितृसत्ताक दृष्टिकोनाचा प्रभाव कमी झालेला आहे का ? हे तपासून बघायला हवे. मुलींना समानतेचा दर्जा देणारे, उच्चशिक्षणासाठी परदेशात पाठवणारे काही पालक, हे अपवाद वगळता सर्वसामान्यपणे समाज, मुलींच्या शिक्षण विषयक कोणता दृष्टिकोन बाळगून आहे, याकडे कानाडोळा करता येणार नाही.

१) पूर्वी मुलींना नाममात्र ५वी / ७ वी पर्यंत शिकवून, मासिक पाळी येत असेल - नसेल तरीदेखील त्यांचे १४ व्या / १५ व्या वर्षी लग्न लावून देत असत. आजच्या आधुनिक काळात मुली पदवी-पदव्युत्तर असे उच्चशिक्षण घेत आहेत; परंतु कुटुंब, नातेवाईक यांना मुलींच्या शिक्षणाचा, प्रगतीचा आनंद तर वाटतोच सोबतच लग्नविषयक चिंतादेखील वाटते. कारण, समाजातील अनेकांचा मुलींच्या शिक्षणाकडे बघण्याचा प्राथमिक दृष्टिकोन हा ‘लग्नासाठीचा निकष’ असाच असतो. शिक्षित असल्याने मुलीला चांगले स्थळ मिळेल, अशी कुटुंबियांना आशा असते; पण मुलगी जर खूप जास्त शिकलेली असेल तर तिच्या अपेक्षा

जास्त वाढतील आणि तिला तिच्याइतका शिकलेला जोडीदार मिळाला नाही, तर लग्नाचे वय वाढत जाईल अशी चिंतादेखील कुटुंबियांना असते. काही मुलींना शिक्षणासाठी घराजवळ असलेल्या शाळेत/महाविद्यालयात जाण्याची मुभा असते. परंतु दूर अंतरावरील महाविद्यालयात प्रवेश घेऊन, वसतिगृहात राहून शिक्षण घेण्यास आजही अनेक मुलींचे पालक विरोध दर्शवितात. अर्थात, त्यामागे मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न असतो. काही पालकांचे मत असे असते की, तरुण मुलींना मुलांपासून धोका निर्माण होऊ शकतो; परंतु या कारणास्तव मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवणे योग्य आहे का ? त्यापेक्षा मुलांवर नैतिकतेचे, सभ्यतेचे संस्कार करण्यावर सर्व स्तरांवर प्रयत्न होणे गरजेचे आहे. 'आग सोमेश्वरी आणि बंब रामेश्वरी' या उक्तीप्रमाणे काही मुलांच्या चुकीच्या वर्तनामुळे हजारो मुलींचे भविष्य अंधारात ढकलले जात आहे. मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत काही पालकांची पुरुषसत्ताक मानसिकतेवर आधारित विचारसरणी दिसून येते. त्यांच्या मते, मुलीला सरते शेवटी चूल-मूल हेच करायचे आहे, तर तिच्या शिक्षणासाठी जास्त खर्च न करता तिचे लग्न अगदी थाटामाटात, खूप पैसे खर्च करून लावून दिल्याने आपली सामाजिक प्रतिष्ठा उंचावेल. त्यामुळे असे पालक मुलींना नाममात्र शिक्षण देतात आणि उच्चशिक्षणाच्या बाबतीत मात्र उदासीन असतात. काही मुलींना जरी कुटुंबाकडून शिक्षण घेण्यासाठी परवानगी मिळाली, तरीदेखील त्यांनी पारंपरिक चौकटीत राहून, रूढी-परंपरेनुसार बंधनांच्या व नियमांच्या अधीन राहून, शिक्षण घ्यावे अशी पालकांची अपेक्षा असते. मुला-मुलींच्या शिक्षणाशी संबंधित आणखी एक गोष्ट म्हणजे लग्न ठरवत असताना समान क्षेत्रातील जोडीदार शोधण्याकडेही कुटुंबियांचा कल असतो. क्षेत्र जुळण्यापेक्षा मन आणि विचार जुळणे अधिक महत्त्वाचे नाही का ? तरुण पिढीने जोडीदाराची निवड विवेकी पद्धतीने व्हावी, या दृष्टिकोनातून विचार करणे गरजेचे आहे. एकंदरित मुलीला चांगले 'मॅरेज मटेरिअल' म्हणून विकसित करण्यासाठीचा निकष या दृष्टिकोनातून शिक्षणाकडे बघणे सर्वस्वी चुकीचे आहे.

२) या व्यतिरिक्त स्त्री-शिक्षणाकडे बघण्याचा दुसरा दृष्टिकोन 'अर्थार्जन' हादेखील असतो. लिंगभावाधारित विषमतेनुसार पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्री आणि पुरुष यांच्यासाठी समाजात अनेक अलिखित नियम तयार करून ठेवले आहेत. त्यानुसार, स्त्रीला नोकरी करण्याची सक्ती नसते; परंतु पुरुषांनी नोकरी करणे बंधनकारक असते. पत्नीने आर्थिक बाजू सांभाळावी आणि पतीने कौटुंबिक

जबाबदारी/मुलांचे संगोपन करावे हा विचार पितृसत्तेच्या पचनी पडणारा नाही. काही ठिकाणी कुटुंबाला बिकट परिस्थितीत आर्थिक आधार देता यावा यासाठी घरातील स्त्रीला एका मर्यादित चौकटीच्या अधीन राहून नोकरी करण्याची परवानगी दिली जाते. तसेच भविष्यात लग्नानंतर जर पतीचा अपघात/निधन झाले तर मुलांचे शिक्षण आणि संगोपन करता यावे या दृष्टिकोनातूनही अनेक कुटुंबीय मुलींच्या शिक्षणाला पाठिंबा देताना दिसतात. शिक्षण घेऊन मुलींनी कायमस्वरूपी स्वावलंबी बनावे, असा विचार काही अपवाद वगळता फार कमी पालक करताना दिसतात.

३) जोपर्यंत स्त्रीकडे एक व्यक्ती म्हणून न पाहता फक्त पत्नी/आई या दृष्टिकोनातून बघितले जाईल तोपर्यंत तिला 'मॅरेज मटेरिअल' म्हणूनच विकसित केले जाईल. शिक्षणाचा, स्त्रीच्या बाबतीत फक्त लग्नासाठी किंवा अर्थार्जनासाठी उपयोग इतका संकुचित अर्थ काढणे कितपत योग्य आहे ? स्त्रियांनी आपल्याला मिळालेल्या शिक्षणाचा व्यापक स्वरूपाने अर्थ समजून घेणे गरजेचे आहे. शिक्षण घेणे, सुशिक्षित होणे म्हणजे फक्त अक्षरांची ओळख करून घेणे असे नसून शिक्षणामुळे वर्तन बदल होणे, वैचारिक परिवर्तन होणे अभिप्रेत आहे. किंबहुना हीच शिक्षणाची प्रमुख उद्दिष्टे असायला हवीत. दैनंदिन जीवनात महिलांनी काय योग्य आहे आणि काय अयोग्य आहे यातील फरक जाणून घेऊन बुद्धीला न पटणाऱ्या, पूर्वग्रह दूषित, चुकीच्या रूढी-प्रथा झुगारून, आत्मविश्वासाने, निर्णय क्षमतेचा वापर करून स्वतःच्या प्रगतीसाठी-विकासासाठी शिक्षणाचा वापर करावा. तरच आजच्या स्त्रीला अधिकाधिक आत्मनिर्भर होऊन सन्मानाने जगणे सुकर होईल. शिक्षणासोबतच संविधानात दिलेले मूल्य, हक्क, कर्तव्य, जबाबदारी या सर्व गोष्टी समजून घेणे गरजेचे आहे. शिक्षण घेणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्या शिक्षणाचा स्वतःच्या दैनंदिन जीवनात अवलंब करणे गरजेचे आहे. विवेकपूर्ण शिक्षणामुळेच श्रद्धा साणि अंधश्रद्धा यातील पुसटशी रेषा व्यक्ती ओळखू शकते. तसेच स्वतःवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होऊन न्याय मिळवण्यासाठी, संघर्ष करण्यासाठी, व्यक्तीचा वैचारिक विकास होतो.

*(लेखिका मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्या आणि कार्यकारिणी सदस्य आहेत.)*

■ ■

# व्यक्तिमत्त्व आणि कलेचे महत्त्व

● अफरोज इनामदार

म्हणा पताका, अर्धपताका, त्रिपताका... असे सरांचे शब्द माझ्या कानांत घुमत राहिले. कथकच्या धड्यातला शेवटचा भाग हा हस्तमुद्रांचा अभ्यास असतो.

मागच्या ऑगस्टमध्ये मला क्रोनिक डिप्रेशन आहे, असे कळाल्यावर त्यावर मानसोपचार तज्ज्ञांचे उपचार सुरू झाले. औषध, समुपदेशनासोबत मला एखादी आवडणारी गोष्ट मी छंदाच्या स्वरूपात बाळगावी, असा सल्ला डॉक्टरांनी दिला. 'मी पुस्तक वाचते' असं सांगितल्यावर काहीतरी शारीरिक हालचालींशी निगडित गोष्टी करा असे सांगण्यात आले. त्यावर आपण आता काय करू शकू यावर विचार सुरू केला.

वडिलांनी रागवल्यापासून आमच्या घरात कधीही संगीत वाजलं नाही. बहुधा त्यांना आम्ही अभ्यासावरच लक्ष केंद्रित करावे आणि सिनेमा, नट्या किंबहुना लावणी, मुजरा इ. करणाऱ्या बायकांसारखे बनू नये असे त्यांना वाटत असावे. पंचवीस वर्षांपूर्वी शिक्षणाला फार महत्त्व होते. रीतसर शिक्षण घेतलं तर नोकरी मिळते, असा समज होता. (पण आताच्या काळात योग्य शिक्षण, योग्य दिशा, माणसाचे उपजत गुण, जगाच्या आपल्याकडून अपेक्षा अशा बऱ्याच तत्त्वांवर नोकरीचे निकष आधारित आहेत.)

मुस्लीम घरांमध्ये तसं पाहिलं तर संगीताला फार कमी दर्जाचं समजलं जातं. संगीत म्हणजे कलेचा आविष्कार न समजता किंबहुना न समजून घेता, त्याला फक्त लैंगिकता, दुसऱ्याकरवी करून घेतलेलं मनोरंजन, पैसे उकळण्यासाठी केले जाणारे नाट्य, दुसऱ्या धर्माची-देवाची भक्ती, दुसऱ्या धर्माचे समर्थन, व्यसन, अनैतिकता इ. प्रश्नांशी फार तथ्य नसले तरी जोडले जाते. लहानपणापासून अशा गोष्टींचे संस्कार झाल्यामुळे मुस्लीम मुले संगीताशी जोडली जात नाहीत. त्यामुळे त्यांच्या मेंदूतील असा भाग जो संगीतासाठी विकसनशील आहे, त्यापासून ते वंचित राहतात.

यामध्ये एक विरोधाभासदेखील पाहायला मिळतो. हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या काळात मुस्लीम कलाकारांनी बरेच मोठे योगदान दिले.

ते पुढील बरीच वर्षे चालू राहिले. मधुबाला, नर्गिस दत्त, मीनाकुमारी आणि यांच्याही आधीपासून कलाक्षेत्रात मुस्लीम कलाकारांचे बरेच योगदान होते. या कलाक्षेत्रात गायन, नृत्य, अभिनय अशा बऱ्याच कलांना वाव मिळत गेला आणि नंतरच्या काळात खान मंडळींनी या कलाक्षेत्राला वेगळ्या उंचीवर नेले.

इतके असूनही त्यानंतरच्या काळात अगदी मोजके मुस्लीम कलाकार आज सिनेसृष्टीत काम करताना दिसतात याचे एक कारण या क्षेत्राचे वास्तविक स्वरूप असू शकते. त्यामुळे मुस्लीम जनतेने कलाक्षेत्रामधून काढता पाय घेतला आणि इतके मोठे करिअरचे दालन सामान्य जनतेसाठी फारसे स्वागतार्ह ठरले नाही.

कला हे एक असे क्षेत्र आहे, जे कोणत्याही ज्ञानार्जनाच्या प्रक्रियेइतके महान आहे आणि प्रत्येक व्यक्तीत कोणतीतरी एक कला दडलेली असते. काही लोक विशेषतः पुरुष तिला दाबून टाकण्याचा प्रयत्न करतात आणि महिला ती अंगभूत नसली तरी शिकण्याचा प्रयत्न करतात. या समस्येचे मूळ आपल्या लहानपणीच्या जडणघडणीत मिळेल.

मेंदूच्या सर्वांगीण विकासासाठी प्राथमिक शिक्षणाच्या उपक्रमामध्ये वाचन, लेखन, विचार करणे, निरीक्षण करणे, व्यक्त होणे या मूलभूत क्रियांसाठी गाणी, नाच, खेळ, स्पर्धा अशा बऱ्याच गोष्टींचा समावेश केला जातो. लहानपणीच मुलांचे उपजत गुण दिसावेत यासाठी हा प्रयत्न असतो; परंतु पुढे जाऊन मुलांना विशिष्ट चौकटीतच शिक्षण घ्यावे लागते. त्यात फक्त वाचन, लेखन आणि पठण एवढ्याच गोष्टी महत्त्वाच्या असतात. त्यामुळे जी मुले खेळात, कलाक्षेत्रात किंवा अन्य कोणत्याही क्षेत्रात प्राविण्य मिळवू शकतात त्यांना बळजबरीने डॉक्टर, इंजिनियर बनवले जाते; पण मेंदूतील तो कलात्मक भाग उपजतच राहतो.

कलाक्षेत्रात असे म्हटले जाते की ज्यावेळी एक जीव तयार होतो त्यावेळी त्याचे सर्वप्रथम हृदय बनवण्याचे काम सुरू होते आणि त्या पेशीत ठोके निर्माण होण्यास सुरुवात होते. हृदयाचे ठोके हे जसे विशिष्टप्रकारे पडतात तसेच संगीतात 'ताला'ला महत्त्व आहे. जन्मतःच प्रत्येक जीवाला संगीताची जाण असते आणि त्यावर लक्ष केंद्रित केले तर त्याचा विकास निश्चित असतो. इथून संगीताचा प्रवास सुरू होतो. आपल्याला काही गाणी आवडतात, काही रडवतात आणि काही नाचवतातदेखील. बेरॉक नावाचे पियानोचे संगीत अशा तालावर आधारित असते की त्यात आपल्या हृदयाची नाडी त्यासोबत ताल धरते आणि रक्तप्रवाह सुरळीत

करते. तसेच वेगवेगळ्या प्रकारचे संगीत ऐकून मेंदूत हार्मोन्स स्त्रवतात. त्याने मानवाच्या भावना आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. थोडक्यात शरीर 'संतुलित' म्हणजे 'हार्मनी'मध्ये राहण्यास कारणीभूत ठरते.

मुस्लीम जनता अल्लाहच्या जवळ जाण्यासाठी नमाजसारख्या आध्यात्मिक क्रियांना वाव देते. त्यात तल्लीन होऊन जाण्याचे आवाहन करते. त्याचप्रकारे संगीताचे ज्ञान हे व्यक्तीला एका नव्या उंचीवर नेऊन ठेवते. त्यात फक्त सुंदर दिसण्याचा, व्यक्त होण्याचा किंवा मनोरंजनाचा भाग नसून आध्यात्मिक आनंद आहे. त्यात कोणतीही अंधभक्ती नाही, कोणता विश्वास नाही वा कोणती शक्ती नाही. हे सारे गणित आहे हार्मनीचे किंवा फ्रिक्वेंसीचे ! ते मिळवण्यास अभ्यास नव्हे तर साधना करावी लागते, नीट ऐकावे लागते, पाहावे लागते, लक्षात ठेवावे लागते आणि कला अंगात भिनेपर्यंत दररोज रियाज करावा लागतो. अशाने साधक मंडळी स्वतः समृद्ध होत असतात. अशा प्रकारचे ज्ञान हे भारतात शास्त्रीय आणि कर्नाटकी संगीतात मिळते. त्यातल्या त्यात मी हा माझा कथक नृत्य शिकतानाचा अनुभव सांगितला. पंडित बिरजू महाराज तर सर्वश्रुत आहेतच. तेच सध्याचे आद्यगुरू म्हणून गणले जात आहेत.

एखादी गोष्ट शिकताना ज्ञानार्जनाने प्रगल्भता आल्यासारखी वाटते; पण कथ्थक किंवा कोणत्याही शास्त्रीय नृत्यप्रकाराकडे पाहिले तर आपण जितके शिकू तितके आपल्याला कमीच वाटते. बहुदा हा अनुभव प्रत्येक विद्यार्थ्याला येत असावा. कारण या क्षेत्राच्या कवाडाची दारे जरी उघडी असली, तरी ज्ञानाची मौतिके मिळवण्यास फार प्रयत्न करावे लागतील; पण आधी म्हणल्याप्रमाणे विद्यार्थ्यांचे जीवन समृद्ध होण्यास मदत होईल.

*(लेखिका अभियंत्या आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या युवा कार्यकर्त्या आहेत.)*

■ ■

*मुस्लीम सत्यशोधक मंडळ वर्धापनदिनानिमित्त देणगी, जाहिरात आणि शुभेच्छा देणाऱ्या पुढील मान्यवरांचे आभार !*

**मा. बेनझीर तांबोळी**

**मा. चंद्रकांत गायकवाड**

विचारमंथन

# जात किंवा जातपात न पाळण्याचे फायदे !

• डॉ. गिरीश जखोटिया

Annihilation of Caste या जातीअंतावरील महान ग्रंथाचे लेखक भारतरत्न डॉ. भीमराव आंबेडकरांना त्यांच्या महापरिनिर्वाणदिनी विनम्र अभिवादन. मित्रांनो, चातुर्वर्ण्यव्यवस्थेची निर्मिती ही अतिप्राचीन नाही. या व्यवस्थेतील प्रत्येक वर्णात नंतर जाती आणि उपजातींची पैदास झाली. म्हणजे 'आमची जात ही अतिप्राचीन' असा कुणी दंभ बाळगण्याची गरज नसावी. बरं, काही विद्वानांचं मत असू शकतं की वर्णांची निर्मिती मानवाने केलेली नाही. या श्रद्धेआड 'वर्णवर्चस्व' प्रस्थापित करण्याचा नेहमीचाच प्रयत्न असू शकतो. आता 'श्रद्धा' ही काही वैज्ञानिक व विवेकी मापदंडांवर तपासता येत नाही. महत्त्वाचा मुद्दा असा की, अमुकतमुक जातीत आपला जन्म होतो, हा आपला पराक्रम नसतोच. बरं, पूर्वजन्मीच्या कर्मानुसार या जन्मीची जात प्राप्त होते, या विधानासाठीचे पुरावे नाहीत. म्हणजे पुन्हा मुद्दा हा श्रद्धेचाच; आणि श्रद्धेची चिकित्सा होऊ शकत नाही. नमनाला घडाभर तेल ओतल्यानंतर आता मुख्य विषयाकडे येऊयात. मी प्रचंड विचार-विश्लेषण करून या निष्कर्षाला पोहोचलोय की जात किंवा जातपात न पाळण्याचे खूप आणि चांगले फायदे आहेत. अर्थात हे फायदे 'फायदे'च वाटतील, जर त्यांचा विचार आपण नि:स्पृहपणे केला तर. यासाठी मनावर लादून घेतलेले पारंपरिक समजांचे ओझे आधी दूर करावे लागेल. जातीभेदांनी आमच्या देशाचे सर्वाधिक नुकसान केले आहे. हे भयंकर नुकसान आजही होते आहे.

जातपात न पाळण्याचा पहिला मोठा फायदा आहे, 'जातीश्रेष्ठता' सिद्ध करण्यासाठीची भंकस सर्कस न करण्याचा. आपली जात कशी सर्वश्रेष्ठ आहे हे सांगण्यासाठी अवैज्ञानिक व अविवेकी बोलावं लागतं. श्रेष्ठता दाखविण्यासाठी मजेशीर प्रतिमा, प्रक्रिया व प्रतिकांचा वापर करावा लागतो. जनमानसात अंधश्रद्धा रुजविण्याचे जटील काम करावे लागते. थापा मारून त्या पचविण्याचं टेंशन आणखी वेगळं. सातत्याने आपल्याच जातीतील महानुभावांची यत्रतत्रसर्वत्र आरती ओवाळावी लागते, जी बहुतेकवेळा ओंगळवाणी दिसते. प्रसंगी इतर जातीतील काही पराक्रम आपण अधिक चांगल्या प्रकारे करू शकलो असतो, असे रेटून

खोटेही बोलावे लागते. काहीजण तर आपल्या जातीचं ब्रँडिंग करताना 'आम्ही कशी प्रत्येक गोष्ट सुरेख लयीत करतो' अशी वदंताही करीत राहतात. स्वतःची जातीश्रेष्ठता बिंबविण्यासाठी काही महाभागांना निबंध आणि प्रबंध लिहावे लागले, जे आजच्या युवापिढीच्या चिकित्सेवर खरे उतरत नाहीत. हां, होतं एवढंच की अशा निबंधकारांबाबतचा अविश्वास वाढत जातो नि अविश्वासाची शिक्षा मात्र साऱ्या जातीला भोगावी लागते. जात न पाळण्याने जातीबद्दलचा वृथा अभिमान गळून पडतो. आपल्या जातीने केलेल्या घोडचुका किंवा अपराध हे मनमोकळेपणाने कबूल करता येऊ शकतात. अन्य जातींच्या आपल्यापेक्षा अधिक चांगल्या कामगिरीकडे मोकळेपणाने पाहता येते. जगातील यच्चयावत कौशल्ये व ज्ञान आमच्याकडेच आहे हा खुळचट समज दूर होतो. आपल्या जातीतील गुणदोषांकडे निस्पृहतेने पाहता आल्यास दोष दूर करण्याचा आणि गुणांना आणखी सुधारण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जाऊ शकतो. वेगळ्या भाषेत आपण या प्रयत्नास 'मूल्यमापन व मापदंडांमधील सुधारणा' (Evaluation & Benchmarking) असे म्हणू शकतो.

जातीला महत्त्व न दिल्याने आपण जातींवर आधारित ज्या काही विशिष्ट व्यवसायांच्या, भूमिकांच्या व मर्दुमकीच्या मक्तेदाऱ्या होत्या त्या नाकारू शकतो. उदाहरणार्थ, नोकरी करणाऱ्या काही जातींमधील युवक आज उत्तम उद्योग करताहेत. दहावी-बारावीच्या मेरीट लिस्ट मधील काही जातींची मक्तेदारी संपली आहे. माझेच उदाहरण घ्या ना, एका व्यापारी समाजात जन्मूनही मी वेगळ्या धाटणीचे बरेवाईट वैचारिक लेख (!) लिहीत असतो. आज व्यापारी समाजातील तरुण मुले मेडिसिन, संशोधन, स्थापत्यशास्त्र, अध्यापन, नागरी प्रशासन इ. क्षेत्रांमध्ये उत्तम कामगिरी बजावताहेत. जातींच्या पारंपरिक मक्तेदाऱ्यांमधून किंवा बंदिस्त कोषांमधून बाहेर पडल्यानेच हे शक्य झाले. थोडक्यात असे की, बुद्धिमत्ता ही फक्त बुद्धिमत्ताच असते. तिचे जातीनिहाय प्रकार नसतात. आपण तिचा कुठे आणि कसा वापर करतो यावर आपली मर्दुमकी ठरते. जातींना बाजूला ठेवून व्यवसाय व उद्योग निवडले जाऊ लागल्यास पूर्वी एकमेकांच्या 'जातीबद्ध' असलेल्या व्यवसाय - उद्योगांकडे आपण जे दूषित नजरेने पाहायचो ते थांबवू शकू. उदाहरणार्थ, काल ग्रंथांवर आधारित उपजिविका करणारा आज उत्तम मिठाई विकतो किंवा शहरात दुकानदारी करणारा आज गावी फळभाज्यांची चांगली शेती करतो. गमतीशीर समस्या मात्र अशी आहे की, आमचे जातीबद्ध व्यवसाय

व नोकऱ्या बदलूनही कालच्या जाती मात्र तशाच राहिल्या.

एकदा जात न पाळण्याचे ठरवले की, आपण आपल्या जातीचा चष्मा वापरणे बंद करतो आणि दुसऱ्याच्या जातीबद्ध विचारांना विवेकाने सामोरे जाऊ शकतो. हे मान्य की आजही बऱ्याचदा समोरची व्यक्ती तिच्या 'जातीस्थाना'नुसार वागते. अशा वागण्यावर अर्थातच आपले नियंत्रण नसते; परंतु 'जातीअंत' करण्यासाठी आपण मात्र एक नैतिक भूमिका ठामपणे स्वीकारू शकतो. मला असे अनेक यशस्वी उद्योगपती व बहुराष्ट्रीय कंपन्या माहीत आहेत ज्या आपल्या सोयीची 'जात' न पाहता 'योग्यता' पाहून नोकरी देतात नि म्हणून सदासर्वकाळ मोठ्या होत राहतात. मी असेही उद्योजक पाहत आलोय जे जात्याभिमानामुळे आपल्याच जातीतील अत्यंत सामान्य कुवतीचे कर्मचारी नेमतात नि कालांतराने स्पर्धेत मागे पडत जातात. अशा उद्योगांमध्ये जातीबद्ध अंधश्रद्धा व दंभ शिरल्याने नवे काही शिकण्याची प्रक्रियाच मंदावते. जातींबद्दलच्या अतिरेकी प्रेमामुळे कला, साहित्य, क्रीडा, प्रशासन, संशोधन, राजकारण, अध्यात्म, सांस्कृतिक चिंतन इ. बहुतेक क्षेत्रांमध्ये सुमारांची सद्दी चालते. हे जातीबद्ध लोक संपूर्ण देशालाच खुजेपणा आणतात. जातीभेदाच्या भयंकर अतिरेकामुळेच मोठा उत्तर भारतीय पट्टा मागासलेला राहिला आहे. आपण जेव्हा जातीच्या रिंगणातून बाहेर पडतो तेव्हा एक अतिविशाल जग दिसू लागते. हे म्हणजे डबक्यातून समुद्रात उतरल्यासारखे असते. काही 'जातीवंत' महाभाग आपल्या डबक्यालाच समुद्र समजतात ती गोष्ट वेगळी ! ज्यांना अमर्याद पराक्रम गाजवायचा असतो ते जातीचा फक्त शंखनाद न करता वैश्विक रणांगणावर उतरतात. ज्यांचे अवघे आयुष्य फक्त स्वजातीच्या मंचावर हारतुरे घेण्यात जाते ते फारसा दैदीप्यमान पराक्रम गाजवू शकत नाहीत. 'जात' त्यांना सुरुवातीला काहीएक आधार जरूर देते; परंतु तीच नंतर ध्येयासक्तीला मर्यादा घालणारी एक चौकट ठरते. जगातील कोणत्याही कालच्या किंवा आजच्या महानायकाकडे पाहा, तुम्हाला दिसेल की एखाद्या 'वैश्विक नागरिका' (Global Citizen) सारखे ते मोठे होत गेले नि साऱ्या जगाचं कल्याण करू शकले.

जात न पाळण्याचा आणखी एक मोठा व समाधानी फायदा असा की, आपल्या जातीतल्या एखाद्या प्रसिद्ध नेत्याच्या किंवा विद्वानाच्या अथवा उद्योगपतीच्या किंवा गुरूच्या दोषांवर पांघरूण घालण्याचे संकट आपल्यावर ओढवत नाही. अन्यथा आपण असा एक प्रकार हल्ली खूपच पाहतो की, आपल्या जातीतील नायकाचे अपराध किंवा चुका झाकण्यासाठी किंवा नाकारण्यासाठी

त्या त्या जातीतील अनुयायांची किती घालमेल होते ! अरे, तुमच्या जातीतला तो 'नायक' असल्याने त्याने सर्वगुणसंपन्न असलेच पाहिजे असा अट्टाहास का ? तोही चुका करू शकतो; परंतु जात्याभिमानी लोकांची गोची अशी होते की नायकाने केलेल्या चुका मान्य केल्या तर यांची थोर थोर जात ही 'कमअस्सल' ठरते. अरेरे, मग काय ती त्रेधातिरपीट उडू शकते यांची ! लहानपणापासूनच्या 'जात्याभिमानी संस्कारां'मुळे यांना आयुष्यभर असे अडचणीत सापडून राहावे लागते. एकदा जगभर जाहीर केले की, 'आमची जात चुकाच करू शकत नाही', मग अशा दाव्यापासून मागे हटायचं कसं ? अशा जन्म'जात' गोड गैरसमजुतीमुळे आयुष्यभर कटु अनुभव मात्र घ्यावे लागतात. जातीचा हा अनाकलनीय अहंकार मी अन्यथा सज्जन व बुद्धिप्रामाण्यवादी असणाऱ्या अनेक विचारवंतांमध्येही पाहतो. मानवजातीचे कल्याण करण्याचा अधिक मोठा विचार फक्त आमच्याच जातीतले विचारवंत करू शकतात, असा यांचा हा छुपा दंभ अनवधानाने केव्हा तरी प्रगट होतोच. हीच मंडळी मग अन्य जातीतील विचारवंतांना अनुल्लेखाने मारू लागतात.

एकदा जात पाळायची नाही, असं ठामपणे ठरवलं की कोणत्याही जातीची भीती अथवा अनाठायी आकर्षण वाटत नाही. बाहेरून चकचकीत दिसणाऱ्या; परंतु आतून सडलेल्या जातींचे अनुकरण करण्याची गरज भासत नाही. काही कारणास्तव जातीने निर्माण केलेला न्यूनगंडही नाहिसा होतो. काही विशिष्ट जातींनी तयार केलेले विशिष्ट नियम, आचार-विचार, परंपरा-प्रथा, प्रतीके व प्रतिमांचा नि:स्पृहपणे विचार करून जे जे अयोग्य किंवा मानवतेविरोधी आहे ते ते ठामपणे नाकारता येते; परंतु यासाठी मुळात स्वतःकडे एक नैतिक अधिकार असावा लागतो जो जात न मानण्यातून येतो. ही प्रगल्भता एकदा आली की स्वतःच्या जातीचे उत्थापन करणेही सोपे जाते व भावनिकदृष्ट्या अशा उत्तम कामगिरीने आपण आपल्याच जातीच्या ऋणा(!)तून अंशतः मुक्तही होतो. त्रयस्थपणे जेव्हा आपण आपल्या जातीकडे पाहतो तेव्हा बहुदा नव्याने बऱ्याच चांगल्या-वाईट गोष्टी लक्षात येतात. जातींची निर्मिती काही अज्ञानी लोकांनी केली होती हे एकदा पटलं की, 'आपण अमुकतमुक कनिष्ठ जातीत का जन्मलो ?' हे शल्य मनात राहत नाही. असे स्वच्छ मन मग मेंदूला वेगाने कार्यान्वित करू शकते. जे जे मागास जातीतील थोर समाजसुधारक, कल्पक कलावंत, बुद्धिवंत लेखक, प्रशासक व लढवय्ये होऊन गेले ते ते मानसिकदृष्ट्या आधी जातीच्या न्यूनगंडातून बाहेर पडलेले होते. जातीच्या न्यूनगंडाने जे बौद्धिक व मानसिक

खच्चीकरण होते ते आपली कुवत असतानाही आपल्याकडून मोठा पराक्रम घडवू देत नाही. जातपात न पाळण्यासाठी आधी आपला जातीय न्यूनगंड किंवा अहंगंड हा घालवावा लागतो. तो घालविण्यासाठी आपण जात्याभिमानी लोकांना चार साधे प्रश्न विचारायला हवेत - मुघल आणि इंग्रज इथे राज्य का करू शकले ? श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धांची निर्मिती व प्रसारण कुणी केले ? गेल्या दोन-तीनशे वर्षांमधील बहुतेक जीवनोपयोगी शोध पाश्चिमात्यांनीच का लावले ? उत्तर भारतातील तथाकथित वरीष्ठ जातीतील मंडळी सुयोग्य शिक्षणाच्या अभावामुळे आज मुंबई व नवी मुंबईत कोणत्या प्रकारची कामे करतात ? जात न पाळण्याचा सर्वोत्तम फायदा असा की, आपली पहिली ओळख ही जातीवरून न देता आपण 'भारतीय' म्हणून देऊ शकू. तेव्हा मित्रांनो, 'जात नाही ती जात' असे पुनःपुन्हा म्हणत बसण्याऐवजी आपण आपल्यापासूनच जातीअंताची सुरुवात करूयात !

*(लेखक मुंबईस्थित विश्लेषक आणि कार्यकर्ते आहेत.)*

■ ■

*मुस्लीम सत्यशोधक मंडळ वर्धापनदिनानिमित्त देणगी, जाहिरात आणि शुभेच्छा देणाऱ्या पुढील मान्यवरांचे आभार !*

**मा. सत्यनारायण मुंदडा**

**मा. किशोर जैन**

**मा. सुरेश पिंगळे**

**मा. मनोज वाहणे**

**मा. प्रणिता एजाज**

**मा. आर. एस. अलासे, कोल्हापूर**

**मा. उत्तम जोगदंड, मुंबई**

**मा. जी. डी. पारेख**

**मा. वसंत सोनवणे**

**मा. दीपकभाई चौधरी, नंदुरबार**

**मा. अमीत साबणे, पुणे (सध्या अमेरिका)**

विचारमंथन

# भारत माझा महान : आई-बहिणीस नाही मान !

• बेनझीर काझी

आपण आपल्यावर झालेले संस्कार आपल्या भाषेतून व्यक्त करतो. किंबहुना भाषा ही मानवी संस्कृतीचे महत्त्वाचे अंग आहे. भाषा, लोकभाषा किंवा बोली भाषा अभिव्यक्तीचे प्रमुख साधन आहे. मानवी प्रगतीला भाषा साहाय्यक ठरली आहे. ती व्यक्तिमत्त्व विकासाचे साधन आहे, तसेच व्यक्तिमत्त्वाच्या मूल्यमापनाचा एक निकष आहे.

भाषेविषयी मला सन्मान आहे. भाषेतून आपले शिष्टाचार दिसून येतात. भाषा माणसाला जोडणारी असते तसेच तोडणारीसुद्धा.

आपण आपला आनंद, सद्भावना, द्वेष, राग भाषेतून व्यक्त करतो. कधी हळूवारपणे तर कधी जोरात तर कधी देहबोलीतून ! मला वेळोवेळी खंत वाटते ती 'शिव्या' या प्रकाराची. खास करून काही लोकांच्या तोंडात नेहमी आयाबहिणीवरील शिव्या असतात. त्याचा वापर इतक्या सर्रास आणि बेमालूमपणे होतो की आपण आपल्याच आयाबहिणींचा किती अपमान करतो हे त्यांच्या ध्यानीमनीही कधी येत नाही. याची मला प्रचंड चीड येते. हा प्रकार म्हणजे अविवेकाचा अविष्कार असेच म्हणावे लागेल ! जाऊ तिथे आई-बहिणीवरून शिव्या ऐकावयास मिळतात, तेही सगळ्या भाषेत शिव्या व त्यांचा अर्थ सेमच. पुरुष भांडणात असो वा मैत्रीत एकमेकांना आई-बहिणीवरून शिव्या देतात.

शिव्या देणाऱ्यास माझा प्रश्न आहे की, कोणी हा अधिकार दिला, शिव्यांमध्ये आईबहिणीचा उद्धार करण्याचा ? का आम्हा स्त्रियांचा, आमच्या शारीरिक अंगाचा वापर शिव्या देण्यासाठी, घाण व गलिच्छ बोलण्यासाठी केला जातो ? हे ऐकून काय वाटत असेल त्या आईला जिने जन्म दिला, जिवाचं रान करून वाढवलं, शिकवलं. जन्म झाला आईमुळे, बोलायला शिकलो आईमुळे, काहीजण तर पहिला शब्द देखील 'आई' हाच उच्चारले असतील आणि तोच शब्द आता शिव्यांसाठी, गलिच्छ बोलण्यासाठी वापरला जातो. आईनंतर आपली बहीण असते जी आपली काळजी घेते, जिच्यासोबत आपण मोठे होतो, आपल्या आयुष्यातील काही अविस्मरणीय क्षण घालवतो, जी आपल्यासाठी उपवास करते, आपल्याला राखी बांधून आपण तिच्या पाठी कायम उभे राहू अशी छोटीशीच

अपेक्षा ठेवते आणि आपण काय करतोय तर तिचा, तिच्या शारीरिक अंगाचा उद्धार ! घाण आणि गलिच्छ बोलण्यासाठी वापरतो. पण हे का ? कशासाठी ?

स्त्रियांची शारीरिक रचना ही जन्म देण्यासाठी, संगोपनासाठी आहे. भांडणात, रागात त्यांची काय चूक ? हीच का... ती एक स्त्री आहे ? असे प्रश्न माझ्या मनात आले आणि मी उत्तरांसाठी संशोधन चालू केलं, माझ्या मित्रमंडळींबरोबर चर्चा केली, तर असे जाणवले की, सर्वात जास्त भावनिक संबंध आणि मर्मस्थान हे आईबहिणी असतात. त्यामुळे शिव्या देताना एकमेकांवर राग, द्वेष व्यक्त करण्यासाठी व एकमेकांचे मानसिक खच्चीकरण करण्यासाठी बहुदा आई-बहीण यांचा म्हणजेच स्त्रियांच्या संदर्भाने दिल्या जातात.

सध्याचं वातावरण आणि परिस्थिती इतकी बेकार आहे की, माणूस इतका चिडतो की तोंडातून शिव्या निघतात. त्याची बरीच कारणे असू शकतात. जसे बेरोजगारी, नोकरी, वाहतूक समस्या, सरकारबाबत नाराजी अशी अनेक. अशा परिस्थितीत तोंडातून शिव्या निघणं स्वाभाविक आहे; परंतु त्यासाठी आई-बहीण व स्त्रियांचा अपमान करण्याची गरज नाही. राग, द्वेष व्यक्त करण्यासाठी आपण सौम्य शब्दांचा वापर करू शकतो जेणेकरून आईबहिणींचा मानही ठेवता येईल व आपले कामही होईल.

मित्रांसोबत चर्चेत हा एक उपाय सुचवला तर काही जण सौम्य शब्दांच्या वापरासाठी तयार झाले; पण काहीजणांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली. त्यांचे असे म्हणणे झाले की, सौम्य शब्दांत तो फिल येत नाही. अरे भावांनो, प्रयत्न तर करून बघा, जमेल हळूहळू ! बदल हा काय एका रात्रीतून होत नसतो; पण प्रयत्न करण्यास काय हरकत आहे ! बहिणी, स्त्रिया काय शिव्या देण्यासाठी नाहीत, तुमचा वेळ त्यांना मान मिळवून देण्यात घालवा की !

आठवा ना छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे आणि अशा मान्यवरांचा काळ ! त्यांची शिकवण काय सांगते, हेच ना की सर्व स्त्रियांना मान देऊन त्यांचा आदर करा. विविध धर्मांचे पवित्र ग्रंथ वाचून बघा, त्यातही हेच सांगितलं आहे की, आईबहिणीस मान द्या. खरं तर जो कायदा जातीवाचक शिव्यांसाठी आहे (ॲट्रासिटी ॲक्ट) तो कायदा स्त्रियांच्या अपमानास्पद वागणूकीसाठीही करावा म्हणजे या भीतीने तरी महिलांना सन्मान मिळेल !

*(लेखिका, सोलापूर येथे शिक्षिका असून*
*मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या सदस्य आहेत.)*

■ ■

# भारतीय मुस्लीम अस्मितेच्या बदलत्या संकल्पना

● मो. अली निजामोद्दीन माळेगावकर

प्रत्येक व्यक्तीच्या अनेक ओळखी किंवा अस्मिता असतात. सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, वांशिक, पंथीय, जातीय, भाषिक, प्रादेशिक, लैंगिक, व्यवसाय यांवर आधारित अस्मिता असतात. या सर्व अस्मिता व्यक्तीसाठी महत्त्वाच्या असतात. एक अस्मिता दुसऱ्या अस्मितेपेक्षा जास्त महत्त्वाची असू शकते. भारतीय उपखंडातील मुस्लीम अस्मितेच्या प्रश्नाचे विश्लेषण सामाजिक, धार्मिक आणि राजकीय जाणिवेच्या आधारे केले जाऊ शकते. सामाजिकदृष्ट्या भारतातील मुस्लीम समुदाय कधीही दिसून येत नाही. जगातील सर्व मुस्लीम एकसंध आहेत, ही घोषणा जशी जागतिक पातळीवर चुकीची आहे; तशीच भारतीय पातळीवरदेखील खरी नाही. भारतातील मुस्लीम समाज विविधतापूर्ण किंवा ‘बहुविध’ स्वरूपाचा आहे. मुस्लीम सत्ताधारी वर्गाच्या बदलत्या प्राधान्यक्रमानुसार त्यांची धार्मिक ओळख बदलली गेली. मुस्लिमांमध्ये राजकीय अस्मितेची संकल्पना ब्रिटिश राजवटीच्या काळात निर्माण झाली. लोकशाही संस्था, प्रतिनिधित्व आणि निवडणूक प्रक्रिया ब्रिटिश राजवटीच्या काळात लागू झाल्या, त्यामुळे भारतीय मुस्लिमांमध्ये अल्पसंख्याक या राजकीय अस्मितेची जाणीव झाली.

इस्लामच्या उदयाच्या वेळी अरब समाजातील आदिवासी गटांची प्रतिष्ठा आणि दर्जा समान होता. इस्लामिक साम्राज्याचा विस्तार सिरीया, पॅलेस्टाईन, लेबनॉन, इराक, इराण, स्पेन, पोर्तुगाल, ट्युनिशिया, उझबेकिस्तान, तुर्की, इजिप्त, ग्रीक, बल्गेरिया, रोमानिया, मॅसेडोनिया, हंगेरी, जॉर्डन, उत्तर आफ्रिका, भारत इत्यादी भागांत झाला होता. या प्रत्येक समाजात आधीपासूनच सामाजिक स्तरीकरणाची व्यवस्था होती. इस्लामचा विस्तार या समाजामध्ये झाल्याने अरबांनी सामाजिक स्तरीकरणाला प्रोत्साहन दिले.

भारतात इ. स. ७ व्या शतकाच्या सुरुवातीस पश्चिम आशियातील अरब व पर्शियन लोक, व्यापारी आणि खलाशी केरळच्या मलबार किनारपट्टीवर व्यापाराच्या हेतूने येत होते. ८ व्या शतकाच्या पूर्वार्धात सिंधवर राज्य करणारे अरब हे पहिले मुस्लीम शासक होते. सुरुवातीला भारताच्या उत्तरेकडील भागात

स्थायिक झालेले मुस्लीम तुर्की, पर्शियन आणि अरब होते. दिल्ली सल्तनतच्या काळात तुर्क आणि अफगाणांनी दिल्ली ताब्यात घेतल्यावर इस्लामी वर्चस्व संपूर्ण उत्तर भारतात पसरले. मुघल राजवटीत मुस्लीम नियंत्रण संपूर्ण भारतभर पसरले.

स्थलांतरित मुस्लीम, उत्तर-पश्चिमेकडून आलेल्या लढवय्ये मुस्लीम जमाती आणि स्थानिक धर्मांतरित मुस्लीम हे भारतातील मुस्लीम समुदायांच्या अस्मितेच्या निर्मितीचे तीन महत्त्वाचे घटक आहेत.

अरब-पर्शियन स्थलांतरित लोक व्यापार करण्यासाठी भारतात आले होते. भारतात अरब, पर्शियन, तुर्की, अफगाण आणि मुघल यांनी राजकीय सत्ता हाती घेतल्याने त्यांच्यामध्ये उच्च दर्जाची आणि श्रेष्ठतेची भावना निर्माण झाली होती. जाती व्यवस्थेतील अमानुष व्यवहार, हीन वागणूक आणि जाचक अटींतून मुक्त होण्यासाठी अस्पृश्य जातींनी इस्लाम धर्माचा स्वीकार केला; पण त्यांच्या जात जाणिवा कायम राहिल्याचे दिसून येते.

## वांशिक अस्मिता

सिंधवर राज्य करणारे अरब हे पहिले मुस्लीम राज्यकर्ते होते. हा अपवाद वगळता भावी मुस्लीम शासकांपैकी कोणीही अरब नव्हते. वांशिक श्रेष्ठत्व दाखवण्यासाठी अरबांनी इतरांना बिगर अरबी असे संबोधले. मुस्लीम समाजाचे विभाजन करण्यात वांशिक अस्मिता अधिक प्रबळ होती. वांशिकदृष्ट्या भारतातील मुस्लीम समाज सत्ताधारी, उच्चभ्रू आणि स्थानिक धर्मांतरित गटांत विभागला होता. अरब, पर्शियन, तुर्की, अफगाण आणि मुघल यांनी वांशिक वर्चस्व राखले. उच्च प्रशासकीय नोकऱ्यांसाठी केवळ वांशिकदृष्ट्या शुद्ध परदेशी लोकांची निवड करण्यात आली. वांशिक श्रेष्ठतेच्या सिद्धांताने राज्याची उपलब्ध संसाधने आणि विशेषाधिकार उच्चभ्रू लोकांच्या फायद्यासाठी राखून ठेवण्यात आली. स्थानिक धर्मांतरित मुस्लिमांना कधीही समान दर्जा दिला नाही. स्थानिक धर्मांतरित मुस्लिमांना उच्च पदांवरून वगळण्यात आले. खालच्या जातीतील मुस्लिमांना उच्चशिक्षण घेऊ-देऊ नये कारण ते गर्विष्ठ बनतील अशी धारणा तयार करण्यात आली.

मुघलांच्या आगमनामुळे मुस्लीम शासकांना तसेच हिंदू शासकांना धोका निर्माण झाला. मुघल वर्चस्वाचा धोका लक्षात घेता अफगाण मुस्लीम आणि हिंदू राजपूत एकत्रित आले. त्यांनी कन्वाहाच्या लढाईत बाबरविरुद्ध संयुक्तपणे लढा दिला; परंतु त्यांना यश आले नाही. मुघल राजवटीने भारतातील सामाजिक रचना बदलली. वायव्य सरहद्द उघडल्यानंतर मोठ्या संख्येने इराणी आणि तुर्क भारतात

आले. या स्थलांतरित लोकांनी इराणी आणि मध्य आशियाई संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले. मुघल साम्राज्यात परदेशी वंशाचे मुस्लीम असणे प्रतिष्ठित मानले जात होते. त्यामुळे स्थानिक धर्मांतरित मुस्लिमांनी त्यांचे मूळ प्रसिद्ध पर्शियन-अरब जमातींमध्ये शोधण्यास सुरुवात केली.

मुघल अभिजात वर्गाची सामाजिक रचना आणखी बदलली जेव्हा मुघल साम्राज्याने आपल्या प्रदेशांचा विस्तार केला. केवळ परदेशी वंशाच्या मुस्लिमांच्या मदतीने देशावर राज्य करणे शक्य नव्हते. प्रशासन करण्यासाठी अधिक लोकांची आवश्यकता असल्याने त्यांनी राजपूतांना प्रशासनात समाविष्ट करून अभिजात वर्गाचा विस्तार केला. प्रशासनात सामाजिक रचनेतील हिंदू निम्न जाती आणि मुस्लीम समाजातील खालच्या जातींना वगळले. धर्म श्रद्धेपेक्षा उच्च दर्जा हीच खरी विभाजक रेषा होती. मुस्लीम अभिजात वर्गाने खालच्या जातीतील मुस्लिमांशी एकरूप होण्याऐवजी उच्चवर्णीय राजपूतांना समान मानणे पसंत केले. संपूर्ण सल्तनत आणि मुघल कालखंडात असे कोणतेही प्रतीक नव्हते जे मुस्लिमांना राजकीयदृष्ट्या एकसंध समाजात एकत्र करू शकेल. मुस्लिमांच्या विविध गटांना बांधील असे कोणतेही समान आर्थिक हितसंबंध नव्हते. बिरादारी, जाती, व्यवसाय आणि वर्गीय हितसंबंधांमुळे मुस्लीम राजकीय आणि सांस्कृतिकदृष्ट्या विभागले गेले होते.

## जातीय आणि वर्गीय अस्मिता

जागतिक इस्लाममध्ये जाती व्यवस्था नसली तरीही भारतीय मुस्लिमांमध्ये जातीय व्यवस्था असल्याचे दिसून येते. जात हा भारतीय समाजरचनेचा पाया असून भारतातल्या सर्व धार्मिक (हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध) समूहामध्ये जाती आहेत. मूळ इस्लाममध्ये जाती व जातीय संरचना नाहीत. सैद्धांतिकरित्या इस्लाम धर्म जाती व्यवस्थेचा पुरस्कार करत नाही; पण भारतीय मुसलमानांत मात्र जाती व जातीय संरचना आढळते. मुस्लिमांतील सामाजिक स्तरीकरणाच्या अभ्यासात जातसदृश वैशिष्ट्ये आढळून येतात.

हिंदू धर्मातील जाती-जमातीत आढळणाऱ्या सर्व प्रकारच्या जाती-जमाती भारतीय मुस्लिमांमध्ये आढळून येतात. त्याची दोन कारणे आहेत. पहिले कारण हे आहे की, इस्लामचा स्वीकार करून धर्मांतर केल्यानंतरदेखील मूळ जाती जमातींचे रितीरिवाज आणि जीवन पद्धती धर्मांतरित जाती-जमातींना सोडून देता आल्या नाहीत. धर्मांतर म्हणजे एका अर्थाने उपासना पद्धतीतील बदल इतक्या

पुरतेच मर्यादित राहिलेले दिसून येते. इस्लामचा स्वीकार केल्यामुळे जातिव्यवस्थेच्या प्रत्यक्ष अत्याचारापासून सुटका करून घेता येईल, केवळ याच मानसिक समाधानापर्यंत फार तर धर्मांतरित लोक गेल्याचे दिसून येते. मूळ जाती व्यवस्थेची मानसिकता इतकी खोलवर रुजली होती की, ती त्यांना पूर्णपणे नष्ट करता आली नाही. दुसरे कारण म्हणजे धर्म बदलला तरी भाषा आणि जीवन पद्धती कायम राहिलेल्या दिसतात. पर्यायी धर्म दिला तरी पर्यायी अर्थव्यवस्था व उदरनिर्वाहाची साधने दिली गेली नाहीत, म्हणून धर्म इस्लाम राहिला; परंतु व्यवसाय व सामाजिक दर्जा मात्र हिंदू धर्मातील कनिष्ठ जाती-जमातीचाच राहिला. त्यामुळे मुस्लीम समाजामध्येही हिंदू समाजाप्रमाणेच जाती व्यवस्था आढळून येते.

मुस्लिमांमध्ये स्थूलमानाने अशरफ, अजलफ आणि अरजल हे तीन सामाजिक वर्ग असल्याचे मानले जाते. १. अशरफ याचा अर्थ उच्चवर्ग व उच्च जातीशी जोडला जातो. जे विदेशी मुस्लीम आहेत अथवा त्यांचे वंशज आहेत. हिंदू धर्माच्या उच्च जातीतून धर्मांतरित झालेले मुस्लीम आहेत अशा लोकांचा समावेश उच्च दर्जाच्या मुस्लिमांमध्ये केला गेला. २. अजलफ गटात कारागीर, कलाकार, कुशल कामगार, श्रमिक आणि कृषक यांचा समावेश होतो. ३. अरजल गटात अस्पृश्य जातीमधून धर्मांतरित झालेल्या लोकांचा समावेश होतो.

## धार्मिक आणि भाषिक अस्मिता

उलेमांनी धार्मिक चेतना वाढविण्याचा आणि मुस्लीम ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. उलेमांनी भारतीय समाजाची आस्तिक आणि नास्तिक अशी विभागणी केली. त्यांनी मुख्यत्वे खालच्या वर्गातील मुस्लिमांकडून पाळल्या जाणाऱ्या 'हिंदू कर्मकांड' विरोधात आवाज उठवला. खालच्या वर्गातील मुस्लिमांना सुधारण्याचा आणि त्यांचा धर्म 'शुद्ध' करण्याचा प्रयत्न केला. स्थानिक पातळीवर धर्मांतरित मुस्लिमांबद्दल त्यांचा दृष्टिकोन प्रतिकूल होता. उलेमांनी असा युक्तिवाद केला की, काही स्वदेशी भारतीय चालीरीती कायम ठेवून ते अर्धे मुस्लीम आणि अर्धे हिंदू झाले आहेत.

उलेमांच्या मते खरा इस्लाम केवळ अरबी किंवा पर्शियन भाषेच्या ज्ञानानेच समजू शकतो. त्यामुळे मुस्लीम समुदायाशी एकरूप होण्यासाठी स्थानिक पातळीवर धर्मांतरित झालेल्या मुस्लिमांनी त्यांची स्थानिक संस्कृती सोडून अरबी आणि पर्शियन भाषा शिकली पाहिजे. सत्ताधारी अभिजात वर्गाच्या व्याख्येनुसार परकीय वंशाचे मुस्लीम हे स्थानिक पातळीवर धर्मांतरित झालेल्या लोकांपेक्षा चांगले मानले

गेले. स्थानिक पातळीवर धर्मांतरित मुस्लिमांचे अज्ञानी, निरक्षर आणि वाईट मुस्लीम असे वर्गीकरण करण्यात आले. मुघल राजकीय सत्तेच्या ऱ्हासाने सत्ताधारी मुघल वंशजांना मोठा फटका बसला. परकीय वंशाच्या मुस्लिमांचे सामाजिक तसेच राजकीय वर्चस्व कमी झाले. पर्शियन भाषेचे वर्चस्व कमकुवत झाल्याने उर्दू ही मुस्लीम अभिजात वर्गाची नवीन भाषा म्हणून उदयास आली. स्थानिक पातळीवर धर्मांतरित मुस्लिमांनी स्वत:ला उच्च दर्जा मिळवून देण्यास सुरुवात केली. भारतातील मुस्लीम राज्यकर्त्यांची सत्ता शिखरावर होती, तेव्हा धार्मिक, राजकीय किंवा सामाजिक विवेक जागृत करण्यात ते कमी पडले.

## पंथीय अस्मिता

अरबी समाज विविध टोळ्यांमध्ये विखुरलेला होता. मोहम्मद पैगंबरांनी अरबी समाजाचे एकसंध समाज निर्माण केले. हा समाज समता, न्याय व बंधुत्व या मूल्यांवर आधारित होता. १८ व्या शतकात मुस्लीम विद्वान (उलेमा) कुराण आणि हदीसच्या स्त्रोतांचा आधार घेऊन मुस्लीम धार्मिक प्रथा यांतील फरक अधोरेखित करू लागले. इस्लाम धर्मातील पंथभेदाप्रमाणे अनेक संप्रदाय निर्माण झाले आहेत. त्या पंथांमध्ये अनेक साम्य-भेद आढळून येताना दितात. भारतीय मुसलमानांत जगातील इस्लामधील सर्व पंथ-भेद आहेत. भारतीय समाजरचनेतून देखील काही नवीन पंथ आणि पंथभेद निर्माण झाल्यासारखे दिसून येतात. भारतीय मुसलमानांत केवळ शिया, सुन्नी, वहाबी असे भेद नसून, अनेक पंथभेद दिसून येतात. अहमदिया, कादियानी आणि मेहदवी हे पंथ तर सर्वस्वी भारतातच निर्माण झालेले आहेत. अहमदिया आणि कादीयानी पंथांचा उदय उत्तर भारतातच झाला. या पंथांनी इस्लाम आणि कुराण यांच्या आधारे केलेली मांडणी ही जरी बहुसंख्य सुन्नी धर्मगुरूंना मान्य नसली तरी, ती जागतिक इस्लामच्या दृष्टीने महत्त्वाची ठरलेली आहे. इस्लामी धर्मशास्त्रात त्यांचे योगदान वादग्रस्त आहे. याशिवाय इस्माईली, दाऊदी-बोहरा, खोजा, सुलेमानी खोजा, कच्छी मेमन हे पंथदेखील आहेत. याशिवाय तबलिगी जमात आणि जमाते इस्लामी यासारख्या अनेक चळवळींचे रूपांतर एक प्रकारे पंथभेदातच होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पंथनिहाय आणि धार्मिकदृष्ट्या भारतातील मुसलमान कधीच एकसंध नव्हता आणि नाही. भारतातील या वेगवेगळ्या पंथांतील मुसलमानांत सर्व प्रकारचे संघर्ष, भेदाभेद दिसून येतात. त्यांचे धर्मगुरू, मस्जिदी, धर्मप्रवचने आणि धार्मिक आचार-विचार भिन्न भिन्न असतात. त्यांची धर्मशास्त्रे आणि व्यक्तिगत कायदे देखील भिन्नभिन्न

आहेत.

## अखिल मुस्लीम एकतावाद (पॅन-इस्लामवाद)

ईस्ट इंडिया कंपनीच्या उदय आणि यशामुळे मुस्लीम शासक वर्गाच्या भूमिकेत बदल झाला. मुघल सत्तेच्या ऱ्हासानंतर मुस्लीम शासक वर्गाच्या विशेषाधिकारांना धोका निर्माण झाला. मुघल सम्राट त्यांच्या हिताचे रक्षण करण्यास असमर्थ ठरला. अशा परिस्थितीत तुर्कीच्या खलिफाचे नाव उच्चारण्याची प्रथा सुरू झाली. तुर्कीचा खलीफा हे भारतातील मुस्लीम समाजाचा रक्षक आणि संरक्षक मानला गेला. मुघल सम्राटाच्या राजकीय अधिकाराचा ऱ्हास झाल्यामुळे उलेमा मुस्लिमांचे प्रतिनिधित्व करू लागले. मुस्लीम समाजाच्या हिताचे रक्षक आणि संरक्षक म्हणून स्वत:कडे पाहू लागले. त्यांनी पुनरुज्जीवनाच्या चळवळी सुरू केल्या. पुनरुज्जीवनाचा हेतू मुस्लीम समुदायामध्ये सुधारणा करणे, त्यांना भेडसावणाऱ्या आव्हानांना तोंड देणे आणि एकजिनसीपणा वाढवणे हा होता. सय्यद अहमद सर हिंदी यांची जिहाद चळवळ आणि हाजी शरीतुल्ला यांची फरायझी चळवळ पुनरुज्जीवनवादी होती. या चळवळी इस्लामला हिंदू विधी आणि चालीरीतींपासून शुद्ध करण्याचा प्रयत्न करत होत्या. त्यांचे अंतिम ध्येय भारतात इस्लामिक राज्य स्थापन करणे आणि मुस्लिमांना धर्माच्या आधारावर एका समुदायात एकत्र करणे हे होते.

भारतीय मुस्लिमांमध्ये वेगळी ओळख निर्माण करण्यात दोन घटकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पहिले ख्रिश्चन मिशनऱ्यांचे कार्य आणि दुसरे हिंदू सुधारणावादी आणि पुनरुज्जीवनवादी चळवळी. या दोन्हींमुळे मुस्लिमांना धोका वाटत होता. मुस्लिमांचे दुसऱ्या धर्मात धर्मांतरण होण्याची भीती वाटत होती. उलेमांनी मुस्लिमांना वाचवण्यासाठी स्वतःला संघटित करण्यास प्रवृत्त केले. बाह्य आणि अंतर्गत आव्हानांनी भारतातील मुस्लिमांना जवळ आणले, धार्मिक जाणिवेने त्यांच्या वेगळ्या ओळखीचा मार्ग मोकळा केला. मदरसा, मशीद, खानगा हे त्यांच्या धार्मिक अस्मितेचे प्रतीक बनले. राजकीय सत्तेचा मार्ग म्हणून त्यांनी धार्मिक पुनरुज्जीवनवादात ठेवलेल्या आशा संपुष्टात आल्या. सय्यद अहमद सर हिंदी यांची जिहाद चळवळ मुस्लिमांना ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढण्यासाठी एकत्रित करण्यात अयशस्वी ठरली. बंगालमधील मुस्लीम फरायझी चळवळ ब्रिटिशांनी दडपवून टाकली.

१८५७ च्या बंडाच्या अपयशानंतर भारतीय मुस्लिमांचे मनोधैर्य खचले.

ब्रिटिश विद्वानांनी भारतीय मुस्लिमांच्या धर्मावर टीका केली. त्यामुळे मुस्लीम घाबरले आणि संतापले. प्रत्युत्तर म्हणून भारतीय मुस्लीम विद्वान त्यांच्या धर्माच्या रक्षणासाठी पुढे आले. पाश्चात्त्य टीकेला उत्तर म्हणून त्यांना इस्लामिक इतिहासाचा अभ्यास करण्यास प्रवृत्त केले. त्यांनी ऐतिहासिक तथ्यांद्वारे युरोपची प्रगती मुस्लीम शास्त्रज्ञ आणि विद्वानांच्या योगदानामुळे झाली हे सिद्ध केले. उमय्यद राजवटीत, ख्रिश्चन आणि यहुदी यांच्याबद्दल धार्मिक सहिष्णुतेचे धोरण होते. कला, साहित्य वास्तुकला आणि विज्ञानात मुस्लिमांच्या योगदानामुळे मानवी सभ्यता समृद्ध झाली. अब्बासी लोकांच्या वैभवाच्या प्रतिमा, स्पेनच्या मूर्सची भव्यता आणि सेल्जुकांच्या विजयांनी त्यांचा आत्मविश्वास आणि अभिमान पुनर्संचयित करण्यात मदत केली. भारताबाहेरील इस्लामिक भूतकाळाचा गौरव करताना त्यांनी दिल्ली सल्तनत आणि मुघल या भारताच्या भूतकाळाकडे दुर्लक्ष केले. त्यांच्या नजरेत, वारशाने मिळालेल्या भूतकाळापेक्षा दूरचा आणि बाहेरचा भूतकाळ अधिक आकर्षक होता.

## राजकीय अस्मिता

एकोणिसाव्या शतकात वसाहतवादी राजवटीत हिंदू आणि मुस्लीम यांच्यातील मोठ्या प्रमाणावर संघर्ष सुरू झाल्याचे दिसून येते. भारतीय समाजात धर्म हा मूलभूत घटक असल्याने ब्रिटिशांनी अनेक प्रकारच्या सामाजिक कलहांना धार्मिक रंग दिल्याचे दिसून येते. एकोणिसाव्या शतकापूर्वी हिंदू किंवा मुस्लीम अस्मिता अस्तित्वात होती की नाही याविषयी एकमत नाही. वसाहतपूर्व काळातील बहुतेक विद्वानांना असे वाटते की, पूर्व-वसाहतवादी समाज जाती आणि स्थानिक निष्ठांमुळे खूप विखुरलेला होता. भारतीय अस्मिता निर्माण करण्यात आधुनिक राष्ट्रवादाच्या सिद्धांताने आणि वसाहतवादाने मध्यवर्ती भूमिका पार पाडली.

भारतातील ब्रिटिश साम्राज्याने आपल्या भारतीय प्रजेच्या ओळखीमध्ये मोठे परिवर्तन घडून आणले. आधुनिक राज्याची वाढ, ज्ञानाच्या नवीन प्रणालींचा परिचय, भांडवलशाही उत्पादन पद्धतींचा विस्तार आणि रेल्वे, तार, पोस्ट, प्रेस या सर्व प्रकारच्या दळणवळणाचा प्रसार यामुळे येथे सर्व प्रकारच्या नवीन स्थानिक, उप-प्रादेशिक आणि प्रादेशिक स्तरीय ओळख निर्माण करणे शक्य झाले. सर्वात उल्लेखनीय विकसित झालेल्या ओळखींपैकी एक म्हणजे मुस्लीम ही ओळख.

खिलाफत चळवळीने भारतीय मुस्लिमांमध्ये मोठ्या प्रमाणात मुस्लीम अस्मितेची जाणीव वाढवली. तसेच उलेमा आणि पाश्चात्त्य सुशिक्षित मुस्लिमांना एकत्र केले. मुस्लीम लीगने १९१८ च्या अधिवेशनात आघाडीच्या उलेमांना

पक्षात सामील होण्यासाठी आमंत्रित केले. त्यांनी संधी साधली आणि लवकरच चळवळीवर नियंत्रण प्रस्थापित केले. जेव्हा गांधींनी खिलाफतच्या मुद्याला पाठिंबा दिला आणि असहकार चळवळ सुरू केली तेव्हा त्यांनी मुस्लिमांशी एकजुटीने विरोध करण्यासाठी हिंदूंना बाहेर काढले; पण असहकार आंदोलन मागे घेतल्याने आणि मुस्लिमांची हिंदूंशी असलेली एकजूटता कमी होऊ लागली.

भारतीय मुस्लिमांनी अखिल मुस्लीम एक्तावाद (पॅन-इस्लामवाद) आणि खिलाफतला पाठिंबा देणे ही वाढत्या मुस्लीम मध्यमवर्गाची भावनिक गरज होती. जो राष्ट्रीयत्वाची प्रादेशिक संकल्पना नाकारून ओळख शोधत होता. त्यांच्या मागण्यांना अधिक वजन देण्यासाठी ते मुस्लीम जगाकडे वळले. खिलाफत चळवळीच्या अपयशामुळे मुस्लीम जगताशी त्यांचे संबंध कमकुवत झाले. तुर्कीच्या खिलाफतच्या समाप्तीबरोबर अतिरिक्त-प्रादेशिक राष्ट्रवादाचा तर्क संपुष्टात आला. मुस्लीम उच्चभ्रूंच्या लक्षात आले की, त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी त्यांना भारतात त्यांची वेगळी ओळख सांगावी लागेल.

भारतीय मुस्लिमांनी स्वतंत्र राष्ट्रीय अस्मितेचा दावा केल्याने त्यांचा हिंदूंशी संघर्ष झाला. दोन समुदायांमध्ये अंतर निर्माण करणारे घटक म्हणजे त्यांच्यातील पाश्चात्त्य शिक्षणाचा असमान विकास, उर्दू-हिंदी संघर्ष, बंगालची फाळणी, स्वतंत्र मतदारांची मुस्लिमांची मागणी, सरकारी नोकऱ्यांसाठी कोट्याची मागणी आणि जातीयवादी राजकीय प्रतिनिधित्व. १९२० च्या पुनरुज्जीवनवादी चळवळींमुळे दोन्ही समुदायांमधील भावना अधिक तीव्र झाल्या. १९२८ मध्ये हिंदूंच्या शुद्धी (शुद्धीकरण) आणि संघटना (हिंदू एकता) चळवळींना प्रतिसाद म्हणून, मुस्लीम शेतकऱ्यांनी हिंदू धर्मात पुनर्परिवर्तन करण्यापासून मुस्लीम शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी तबलीग (धर्मांतर) आणि तन्झीम (संघटना) चळवळी स्थापन केल्या. त्यांना त्यांच्या धार्मिक ओळखीची जाणीव करून दिली. परिणामी त्यांच्या धार्मिक ओळखीच्या वाढत्या जातीयवादाने त्यांच्या सौहार्दपूर्ण आणि दीर्घकालीन सामाजिक आणि सांस्कृतिक संबंधांना मोठ्या प्रमाणात नुकसान केले. सरकारी नोकऱ्या आणि राजकीय प्रतिनिधित्वाच्या वितरणाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा मुस्लीम राजकारण्यांनी या वाढलेल्या धार्मिक जाणिवेचा पुरेपूर वापर केला. मुस्लीम समाजाच्या नावावर अधिक चांगला हिस्सा मिळवण्यासाठी मुस्लीम उच्चभ्रूंनी मुस्लीम अस्मितेच्या आवाहनाचा पुरेपूर वापर केला. अशाप्रकारे, राजकीय गरजेतून द्वि-राष्ट्र सिद्धांताचा उदय झाला आणि प्रथमच त्याने मुस्लीम आणि हिंदू संस्कृती,

सामाजिक जीवन आणि इतिहास तसेच धर्म यांच्यातील फरक अधोरेखित केला.

## सांस्कृतिक आणि प्रादेशिक अस्मिता

डॉ. मोईन शाकीर यांच्या मते भारतातील मुसलमानांचा प्रश्न हा 'राष्ट्रीय' स्वरूपाचा नसून 'प्रादेशिक' स्वरूपाचा आहे. डॉ. मोईन शाकीर यांच्या मते, उत्तर प्रदेशाच्या मुसलमानांप्रमाणे केरळच्या मुसलमानांचे भाषिक किंवा सांस्कृतिक प्रश्न नाहीत. दक्षिणेतील आणि उत्तरेतील मुसलमानांची समाजरचना भिन्न आहे. प्रत्येक राज्यातील वेगवेगळ्या पंथीयांच्या चालीरीती आणि सांस्कृतिक जीवन वेगवेगळे आहे. किंबहुना वेगवेगळ्या भारतीय प्रदेशातील भाषा आणि संस्कृतीचा प्रचंड प्रभावही त्यांच्यावर दिसून येतो. दाऊदी आणि कच्छी मेमन हे पूर्णपणे कच्छी आणि गुजराती संस्कृतीने प्रभावित झालेले दिसतात. ते फक्त कच्छी आणि गुजराती बोलतात असे नसून केशभूषा, वेशभूषा तशीच असते आणि त्यांच्या बायकांत हिंदू धर्माप्रमाणे कुंकू आणि गंध अद्यापही लावले जाते, तरी ते 'शिया मुसलमान' म्हणूनच ओळखले जातात. केरळातील मुसलमान समाजावर मल्याळी संस्कृतीचा आणि भाषेचा पूर्णपणे प्रभाव पडलेला दिसून येतो. उत्तरेतील मुसलमानांवर तेथील नबाब, संस्थानिक, जमीनदार आणि धर्मगुरू यांच्या अश्रफ संस्कृतीचा, सरंजामशाहीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. केरळ, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील मुसलमान यांचे स्वरूप पूर्णपणे प्रादेशिकच असते. महाराष्ट्रातील मुसलमान इथल्या सामाजिक आणि सांस्कृतिक प्रभावाखाली असल्याचे दिसून येते.

## स्वातंत्र्योत्तर भारतातील मुस्लीम अस्मिता

काही मुस्लीम संघटनांनी पाकिस्तानच्या निर्मितीला विरोध केला होता. स्वातंत्र्यानंतर उदयास आलेल्या धर्मनिरपेक्ष राज्यालाही काही प्रमुख मुस्लीम संघटनांनी इस्लामच्या मूलभूत तत्त्वांच्या विरुद्ध मानले होते. जमात-ए-इस्लामी या संघटनेच्या दृष्टीने आधुनिक भारतीय राज्य अधार्मिक होते. १९७० पर्यंत जमात-ए-इस्लामीने धर्मनिरपेक्ष राज्याची कल्पना स्वीकारली. कारण ती निरंकुश किंवा फॅसिस्ट राज्यापेक्षा चांगली होती. हिंदू आणि मुस्लीम यांच्यातील कराराची कल्पना जमियत अल-उलामाने मांडली होती. मुस्लिमांनी काँग्रेसला पहिल्या तीन सार्वत्रिक निवडणुकांमध्ये दिलेल्या मतदानातही हे दिसून येते.

भारतीय मुस्लीम लीगचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न उत्तर भारतात झाले. त्यांचे हे प्रयत्न अयशस्वी झाले कारण बहुतेक उत्तर भारतातील प्रमुख नेते

पाकिस्तानला निघून गेले होते; परंतु दक्षिण भारतात मुस्लीम लीग अनेक कारणांमुळे टिकून राहिली. (अ) दक्षिण भारतातील मुस्लीम लीगचे बरेचसे नेतृत्व भारतात राहिलेले दिसतात. दक्षिण भारतात दंगली न झाल्यामुळे बहुसंख्यांना मुस्लीम लीगचा धोका वाटत नव्हता. (ब) दक्षिण भारतापासून पाकिस्तान आणि बांगलादेश दूर असल्याकारणाने धोक्याची तीव्रता कमी होती. (क) दक्षिणेतील मुस्लिमांनी स्थानिक भाषा स्वीकारल्या होत्या, त्यामुळे संप्रेरणात कोणतेही अडथळे नव्हते. बॉम्बेचे सैफ टी. बी. तैयबजी यांनी अंजुमन-ए-इस्लामच्या या संस्थेच्या पुनरुज्जीवनात महत्त्वाची भूमिका बजावली. अंजुमन-ए-इस्लाम ही संस्था मुस्लिमांचे शिक्षण, आर्थिक पुनरुत्थान आणि राजकीय प्रबोधन करण्यासाठी समर्पित होती. सय्यद महमूद हे काँग्रेसचे प्रमुख नेते होते. त्यांनी सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील रोजगार, विधिमंडळ आणि सरकारमधील प्रतिनिधित्व, पाठ्यपुस्तकांमधील सांप्रदायिक पूर्वाग्रह आणि दंगलीत मुस्लिमांच्या जीवित आणि मालमत्तेचे नुकसान या मुद्याच्या आधारे मुस्लिमांना संघटित करण्याचे प्रयत्न केले.

१९६१ मध्ये मुस्लीम अधिवेशनाचे पुनरुज्जीवन करण्यात आले. ऑगस्ट १९६४ मध्ये लखनौ येथे मुस्लीम नेत्यांच्या अधिवेशनात मुस्लीम संघटनांची एक संयुक्त आघाडी स्थापन करण्यात आली. याला इंडिया मुस्लीम मजलिस-ए-मुशावरात असे नाव देण्यात आले. अब्दुल जलील फरीदी यांनी ऑल इंडिया मुस्लीम मजलिस-ए-मुशावरातचे नेतृत्व केले होते. या दोन्ही संस्था काँग्रेस समर्थक होत्या. १९७० नंतर उर्दूची स्थिती, अलीगढ मुस्लीम विद्यापीठ, मुस्लीम वैयक्तिक कायदा इत्यादी मुद्यांच्या आधारे मुस्लीम ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

१९६० च्या दशकाच्या मध्यापासून देशाच्या विविध भागांमधील मुस्लीम गट त्यांना जातीय हिंसाचाराचे लक्ष्य बनण्यामुळे, सतत दुर्लक्षित ठेवल्यामुळे आणि भेदभावाचा सामना करावा लागत असल्यामुळे जागे झाले. काश्मीरची जमात-ए-इस्लामी, हैदराबादची इत्तेहादुल मुस्लीमीन आणि इंडियन युनियन मुस्लीम लीग यांसारख्या जातीयवादी गटांना गोरक्षा, जातीय हिंसाचार आणि हिंदी-उर्दू वादामुळे राजकीय अवकाश मिळाला. काँग्रेसने मुस्लीम समाजाला दुर्लक्षित ठेवले, मुस्लीम समाजाला भेदभावाचा सामना करावा लागला आणि मुस्लीम समाज आर्थिकदृष्ट्या दुर्बल बनल्यामुळे काँग्रेस पक्षापासून दुरावत गेलेला दिसतो. याच काळात आरएसएस-जनसंघाने धर्मनिरपेक्षतेला विरोध आणि मुस्लिमांचा विरोध करून हिंदूंना संघटित करून आपल्या संघटनांचा विस्तार केला. १९७० चे दशक हे

कोणत्याही मोठ्या जातीय दंगली झाल्या नाहीत; परंतु १९८० च्या दशकात जातीय दंगलींच्या अनेक घटना घडल्या. मुस्लिमांनी त्यांच्या पारंपरिक आणि उद्योजकीय कौशल्याने आर्थिक प्रगती केलेल्या शहरांमध्ये या दंगली घडल्या. हा निव्वळ योगायोग नव्हता.

समान नागरी संहितेच्या आवाहनामुळे पुराणमतवादी घटकांनाही बळ मिळाले. जमात-ए-इस्लामी, तबलीगी जमात आणि जमियत अल-उलामा यांनी या क्षेत्रात पुढाकार घेतला. १९७४ मध्ये ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड ची स्थापना शरीयतमध्ये होऊ शकणाऱ्या कोणत्याही बदलांवर लक्ष ठेवण्यासाठी करण्यात आली. १९८६ मध्ये शाहबानो वादाच्या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डने मुस्लीम महिलांना दत्तक घेण्यासाठी सरकारवर प्रभाव पाडला. घटस्फोटावरील अधिकारांचे संरक्षण विधेयक हे स्त्रियांच्या हक्कांच्या बाबतीत चुकीच्या दिशेने टाकलेले पाऊल होते. बाबरी मशिदीवरील वादामुळे सय्यद शहाबुद्दीन, अबुल हसन नदवी, सुलेमान सैत आणि सलाहुद्दीन ओवेसी यांसारख्या नेत्यांना आणखी बळ मिळाले. १९८७ मध्ये जामा मशिदीचे शाही इमाम सय्यद अब्दुल्ला बुखारी यांनी मुस्लिमांना ऐतिहासिक वास्तूच्या आवारात प्रवेश करण्यास आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाच्या ताब्यात असलेल्या ऐतिहासिक वास्तूंवर प्रार्थना करण्याचे आवाहन केले.

मुस्लीम समाजात गेल्या ७ दशकांत विविध अस्मितांचा अविष्कार झालेला दिसतो. उर्दू भाषा, अलिगढ विद्यापीठाचे अल्पसंख्याक स्वरूप, धार्मिक शिक्षण, मुस्लीम साहित्य, जमातवादी राजकारण, मुस्लीम पर्सनल कायद्याचे संरक्षण, वक्फ बोर्डचे संरक्षण, एकसंघ व एकजिनसी मुस्लीम समुदाय असे अनेक मुद्दे मुस्लीम अस्मितांचे जडणघडण करण्यात महत्त्वपूर्ण ठरले.

१९७० च्या दशकापर्यंत भारतातील मुस्लीम समाजातील राजकारण मूलतत्त्ववादावरच आधारलेले दिसून येते. या राजकारणाला प्रतिउत्तर म्हणून १९७० नंतर परिवर्तनवादी राजकारणाला सुरुवात झाली. मुस्लीम समाजात १९७० च्या दशकात मुस्लीम परिवर्तनवादी कार्यकर्त्यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळामार्फत धर्मचिकित्सा, बुद्धिप्रामाण्यवाद व धर्मनिरपेक्ष राजकारणावर भर देऊन मुल्ला-मौलवींवर टीका केली. दुसऱ्या बाजूला असगरअली इंजिनिअर यांनी बोहरा समाजावर इस्लामच्या नावाने सय्यदांनी स्थापित केलेल्या अनियंत्रित सत्तेला विरोध केला. इस्लाम मानवतावादी, समानतावादी, मुक्तिदायी धर्म आहे असे सांगितले.

१९८० च्या दशकात उदयास आलेल्या मुस्लीम ओबीसी चळवळीमुळे भारतीय मुस्लिमांच्या समस्येचे खरे आधार धार्मिक-राजकीय घटक नाहीत, तर सामाजिक व आर्थिक घटक आहेत हे मुस्लीम ओबीसींच्या लक्षात आले. ओबीसी चळवळीने प्रतीकात्मक, धार्मिक, अल्पसंख्याकांचे राजकारण या मुद्यांऐवजी शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय मुद्यांवर लक्ष केंद्रित केले. मुस्लीम ओबीसींनी सामाजिक न्याय या संकल्पनेच्या आधारे मुस्लीम अभिजन वर्गाला आवाहन देण्यास सुरुवात केली. मंडल आयोगाच्या शिफारसींच्या अंमलबजावणीनुसार जात आणि सामाजिक, शैक्षणिक मागासलेपणाच्या निकषावर मागास असणाऱ्या मुस्लीम जातींना ओबीसी कोट्यात समाविष्ट केले गेले. याला विरोध म्हणून मुस्लीम अभिजन वर्गाने संपूर्ण मुस्लीम समुदायाला वंचित व मागास घोषित करून त्यांना आरक्षणाद्वारे संरक्षित करावे अशी मागणी शासनाकडे केली.

रफिक जकारिया, हमीद दलवाई, असगर अली इंजिनिअर, अलीम वकील, फकरुद्दीन बेन्नूर, शमसुद्दीन तांबोळी, विलास सोनावणे इत्यादींनी मुस्लीम समाजाच्या प्रबोधनावर भर दिला. बाबरी प्रकरणानंतर मुस्लीम राजकारणाचे चर्चाविश्व आणि राजकीय प्रतिनिधित्वाची पुनर्रचना करण्यात आली. मुस्लीम राजकारणाविषयी नवी मते तयार झाली. ओबीसी आणि दलित मुस्लिमांनी आरक्षणाची केलेली मागणी आणि मुस्लीम महिलांचे वैयक्तिक कायदे ही दोन मुस्लीम राजकारणात झालेल्या मूलगामी बदलाची उदाहरणे आहेत.

मुस्लीम समाजाचे राजकारण समजून घेण्यासाठी मुस्लीम समाजातील राजकीय अभिजनांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. अभिजनांच्या सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमीनुसार अभिजनांचे राजकारणातील स्थान ठरत असते. भारतातील एकूण मुस्लिमांपैकी १० ते १५% उच्चवर्गीय मुस्लीम असून शतकानुशतके देशातील राजकीय, धार्मिक व सामाजिक संस्थांवर त्यांचेच नियंत्रण आहे. तेच सातत्याने विशेषाधिकारांचा उपभोग घेत आहेत. या अभिजन वर्गाने नेहमी अमूर्त, धार्मिक, भावनिक मुद्यांचेच राजकारण केल्याने दारिद्र्य, निरक्षरता, मागासलेपण हे विषय बाजूलाच राहिले.

वसाहतपूर्व काळात मुस्लीम राजवटीचा विस्तार संपूर्ण भारतभरात होता. धार्मिक अस्मितेपेक्षा राज्यविस्तार हे प्रमुख ध्येय होते. संघर्षाचे स्वरूप निव्वळ धार्मिक नव्हते. ब्रिटिश वासहतिक वर्चस्वाच्या काळात हिंदू आणि मुसलमान या धार्मिक अस्मितांची घडण झाली. त्यास ब्रिटिशांचे धोरण कारणीभूत होते. एका

बाजूस मुस्लिमांना सत्ताधीश असल्याची जाणीव निर्माण करत अनुनयाचे धोरण स्वीकारले आणि दुसऱ्या बाजूला हिंदू आत्मभान निर्माण करण्यास चालना दिली. त्यामुळे राष्ट्रीय चळवळीच्या काळातच हिंदू-मुस्लीम अस्मिता टोकदार बनत गेल्या. भारत-पाकिस्तान फाळणी ही त्याची अंतिम परिणती होती. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राजकारणात हिंदू-मुस्लीम संघर्ष उभा करण्याची सोय ब्रिटिशांनी करून ठेवली होती; पण सुरुवातीच्या काळात धर्मापेक्षा जातीचे राजकियीकरण अधिक घडले. १९८० च्या दशकात उदयाला आलेल्या जमातवादी राजकारणाने हिंदू-मुस्लीम या धार्मिक अस्मितेच्या राजकारणाला अधिक प्राधान्य दिले. धार्मिक अस्मितांना प्राधान्य देत धर्म आणि राजकारण यांची सांगड घालण्यात आली. दंगली घडवल्या गेल्या. धार्मिक अस्मितांचा उपयोग राजकीय हितसंबंधासाठी केला गेला.

**References :**


1. Ali Mubarak, 2009, Consciousness of Muslim Identity in South Asia Before 1947: Historical aspects of creation of a Muslim Identity, Lahore, Irenees.net Link:- https://www.irenees.net/index_en.html

2. Asghar Ali Engineer, 1998, Democracy and Politics of Identity, Mumbai, Economic and Political Weekly, Mar. 26 - Apr. 3, 1998, Vol. 33, No. 13 (Mar. 26 -Apr. 3, 1998), pp. 697-698

3. Khalid Anis AnsaAri, 2009, Rethinking the Pasmanda Movement, Economic Political Weekly,Vol. 44, Issue No. 13, 28 Mar, pp. 8-10.

4. Mangesh Kulkarni, 2011, Interdisciplinary Perspectives in Political Theory, New Delhi, Sage

5. Sayyed Zainuddin, 2003, Islam, Social Stratification and Empowerment of Muslim OCCs, Economic Political Weekly, Vol. 38, Issue No. 46, 15 Nov, pp. 4898-4901.

6. Seik Rahim Mondal, 2003, Social Structure, OCCs and Muslims, Economic Political Weekly,Vol. 38, Issue No. 46, 15 Nov, pp. 4892-4897.

7. Rafiq Zakaria, 2004, Indian Muslim: Where have they gone wrong ?, Mumbai, Charatiya Vadya Chavan.

**संदर्भ**

१. पळशीकर सुहास, २००९, मुस्लीम राजकारणाच्या वाटचालीपुढील आवाहने, पुणे, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ.

२. बेन्नूर फकरुद्दीन, २०१२, भारतीय मुस्लिमांची समाजरचना आणि मानसिकता, पुणे, प्रतिमा प्रकाशन.

**- मो. अली निजामोद्दीन माळेगावकर**
साहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
आबेदा इनामदार महाविद्यालय, पुणे.
संशोधनाचा विषय - 'महाराष्ट्रातील मुस्लीम राजकारण'

■ ■

व्यक्तिविशेष

# परभणीचे शायर इरफान परभनवी

● प्रदीप निफाडकर

पूर्वीचे प्रभावतीनगर म्हणजेच आजच्या परभणीत एक शायर जन्माला आले. त्यांचे नाव इरफान परभनवी. 'इरफान' या शब्दाचा अर्थ ज्ञान, ओळख असा आहे. इरफान यांचा एक शेर आजच्या वस्तुस्थितीवर आहे. आज आपण इतक्या वाहतुकीच्या गर्दीत जातो की कधी अपघात होईल आणि कधी जाऊ हे कळणार नाही. अपघातच कशाला, अतिरेकी आपल्याला कधी उडवतील याचा भरोसा नाही. मी अतिरेकी म्हणतो तेव्हा फक्त पाकिस्तानातून आलेले नव्हे, तर दाभोळकर, पानसरे यांचे जीव घेणारेसुद्धा त्यात येतात. म्हणून इरफान म्हणतात,

*घर से निकलो तो दुआ माँग के निकलो वर्ना*
*लौट आने का नहीं अपने भरोसा कोई*

घरातून निघतानाच आई-वडिलांचे, ते नसतील तर कोणा ज्येष्ठ व्यक्तीचे आशीर्वाद, पत्नी-मुलांच्या शुभेच्छा घेऊनच बाहेर पडा. नाहीतर परत घरी येण्याचा काही भरोसा नाही. बरे, इरफानजी पुण्या-मुंबईत बसून सांगत नाहीत, तर परभणीत बसून सांगतात, हेही लक्षात घ्यायला हवे. आज सारीच शहरे तशी धोकादायक झाली आहेत म्हणा. असो. अन्य एका गझलेत ते म्हणतात,

*होश जिस वक़्त भी आएगा गिरफ़्तारों को*
*ख़स की मानिंद उड़ा डालेंगे दीवारों को*

हा शेर त्यांनी पूर्वी लिहिला असणार, कारण त्यांचा जन्म १९२६चा आहे. म्हणजेच पारतंत्र्यातील आहे. तेव्हा इंग्रज कोणालाही काहीही आरोपाखाली अटक करीत होते. त्यामुळे ते म्हणतात, 'तुम्ही अटक करा; पण लक्षात ठेवा, हे स्वातंत्र्यवेडे जेव्हा भानावर येतील ना तेव्हा तुमच्या कारागृहाच्या भिंती पाडल्या जातील. कशा ? खस की मानिंद म्हणजे खसचा (वाळा) सुगंध कसा उडतो, तितक्याच वेगाने ते भिंती पाडतील.' त्याच गझलेत ते म्हणतात,

*इतने ऊँचे भी न उड्डो कि सँभल भी न सको*
*हम ने गिरते हुए देखा कई मीनारों को*

आपण कितीही मोठे झालो तरी पाय जमिनीवर ठेवावेत, हे सांगणारा हा

शेर. तुम्ही इतकेही उंच होऊ नका की स्वतःलाच सांभाळू शकणार नाही. आम्ही कितीतरी उंच बुरूजांना कोसळताना पाहिले आहे. याच गझलेत अजून एक शेर सुंदर आहे.

बुज़दिली है कि ये नादानी है आख़िर क्या है
लोग अश्कों से बुझाने लगे अंगारों को

हा घाबरटपणा आहे की वेडेपणा ? काय आहे शेवटी ? कळत नाही. लोक आता अश्रूंनी निखारे विझवू लागले आहेत. माणसे रडत होती इथपर्यंत ठीक होते; पण आता त्यांच्या अश्रूंचा प्रवाह इतका वाढला आहे की तुम्ही त्यांची जाळलेली घरे ते आता अश्रुंनी विझवत आहेत. आता तुमची काही खैर नाही.

आणि हा शेवटचा मास्टर स्ट्रोक पाहा-

*वही रिश्वत वही उग़वा वही ख़बरें 'इरफ़ाँ'*
*हम तो बिन देखे ही पढ़ लेते हैं अख़बारों को*

लाच देण्यामुळे पकडल्याच्या त्याच बातम्या, त्याच अपहरणाच्या बातम्या, त्याच त्या बातम्या. इरफान, आम्ही आता न बघताही वर्तमानपत्रे वाचू शकतो.

*(लेखक पुणेस्थित पत्रकार आणि गझलकार आहेत.)*

■ ■

■ मोठ्या माणसांशी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जर एखाद्यास आपला स्वाभिमान गुंडाळून ठेवावा लागत असेल; अगर एखाद्या स्त्रीस तिचे शील भ्रष्ट करावे लागत असेल तर ते कसे शक्य आहे ? अगदी याच न्यायाने राष्ट्राचे स्वातंत्र्य एखाद्या मोठ्या व्यक्तीकडे गहाण ठेवून कृतज्ञता व्यक्त करावयाची असेल तर तेही शक्य नाही.


**- डॅनियल कॅनेल** (आयरिश देशभक्त)

■ मोठ्यातल्या मोठ्या माणसाच्या चरणावर तुम्ही आपले स्वातंत्र्य अर्पिता कामा नये; अगर शासनसंस्थांचा तो दुरूपयोग करील एवढी सत्तादेखील त्याजकडे तुम्ही विश्वस्त म्हणून ठेवू नये.

**- जॉन स्टुअर्ट मिल**

# मधु दंडवते : समाजवादी चळवळीतील दीपस्तंभ

• पन्नालाल सुराणा



येत्या २१ जानेवारी रोजी प्रा. मधु दंडवते यांच्या जन्माला शंभर वर्षे पूर्ण होतील. अहदमनगर शहरात जन्मलेले मधु हे कुशल क्रिकेट खेळाडू होते. त्या क्षेत्रात प्रगती करण्याच्या इच्छेने वडिलांनी त्यांना मुंबईला पाठवले. क्रिकेटचा सराव चालू राहिला; पण कॉलेजात पदार्थविज्ञान यात विशेष गती असल्याने त्यांनी एम्. एस्सी. ही पदवी उच्च श्रेणीत मिळवली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या सिद्धार्थ महाविद्यालयात त्यांना प्राध्यापक म्हणून नियुक्ती मिळाली. त्याचवेळी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ऐन भरात आली. पाच तास कॉलेजात काम केल्यानंतर बाकीचा वेळ भाई जीवनजी लेन मधील प्रजा समाजवादी पक्षाच्या कार्यालयात बसून चळवळीच्या हालचाली करायच्या असे दीड-दोन वर्षे चालले.

मुंबईच्या विविध उपनगरांत व विशेषतः वरळी, परळ, लालबाग या भागातील कामगारांच्या वस्त्यावस्त्यांत पक्ष कार्यकर्त्यांच्या बैठका अनेक वर्षे घेत. बँक कर्मचारी व विमा कर्मचारी यांच्या संघटनांची पदे त्यांच्याकडे चालत आली.

बॅ. नाथ पै हे रत्नागिरी मतदारसंघातून लोकसभेवर तीन वेळा निवडून गेले होते. परंतु बेळगावातील एका सभेत जोरदार भाषण करून खुर्चीत बसल्याबरोबर हृदयविकाराने त्यांचे निधन झाले. सगळ्या समाजवाद्यांना हादरा बसला. कोकणातही सर्वत्र शोकावेग पसरला; पण त्यात फारवेळ गुंतून पडणे शक्य नव्हते. लोकसभा निवडणुकीचे अर्ज भरायची मुदत जवळ आली होती. तिकडल्या कार्यकर्त्यांनी आग्रह धरल्यामुळे दंडवतेंनी आपली उमेदवारी जाहीर केली. प्रचंड बहुमताने ते विजयी झाले आणि पुढे सलग ५ वेळा ते रत्नागिरीचे प्रतिनिधीत्व लोकसभेत करत राहिले.

१९५६ साली गोवा मुक्ती आंदोलनात भाग घेण्याची दंडवते व त्यांच्या

पत्नी प्रमिलाताई दोघांची इच्छा होती; पण सत्याग्रहाचे सूत्रधार विनायक कुलकर्णी यांनी (गोव्यातील पोर्तुगीज पोलिस भयंकर दडपशाही करत होते हे माहीत असल्याने अपत्यांना उघडे पडू देऊ नये या भूमिकेतून) 'दोघांपैकी एकालाच परवानगी देईन' असे म्हटल्यावर फक्त प्रमिलाताई सत्याग्रहात गेल्या. पोलिसांनी त्यांना पकडून सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सीमेवर सोडले. या जोडप्याचे राजकीय कार्य कैक वर्षे अखंड चालू राहिले. पुढे १९८० साली दंडवते रत्नागिरीतून आणि प्रमिलाताई मुंबईमधून लोकसभेवर निवडून गेल्या होत्या. महिला दक्षता समिती स्थापन करून प्रमिलाताईंनी महिलांच्या दुःखांना वाचा फोडण्याचे मोठे काम केले होते. दंडवते हे सोशलिस्ट पार्टीच्या कामासाठी देशभर दौरे करायचे. १९७५ साली इंदिराजींनी अंतर्गत आणीबाणी लावली आणि त्या दोघांची उचलबांगडी झाली. येरवडा जेलमध्ये त्यांना ठेवण्यात आले.

१९७७ च्या लोकसभा निवडणुकीत जनता पक्षाला बहुमत मिळाले होते. मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली बनलेल्या मंत्रिमंडळात दंडवतेंचा समावेश करण्यात आला आहे, हा निरोप देण्यासाठी वरीष्ठ अधिकारी विठ्ठलभाई पटेल हाऊसमधील खोलीत पोहचले तेव्हा दंडवते हे आपले कपडे धूत होते !

रेल्वेमंत्री झाल्याबरोबर दंडवतेंनी कोकण रेल्वेच्या कामाला हात घातला. सर्व समुद्रकिनाऱ्याला लागून रेल्वेलाईन असावी, ही संरक्षणव्यवस्थेची गरज लक्षात घेऊन दंडवतेंनी मुंबई ते मंगरूळ या मार्गाचे काम अतिशय अल्पकाळात पूर्ण केले. पुढे १९८९ साली व्ही. पी. सिंग यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी अर्थखाते सांभाळले होते. कार्यालयातील कर्मचाऱ्यांना बरोबरीने वागवणे हे व्रत त्यांनी अखंडपणे पाळले.

समाजवादी चळवळीला वैचारिक दिशा देण्याच्या दृष्टीने दंडवतेंनी भाषणे करण्याबरोबरच सतत लेखनही केले. 'जनता' या इंग्रजी साप्ताहिकातील त्यांचे लेख, 'गांधी ॲण्ड मार्क्स' हा त्यांचा ग्रंथ, तसेच 'सद्सदविवेकाला आवाहन' हे त्यांचे दुसरे पुस्तकही कार्यकर्त्यांना खूप मार्गदर्शक ठरले.

राजकारणात विचारसरणीचे महत्त्व कमी झाले आहे. समाजवाद याची तर हेटाळणीही होत आहे; पण जगभर मुठभरांच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण होत असल्याने सर्वसामान्य माणसांचे हाल वाढत चालले आहेत. त्यावर समाजवाद हेच उत्तर आहे, ही प्रा. मधु दंडवते यांची शिकवण आजही मार्गदर्शक ठरत आहे.

*(लेखक समाजवादी चळवळीतील ज्येष्ठ नेते आणि मार्गदर्शक कार्यकर्ते आहेत.)*

■ ■

# साबा नझीर

**• अनुवाद - अल्तापहुसेन नबाब**



ही कहाणी साबा नजीर, मुरिडके, लाहोरपासून पन्नास किलोमीटर दूर असणाऱ्या पाकिस्तानातील छोट्याशा गावातील मुलीची आहे. परंपरेला छेद देऊन आणि आपल्या कुटुंबाची प्रतिष्ठा, इज्जत पणाला लावून तिने कट्टर इस्लामवाद्यांना, धर्मासाठी नव्याने विवादास्पद प्रजनन भूमी उपलब्ध करून दिली. पुराणमतवादी राजपूत जातीत जन्माला आलेली साबा ही महिलांसाठी परदासक्त असलेल्या आणि पुरुषांशिवाय घराबाहेर न पडण्याच्या, तसेच कसेबसे दहावी पर्यंतच शिक्षण घेऊ शकणाऱ्या आणि त्यानंतर लग्न होणे गृहीत असलेल्या कुटुंबात जन्माला आलेली होती. इस्लाम स्वीकारणे आणि त्यावर अंमल करणे हे साबाला बंधनकारक होते; परंतु एकदा टेलिव्हिजनवर सेनेतील महिलांची धाडसी प्रात्यक्षिके पाहिल्यावर, तिला प्रथमच परंपरेच्या चौकटीबाहेर आणि घराबाहेर पडणाऱ्या मुस्लीम महिला पाहून प्रभावित वाटले होते. नंतर ग्रामीण वृत्तपत्रातील मुस्लीम मुलींची छायाचित्रे तेही विविध स्पर्धांमध्ये भाग घेताना पाहिल्यावर तिला हे काहीतरी नवीन आणि आश्वासक जगाचा आभास करणारे वाटले, जे तिच्यासाठी नवीन होते. त्याचवेळी तिच्या मनात चार भिंतींपलीकडचे जग पाहण्याची आणि आपल्या कुटुंबापासून विभक्त आपली स्वतःची ओळख निर्माण करण्याची इच्छा निर्माण झाली. माझ्या कुटुंबातील महिलांप्रमाणे मी फक्त मुलांची आणि घरादारांची निगा राखण्याची परंपरा कायम ठेवणार नाही असा निर्धार तिने केला. त्याचवेळी शिक्षणात रूची नसणाऱ्या साबाला या सर्व गोष्टींतून मुक्त होण्यासाठी शेवटी शिक्षणाचीच मदत घ्यावी लागली, कारण शिक्षणाव्यतिरिक्त तिला घराबाहेर पडता येणार नव्हते. गल्लीत आपल्या भावंडांना क्रिकेट खेळताना पाहणे, तेही लपून या व्यतिरिक्त साबाला क्रिकेटची ओळखसुद्धा नव्हती. महाविद्यालयात वर्ग बुडवून क्रिकेट खेळणे

तिने पसंत केले. खेळ हाच तिला तिच्या कैदी जीवनातून मोकळा श्वास निर्माण करणारा होता; परंतु संध्याकाळी पुन्हा घरी गेल्यावर तो श्वास परत घुसमटत होता. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमुळे या दडपशाहीतून मुक्त होण्यासाठी तिला संधी मिळाली. शेखूपुरा, मुरिडके या गावापासून तासाभराच्या अंतरावर ही स्पर्धा होती. कुटुंबात कोणालाही न सांगता ती या स्पर्धेत सहभागी झाली. इतर मुलींबरोबर खेळताना त्या कशा मुक्तपणे पळतात, वावरतात आणि कोणत्याही खेळात बिनदिक्कत सहभागी होतात, हे पाहून ती भारावून गेली. कदाचित मीसुद्धा शेखूपुरात जन्माला आले असते तर या मुलींप्रमाणे खेळू शकले असते, असे तिला वाटले; परंतु हा तिचा आनंद फार काळ टिकला नाही. संध्याकाळी उशिरा परतताना आईसमोर तिची चोरी पकडली गेली आणि तिने साबाला रागावले, धमकावले आणि जर घरात हे समजले, तर तुझे वडील आणि भाऊ तुझे शिक्षण बंद करतील अशी धमकी दिली; परंतु या गोष्टींची तिला तमा नव्हती कारण तिला आज खेळण्याची संधी मिळाली होती आणि ती याच सुंदर विश्वात रमली होती.

शेखूपुरातील याच स्पर्धेत पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या निवडकर्त्यांसमोर गोलंदाजी करण्याची संधी तिला मिळाली. तिच्या कामगिरीने निवडकर्त्यांना प्रभावित केले आणि दुसऱ्या दिवशी एका सामन्यात खेळण्यासाठी तिची निवड करण्यात आली; परंतु तिची परवड अजून संपलेली नव्हती कारण तिला स्वखर्चाने शेखूपुराला जायचे होते आणि आर्थिकदृष्ट्या तिच्या कुटुंबाला हे परवडणारे नव्हते. कारण आत्तापर्यंत ती महाविद्यालयाकडूनच सर्व प्रवास करत होती आणि त्याहूनही तिला तिचे कुटुंब या गोष्टीसाठी परवानगी देतील की नाही याची शंका होती. शेवटी शाळेतील एका प्रशिक्षकाच्या मदतीने तिने शेजारील गावातून सकाळी बस पकडली, नंतर रिक्षा करून ती स्पर्धेच्या ठिकाणी पोहचली; परंतु संपूर्ण प्रवासात तिला हीच भीती वाटत होती की जर आपल्याला कोणी पाहिले तर आपण संपलोच; परंतु तिला कोणीही पाहिले नाही. ती या सामन्यासाठी उशिरा पोहोचली. परंतु कपडे परिधान केल्यावर आणि खेळण्यासाठी मैदानात उतरल्यावर तिचा या गोष्टीवर विश्वासच बसला नाही कारण तिने स्वप्नातसुद्धा कधी हे अपेक्षित धरले नव्हते. त्या दिवशी पंचांनी ती वेगवान गोलंदाज नाही, असे म्हटल्यावर तिने त्यांच्याबरोबर वाद घातला आणि मी वेगवान गोलंदाजच आहे असे म्हटले. शेवटी तिला बॅट फिरवणे आणि चेंडू फेकणे याशिवाय क्रिकेटमधली दुसरी काहीही माहिती नव्हती आणि ज्ञानही नव्हते; परंतु त्या दिवशीच्या तिच्या प्रदर्शनाने वाहवा मिळवली

आणि पुढील प्रवासासाठी हेच तिला प्रेरणा देणारे ठरले. या सामन्यातील जर्सी ती महाविद्यालयात खेळताना कायम घालत होती कारण त्यावर पीसीबीचा लोगो होता आणि या लोगोचा काय प्रभाव पडू शकतो याची तिला स्वप्नातही कल्पना नव्हती. तिच्या मैत्रिणीच्या भावाने तिला असे खेळताना पाहून मुरिडके जिमखाना क्लबमध्ये खेळण्याचे सुचवले; परंतु घरची परिस्थिती आणि वडील, भाऊ यांची भीती वाटत असतानासुद्धा तिने आईला सर्व परिस्थिती समजावली आणि मी आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करू शकते याची शाश्वती दिली. शेवटी आईच्या संमतीने ती क्लबमध्ये गेली. सुरुवातीला तिला खेळण्याची परवानगी नाकारण्यात आली; परंतु तिने पीसीबी लोगोची जर्सी घातल्यावर तिथल्या स्टाफने तिला परवानगी दिली.

वकार सरफराज या प्रशिक्षकाला तिच्या गोलंदाजीने विशेष प्रभावित केले. त्यांनी तिच्या आईला साबाचे भविष्य, आर्थिक आणि इतर गोष्टींसाठी खूपच उज्ज्वल असल्याची ग्वाही दिली. तसेच स्वतः आपण तिला रोज आणण्याची जबाबदारी स्वीकारत असल्याचे सांगितले. आईने शेवटी वडील आणि भावाच्या विरोधात जाऊन गुप्तपणे साबाला मदत करण्याचे ठरवले. परंतु काही महिन्यांनंतरच वकार सरफराज यांनी क्लब सोडून स्थानिक ठिकाणी प्रशिक्षण सुरू केले, जे साबाच्या भावाच्या कंपनी शेजारीच होते. जेव्हा कंपनी कर्मचारी घरी परतत तेव्हा साबाला कुठेतरी लपावे लागायचे. तरी इतर गावांचे पुरुष एका मुलीला क्रिकेट खेळताना पाहून अचंबित व्हायचे. त्यामुळे ती अस्वस्थ व्हायची आणि झाडामागे लपायची. प्रशिक्षकांना तिची ही अडचण लक्षात आली आणि त्यांनी तिला सल्ला दिला की अशी वृत्ती बाळगली तर ती कधीही पुढे जाऊ शकत नाही. ही गोष्ट तुला स्वीकारावीच लागेल आणि तसेच खेळावे लागेल. साबाची आई या सर्व घटनांनी भयभीत होत होती आणि जेव्हा केव्हा पावसामुळे प्रशिक्षण रद्द व्हायचे, ती आनंदी व्हायची.

प्रशिक्षणार्थींमधील एका मुलाने तिला लाहोर येथील किनार्ड महाविद्यालयात स्पर्धात्मक सामन्यासाठी जाण्यासाठी प्रवास खर्चाची मदत केली; परंतु नंतर तिला हे सर्व ओझे वाटू लागले. शेवटी महाविद्यालयातील एका शिक्षकाने तिला महाविद्यालयाच्या बसने प्रवास करण्याचे सुचवले. यामुळे तिचा प्रवास खर्च वाचणार होता. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी तिने बसमध्ये प्रवेश केला; परंतु बस वाहकाने तिला लगेच पुढच्या स्टॉपवर उतरवले आणि सांगितले की ही बस

फक्त मुलांसाठी आहे. ती रडतच आपल्या शिक्षकाकडे गेली. त्यांनी तिला केस कापून मुलाप्रमाणे दिसण्याचा सल्ला दिला. तेव्हा तिने सांगितले की आमच्या घरात हा खुनापेक्षाही मोठा गुन्हा समजला जातो आणि मला ते मारून मारून माझा लगदा करतील.

शेवटी धाडस करून ती लहान भावाला बरोबर घेऊन एका स्वस्त केस कर्तनालयात केस कापण्यासाठी गेली. केस कापणारा प्रत्येक वेळी बस्स का ? बस्स का ? विचारी. साबा अजून-कमी, अजून-कमी म्हणून केस कापायला सांगायची. शेवटी केस बऱ्यापैकी लहान केल्यावर आपण यापेक्षा जास्त केस कमी करणार नाही म्हणून त्या न्हाव्याने साबाला नकार दिला. घरी परतल्यानंतर घरात कोहराम माजला. वडिलांनी साबाच्या कानशिलात लगावली. भावाने तिला धक्के देत जमिनीवर पाडले. वडिलांनी तिच्या आईला मुलगी हाताबाहेर जाण्यासाठी तिलाच दोषी ठरविले. त्या दिवसापासून साबाचे खाणे-पिणे बंद करून टाकले. तरीही साबाने भावाला ठणकावून सांगितले की तुला मला मारायचे असेल तर मारून टाक; परंतु मी क्रिकेट खेळणे बंद करणार नाही. तू माझे हातपाय तोडले तरी मी रांगत मैदानात जाईन आणि खेळेनच. या सर्व धमक्यांना, भीतीला न जुमानता सकाळी पुन्हा ती मुलांच्या बसच्या टपावर बसून क्रिकेट खेळायला गेली. एकदा पकडले गेल्यावर त्या बसवाहकाने तिला बेदम मारले आणि तिकीट काढायला पैसे नसल्याने पोलिसांची धमकी देऊन बसमधून बाहेर फेकले. तरीही ती रोज बसमध्ये दामटून प्रवास करत राहिली. तिकीट न काढल्यामुळे वाचलेल्या पैशातून ती नान घेऊन पाण्याबरोबर खायची. कधी कधी ती उपाशीच झोपायची. किनार्ड महाविद्यालयात तसे बरेच विद्यार्थी हे श्रीमंत घरातील होते. जेवताना ते जेवण एवढे वाया घालवायचे की साबा हैराण व्हायची. तेव्हा साबा अल्लाहला दोष द्यायची. हा कसला न्याय आहे, काहींना एवढे जेवण देतो की ते कचरापेटीत टाकून देतात आणि मला माझी फक्त भूक भागवण्यासाठीसुद्धा ते मिळत नाही. रात्री उशिरा नऊ नंतर ती घरी पोहोचत असे. लहान भावाच्या मदतीने गुपचूप घरात घुसून ती झोपी जाई. परंतु हे करताना तिला रात्रीच्या जेवणास मुकावे लागे. अपुरे जेवण आणि अस्वच्छ पाण्याच्या सेवनामुळे, तापाने ती आजारी पडली. लहान केसांमुळे तिला दवाखान्यात नेण्यास तिच्या कुटुंबियांना लाज आणि भीती वाटत होती म्हणून तिला विनाउपचार घरातच ठेवले होते. महिनाभर सरावाला न आल्यामुळे प्रशिक्षक भेटायला गेले. शेवटी त्यांनी स्वखर्चाने तिला दवाखान्यात

दाखल केले तेव्हा तिला विषमज्वर (टायफाईड) झाल्याचे निदान करण्यात आले.

आजारातून बरे झाल्यावर तिने सराव सुरू केला आणि तिच्या मेहनतीचे फळ तिला लवकरच मिळाले. दिवंगत पंतप्रधान श्रीमती बेनझीर भुट्टो महिला क्रिकेट या स्थानिक स्पर्धेत, जी पाकिस्तान क्रिकेट मंडळाने आयोजित केली होती, तिची निवड झाली. या स्पर्धेमुळे साबाचे जीवनच पालटून गेले. वर्तमानपत्रातील तिच्या फोटोला बघून अनेक शेजारी तिचे अभिनंदन करण्यासाठी घरी गेले आणि प्रथमच तिच्या कुटुंबाला साबाचे क्रिकेट खेळणे लाजिरवाणे न वाटता गौरवास्पदच वाटले. त्यानंतर तिच्या कुटुंबियांचे मत एका रात्रीत बदलले. त्यांनी तिला फक्त मुक्तपणे क्रिकेट खेळण्यासच परवानगी दिली नाही तर लाहोर येथे तिला राहण्याची मुभासुद्धा दिली. तिच्या कुटुंबात ती पहिली महिला होती, जी स्वकर्तृत्वावर आपले जीवन जगणार होती.

लाहोरला पाकिस्तान रुपया ३०० मानधनात तिचे जगणे मुश्किल होते. त्यामुळे दरवेळी अर्धपोटी आणि विना औषधोपचार ती खूप काळ तग धरू शकत नव्हती. वर्षातून दोन आठवडे क्रिकेट खेळणेसुद्धा तिच्या सरावासाठी योग्य नव्हते. शेवटी तिने आलीम दार क्रिकेट अँकेडमीमध्ये प्रवेश घेतला. ते तिच्या विद्यापीठापासून दहा किलोमीटर अंतरावर होते. रोज एवढे अंतर चालत जाणे तिच्यासाठी कठीण होते. शेवटी काही महिन्यांनंतर आंतरविद्यापीठ स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केल्यामुळे तिचे मानधन पाकिस्तान रुपया २,५०० झाले आणि सगळ्यात आधी तिने स्वतःसाठी एक जुनी सायकल खरेदी केली. त्यावर ती रोज २८ किलोमीटर प्रवास करू शकणार होती. ती विकत घेतल्यानंतर तिला ती चालवतासुद्धा येत नव्हती. शेवटी तिने पुन्हा चालत जाण्याचा मार्ग स्वीकारला. शेवटी जिद्दीने तिने सायकल सराव सुरू केला आणि बस-रिक्षा भाडे परवडत नसल्याने रोज २८ किलोमीटर प्रवास ती त्या सायकलवरून करू लागली. रमजान महिन्यातील उपवासामुळे अशक्तपणा येऊन ती एकदा रस्त्यावरच त्या सायकलवरून पडली. सायकल चालवल्यामुळे तिच्या शरीरावर जखमा झाल्या होत्या. नंतर एका अनोळख्या व्यक्तीने तिला उठवले, पाणी पाजले आणि खाऊ घातले. अल्लाहनेच त्याला माझ्यासाठी पाठवले होते, असे ती खाताना रडत रडतच म्हणत होती. सरते शेवटी आजारांवरील उपचारामुळे तिचे मानधन तिला अपुरे पडू लागले. त्यामुळे तिने नोकरी करण्याचा विचार केला; परंतु त्यासाठी तिला क्रिकेट सोडावे लागणार होते. घरची आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्यामुळे तिने जल आणि

ऊर्जा खात्यात नोकरी सुरू केली. तिथे तिला क्रिकेट सोडून बेसबॉल खेळण्यास मिळणार होते. शेवटी नोकरीतून पाकिस्तान रुपया ३५,००० साठवून तिने पुन्हा क्रिकेटकडे वळण्याचा निर्णय घेतला आणि महिला क्रिकेटसाठी असणाऱ्या किनार्ड कॉलेजमध्ये तिने प्रवेश घेतला. तिने आपले पाकिस्तानसाठी क्रिकेट खेळण्याचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी शेवटची संधी म्हणून हा निर्णय घेतला. पाकिस्तानसाठी क्रिकेट खेळण्याच्या स्वप्नांसाठी तिने आतापर्यंत कुटुंबियांच्या इच्छा, असंख्य सामाजिक बंधने आणि कितीतरी तडजोडी, बलिदानांचा सामना केला होता. वर्षभरानंतर जेव्हा ७५ क्रिकेटरांची यादी निवडली गेली त्यात तिचे नाव नव्हते. हा तिच्यासाठी मोठा आघात होता. तरी न खचता तिने पुन्हा अजून एक वर्ष तयारी केली. हा तिचा निर्णय खूपच धाडसी आणि धीट होता. याचे तिला लवकरच फळ मिळाले.

२०१८ साली कराची येथील पाकिस्तान क्रिकेट बोर्ड एकादश महिला संघात तिची निवड झाली. तरीही येथे तिचे दुर्दैव पुन्हा आड आले. पहिल्या सामन्यात, तेही तगड्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध तिला विषमज्वर झाला होता; परंतु काहीही झाले तरी आपल्याला खेळायचेच आहे हे ठरवून तिने संघ सहकाऱ्यांपासून आपल्या जबर तापाची लक्षणे लपवली. तिचा संघ या सामन्यात सपाटून हरला परंतु ४ षटकांमध्ये ७ धावा देत १ बळी अशी तिची वेधक कामगिरी होती. पुढच्याच सामन्यात तिने ३ बळी मिळवले. संपूर्ण स्पर्धेत ती सामायिक सर्वाधिक बळी घेणारी खेळाडू बनली आणि ही कामगिरी पत्रकारांनी उचलून धरली. कॅमेरा आणि पत्रकारांसमोर ती एवढी गांगरून गेली की तिला काय विचारले जात आहे हेच समजत नव्हते. तिच्या या दैदिप्यमान कामगिरीने प्रभावित होऊन पाकिस्तान महिला संघ प्रशिक्षक मार्क कोलस यांनी तिची T२० वर्ल्डकप प्रशिक्षणासाठी निवड केली. T२० वर्ल्डकप प्रशिक्षणात तिला पाकिस्तान संघाची जर्सी भेटली. तिचा यावर विश्वासच बसत नव्हता. आरशात स्वतःला ती जर्सी घातल्यावर इतकी सुंदर पाहून ती काढण्याची तिची इच्छाच होत नव्हती. असेच घालून झोपण्याची तिची इच्छा होत होती. ती जर्सी परत करण्यासाठी ती तयार नव्हती; परंतु शेवटी प्रशिक्षणानंतर तिला ती परत करावीच लागली. त्यावर्षीच्या वर्ल्डकपला तिची निवड झाली नाही; परंतु थोड्याच महिन्यांत वेस्टइंडीज बरोबरच्या सामन्यांसाठी तिची दुबई येथील स्पर्धेत निवड झाली. त्यासाठी तिला प्रथमच विमान प्रवास करता आला. ज्या मुलीला बस-रिक्षा भाडे देणे जमत नव्हते ती आज विमान

प्रवास करणार होती. तिने हे तिच्या वडिलांना सांगितले तेव्हा ते थोडे चिंतित झाले, तिने एवढे पैसे कुठून आणले असतील. तेव्हा तिने अल्लाहनेच माझे म्हणणे ऐकले व मला या प्रवासासाठी स्वतःहून खर्च करण्याची गरज नाही, असे म्हटले.

जरी बोर्ड सर्व राहण्या-खाण्याचा, प्रवासाचा खर्च करीत असला तरी साबाला सर्वात अनमोल ठरली ती तिची जर्सी, जी तिला आता परत करावी लागणार नव्हती. सरावा दरम्यान दिवसभर, जेवताना-झोपताना ती जर्सी घालूनच राहिली. तिचे सहकारी या तिच्या वेडेपणावर हसत होते; परंतु त्यांना काय माहीत ही जर्सी तिच्यासाठी काय होती कारण आता ती जर्सी तिची होती.

मुरिडके गावातील एक मुलगी पाकिस्तान संघासाठी क्रिकेट खेळते आहे, ही बातमी वाऱ्यासारखी तिच्या स्थानिक ठिकाणी पोहचली. अनेक पत्रकार तिच्या घरी मुलाखत घेण्यासाठी गेले; परंतु तिने वडिलांना, आता आपण श्रीमंत झालो आहोत आणि आपली परिस्थिती काय आहे, हे न सांगण्यास बजावले कारण तिला भीती वाटली की, त्यामुळे चोरांच्या रडारावर तिचे कुटुंब आले असते आणि त्यांनी तिच्या घरी चोरी केली असती.

साबाला तिची पहिली कमाई वडिलांना द्यायची होती कारण त्यांनी त्यांच्या कुटुंबासाठी खूप कष्ट घेतले होते. मुलांनी शिकावे, कमवावे हेच स्वप्न त्यांनी बघितले होते; परंतु ते पूर्ण होऊ शकले नाही. शेवटी एका मुलीने हे स्वप्न पूर्ण केले होते. साबाने पाकिस्तान रुपये ५०,००० वडिलांच्या हातात ठेवले, ते त्यांनी घ्यायचे नाकारले, कारण मी तुझ्यासाठी काहीच केले नाही असे त्यांचे म्हणणे होते. शेवटी त्यांनी अभिमानाने म्हटले, जे माझ्या मुलांनी मला दिले नाही ते माझ्या मुलीने मला आणून दिले. परंतु साबाच्या म्हणण्यानुसार, मला माहीत होते की आपल्या समाजात मुलींसाठी किती मर्यादा आहेत. आता मला माझ्या वडिलांना काम करू द्यायचे नव्हते कारण ते आता थकले होते. संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी आता मी घेणार होते. मी आणि माझा अल्लाहच जाणतो माझा प्रवास. मी ज्यावेळी सामने खेळेन त्यावेळी इतर पालक आपल्या मुलींच्या पाठीशी उभे राहताना मला बघायचे आहे. कारण मी खेळत असताना माझ्या पालकांना मी हे सांगूसुद्धा शकत नव्हते की मी खेळत आहे. मला माझ्या कुटुंबियांचा फक्त आधार हवा होता, पैसा नव्हे. माझा प्रवास खूपच उशिरा सुरू झाला. जर माझ्या कुटुंबीयांनी मला योग्य वेळी साथ दिली असती तर आजचे चित्र वेगळेच असते आणि तिने आपल्या अश्रूंचा बांध मोकळा केला.

साबाचा अविश्वसनीय प्रवास फक्त गरिबीवर, भुकेवर, सामाजिक बहिष्कारावर मात करून झालेला नव्हता तर समाजातील एका एकत्रित धाग्याने, ज्याने महिलांना खेळण्यासाठी अडचण निर्माण केली होती अशा सर्व महिलांच्या संघर्षाचा प्रवास होता. पाकिस्तान क्रिकेट महिला संघाची कर्णधार साना मीर यांनी, असे पालक जेव्हा आपल्या मुलींना आधार देत नाहीत हे बघितले की संताप येतो असे म्हटले; परंतु साबाचे याबाबतीत म्हणणे वेगळेच आहे. असे पालक जेव्हा मुलींना मारतात, क्रिकेट खेळण्यासाठी मनाई करतात तेव्हा त्यांच्या गोष्टी ऐकून पाश्चिमात्य देश त्यांना उचलून धरतात, त्यांना प्रसिद्धी देतात. परंतु आपल्या पालकांना आता धीट व्हावे लागेल, यात त्यांची चूक नाही. आपल्या देशाची यंत्रणाच अशी आहे की सामाजिक दबावाखाली हे पालक आपल्या मुलींना अशी वागणूक देतात. त्यांना त्यांची काळजी वाटत असते. मला माझ्या वडिलांचा अभिमान आहे त्यांनी मला प्रशिक्षणासाठी दूर गावी पाठवले. त्यांना माहीत होते की मला पोटभर जेवण, झोपण्यासाठी ठीकठाक बिछाना सुद्धा मिळणार नाही, तरीही त्यांनी हा निर्णय घेतला. असे बरेच पालक आहेत जे असे निर्णय घेऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्याबद्दल गैरसमज करून घेऊ नये. त्यांना मुलींवर अधिकार गाजवायचा नसतो तर त्यांना त्यांची काळजी वाटत असते. मी वडिलांना समजावत असे, ज्यात मी कधी यशस्वी तर कधी अयशस्वी होत असे.

साबाचे हे बोल २०१६ च्या T२० वर्ल्ड कपमधील भारताला हरवल्यानंतरचे होते. साबासारख्यांना अनेक अडचणींना सामोरे गेल्यानंतर कुटुंबाची साथ योग्यवेळी भेटली, म्हणूनच ती आज सर्वोच्च ठिकाणी आहे. परंतु अशा कितीतरी मुलींची कहाणी कुटुंबीयांच्या आधाराविना संपलेली आहे आणि ऐकिवातही नसणार आहे.

हा लेख खालील इंग्रजी पुस्तकातून भाषांतर करून लिहिला आहे.

Unveiling JAZBA - a History of Pakistan Women's Cricket

by - Aayush Puthran

Polaris Publishing, 2022

India Publishing - Westland Books

*(अनुवादक हे अभियंता असून मुस्लीम सत्य. मंडळाचे सहकार्यवाह आहेत.)*

■ ■

व्यक्तिविशेष

# फिर भी फातिमा शेख अपरिचित क्यो ?

**• मुबिना जमीर**



सम्मानजनक जीवन जीने की एक लंबी ऐतिहासिक संघर्ष परंपरा के बावजूद आज नारी समाज पुरुषों की तुलना में अपने आप को हाशिए पर पाती है। दुनिया की पचास प्रतिशत आबादी (पुरुष) अपनी आजादी का उत्सव मना रही है, वही दुसरी तरफ पचास प्रतिशत आबादी यानी महिलायें आज भी अपनी आजादी और अधिकारों के लिए संघर्ष कर रही है। और उसमें भी १२.५ प्रतिशत मुस्लिम महिलायें आज भी कडा संघर्ष कर रही है। इसका उदाहरण इराण की महिलायें, आज भी हिजाब के विरोध में सड़को पर उतरकर पुरुषसत्ता के खिलाफ अपना गुस्सा प्रदर्शित कर रही है। हमारे भारत देश में भी मुस्लिम महिलाओं के प्रश्न आज भी आझादी के पहले जैसे थे। आजादी के पचहत्तर साल बाद भी वैसे ही है।

हमारा भारतीय पुरुषसत्ताक समाज इस तथ्य को भूल गया है कि, नारी भी मानव है, और उसमें भी बुद्धी है एवं उसका भी स्वतंत्र व्यक्तित्व है। उन्नीसवी सदीं मे भी नारी गुलाम बनकर सामाजिक व्यवस्था की चक्की में पिसती जा रही थी। अज्ञानांधकार, कर्मकांड, वर्णभेद, जाति पाती, बालविवाह, मुंडन तथा सतीप्रथा आदी व्याधीयों से नारी जाती व्यथित थी। अतः परावलंबी जीवन जीने की आदी हो चुकी थी। सभी धर्म के धर्मगुरू इसी बात को दोहराते थे की नारी परावलंबी है वह पिता, पति, पुत्र और भाई के सहारे के बिना नही रह सकती। नारी स्वतंत्रता का आंदोलन सदीर्घ इतिहास में आज तक उतना सफल नही हुआ। इस दरम्यान कई धर्म संप्रदाय स्थापित हुए, पनपे, लेकीन उनमे से किसी में भी नारी समानता को स्थान नहीं मिला। यहुदी, इस्लाम, इसाई आदी विदेशी धर्मों मे भी

नारी समानता का सवाल कभी उपस्थित नही हुआ। सभी धर्मों में नारी का संबंध केवल पापों से ही जोडा गया। हिंदु शास्त्रानुसार नारी एवं शुद्र को विद्यार्जन का अधिकार नही था। नारी अगर शिक्षा लेगी तो वह कुमार्ग पर चलेगी और घर का सुख चैन नष्ट हो जायेगा। यह झूठी धारणा फैलाई गयी थी कि लडकी के शिक्षा प्राप्त करने पर उसे अकाल वैधव्य आता है। स्त्री का पैर में चप्पल पहनना भी अपवित्र समझा जाता था। नारी शिक्षा के द्वार धर्म के ठेकेदारों ने बंद कर दिये थे। ऐसे में फातिमा का जन्म ९ जनवारी १८३१ को हुआ। फातीमा का परिवार उत्तर प्रदेश में रहता था। बाद में वहाँ से वे मालेगाव (नासिक) में आये। उनके परिवार के लोग हॅण्डलुम टेक्सटाईल का काम करते। आर्थिक संकट के कारण वे लोग मालेगाव मे रहने लगे थे। फातिमाजी ने कम उम्र में ही अपने माता पिता को खो दिया था। ऐसी स्थिती में वह अपने भाई उस्मानजी की देखरेख में पली बढी। उसके बाद पूना के गंजपेठ इलाके में रहनेवाले गफ्फार बेग ने इन भाई-बहन को अपने बच्चों की तरह पाला। इन्ही की देखरेख में दोनो बड़े हुए। इस प्रकार दोनो भाई-बहन पूना मे रहने लगे।

जहाँ तक मुस्लिम समाज के भीतर कानून कायदों की बात है वह भी लगभग ऐसी ही मान्यताएँ थी जैसी हिंदू धर्म की थी। मुस्लिम औरते परदे में रहने के लिए अभिशप्त थी। उनके घर की चार दिवारी ही उनके लिये मक्का और मदीना थी। न उनके लिए स्कूल थे न मदरसे। मस्जिदों में उन्हें भी प्रवेश निषेध था। उनपर भी हजारो बंदीशे थी। धर्म के ठेकेदार अपने अपने समाज पर हावी थे। फिर ऐसी स्थिती में एक फातिमा जैसी मुस्लिम महिला का नारी शिक्षा आंदोलन में आगे आना किसी जोखिम से कम नहीं था। जनकल्याण की उदात्त भावना के वशीभूत होकर भारत में नारी शिक्षा का प्रथम प्रयास फुले दंपति ने किया जिस में फातिमा शेखने भी मुस्लिम रूढीवादी समाज के खिलाफ जाकर नारी शिक्षा आंदोलन में फुले दंपति के कदम से कदम मिलाके चली। उन्होंने धार्मिक शिक्षा के तहत पहले उर्दु भाषा सीखी। उसके बाद मराठी भाषा भी सीखी और अन्य विषयों का भी अध्ययन किया।

समाज में जहाँ बुरे लोग होते है वहाँ अच्छे लोगों की भी कमी नहीं होती। महात्मा फुले और सावित्रीबाई ने जिस प्रकार सामाजिक क्षेत्र में योगदान दिया उसी प्रकार फातिमा शेख ने भी प्रगतिशील विचारों के साथ ज्योतिबा को साथ दिया और फुले दंपतिको जो यह योगदान फातिमा से प्राप्त हुआ उसे शब्दों में

व्यक्त करना कठीण है। इस शिक्षा आंदोलन में फातिमा ने दया, करूणा और मैत्री की शितल छाया सभी जाति धर्मों के प्रति समान बरसाई। वास्तविक महापुरुष वही होते है जो कभी भी जातीय संकीर्णता में नहीं पडते। महात्मा फुले मुसलमान बच्चों तथा अध्यापिका का भी हृदय से स्वागत करते थे।

कई अन्य भारतीय महिला सुधारकों की तरह इतिहास फातिमा शेख के बारे में भी अनजान रहा, वे अलग थलग रही। जब फुले दंपति ने निचली जातियो, विशेषकर महिलाओं को पढ़ाना शुरू किया तो उनके पिता गोविंदराव पर ब्राह्मणो द्वारा दबाव बनाकर उन्हें या तो शिक्षा देने को बंद करने या अपना घर छोड़ने पर मजबूर किया गया। दंपति ने अपना घर छोडने का फैसला किया और ऐसी विपरित परिस्थिती मे उन्हें फातिमा और उनके भाई, उस्मान शेख ने अपने घरमें रहने और स्कुल खोलने की जगह दी।

जोतिबा और सावित्री के साथ फातिमा भी रूढीवादी मुसलमानों तथा उच्च जाति के हिंदुओं के निशाने पर आ गयी। उन्होने सावित्रीबाई को अपने घर में 'स्वदेशी पुस्तकालय' नामक अपना पहला लडकियों का स्कूल स्थापित करने में मदद की, उच्च जाति के हिंदु और रूढीवादी मुसलमान सहशिक्षा और अंग्रेजी शिक्षा के विरुद्ध थे, इन सारी परेशानियों से उभरते हुए सावित्री और फातिमा ने स्कूल की स्थापना की और यहा तक की एक प्रशिक्षण संस्थान मे जाकर अध्यापिका की ट्रेनिंग लेकर पेशेवर शिक्षका भी बन गयी। निश्चित ही सामाजिक न्याय की धारा को आगे बढाने के लिये फातिमा शेख ने हर प्रकार की चुनौतियों का स्वीकार किया।

फातिमा शेख के जीवन का बहुत महत्त्व है, क्योंकि उन्होने दलितों और मुसलमानों के पहले संयुक्त संघर्ष को पहचाना और आगे बढाया। सावित्रीबाई और फातिमा के जीवन संघर्ष को देखते हुए हमे यह सीखने को मिलता है कि, उत्पीडीत समूहों की एकता ने हमेशा मुक्ति का संघर्ष किया है। फातिमा ने सामाजिक और लैंगिक भेदभाव के खिलाफ लड़ाई लड़ी। फातिमा शेख ने अपने पडोसियों को समझाने के लिये घर-घर जाकर घंटो बिताए। फातिमा शेख को बहोत ज्यादा विरोध किया गया। यह विरोध दोहरा और ज्यादा तीव्र था। लोगों ने किचड फेंका, गालियाँ दी, लेकीन फातिमा ने हिम्मत नहीं हारी। शुद्रातिशुद्रों की सेवा करना, अध्यापिका बनने पर भी मुक्त में पढना, अपना घर रहने के लिए और स्कुल खोलने के लिए देना, कितना महान त्याग और कितनी असीम उदारता है। अज्ञानांधकार

मे फंसे इस समाज को विद्या का महत्त्व समझाना आवश्यक था। अल्प अवधि में पुना तथा उसके आसपास अनेक स्कूल खुलने लगे फुलेदंपति के साथ कठोर परिश्रम, सच्ची लगन और जनकल्याणी भावना तथा नारी उत्थान की उत्कट इच्छा शक्ति के साथ फातिमा भी खड़ी थी। फातिमा स्वयं एक बहोत हिम्मतवाली महिला थी और सावित्रीबाई के साहसिक कारनामों से बहुत प्रभावी थी। उन दिनों मुस्लिम स्त्रिया पर्दे से बाहर नहीं निकलती थी उस हालत में भी फातिमा ने पर्दे से बाहर आकर शिक्षा ग्रहण की। उन्होंने भी अध्यापन कार्य को ही प्रमुखता दी। फातिमा और सावित्रीबाई आजन्म सहेलिया बनी रही और एक साथ मिलकर अनाथ बच्चों का स्कूल चलाया।

इस्लाम पुरुषों और महिलाओं दोनों को शिक्षित करने को प्रोत्साहित करता है, लेकिन कुछ मुस्लिम परिवार लडकियों को स्कूल जाने से मना करते हैं। शायद इसीलिए फातिमा शेख को ज्यादा याद नहीं रखा गया, क्योंकि उनको याद रखना ऐसे कट्टरपंथीयों के लिए मन माफिक नहीं है जो पितृसत्ता और रूढिवादी विचारों को त्यागना नहीं चाहते हैं। सावित्रीबाई और जोतिबा फुले को आज भी भारत में लोग याद करते हैं। लेकिन फातिमा शेख के योगदान को काफी हद तक भूला दिया गया है। आज हम इस मुस्लिम नायिका को याद कर रहे है, यह हमारे लिये गौरव की बात है। फातिमा की १९१ वी जयंती पर गुगल ने डूडल बनाकर उनके कार्य को याद किया, बी. बी. सी.ने भी काफी स्पेस दिया, अचानक फेसबुक यूनिवर्सिटी की नींद खुल गई, और फेसबुक पर भी ट्रेंड चला लेकिन दुःख की बात तो यह है कि, मुस्लिम समाज यहाँ भी पिछे रह गया। वे अपनी ही समाज से आयी कर्मठ अध्यापिका तथा समाज सेविका को उस तरह याद नहीं कर पाये जैसा करना था। मुस्लिम क्यो अपने प्रगतिशील नायको को याद नही रख पाते ? इस गुमनाम नायिका को गुगल, फेसबुक, बीबीसी याद कर रहे हैं तो जिस समाज से यह नायिका आती है वह समाज उनसे अपरिचित क्यों है ? महाराष्ट्र सरकार के आभारी हैं जहाँ फातिमा शेख के जीवन संघर्ष को उर्दू पाठ्यक्रम में बच्चो को पढ़ाया जा रहा हैं, आशा करते हैं अन्य प्रदेशों की सरकारे भी उनके जीवन संघर्ष को पाठ्यक्रम में शामिल हैं। फातिमा का जीवन हम सबके लिये एक मिसाल है।

*(लेखिका औरंगाबाद येथे शिक्षिका असून*
*स्त्री-अभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्त्या आहेत.)*

■ ■

व्यक्तिविशेष

# सत्यशोधक फातीमाबी शेख जयंती का साजरी करावी ?

• डॉ. बेनझीर तांबोळी

*मुस्लीम सत्यशोधक मंडळ संचलित सत्यशोधक फातिमाबी शेख महिला मंचच्यावतीने ९ जानेवारी, २०२३ रोजी सत्यशोधक फातिमाबी शेख जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा संक्षिप्त अहवाल.*



फातिमाबी शेख यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. त्यांच्या अस्तित्वाबद्दलही काहीजण प्रश्न उपस्थित करतात. वास्तविक फातिमाबी शेख यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती उपलब्ध नसणे हाच फातिमाबी शेख यांच्यावरील मोठा अन्याय आहे. हे असे का ? या प्रश्नाचे उत्तर सापडत नाही. याचे उत्तर सापडत नाही याचा अर्थ फातिमाबी शेख यांच्याबद्दलचा आदर कमी होत नाही. वंचितांच्या शिक्षणातील फातिमाबींचे योगदान हे नि:संदिग्ध आहे आणि त्याचे काही ऐतिहासिक पुरावे आहेत. फातिमाबी शेख यांचा जन्मकाळ हा सुमारे २०० वर्षांपूर्वीचा असला, तरी आजच्या महिलांसाठी त्या स्फूर्तिस्थान आणि आदर्श आहेत. त्यांचे स्मरण, त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांचा जन्मोत्सव आजच्या प्रत्येक स्त्री-पुरुषाने साजरा केला पाहिजे.

महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना २४ सप्टेंबर, १८७३ रोजी केली. भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष आणि सत्यशोधक समाजाचे शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष असा योग म्हणजे हे २०२३ हे वर्ष. महात्मा फुल्यांना गुरुस्थानी ठेवून सत्यशोधक विचारांना राजाश्रय देणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू यांचे स्मृतिशताब्दी वर्ष चालू

आहे. सत्यशोधक विचारांचा प्रचार-प्रसार करणाऱ्या श्रेयनामावलीत अलीकडे ज्या प्रबोधकांची नोंद होते त्यात नि:संशयपणे सत्यशोधक फातिमाबी शेख यांच्या नावाचा उल्लेख होतो. किंबहुना जेव्हा जेव्हा क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव घेतले जाते तेव्हा फातिमाबी शेख यांचा उल्लेख होतोच. मात्र दुर्दैवाने फातिमाबी शेख यांच्या चरित्रात्मक माहितीबद्दल अज्ञान आणि अनभिज्ञता जाणवते. इतिहासकार सावित्रीबाई आणि महात्मा फुले यांचे समकालीन सहकारी असणाऱ्या फातिमाबी, उस्मान शेख, गफूरबेग मुन्शी आणि इतरांची पुरेशी दखल घेण्यात कमी पडले का ? समाजाने याबाबतीत अनास्था दाखवली का ? असे अनेक प्रश्न आज तरी अनुत्तरीतच आहेत.

मागील काही वर्षांपासून समाज माध्यमातून फातिमाबी शेख यांचा नसलेला एक फोटो ठराविक काळानंतर व्हायरल करून त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन केले जाते. वास्तविक चुकीचा फोटो आणि चुकीची जन्मतारीख मोठ्या प्रमाणात व्हायरल करून फातिमाबी शेख यांच्याबद्दलची संदिग्धता वाढवण्यात येत आहे असे दिसते. परिणामी काही लोक फातिमाबी शेख सावित्रीबाई फुले - महात्मा फुले यांच्या समवेत होत्या की त्या निर्माण केलेल्या एक काल्पनिक पात्र आहेत अशी शंका व्यक्त करतात. तसेच फातिमाबी शेख आणि उस्मान शेख हे भाऊ-बहीण असावेत की पती-पत्नी असावेत, अशीही शंका उपस्थित केली जाते. तत्कालीन परिस्थिती लक्षात घेता त्या कुमारिका होत्या, परित्यक्त्या होत्या की विधवा ह्या प्रश्नाचेही उत्तर मिळत नाही. फातिमाबी यांच्याबद्दलचे अज्ञान, अपसमज आणि अनभिज्ञता ही निश्चितच अन्यायकारक आहे; परंतु अलीकडे फातिमाबीबद्दलची जिज्ञासा जशी वाढली आहे तशीच त्यांच्याविषयी आदर आणि आकर्षणही वाढले आहे.

फातिमाबी शेख यांच्याविषयी जी अल्प आणि अधिकृत माहिती उपलब्ध आहे त्यावरून त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची कल्पना येते. त्या केवळ सावित्रीबाई फुले यांच्या सहकारी आणि मैत्रीण नव्हत्या, तर त्यांच्या खांद्याला खांदा लावून वंचित आणि उपेक्षितांच्या शिक्षणासाठी योगदान देणाऱ्या प्रबोधक होत्या ! स्त्रियांना शिक्षण देत असताना क्रांतिज्योती सावित्रीबाईंना जो अवमान-अपमान सहन करावा लागला, अंगावर दगड, चिखल, शेण फेकले गेले तसेच एक समकालीन सोबती आणि सहशिक्षक म्हणून फातिमालाही सहन करावे लागले असणार यात शंका नाही.

ख्रिस्ती मिशनरी लोखंडे यांनी काढलेल्या पुस्तकातील फोटो आणि 'मजूर' मासिकात प्रसिद्ध झालेल्या फोटोत सावित्रीबाई आणि फातिमाबी यांच्यासोबत दोन विद्यार्थिनी दिसतात. या फोटोत जो सावित्रीबाई आणि फातिमाबीचा फोटो आहे तोच आज वापरला जातो. 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय' या पुस्तकातील फोटोत सावित्रीबाईंच्या शेजारी ज्यांचा फोटो आहे त्या इतर कोणी नसून फातिमा शेख आहेत. आणखी एक महत्त्वाचा पुरावा म्हणजे सावित्रीबाई आजारी असताना त्या सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे गेल्या होत्या. त्यावेळी त्यांनी १० ऑक्टोबर १८५६ रोजी जोतिबांना पत्र लिहिले होते. अस्पृश्य, वंचित, महिलांसाठी काढलेल्या शाळांविषयी जोतिबांना चिंता वाटत होती. त्यावेळी जोतिबांना आश्वस्त करण्यासाठी सावित्रीबाई पत्रात लिहतात, 'माझी काळजी करू नका, तब्बेत ठीक होताच मी पुण्यात परत येईन. फातिमाला त्रास होत असेल; पण ती कुरकूर करणार नाही.' सावित्रीबाईंच्या अनुपस्थितीत फातिमाबींनी केवळ शिक्षिका म्हणून नाही, तर मुख्याध्यापक म्हणूनही काम पाहिले होते. या अर्थाने त्या मुस्लीम समाजातील जशा पहिल्या शिक्षिका ठरतात तशाच प्रथम मुख्याध्यापकही. १ जानेवारी, १८४८ रोजी फुले दांपत्यांनी पुण्यात पहिली मुलींची शाळा काढली. त्या शाळेच्या स्थापनेत आणि चालवण्यात फातिमाबी शेख यांचाही वाटा होता हे सिद्ध होते. एक ध्येयवादी शिक्षिका म्हणून फातिमाबीने दिलेले योगदान ऐतिहासिक आणि शाश्वत आहे.

फुले दांपत्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या स्थापनेत फातिमाबी शेख यांचा समावेश होता. तसेच यानिमित्ताने तयार करण्यात आलेल्या सत्यशोधक समाजाच्या सभासद यादीत इलायजा शालेमान, अजम इलायजा शालेमान अशा मुस्लीम सदस्यांचा उल्लेख आहे.

फातिमाबी शेख यांचा जन्म-मृत्यू आणि सविस्तर चरित्रात्मक अधिकृत माहिती नाही म्हणून त्यांची उपेक्षा होऊ नये. याची दखल घेऊन उपलब्ध माहिती आणि तर्काच्या आधारे गुगलने ९ जानेवारी ही तारीख त्यांचा जन्मदिवस म्हणून घोषित केला आहे. गुगलडुगलच्या माध्यमातून त्यांचा अधिकृत फोटो प्रसिद्ध केला गेला आहे. या दिवसाला फातिमाबी शेख यांचे स्मरण आणि अभिवादन करण्यासाठी मान्यता मिळाली आहे.

तसेच अत्यंत अभिमानास्पद बातमी म्हणजे यावर्षी आंध्र प्रदेश शासनाने इयत्ता आठवीच्या पाठ्यपुस्तकात फातिमाबी शेख यांचा समावेश केला आहे.

तसेच जयंतीच्या चार दिवसांपूर्वी म्हणजे ५ जानेवारी, २०२३ रोजी फातिमाबी शेख यांच्या भारतातील पहिल्या पुतळ्याचे अनावरण करनूल जिल्ह्यातील इमीगनूर येथील जिल्हा परिषद शाळेच्या आवारात केले आहे. फुले, शाहू, आंबेडकरांचा पुरोगामी वारसा असणाऱ्या आणि फातिमाबी शेख यांची कर्मभूमी असणाऱ्या महाराष्ट्रात सावित्रीच्या सत्यशोधक भगिनीची उपेक्षा होऊ नये असे वाटते.

याच निमित्ताने ९ जानेवारी रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या सत्यशोधक फातिमाबी शेख महिला मंचच्यावतीने फातिमाबी शेख यांचे स्मरण करण्यासाठी डॉ. बेनझीर तांबोळी यांच्या अध्यक्षतेखाली एका छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. आबेदा शेख, समीना पठाण, अप्सरा आगा, श्रीरूपा बागवान या चौघींनी या प्रसंगी आपले विचार व्यक्त केले.

फातिमा शेख यांच्याविषयी माहिती देऊन त्यांचे योगदान आबेदा शेख यांनी स्पष्ट केले. आजही मुस्लीम मुली ज्या परिस्थितीत शिक्षण घेतात, त्यांच्या पालकांना काय संघर्ष करावा लागतो हेही यांनी त्यांच्या शिक्षिका म्हणून आलेल्या अनुभवावरून सांगितले.

समीना पठाण यांनी शिक्षण घेतल्याने काय बदल घडायला हवेत हे स्पष्ट केले. अर्थार्जन करण्याशी क्षमता निर्माण होणे, निर्णयप्रक्रियेत सहभागी होता येणे ह्याचबरोबर विचारात सकारात्मक परिवर्तन होणे हेही तितकेच गरजेचे आहे ह्यावर त्यांनी भर दिला.

आजच्या बदलत्या परिस्थितीत मुस्लीम तरुणांच्यापुढील आव्हाने वेगळी आहेत. शिक्षण घेऊन पुढे जाणाऱ्यांना दोन्ही बाजूंनी समस्या निर्माण केल्या जातात. समाज कधीकाळी अनुभवलेल्या मागासपणाकडे पुन्हा वाटचाल करू लागला आहे, जे अत्यंत धोकादायक आहे असे प्रतिपादन अप्सरा आगा यांनी केले.

श्रीरूपा बागवान यांनीही आपले विचार मांडताना असे सांगितले की, पूर्वीपेक्षा जरी स्त्रियांच्या वाटा अधिक मोकळ्या झाल्या असल्या, तरी आव्हानेही काळानुरूप बदलली आहेत किंबहुना अधिक खडतर झाली आहेत. मुस्लीम स्त्रियांची किंवा सर्वच स्त्रियांची वाटचाल तेव्हाही सोपी नव्हती आणि आज तर अजिबातच नाही.

या कार्यक्रमादरम्यान प्रश्नोत्तरे आणि अनुषंगिक चर्चेमध्ये उपस्थित तरुण मुलांनी अनेक प्रश्न विचारले आणि काही मुद्देही मांडले.

अध्यक्षीय भाषणात वक्त्यांच्या भाषणाचा परामर्श घेऊन डॉ. बेनझीर

तांबोळी यांनी काही मुद्यांवर भाष्य केले.

फातिमाबी शेख आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी काम करताना जो भगिनीभाव दाखवला त्याची समाजात आज प्रकर्षाने उणीव जाणवते. प्रबोधन परंपरेतील ऐक्याच्या पाऊलखुणाही आज दिसून येत नाहीत. याउलट अधिकाधिक विषमता पुढे आणली जाते आहे असे दिसते. लव्ह जिहाद, धर्म, जात यापलीकडे जाऊन समाजनिर्मिती व्हावी. भावभावना, जाणिवा यांचे अभिसरण होऊन सकारात्मक समाजाची निर्मिती व्हावी हे आज अपेक्षित आहे. कपडे (हिजाब), खाद्यपदार्थ (हलाल), रंग (भगवा, गेरुआ) ह्यावरून राजकारण करण्यापेक्षा आरोग्य, शिक्षण, रोजगार, स्वच्छता ह्या मुद्यांना धरून मानवताकारण व्हावे. शिष्यवृत्तीमध्ये कपात, आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांची माहिती संकलित करण्यासाठी समिती यांसारखे विषय पुढे आणून लोकांना त्यात गुंतवून आरोग्य, शिक्षण, रोजगार हे मूळ मुद्दे बाजूला सरले जातात; ह्याला समाजातून विरोध झाला पाहिजे. 'कुजबूज सेल' जर चुकीची माहिती मोठ्या प्रमाणात ठामपणे पसरवत असेल, तर आपण सर्वांनी 'सकारात्मक कुजबूज'ही तेवढ्याच ठामपणे केली पाहिजे.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि फातिमाबी शेख या केवळ महिला, वंचितांच्या शिक्षणाच्या अग्रणी नाहीत, तर अन्याय, अत्याचार, शोषण किंबहुना महिलामुक्तीच्या, हिंदू-मुस्लीम भगिनीभावाच्या प्रतीक आहेत. त्यांचे कार्य हे विशिष्ट जातीधर्मांसाठी प्रेरणा नाही, तर त्यात समस्त विश्वकल्याणाचा संदेश आहे. या वैश्विक विचाराचे संवर्धन आणि संक्रमण करण्यासाठी जसा राजमाता जिजाऊ-क्रांतिज्योती सावित्री जन्मोत्सव साजरा केला जातो तसाच फातिमाबीचाही जन्मोत्सव केला पाहिजे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. कार्यवाह प्रा. जमीर शेख यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले आणि खजिनदार दिलावर शेख यांनी आभार व्यक्त केले. प्रमुख कार्यक्रमानंतर अनौपचारिक चर्चेत उपस्थितांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा विचार सामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी काही उपक्रमही सुचवले.

*(लेखिका मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्या आणि सत्यशोधक फातिमाबी शेख महिला मंच प्रमुख आहेत.)*

■ ■

ललित

# बडा (लघुकथा)

● डॉ. लतिका जाधव

गुड्डू अलसाया सा टूथब्रश कर रहा था। तभी डोअरबेल की मधुर चिडिय़ा जाग़ उठी।

''गुड्डू'' मां ने आवाज दी।

गुड्डू समझ गया। उसने दरवाजा खोला। सामने खडे थे, पडोस के सुरिंदर चाचा और उनके साथ दादी जी की बहन रानी माँ।

''गुड्डू, मैं घूमने गया था। आते समय अम्माजी रिक्शे से उतर रही थी। उनको मैंने पहचाना, तो सोचा यहां तक छोड़ देते हैं।''

गुड्डू मुंह में टूथब्रश लिये था। तब तक माँ आ गयी।

''ओह ! भाईसाहब, अब चाय पीकर ही जाना।'' रानी मां अंदर आ गयी थी।

''शुक्रिया, भाभीजी फिर कभी। आफिस जाना है।'' सुरिंदर चाचा इतना कहकर जल्दी जल्दी निकल पड़े।

गुड्डू गुसलखाने के तरफ़ भागा।

मां रानी मां को दादीजी के कमरे मे ले गयी। उनके पास जाते ही दोनों बहनें गले मिलकर रोने लगी। दादी अब बुढापे के आखिरी पडाव पर थी। रानी मां उनकी सबसे छोटी बहन थी। लेकिन घर गृहस्थी कभी कभी ऐसी स्थिति बना देती है कि लंबे समय तक मिलना जुलना मुश्किल सा हो जाता था।

गुड्डू स्कूल जाने के लिए तैयार हो गया। जाने से पहले रोज की तरह दादी के पास गया। ''दादी मां हम स्कूल जा रहे है।''

रानी मां ने गुड्डू को स्कूल के युनिफार्म मे देखकर कहा, ''अरे ! गुड्डू कितना बड़ा हो गया।''

दादी माँ हंसकर बोली, ''बड़ा और समझदार भी।''

यह सुनकर गुड्डू के मन को तो मानों पंख ही लग गये। बड़ा... बड़ा...

वह मां के पास गया। अपना स्कूल बैग, टिफिन बैग उठाया। मां उसके साथ निकली, बाहर जहां स्कूल बस रूकी थी। मां उसका बैग लेने लगी, तो गुड्डू

ने मना कर दिया। मां उसको बस मे जाता देख घर में वापस आ गयी।

रानी मां नहा धोकर प्रसन्नता से बोली, ''बहू जरा इधर आना।''

गुड्डू की मां उनके पास गयी।

''मैं समय निकालकर बडी मुश्किल से यहां आयी। आज रात ही निकलने वाली हूँ। मैं कुछ दिनों बाद तीर्थयात्रा के लिये जा रही हूं। आने के बाद भी मिलना होता है, नहीं होता है। इसलिये बड़ी बहन से मिलने यहां आ गयी। आप लोगों को खुश देख अच्छा लगा। मैं तीर्थयात्रा से वापस आ जाऊंगी तब दीदी, गुड्डू और सुरेश आप सब मेरे घर आ जाना।''

''इतनी जल्दी क्या है। आप अभी जाने की बात कर रही है। सुरेश तो आफिस के काम से बाहर गये है।'' गुड्डू कि मां नाराजगी जताते हुये बोली।

रानी मां गंभीर हो गयी थी। ''घर में सब यहां आने के लिये मना कर रहे थे। मैं मेरी छोटी बहू के साथ आयी हूँ। वही मेरी दीदी से मिलने की चाह देख, सहेली की शादी मे जाने का बहाना कर साथ लेकर आयी।''

''अच्छा ! तो नीहारिका भी संग है। तो फिर वह कहां है ?'' मां बोली।

रानी मां कहने लगी, ''वह मुझे रिक्षा से इधर छोड़ कर अपनी सहेली की शादी में शरीक होने उसी रिक्षा से गयी है। शाम तक यहां मुझे लेने आ जायेगी।''

मां असमंजस में पड़ गयी। रानी मां पर अभी तक ससुराल में पति महाशय की बंदिशें लगी है। भला हो निहारिका का जो उनको यहां तक ले आयी।

दादीजी को अपनी बहन का दर्द पता था, अब मिलने आ ही गयी तो दोनों खूब बाते कर रही थी।

अपने समय पर गुड्डू की मां भी आफिस के लिये निकल गयी।

दोपहर बाद गुड्डू स्कूल से वापस आ गया। मां तो उस समय आफिस में रहती थी। वह अपने कमरे मे गया। फिर टेबल पर जो खाना था, थाली मे लिया। खाना होने के बाद गुड्डू ने दादी के पास जाकर देखा, वह आज बहुत खुश नजर आ रही थी।

रानी मां ने गुड्डू को अपने पास बिठाया उसको निहारते हुये बोली, ''खूब पढना, मां का, दादी का सबका ध्यान रखना। अब तुम बड़े हो रहे हो।''

गुड्डू थोड़ा शरमा गया था। उसने सर हिलाकर हामी भरी।

रानी मां ने गुड्डू के हाथ में सौ रुपये का नोट थमा दिया।

''मुझे नहीं चाहिये।'' गुड्डू मना करने लगा।

"वह तो मैं समझ गयी, बड़ा हो गया है। लेकिन मेरे लिये सोना बच्चा हमेशा बच्चा है।" रानी मां हंस कर बोली।

गुड्डू मुठ्ठी मे नोट दबाकर बाहर आया। उसने आसमान के तरफ़ देखा आज आसमान जैसे पास आ रहा था। गुड्डू को लगा वह सचमुच बड़ा हो गया है। उसने बाबा कि सायकिल पर चढने कि कोशिश की, उस सायकिल को धक्का देकर स्टैंड से उतारा। मजबूत सायकिल को अपने उपर गिरता देख उसको दीवार पर झुकाकर रख दिया, भागकर घर में आ गया। तभी घर मे फोन कि घंटी बजने लगी। गुड्डू ने फोन उठाया, "हैलो।"

"सुनो, गुड्डू मैं अभी निकल रही हूं। नीहारिका आये तो उनको दादी के पास बिठाना। और आपके लिये कुछ लाना है ? कुछ चाहिये ?"

गुड्डू बोला, "मुझे कुछ नहीं चाहिये। मगर आपके लिये आपको कुछ चाहिये तो ले आना।" मां गुड्डू की बात सुनकर हंस पड़ी, कितना समझदार हो गया।

गुड्डू अपने कमरे में गया। उसने अपनी चित्रकला के लिये रखे सफेद काग़ज़ को निकाला। उस सफेद काग़ज़ पर नीला आकाश क्रेयॉन से उतारा, इस नीले आकाश मे हल्के भूरे रंग के पंछी भी उडने लगे। गुड्डू ने काग़ज़ को टेबल पर रख दिया।

थोड़ी देर बाद मां आफिस से घर आ गयी, घर में चहलपहल शुरू हो गयी। वह मां के लाये सामान को देखने लगा, जिसमें एक छोटा चाकलेट का पैकेट भी था। वह धीरे से मुस्कुराया।

गुड्डू मां के तरफ़ देखकर बोला, "मां, चाकलेट का पैकेट खोलू ?"

मां को अब हंसी आ गयी। यह देख गुड्डू भी मां को लिपटकर हंसने लगा। हंसते हंसते चाकलेट का पैकेट खोलने लगा।

*(लेखिका समतावादी कार्यकर्ता और वाडीया कॉलेज, पुणे मे अध्यापक है.)*

■ ■

# शाश्वत

डॉ. गिरीश जखोटिया

*ते मातब्बर गृहस्थ*
*जगभर हिंडले*
*शाश्वत काय असतं ते शोधायला.*
*बख्खळ गुरूंना भेटले*
*पण 'शाश्वत' असं काही*
*नजरेला गावलं नाही !*

*मग ते तत्त्ववेत्त्यांना भेटले,*
*मानसोपचार तज्ञांना भेटले,*
*वैज्ञानिकांना भेटले,*
*धर्ममार्तंडांना भेटले.*
*समद्यांनी एकच उत्तर दिलं,*
*'शाश्वत कायबी नसतंय.*
*समदं बदलत रहातंय.'*

*अचानक गावाकडं*
*एक 'निऋती' माय भेटली.*
*माय म्हणाली,*
*'धरती धान्य पिकवती,*
*हेच शाश्वत.*
*फुलं सुगंध पसरवतात नि*
*झाडे फळं देतात,*
*हेही शाश्वतच.'*

*'शाश्वता'ला शोधण्याची*
*मातब्बर गृहस्थाची*
*नजरच आता बदलली.*
*पारावर नातवाला*
*घेऊन बसलेले*
*आजोबा भेटले.*
*सुरकुतलेल्या चेहऱ्यावरचं*
*त्यांचं निरागस हसणं*
*एकदम 'शाश्वत' वाटू लागलं.*

*मातब्बर गृहस्थ*
*आता आठवून आठवून*
*शाश्वतांची यादीच बनवू लागले.*
*आईनं मायेनं*
*पाठीत घातलेला धपाटा*
*आयुष्यभर आपल्या सोबत आहे,*
*म्हंजी 'धपाटा'बी शाश्वतच की.*
*अन् बापाच्या डोळ्यातलं प्रेम -*
*तेबी शाश्वतच की !*

*एकमेकात समदं*
*जग बघणाऱ्या*
*नवरा - बायकोतलं प्रेम*
*शाश्वतच असतंय की.*
*त्यातला एक पार्टनर निवर्तल्यावर*
*दुसरा त्याच शाश्वत प्रेमावर*
*राहिलेलं समदं आयुष्य*
*काढतो नव्हं ?*

*(कवी मुंबईस्थित लेखक विश्लेषक आणि कार्यकर्ते आहेत)*

■ ■

वाचनीय

# धार्मिक राष्ट्रवाद पुरस्कृत जमातवादी राजकारणाचा चेहरा

**• डॉ. शमसुद्दीन तांबोळी**

*'बहुसंख्याकांचा धर्मवाद राष्ट्रासाठी घातक असतो आणि अल्पसंख्याकांचा धर्मवाद आत्मघातक असतो.'*

**- पंडित जवाहरलाल नेहरू**


देशाचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांनी व्यक्त केलेल्या या विधानाचा प्रत्यय आपण गेल्या काही दशकांपासून घेत आहोत.


प्रागतिक लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. राम पुनियानी यांनी देशातील राजकीय-सामाजिक परिस्थितीवर वेळोवेळी इंग्रजीत लिहिलेल्या लेखांतील निवडक अशा ६३ लेखांना तीन भागांत विभागून त्याची तीन पुस्तके अलीकडेच लोकवाङ्मय गृह प्रकाशनाने प्रसिद्ध केली आहेत. भारतीय संविधान आणि भारतीय समाजाविषयी आस्था बाळगून काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी ही तिन्ही पुस्तके वाचली पाहिजेत. आपण त्या त्या वेळी उद्भवलेल्या प्रसंगांचे साक्षीदार असतो. त्या घटनांवर आपण विचार करतो आणि या निमित्ताने झालेले वृत्तपत्रीय, नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले लेखन वाचतो. यातील काही घटना आणि लेखन अनेकवेळा विस्मृतीत जातात. एका नंतर एक अशा घटना घडतात आणि या घटनांमध्ये काही समान धागा असतो. भूत आणि वर्तमानकाळातील घटना भविष्यातील घटनांच्या नांदी ठरतात आणि ही घटनामालिका चालू असते. या सर्व घटना, त्यांचे निमित्त आणि त्यावरील लेखन एकत्रितपणे वाचण्याची, विचार करण्याची संधी या पुस्तकांच्या निमित्ताने मिळते. मूळात इंग्रजी लेखांचे मराठी अनुवाद करण्यात आणि पुस्तक रूपात उपलब्ध करून देण्यात कार्यकर्ते वीरा साथीदार, डॉ. विवेक कोरडे, श्रुती गणपत्ये, कलिम अजीम, कॉ. सुकुमार दामले आणि राजन बावडेकर यांनी मेहनत घेतली आहे. विशेषतः डॉ. राम पुनियानी यांचे हे लेख सेंटर फॉर स्टडी ऑफ सोसायटी अँड सेक्युलॅरीझम, मुंबई मार्फत प्रसिद्ध झाले आहेत.


'जमातवादाचे राजकारण आणि भारतीय लोकतंत्र' - भाग १ या

पुस्तकात संघपरिवार, हिंदुत्ववाद्यांनी निर्माण केलेल्या जमातवादी आव्हानांचा समावेश आहे. यात अनुक्रमे धर्म, राजकारण आणि समाज, न्यायासाठी आंदोलन, भक्ती-सुफी परंपरा मानवतेला एकत्र आणतात, हिंदुत्व या शब्दाभोवतीची संदिग्धता, श्रद्धा-अंधश्रद्धा आणि शास्त्रीय दृष्टिकोन, भारतीय मूल्यांची सुरू असलेली थट्टा, गांधींची जात कोणती आणि काँग्रेस कशाचे प्रतिनिधित्व करते ? नेताजी-नेहरू आणि ब्रिटिशविरोधी लढा, जीनांचे भूत, आणीबाणी आणि हिटलरशाही समान होते का ?, इतिहासाची जातीयवादी आवृत्ती, टिपू सुलतान : नायक की खलनायक ?, करीना-कैफ यांच्या मुलाचे तैमूरचे स्वागत करू या, अभ्यासक्रमातून राष्ट्रनिर्मितीत भूमिका दाखवण्याचा आर. एस. एस.चा प्रयत्न, आर. एस. एस.चा शिक्षण अजेंडा काय ?, आर. एस. एस.च्या कार्यकर्त्यांना सरकारी सेवेत नियुक्त करावे काय ?, जन गण मन अधिनायक - किंग जॉर्जबाबत नाही, हिंदुत्ववाद्यांची नवी प्रयोगशाळा, मुस्लीम ब्रदरहूड आणि हिंदू ब्रदरहूड, हिंदुराष्ट्र स्थापन करण्याचा कट, दहशतवादी कारवायांचा तपास आणि संघ या लेखांचा समावेश आहे. लेख शीर्षकांची ही यादीच पुस्तकातील गंभीर आशयाचे सुतोवाच करण्यास पुरेशी आहे.

'जमातवादी हिंसा आणि धार्मिक राष्ट्रवाद' या भाग दोन मधील पुस्तकातील अनुक्रमणिकेमध्ये धर्माच्या नावाखाली दहशतवादाचा धुमाकूळ, मतांसाठी विभाजनाचे राजकारण, बुलंद शहर : हिंसेचा आणखी एक नमुना, शीखविरोधी दंगल आणि राजकारण, बाबरी मस्जिद पाडल्यानंतर..., गुजरात २००२ दंगलीचे सत्य, द्वेष आणि हिंसाचाराशी सामना : अल्पसंख्याकांनी काय करावं ?, भारताच्या भविष्यकालीन विभिन्न समुदायांची लोकसंख्या, मुस्लिमांचा भेदभाव की अपमान, भारतीय मुस्लीम आणि काँग्रेस, मुस्लीम महिला आणि संघ-भाजपचा अजेंडा, जातिव्यवस्थेचा अंत : क्रांती आणि प्रतिक्रांती, देवा, मला प्रवेश मिळेल काय ? आंबेडकरांच्या फोटोला हार घालून सन्मान होईल का ?, दलित कार्यकर्ते नक्षलवादी कसे ?, कोणता पक्ष दलितांसाठी लढतो ? शबरीमला देऊळ आणि महिलांचा लढा, दोन निकालांची गोष्ट : असिया बीबी आणि शबरीमला, आसामचे स्थलांतरित देशाला धोका आहेत ?, काश्मीर : कलम ३७० रद्दीकरणाचा अन्वयार्थ हे लेख मागील तीन दशकातील घडामोडींचा आढावा घेणारे आहेत. या घटना देशाच्या राजकारणाची आणि त्यांच्या भारतीय समाजावरील परिणामांची समिक्षा करतात. सामाजिक आणि राजकीय




कार्यकर्त्यांसाठी हा लेखसंग्रह फार महत्त्वाचा आहे.

'धर्म, आतंकवाद आणि अल्पसंख्याक समाज' या भाग तीन पुस्तकात भारत स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात कोणकोणती आव्हाने झेलत आहे ही शोकांतिका स्पष्ट करते. देशातील विचारवंतांची हत्या, हिंदुत्ववादी राजकारणाची दिशा या भागात वाचायला मिळते. तीन जणांची कत्तल आणि एका मनुष्याची मारून मारून हत्या, गौरी लंकेश यांचा खून, भारतीय राजकारणाच्या सारीपाटावर गोमाता, शैक्षणिक संस्थांचा गळा घोटण्याचा प्रयत्न, अलाहाबाद ते प्रयागराज : नावात काय आहे ?, कला देशद्रोही होते तेव्हा, इस्लामवादी दहशतवाद पडद्यामागचे राजकारण, दहशतवादाला धर्माशी जोडता येईल का ?, मुंबई दहशतवादी हल्ल्याची १० वर्षे, सांप्रत संकट स्थिती : धर्मामुळे की राजकारणामुळे, मोदी पुन्हा : मग लोकशाही कुठे ?, आज भारतात शांततेचा प्रसार कसा करायचा ?, अत्याचारापासून वाचण्यासाठी दलित आणि बौद्ध इस्लामचा स्वीकार करीत आहेत, पटेलांना मोठे करण्यासाठी नेहरूंना छोटे करण्याचा भाजपचा कट, काशी-

मथुरा : मंदिराचे राजकारण पुनर्जीवित होणार ?, लव्ह जिहाद, धर्मांतर आणि स्वातंत्र्यावर गदा, महात्मा गांधी - वर्ण आणि जाती, देशभक्ती - धर्म आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारधारा, आक्रसणारे लोकशाहीचे अवकाश आणि निवडणुकीतील पर्याय, भारत : जातीयवाद - भारतीय राज्यघटना आणि मुस्लीम अल्पसंख्याक, वंचित समाजाला न्याय कधी मिळेल ?, कोविड - १९ आणि शिक्षणात सांप्रदायिक अजेंडा राबवणे.

या पुस्तकातील लेखांची यादी आव्हानांची मीमांसा करून थांबत नाही, तर पर्यायी उपायांची चर्चाही करते.

या तीनही पुस्तकांतील प्रत्येक लेखाचे स्वतंत्र परिशीलन करणे आणि त्यावर चर्चा करणे आवश्यक आहे, मात्र या ठिकाणी ते शक्य नाही. वाचकांना व्यक्तिगत पातळीवर तसा प्रयत्न करता येईल. सारांश रूपाने या पुस्तकातील काही महत्त्वाच्या मुद्यांचा आणि विषयांचा आधार घेऊन पुस्तक परिचय करून देण्याचा पुढे प्रयत्न केला आहे.

आपण धार्मिक तणाव आणि सांप्रदायिक राजकारणाचे चटके तसे फाळणी काळापासून सहन करीत आहोत. याकाळात ज्या सांप्रदायिक अस्मिता पेटवल्या गेल्या त्या आज अधिक भडकताना दिसत आहेत. वास्तविक ही विषारी बीजे सुमारे दीडशे वर्षांपूर्वी इंग्रजांनी पेरली. 'फूट पाडा आणि राज्य करा' करीता सांप्रदायिक अस्मिताच वापरल्या. पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंना जेव्हा विचारण्यात आले की, 'पंतप्रधान म्हणून त्यांना सर्वात मोठं आव्हान कोणते वाटते ?' तेव्हा ते म्हणाले की, 'अनेक धर्म असलेल्या या देशाला सेक्युलर बनवणं.' तसेच ११ ऑगस्ट १९४७ रोजी बॅरिस्टर जीनांनीही म्हटलं होतं की, पाकिस्तान हा सेक्युलर असेल. एका वर्षानंतर म्हणजे ११ सप्टेंबर १९४८ रोजी जीनांचे निधन झाले आणि झिया उल हक यांच्या काळात इस्लामीकरणाची प्रक्रिया तीव्र होऊन त्याची जागा धार्मिक कट्टरवाद्यांनी घेतली. 'भारतात मी स्वतःला इतका चांगला हिंदू समजतो, जितका की एखादा मुसलमान. तसेच मी स्वतःला तितकाच चांगला ख्रिश्चन किंवा पारसी देखील मानतो.' असे सांगणाऱ्या महात्मा गांधींची ३० जानेवारी १९४८ रोजी हत्या करण्यात आली. तरीही भारताने देशाला आधुनिक, वैज्ञानिक, धर्मनिरपेक्ष असा सर्वसमावेशकतेचा चेहरा दिला. पाकिस्तानात जे एका वर्षात झाले ते भारतात आजमितीस होताना दिसत आहे. सेक्युलर मूल्यांना धाब्यावर बसवून आपण कट्टरतावादाच्या दिशेने प्रवास करत आहोत. सेक्युलॅरिझम ही एक

थाप आहे. मृत पावलेल्या मुस्लीम महिलेवरही बलात्कार करा, अशी विखारी वक्तव्ये केली जातात. तरीही भारतात सेक्युलॅरिझमला कायदेशीर मान्यता आहे. मात्र काहीजण विरोध करून बळजबरीने भारतीयांना हिंदुत्वाच्या कोषात ओढण्याची उठाठेव करीत आहेत.

गेल्या जवळपास साडेतीन दशकांपासून भारतातील जमातवादी गट आक्रमक झाले आहेत. जे शहाबानो प्रकरणात अनुभवले. त्यातूनच हिंदुत्ववाद्यांना इंधन मिळाले. या संघटनांनी परिस्थितीचा फायदा घेऊन आत्मशक्ती वाढवली आणि शक्तिप्रदर्शनातून बाबरी मस्जिद उद्ध्वस्त केली. नंतरच्या तीन दशकांत वातावरण आधिकाधिक गढूळ होत गेले, लोकांत असामंजस्य, असहिष्णुता वाढवली. हिंदू जमातवादी राजकारणाने समाजात दुहीची बीजे पेरून हिंसा आणि ध्रुवीकरणाचे विविध प्रयोग केले. त्यासाठी राममंदिर, गोमांसाचा प्रश्न उभा केला. धर्माची नैतिक मूल्ये, धर्मविषयक नियम यांना फाटा देत धार्मिक अस्मितेचा वापर करून समता आणि उदारमतवादी मूल्यांना पायदळी तुडवून, हिंसेचा मार्ग अनुसरून सृजनशील कलाकारांच्या अभिव्यक्तींवर मर्यादा घालण्याचे आणि त्यांना देशद्रोही ठरवण्याचे प्रकार वाढले. अलीकडे तर अल्पसंख्याक समाजाबद्दलचा आकस आणि घृणा टोकाला पोहचवली आहे. सातत्याने अपप्रचार, भीती आणि शत्रूभाव निर्माण करणारे विषय हाताळण्यात आले. 'भारतात मुस्लिमांची लोकसंख्या वाढत आहे. लोकसंख्या वाढवून भारताला मुस्लीम राष्ट्र बनवण्याचे कारस्थान रचले जात आहे.' हा अपप्रचाराचा जुना मुद्दा आजही वापरण्यात येतो. डॉ. एस. वाय. कुरेशी यांनी 'द पॉप्युलेशन मिथ...' पुस्तकातून हे अपसमज दूर करण्यासाठी भारतातील विविध अभ्यास, पाहणी आणि जनगणनेचे अहवाल सादर केले. तसेच 'फॅमिली प्लॅनिंग अँड लीगसी ऑफ इस्लाम' या पुस्तकात विचारवंत ए. आर. ओमरान यांनी केलेले प्रतिपादन जाणिवपूर्वक दुर्लक्षित करण्यात येते.

गो-वंश मांस निर्यात करणाऱ्या कंपन्यांमध्ये 'अल कबीर, अरेबियन एक्सपोर्ट, एमकेआर फ्रोजन फूड आणि अल-नूर' यांचा समावेश आहे. नावांवरून असा समज होऊ शकतो की याचे मालक मुस्लीम असावे. मात्र यांपैकी बऱ्याच कंपन्या जैनांच्या आणि ब्राह्मणांच्या मालकीच्या आहेत. सध्या समाज माध्यमांचा वापर करून खोटी, बनावट आणि दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करण्यात येते. मध्यंतरी एक ट्वीट फिरवले, 'एनसीआरबीच्या अहवालानुसार भारत हा महिलांसाठी सर्वात धोकादायक आहे कारण भारतात ९५% बलात्कार प्रकरणात

गुन्हेगार मुस्लीम असतात. बलात्काराच्या एकूण ८४,७३४ घटनांपैकी ८१,००० बलात्कार करणारे मुस्लीम होते. ९६% बळी हे अन्य धर्मीय आहेत आणि त्यांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे बलात्काराच्या घटनाही वाढतील.' वस्तुस्थिती अशी आहे की एनसीआरबी (नॅशनल क्राईम रेकॉर्डस् ब्यूरो) बलात्काराच्या प्रकरणात धर्माची नोंदच करीत नाही. ही तथ्यशोधनातून पुढे येणारी माहिती समाजापर्यंत पोहचतच नाही. त्यामुळे जाणिवपूर्वक निर्माण केलेले संशयाचे वातावरण अधिक गडद होते. भारतीय मुस्लिमांची विदारक स्थिती दाखवणारे अनेक अहवाल प्रसिद्ध आहेत. या आधारे विकासासाठी सहानुभूतीने विचार करून काही उपाययोजना करण्या-ऐवजी मुस्लिमांबद्दल अपप्रचार करून, त्यांना अतिरेकी ठरवून, अफवा पसरवून, त्यांचे अपराधीकरण करून अपमानित करण्यात येत आहे. हा केवळ अन्याय नसून तो भारताचा धर्मनिरपेक्ष व उदारमतवादी चेहरा विद्रुप करण्याचा प्रकार आहे.

मुस्लीम, ख्रिश्चन, दलित, आदिवासी आणि महिलाविषयक सातत्याने घेण्यात येणारी पक्षपाती-एकांगी भूमिका आणि वक्तव्ये, जेएनयू, हैद्राबाद सेंट्रल युनिव्हर्सिटी, अलिगढ मुस्लीम विद्यापीठ, डॉ. आंबेडकर - मद्रास आयआयटीतील पेरियार स्टडी सर्कल इत्यादी ठिकाणी घडवून आणलेले राजकारण, डॉ. आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस यांच्या मूलभूत विचारांशी छेडछाड करून विपर्यास करणे. अशा प्रकारांतून देशाची हिंदू राष्ट्राकडे आणि एकाधिकारशाहीकडे वाटचाल सुरू झाली आहे हे स्पष्ट होते.

समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या संविधानिक मूल्यांपासून लोकशाहीचा प्रवास सुरू होतो. मात्र १. सत्तेचे विकेंद्रीकरण, २. नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण, ३. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, ४. दुर्बल घटनांविषयी सकारात्मक भूमिका आणि ५. धार्मिक अल्पसंख्याकांना वाटणारी सुरक्षितता या पाच निकषांच्या आधारे लोकशाहीच्या सद्य:स्थितीचे मूल्यमापन केल्यास लोकशाहीचा दुबळेपणाच समोर येतो. जमातवादी राजकारणामुळे निर्माण झालेल्या दुरावस्थेची मांडणी करून देशाच्या भल्यासाठी, जनसामान्यांच्या सुखासाठी, मानवतेच्या कल्याणासाठी तसेच शांततापूर्ण सहजीवनासाठी आम्ही कोणता मार्ग अवलंबला पाहिजे याचीही चर्चा लेखकाने केली आहे.

लव्ह जिहाद, घरवापसी, मॉबलिंचींग, दलित हिंसाचार, एनआरसी, शिक्षणाचे भगवीकरण, तसेच शहर, रस्ते, वास्तूंची नावे बदलण्याचा सपाटा, काशी - मथुरा मंदिरांचे राजकारण, विविध अंधश्रद्धांना खतपाणी, मुस्लीम महिला

आणि संघ व भाजपचा अजेंडा, विविध तपास यंत्रणांचा दुरूपयोग या आणि अशा जमातवादी राजकारणास ऊर्जा पुरवणाऱ्या विषयांवरील वाद-प्रतिवाद पुस्तकात मांडला आहे. तसेच विविध ऐतिहासिक संदर्भांच्या पार्श्वभूमीवर जमातवादी राजकारणाची, संकोच होत असलेल्या मूल्यांची अभ्यासपूर्ण मीमांसा उपायांसह लेखकांनी केली आहे.

मुस्लीम विचारवंत मौलाना वहिदुद्दिन खान तसेच डॉ. असगरअली इंजिनिअर यांच्या उदारमतवादी इस्लामचे संदर्भ पुस्तकात काही प्रमाणात आहेत. तलाक प्रश्नावरील राजकारण स्पष्ट करताना हमीद दलवाई यांच्या मुस्लीम महिला आंदोलनाची नोंद आली असली तरी हमीद दलवाई यांनी केलेल्या मुस्लीम जमातवादी राजकारणाची चिकित्सा, आक्रमक हिंदुत्ववाद वाढण्यास कारणीभूत ठरलेले घटक, विविध प्रसंगी जमातवादी मुस्लिमांनी सुधारणेस सातत्याने केलेला विरोध आणि आंदोलने यासंदर्भात पुस्तकात अधिक तपशील मांडायला हवे होते असे वाटते. तसे झाले असते तर या पुस्तकांकडे नकारात्मक पाहणाऱ्यांना मर्यादा पडल्या असत्या. आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय पातळीवरील मुस्लीम देशातील अतिरेकी संघटना आणि त्यांच्या परिणामाची चर्चा केली आहे. मात्र त्यास भारतातील मुस्लीम जमातवादी घटनांची जोड देऊन हा विषय अधिक व्यापक करणे शक्य होते. अर्थात लेखक डॉ. राम पुनियानींनी जमातवादी राजकारणाशी संबंधित घटनांच्या निमित्ताने लिहिलेल्या प्रतिक्रियात्मक लेखांपैकी निवडक अशा संदर्भमूल्य असणाऱ्या ६३ लेखांचा मराठी अनुवाद म्हणजे तीन भागांत विभागलेली ही तीन पुस्तके आहेत.

**पुस्तकांची नावे :**

१) जमातवादाचे राजकारण आणि भारतीय लोकतंत्र
(पृष्ठे ८३, किंमत १००/- रु.)

२) जमातवादी हिंसा आणि धार्मिक राष्ट्रवाद
(पृष्ठे ८८, किंमत १००/- रु.)

३) धर्म, आतंकवाद आणि अल्पसंख्याक समाज
(पृष्ठे ९१, किंमत १००/- रु.)

लेखक : राम पुनियानी, प्रकाशन : लोकवाङ्मय गृह, मुंबई


*(लेखक मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष आहेत.)*

■ ■

वाचनीय

# अंधश्रद्धेचा धांडोळा घेणारे पुस्तक : तिमिरभेद

● प्रा. शाम जोगळेकर




'तिमिरभेद - धांडोळा मुस्लीम अंधश्रद्धांचा' हे पुस्तक पुण्याच्या शम्स पब्लिकेशनने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. डॉ. शमसुद्दीन तांबोळी पुस्तकाचे संपादक आहेत. संपादकीयमध्ये डॉ. तांबोळी यांनी या पुस्तकामागील भूमिका सविस्तरपणे मांडली आहे. मुस्लीम समाजात प्रबोधनाचे वारे वाहावेत यासाठी हमीद दलवाई यांनी आपल्या निवडक कार्यकर्त्यांसोबत २२ मार्च १९७० रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. तत्पूर्वी १९६८ मध्ये प्रा. अ. भि. शाह यांच्यासमवेत इंडियन सेक्युलर सोसायटीची स्थापना केली होती. अजूनही या संस्थांचे कार्य सुरू आहे. 'सेक्युलॅरिझम' या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट केला आहे. अंधश्रद्धांचे आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे विकसन महत्त्वाचे ठरते. सेक्युलॅरिझमच्या निर्मितीसाठी लोकशाही ही पूर्व अट आहे. भारतीय संविधान हे आपले दीपस्तंभ आहे.

धर्मस्वातंत्र्य हे व्यक्तीला दिलेले आहे, धर्माला नाही. धर्मस्वातंत्र्य उपभोगताना शांतता, सुव्यवस्था, सामाजिक आरोग्य आणि सामाजिक सुधारणा यांना बाधा येणार नाही, याची दक्षता सर्व नागरिकांनी घेतली पाहिजे. याचअर्थाने अल्पसंख्याकांना खास अधिकार संविधानाने बहाल केले आहेत. नागरिकांची विविध मूलभूत कर्तव्ये स्पष्ट केली आहेत. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधवृद्धी आणि सुधारणावाद यांचा विकास करणे या गोष्टी नागरिकांकडून अपेक्षित आहेत. हिंदू समाजात अंधश्रद्धा निर्मूलनाची दीर्घ परंपरा आहे. मुस्लीम समाजातील अंधश्रद्धांविषयी फारशी चर्चा होत नाही, असा आक्षेप घेतला जातो. मात्र मुस्लीम सत्यशोधक मंडळ याला अपवाद आहे. या पुस्तकाला लोकेश शेवडे

यांची प्रस्तावना लाभली आहे. या पुस्तकात एकूण तेरा लेख आहेत. शेवटी सर्व लेखकांचा परिचय दिला आहे. पुस्तकाचे सूचक आणि रंगीत मुखपृष्ठ आणि आतील रेखाचित्रे मुकीम तांबोळी यांची आहेत.

'तिमिराकडून तेजाकडे...' या पहिल्या लेखात डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी सविस्तर विवेचन केले आहे. बहुतेक सर्व धर्म ऐहिक आणि पारलौकिक जीवनाविषयी आपले तत्त्वज्ञान मांडतात. त्यांनी आध्यात्मिकता, नैतिकता, स्वतंत्र ओळख यावर भाष्य केलेले आहे. आजच्या प्रगत विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या काळात धर्माच्या मर्यादा अधोरेखित होतात. आपला समाज धर्मचिकित्सेसाठी तयार नाही. धर्माची स्थापना ईश्वराने केली, अशी श्रद्धा धार्मिक लोक बाळगतात. धर्म आणि ईश्वर ही अंधश्रद्धेची जननी आहे, असे बुद्धिप्रामाण्यवाद्यांना वाटते. समाजातील मुल्ला, मौलवी, उलेमा या पुरोहित वर्गाने स्वतःचा विचार इस्लाम समाजावर लादला. इस्लामने अंधश्रद्धा, चमत्कारांना विरोध केला असूनही इस्लामच्या संस्कृतीत आणि धार्मिक परंपरेत अनेक अंधश्रद्धा आहेत. इस्लामचे संस्थापक मुहम्मद पैगंबर यांच्या मृत्यूनंतर सत्ता कोणाकडे जावी यावरून वाद होऊन शिया-सुन्नी संप्रदाय अस्तित्वात आले आणि नंतर अन्य उपपंथही निर्माण झाले. पुरोहित वर्गाच्या वर्चस्वातून फतवा संस्कृती निर्माण झाली. हिंदू आणि अन्य धर्म समुदायांत मुस्लीम समाजाबद्दल अनेक गैरसमज आहेत. मुस्लीम समाजात धर्मसुधारणा करणारे काही उदारमतवादी विचारवंत आणि नेते झाले. या उदारमतवादी विचारप्रवाहांना गती देण्याची आज गरज आहे. यासाठीच मुस्लीम सत्यशोधक मंडळाने 'तिमिरभेद मंच' निर्माण केला आहे.

दुसऱ्या लेखात मुस्लीम अंधश्रद्धांची सविस्तर चर्चा केली आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत होणाऱ्या परंपरागत विधींची चिकित्सा करण्याची गरज मानण्यात आली आहे. प्रा. उम्मीद शेख यांनी मुस्लीम अंधश्रद्धांची चिकित्सा कशी करता येईल हे सविस्तरपणे मांडले आहे. बुरखा प्रथेमुळे स्त्रियांचे शारीरिक आणि मानसिक शोषण कसे होते हेही स्पष्ट केले आहे. कुराण आणि हदीस यावरील प्रचंड श्रद्धेमुळे धर्मग्रंथांची चिकित्सा करण्यास विरोध होतो. परिणामी कालबाह्य प्रथा-परंपरा-शोषण सुरूच राहते.

युसूफ शेख यांनी अंधश्रद्धांचा उगम आणि प्रसार कसा होतो हे थोडक्यात मांडले आहे. परिणामी मुस्लीम समाजात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यासाठी सर्वदूर शिक्षणाच्या प्रसाराची गरज आहे.

डॉ. बेनझीर तांबोळी यांनी अंधश्रद्धांचा धांडोळा सविस्तरपणे घेतला आहे. शिक्षिका असलेल्या रुक्साना मुल्ला यांनी मुस्लीम समाजात विवेकवाद किंवा विज्ञानवाद वाढविण्याची गरज उत्तम प्रकारे सोदाहरण स्पष्ट केली आहे. आपण सर्वप्रथम माणूस आहोत, भारतीय आहोत ही भावना भारतीय मुस्लीम समाजात दृढ झाल्यास हा समाज विज्ञानवादी, विवेकवादी होईल याची त्यांना खात्री वाटते.

बेनझीर काझी, अल्तापहुसेन नबाब, अफरोज इमानदार यांचे लेख विचारप्रवर्तक आहेत. बुरखा, हिजाब यांविषयीची सविस्तर चर्चा उपयुक्त आणि माहितीपूर्ण आहे. धार्मिक सण-उत्सव आणि अस्मिता जपण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांचा आखाडा करू नये, अशी किमान अपेक्षा व्यक्त केली गेली आहे. यदुनाथ थत्ते, पु. ल. देशपांडे यांचे जुने, पूर्वप्रकाशित लेख आजच्या काळातही उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरतात, ही निश्चितच चिंतेची बाब आहे.

हे पुस्तक मुस्लीम समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यास मदत करील, अशी आशा वाटते. हे पुस्तक सर्वांसाठीच वाचनीय आणि संग्राह्य झाले आहे.

**तिमिरभेद**
संपादक : डॉ. शमसुद्दीन तांबोळी
प्रकाशक : शम्स पब्लिकेशन्स, पुणे ८.
पहिली आवृत्ती : २२ मार्च २०२२
पृष्ठे : १०२, मूल्य : रु. १५०/-

*(लेखक अलिबाग येथील सेवानिवृत्त प्राध्यापक आणि पुरोगामी कार्यकर्ते आहेत.)*
फोन : ९२७३३४३१७७

■ ■

संविधानिक नैतिकता ही काही स्वाभाविक प्रवृत्ती नाही. ती उत्क्रांत व्हावी लागते, विकसित करावी लागते. आम्हाला याची जाणीव असावी की आमचे लोक अजूनही नैतिकता शिकले नाहीत. आपल्या लोकांनाही नैतिकता शिकवण्याची गरज आहे. कारण भारतीय समाज मुळात अलोकशाहीवादी आहे.

**- डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

*(संविधान सभेतील वादविवाद... पृष्ठ ६६*
*संपादक : प्रदीप गायकवाड)*

दखलपात्र

# फाळणीचे मूळ

● हमीद दलवाई

भारत-पाकिस्तान यांच्यामधील संघर्षाचे मूळ माझ्या मते गेल्या एक हजार वर्षांच्या भारताच्या इतिहासामधून आणि द्विराष्ट्रवादाच्या आणि हिंदू-राष्ट्रवादाच्या धर्मराज्य स्थापन करण्याच्या कल्पनेतून निर्माण झाले आहे. पाकिस्तानची निर्मिती ही द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताला आलेले फळ असून आता जो भारत आहे तेथे हिंदू राष्ट्राची मुहूर्तमेढ रोवून आपले ध्येय साध्य करावे ही हिंदू राष्ट्रवाद्यांची आकांक्षा आहे.

हिंदू राष्ट्रवाद्यांच्या आकांक्षांना यश आले नाही याचे कारण गांधींजींसारख्यांच्या प्रयत्नांना तर आहेच; परंतु त्याचे मुख्य कारण माझ्या मते हिंदू समाजाच्या सामाजिक दृष्टिकोनात सामावलेले आहे कारण अखेर गांधीजी हेही या सामाजिक उदारमतवादाचीच निर्मिती होते हे नाकारून चालणार नाही. हा उदारमतवाद मुस्लीम समाजातही काही प्रमाणात अस्तित्वात होता. अब्दुल गफारखान, युसुफ मेहेरअली आणि आता न्या. छगला या उदारमतवादांतून निर्माण झालेल्या व्यक्ती होत; पण मुसलमान समाज त्यांच्याकडे आकृष्ट झाला नाही किंवा गांधीजींकडे हिंदू समाज आकृष्ट झाला नाही हेही म्हणणे तितकेसे खरे नाही. गफारखानांचे मागे सारा पख्तून समाज उभा होता आणि १९४० साली वेगळ्या राष्ट्राचा, पाकिस्तानचा मुस्लीम लीगने ठराव करण्यापूर्वी अखंड भारताच्या मुसलमान बहुसंख्य असलेल्या प्रांतांतून मुस्लीम लीगपेक्षा काँग्रेसलाच मुसलमानांचा अधिक पाठिंबा होता.

पाकिस्तानचा ठराव झाल्यानंतर हळूहळू परिस्थिती बदलत गेली आणि जीनांना अधिकाधिक पाठबळ मिळत गेले. तथापि, हा ठराव होईपर्यंत काँग्रेस व मुस्लीम लीग यांच्यामध्ये झालेल्या वाटाघाटींचा इतिहास लक्षपूर्वक पाहिल्यास फाळणीचा दोष काँग्रेसच्या माथी येतो याबद्दल कोणत्याही सुबुद्ध नागरिकाला शंका राहणार नाही.

**- हमीद दलवाई**

■ ■

# आपण भारताचे सुजाण आणि सुशिक्षित नागरिक होऊया !

**संविधानातील कलम २५ चा अर्थ समजून घेताना...**

(१) सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य यांच्या व या भागातील अन्य उपबंधांच्या अधीनतेने, सद्सद्विवेक बुद्धीच्या स्वातंत्र्याला आणि धर्म मुक्तपणे प्रतिज्ञापित करण्याच्या, आचरण्याच्या व त्याचा प्रसार करण्याच्या अधिकाराला सर्व व्यक्ती सारख्याच हक्कदार आहेत. पण...

(२) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे -

(क) धर्माचरणाशी निगडित असेल अशा कोणत्याही आर्थिक, वित्तीय वा अन्य धार्मिकतेवर कार्याचे विनियमन करणाऱ्या किंवा त्यावर निर्बंध घालणाऱ्या,

(ख) सामाजिक कल्याण व सुधारणा याबाबत अथवा सार्वजनिक स्वरूपाच्या हिंदू धार्मिक संस्था हिंदूंचे सर्व वर्ग व पोटभेद यांना खुल्या करण्याबाबत उपबंध करणाऱ्या, कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

वरील कलम पाहता एकूण मुसलमान समाजाच्या अधिकारांचे, हक्कांचे स्पष्टीकरण कोणत्या कायद्यानुसार व्हावे, ह्या विषयी पुरोगामी मूल्यांवर ज्यांची श्रद्धा आहे त्या सर्वांनी एकत्र येऊन आपली भूमिका स्पष्टपणे मांडली पाहिजे. विशेष म्हणजे पंचविसाव्या कलमाने दिलेल्या धर्मस्वातंत्र्याचे नेमके स्वरूप काय हे मुस्लीम जनतेसमोर मुस्लीम सत्यशोधक मंडळासहित शासनानेही स्पष्टपणे मांडले पाहिजे.

भारतीय घटना अपरिवर्तनीय नाही. वेळोवेळी तिच्यात बदल झालेले आहेत आणि ते बदल काल सुसंगत आहेत. तरी संविधानाच्या

मूळ गाभ्याला ते पोषकच आहेत. धर्मातले एखादे किंवा अनेक तत्त्वे किंवा शिकवणुकी जर संविधानाच्या विरोधी जात असतील, तर असे धर्म आणि अशा प्रथा, परंपरा, शिकवणुकी बासनात गुंडाळून अडगळीत फेकून दिल्या पाहिजेत; भले मग त्या कितीही खोलवर रुजलेल्या असोत आणि कोणत्याही धर्माच्या असोत. उदा. कुटुंब नियोजनासारख्या योजना फक्त लोकसंख्या वाढीशी संबंधित नाही, त्या स्त्रियांच्या आरोग्याशी आणि स्वातंत्र्याशी संबंधित आहेत. त्याचा संबंध धर्म आणि धार्मिक समजुतीशी लावून उफराटी भूमिका घेणे बेकायदेशीर आहे... तीच गोष्ट स्त्री-शिक्षण, बालकांचे लसीकरण ह्या सारख्या योजनांची.

आज ज्याला मुस्लीम व्यक्तिगत कायदा किंवा 'मोहामेडन लॉ' म्हणतात तो विवाह, घटस्फोट, पोटगी आणि वारसा हक्क या चार बाबींपुरताच मर्यादित आहे. हा कायदा शरियतच्या तत्त्वांवर आधारित आहे असे म्हटले जात असले, तरी त्यासंबंधी उद्‌भवणारे वाद न्यायालयातच दाखल करावे लागतात. 'शरियत कोर्ट' नावाचा कसलाही प्रकार अस्तित्वात नाही. म्हणूनच मुल्ला-मौलवींनी राजकारण्यांवर दबाव टाकून त्याची स्थापना नव्याने करणे हे घटनाबाह्यच नाही, तर ते भारताच्या घटनेच्या सर्वभौमत्वाला आव्हान देणे आहे, जे सर्वस्वी चुकीचे आहे.

**- जगदीश काबरे**

सांगली

■ ■

स्त्री-पुरुष हे उभयतां जन्मत:च स्वतंत्र व एकंदर सर्व अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र आहेत..... एखादा मानव अथवा मानवांची टोळी एखाद्या व्यक्तीवर जबरी करू शकत नाही.

- आधुनिक भारतातील मानवाधिकाराचे उद्‌गाते

**महात्मा जोतिराव फुले**

## मंडळाचे कार्यक्रम

*जुलै ते डिसेंबर २०२२ या मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेच्या दिवाळी विशेषांकात १७ ऑक्टोबर २०२२ पर्यंतच्या उपक्रमांचा उल्लेख केला आहे. त्यानंतर मंडळाच्या व मंडळाच्या सहभागातून आयोजित कार्यक्रमांच्या संक्षिप्त नोंदी.*

**२३ ऑक्टोबर २०२२ –** मुस्लीम सत्यशोधक मंडळ, डायोसिस ऑफ पुणे, स्वच्छंद पुणे यांच्यावतीने सर्वधर्मीय स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले. हा मेळावा बिशप हाऊस सभागृह, पुणे येथे संपन्न झाला.

**३१ ऑक्टोबर –** मंडळाच्या कार्यालयात स्थानिक कार्यकर्त्यांची बैठक झाली.

**६ नोव्हेंबर –** मंडळाचे आगामी कार्यक्रम ठरवणे आणि नियोजन करण्यासाठी कार्यकर्त्यांची बैठक झाली.

**८ नोव्हेंबर –** मुस्लीम सत्यशोधक पत्रिका दिवाळी विशेषांक आणि समाजवादी शिक्षणहक्क विशेषांकाचे प्रकाशन डॉ. विश्वंभर चौधरी यांच्या हस्ते झाले. दोन्ही विशेषांकांचे संपादक डॉ. शरद जावडेकर आणि डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी मनोगत व्यक्त केले. मा. अशोक धिवरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विनोद वाघ यांनी संचलन केले. अप्सरा आगा यांनी आभार व्यक्त केले. याच कार्यक्रमात मौलाना आझाद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या योगदानाचे स्मरण आणि अभिवादन केले.

**११ नोव्हेंबर –** छत्रपती शिवाजी महाविद्यालय शिक्षण विभाग, सातारा यांनी डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांचे 'मौलाना आझाद यांचे शैक्षणिक योगदान' विषयावर व्याख्यान आयोजित केले.

**२१ नोव्हेंबर –** मंडळाच्या कार्यकर्त्यांची राष्ट्र सेवा दल, पुणे येथे बैठक.

**२६ नोव्हेंबर –** भारतीय संविधान दिन आणि हुतात्मा दिनानिमित्त पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ निगडी, पुणे येथून आलेल्या दिव्यांग बंधू-भगिनींच्या रॅलीचा समारोप झाला. यात डॉ. शमसुद्दीन तांबोळी, नितीन पवार यांनी मार्गदर्शन केले. नबाब अल्तापहुसेन यात सहभागी झाले. हरिदास शिंदे आणि कार्यकर्त्यांनी रॅली आणि सभेचे आयोजन केले.

**२७ नोव्हेंबर** – महात्मा फुले समता प्रतिष्ठान, पुणे वार्षिक सर्वसाधारण सभेत मंडळाचे कार्यकर्ते सहभागी झाले.

**२८ नोव्हेंबर** – आद्य प्रबोधनकार सत्यशोधक महात्मा जोतीराव फुले स्मृतिदिनानिमित्त महात्मा फुले वाड्यातील महात्मा फुले- सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास हार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष तसेच मा. अशोक धिवरे, मा. डी. आर. परिहार आदि उपस्थत होते. याच दिवशी साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर यांच्याशी सद्य:स्थितीवर अनौपचारिक चर्चा, संवाद झाला.

**३ डिसेंबर** – मंडळाच्या कार्यालयात कार्यकर्ता बैठक झाली.

**४ डिसेंबर** – मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे हमीद दलवाई स्टडी सर्कल, शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालयाचे सेंटर फॉर कॉन्स्टिट्यूशनल स्टडीज यांच्यावतीने 'भारतीय संविधान आणि आम्ही भारताचे लोक' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. नितीश नवसागरे यांच्या बीजभाषणाने झाले. अध्यक्षस्थानी मा. अशोक धिवरे होते. डॉ. भगवान गवळी, डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. समिना पठाण यांनी सूत्रसंचलन केले. कार्यशाळेत ॲड. निलेश खानविलकर, प्रा. अझरूद्दीन पटेल यांनी मार्गदर्शन केले. नबाब अल्तापहुसेन, बेनझीर तांबोळी, अप्सरा आगा, आफरोझ इनामदार, समिना पठाण यांनी आयोजन केले. महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेल्या कार्यकर्त्यांबरोबरच आझम शिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी यात सहभाग नोंदवला. प्राचार्य क्रांती देशमुख यांचे सहकार्य लाभले.

**५ डिसेंबर** – महात्मा फुले समता प्रतिष्ठान आयोजित फुले-आंबेडकर व्याख्यानमालेत 'समान नागरी कायदा' या विषयावर ॲड. संदीप ताम्हणकर यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी डॉ. शमसुद्दीन तांबोळी होते. तमन्ना इनामदार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बाबा आढाव, मा. अशोक धिवरे, ॲड. मोहन वाडेकर, बेनझीर तांबोळी, अप्सरा आगा आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

**६ डिसेंबर** – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करून कार्यकर्ते साथी धनाजी गुरव यांनी रावसाहेब पटवर्धन कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांशी 'परिवर्तनाची लढाई' य विषयावर संवाद साधला.

**८ डिसेंबर** – स्वातंत्र्य सैनिक आणि मंडळाच्या आरंभकाळातील मा.

बाबुमियाँ बँडवाले यांना अभिवादन !

**७, ८, ९ डिसेंबर** – शमसुद्दीन तांबोळी यांनी नांदेड, हिंगोली, परभणी येथील कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यासाठी आणि मंडळाच्या कार्यविस्तारासाठी दौरा आखला. या दरम्यान मंडळाचे कार्यकर्ते प्रा. रफिक शेख यांच्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम संस्थेला भेट दिली. या संस्थेच्या विद्यार्थांशी संवाद केला. तसेच अंधश्रद्धा निर्मूलन समिती, राष्ट्र सेवा दल या संघटनांच्या कार्यकर्त्यांसमवेत चर्चा केली. अंधश्रद्धा वार्तापत्राच्या विशेषांकाचे प्रकाशन भारतरत्न ए. पी. जे. अब्दुल कलाम संस्थेच्या सभागृहात झाले. प्रा. रफिक शेख यांनी या कार्यक्रमांचे आयोजन केले.

**१३ डिसेंबर** – 'धर्म, मजहब आणि रिलीजन' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिसंवादात डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी ऑनलाईन संवाद साधला.

**१६, १७ डिसेंबर** – महाराष्ट्र शासनाने अल्पसंख्याक समाजासाठी असणारी प्रिमॅट्रिक शिष्यवृत्ती रद्द केली, तसेच केंद्र सरकारने पोस्टमॅट्रिक - संशोधन कार्यासाठी देण्यात येणारी छात्रवृत्ती रद्द केली. याबरोबरच महाराष्ट्र शासनाने 'आंतरधर्मीय विवाह समन्वय' समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला. हे निर्णय पक्षपाती तसेच संविधानिक अधिकारांचे हनन करणारे असल्याने मंडळाने नापसंती व्यक्त करून या निर्णयाबदल निषेध व्यक्त केला. यानिमित्ताने आयेजित केलेल्या बैठकीस मंडळाचे अध्यक्ष डॉ. तांबोळी, कार्यवाह प्रा. जमीर शेख, खजिनदार दिलावर शेख, शाहेद खान, आजिम पठाण, बेनझीर तांबोळी, जहाँकरा अमिना, मनोहर उपस्थित होते. पुरोगामी कार्यकर्ते जगदीश काबरे यांनीही उपस्थितांशी संवाद केला.

**१७ डिसेंबर** – मंडळाची सर्वसाधारण वार्षिक सभा आयोजित करण्यात आली. मागील बैठकीचा आणि कार्यकमांचा आढावा, आर्थिक अहवाल, आगामी कार्यक्रम यावर चर्चा झाली. प्रा. समिना पठाण-जाधव यांची कार्यकारिणी सदस्यपदी नेमणूक करण्यात आली.

**१८ डिसेंबर** – डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांचे दैनिक लोकसत्ता मध्ये डॉ. राम पुनियानी यांच्या पुस्तकाचा परिचय करून देणारा लेख, तसेच महाराष्ट्र टाईम्समध्ये 'अल्पसंख्याक दिनाबद्दलची उदासीनता' हे लेख प्रसिद्ध झाले. अल्पसंख्याक दिनाच्या निमित्ताने 'अल्पसंख्याक समाजाचे अधिकार' या विषयावर डॉ. तांबोळी यांचे रयत शिक्षण संस्थेच्या इस्माईल साहेब मुल्ला विधी महाविद्यालय,

सातारा यांनी ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन केले.

राष्ट्रीय पातळीवरील विविध संघटनांची संघटना 'चयन'शी मुस्लीम सत्यशोधक मंडळ संलग्न आहे. 'चयन'च्यावतीने दि. १८ डिसेंबर २०२२ रोजी एक दिवसाची परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेच्या समन्वयक संघटनेत मुस्लीम सत्यशोधक मंडळ होते. धनक, नजेरिया, लव्ह फॉर इंडिया प्रोजेक्ट, मासूम, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, एस. एम. जोशी सोशॅलिस्ट फाऊंडेशन, प्रांतोक्या, नाझ इंटरनॅशनल फाऊंडेशन, इव्हीडन्स, डीएचआरडी नेट आदि संस्थांनी भाग घेतला. परिषदेचे उद्घाटन नाट्यकर्मी मा. अतुल पेठे यांनी केले. मा. डॉ. बाबा आढाव यांनी मार्गदशन केले. परिषदेत आंतरजातीय विवाह, आंतरधर्मीय विवाह, मिश्रविवाह करणाऱ्या जोडप्यांचे सत्र आयोजित केले. स्वच्छंद पुणे यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. मिश्रविवाह हा संविधानिक अधिकार आहे. जोडीदाराची निवड करण्याचा व्यक्तीला अधिकार आहे. मात्र, अस्तित्वात असलेल्या कायद्यात अनेक उणिवा असल्याने या अधिकाराचा निकोप वापर करताना अडचणी येतात. यातच महाराष्ट्र शासन आंतरधर्मिय विवाह समन्वय समिती स्थापन करून खाजगी व्यक्तिगत संविधानिक अधिकारांत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करीत आहे. लव्ह जिहाद, धर्मांतर विरोधी कायदा आणि इतर बाबी समोर ठेवून वस्तुनिष्ठपणे समस्या समजून न घेता प्रतिगामी पाऊल उचलत असल्याबद्दल नाराजी व्यक्त करणारा ठराव मंजूर करण्यात आला. तसेच शासनाला सुधारणा करण्याबाबत काही शिफारसी करण्यात आल्या.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यकारिणी सदस्य, कार्यकर्ते आणि मंडळाच्यावतीने-सहकार्यातून घडवून आणलेल्या आंतरधर्मीय विवाह करणारी जोडपी या परिषदेत सहभागी झाली होती.

याच दिवशी आफरोज इनामदार यांनी त्यांचा घटस्फोट झाल्यानंतर मिळालेल्या इद्दत कालावधीची रक्कम रु. १५,०००/- मंडळास देणगी दिली.

**२० डिसेंबर** - भिन्नधर्मिय समुदायांत परस्पर संवेदना सन्मान वाढविण्यासाठी काय प्रयत्न करावेत आणि या निमित्ताने धर्मग्रंथांचा संदेश, संस्कृती, परंपरा यातील सकारात्मक-नकारात्मक बाजू काय आहेत, यावर आंतराष्ट्रीय पातळीवरील ऑनलाईन परिसंवादाचे आयोजन केले. या परिसंवादात मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी भाग घेतला.

**२४, २५ डिसेंबर** - बुलढाणा येथील आंबेडकरी साहित्य अकादमीने

संविधानकेंद्री साहित्य संमेलनाचे आयोजन केले. संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ आंबेडकरवादी साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर होते. या संमेलनात मंडळाचे अध्यक्ष डॉ. तांबोळी यांनी 'संविधानास अपेक्षित समाज आणि सद्य:स्थिती' या विषयावर विचार मांडले.

**२५ डिसेंबर** - मुस्लीम सत्यशोधक मंडळ, डायोसिस ऑफ पुणे, स्वच्छंद पुणे यांनी 'ख्रिसमस' निमित्त आंतरधर्मीय सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन केले. बिशप डॉ. थॉमस डाबरे, प्रा. रवींद्र शाळू यांच्या बरोबरच दिलावर शेख, आजिम पठाण, नबाब अल्तापहुसेन, मुमताज इनामदार यांनी सहभाग घेतला.

**३ जानेवारी २०२३** - क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन.

**५ जानेवारी २०२३** - केंद्र सरकारने प्रिमॅट्रिक तसेच संशोधन कार्यास प्रोत्साहन देणारी मौलाना आझाद छात्रवृत्ती रद्द केल्याच्या निषेधार्त अ. भा. स. शिक्षणहक्क सभा आणि समविचारी संघटनांच्यावतीने आयोजित केलेल्या पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील निदर्शने आंदोलनात मुस्लीम सत्यशोधक मंडळ सहभागी झाले. यात मंडळाचे कार्यवाह जमीर शेख, इर्शादभाई शेख, शाहेदभाई शेख आदि कार्यकर्ते उपस्थित होते.

**७ जानेवारी** - मुस्लीम सत्यशोधक मंडळाची कार्यकारिणी सदस्य बैठक आणि या बैठकीनंतर पुण्यातील कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली.

**८ जानेवारी** - राष्ट्र सेवा दल, पुणे जिल्हा दल दिन मेळाव्यात सहभागी.

**९ जानेवारी** - मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे सत्यशोधक फातिमाबी शेख यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सभा आयोजित करण्यात आली. यात अप्सरा आगा, श्रीरूपा बागवान, आबेदा शेख, समिना पठाण आणि बेनझीर तांबोळी यांनी विचार मांडले. मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विद्यार्थी यात सहभागी झाले. सभेनंतर हिंदू-मुस्लीम ऐक्य वाढवण्यासाठी कोणकोणते उपक्रम आयोजित करावेत, याविषयी चर्चा झाली. या दिवशी मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी महाराष्ट्र टाईम्समध्ये लेख आणि विचारवेध युट्यूब चॅनेलवर फातिमाबी शेख यांच्या जीवनकार्याबद्दल माहिती दिली.

**१४ जानेवारी** - मंडळाच्या कार्यालयात साप्ताहिक बैठकीचे आयोजन करण्यात आले.

**२१-२२ जानेवारी** - मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी,

कार्यवाह प्रा. जमीर शेख, सहकार्यवाह अल्ताफहुसेन नबाब, कार्यकर्त्या अप्सरा आगा - सातारा, सांगली, शिरोळ-कोल्हापूर, गडहिंग्लज, आजरा भागात संपर्क-संवाद दौरा आयोजित केला. यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते मा. सुरेश शिपूरकर यांच्या घरी बैठकीचे आयोजन करण्यात आले. यात मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह श्री. शिपूरकर, अदम मुजावर, आफताब जमादार, निहाल आणि कार्यकर्ते सहभागी झाले. सलीम मोमीन, जगदीश काबरे, मा. सुभाष पाटील, मा. माजी आमदार श्रीपतराव शिंदे, मा. डॉ. एम. बी. शेख, मा. मिरासाहेब मगदूम कुटुंबियांशी संवाद केला. याप्रसंगी कार्यकर्ते गुलाब अत्तार, उपाध्यक्षा प्रा. सायरा मुलाणी उपस्थित होते.

**२७, २८, २९ जानेवारी** - बेबाक कलेक्टिव्ह (निर्भीड आवाजाचा समूह) संस्थेने 'पुरुषप्रधान मानसिकता आणि महिला' या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले. मंडळाच्यावतीने पत्रकार हिनाकौसर खान आणि प्रा. समिना पठाण सहभागी झाल्या.

**२८ जानेवारी** - महाराष्ट्र फाऊंडेशन (अमेरिका), साधना, मासूम यांच्यावतीने पुरस्कार प्रदान कार्यक्रम झाला. या कार्यक्रमापूर्वी निवडक कार्यकर्ते, समविचारी कार्यकर्ते, प्रतिनिधी यांची पुण्यात एस. एम. जोशी सोशॅलिस्ट फाऊंडेशन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले. यात मंडळाचे अध्यक्ष सहभागी झाले.

**२९ जानेवारी** - १४ ते २८ जानेवारी दरम्यान मराठी भाषा पंधरवडा साजरा करण्यात आला. मराठी भाषा संवर्धन आणि वापर करण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाने आरंभापासूनच भूमिका मांडली आहे. मराठी भाषा संवर्धनासाठी मुस्लीम समाजातील अनेक साहित्यिक आणि विचारवंतांनी योगदान दिले आहे. यानिमित्ताने मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांचा लेख महाराष्ट्र टाईम्स वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आला.

**३० जानेवारी** - महात्मा गांधी यांच्या पंच्याहत्तराव्या स्मृतिदिनानिमित्त मंडळाच्या कार्यालयात अभिवादन !

**२ फेब्रुवारी** - मंडळाच्या कार्यालयात कार्यकर्ता बैठक.

**४ फेब्रुवारी** - मंडळाच्या कार्यालयात साप्ताहिक बैठकीचे आयोजन.

**६ फेब्रुवारी** - आरोग्य सेना पुरस्कृत पुणे सुरक्षा मंचातर्फे हॉटेल गुडलक चौक, पुणे येथे धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले. यात आरोग्य सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अभिजित वैद्य अध्यक्षस्थानी होते. माजी सनदी अधिकारी

सुरेश खोपडे, गगनविहारी बोराटे, शमसुद्दीन तांबोळी, दादासाहेब सोनवणे, आर. जे. संग्राम, दिपाली कांबळे, ॲड. संतोष म्हस्के आणि विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी यात विचार मांडले.

**७ फेब्रुवारी** – लोकहक्क फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने मंडळाचे अध्यक्ष शमसुद्दीन तांबोळी यांना 'गांधीवादी नेते बाळासाहेब भारदे पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी प्रा. लुलेकर यांनाही साहित्यिक उत्तम कांबळे यांच्या हस्ते गौरवण्यात आले. श्रीरामपूर येथील लोकप्रतिनीधी आमदार लहू कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी 'कॉ. गोविंद पानसरे पुरस्कार' शहिद सफानी भगद यांना देण्यात आला. कॉ. गोविंद पानसरे यांचे कुटुंबिय, मा. बाळासाहेब भारदे यांचे कुटुंबिय, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते उपस्थित होते. मान्यवरांशी झालेल्या अनौपचारिक चर्चेत मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते मा. अन्वर शेख यांनी भाग घेतला.

**८ मार्च** – मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि मंडळाचे सत्यशोधक फातिमाबी शेख महिला मंचच्यावतीने महिला हक्क दिनाच्या निमित्ताने 'महिला अधिकार आणि मी' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. यात हिनाकौसर खान, हलीमा कुरेशी शेख, मिनाज लाटकर, प्रा. समिना पठाण, श्रीरूपा बागवान, अप्सरा आगा यांनी विचार मांडले. अध्यक्षस्थानी मंच प्रमुख डॉ. बेनझीर तांबोळी होत्या. पुण्यात एस. एम. जोशी सोशॅलिस्ट फाऊंडेशन येथे हा कार्यक्रम झाला.

■ ■

*मुस्लीम सत्यशोधक मंडळ वर्धापनदिनानिमित्त देणगी, जाहिरात आणि शुभेच्छा देणाऱ्या पुढील मान्यवरांचे आभार !*

**मा. महेश बनकर, पुणे**

**मा. सेजल नरसिंह दळवी**

**मा. दिलीप फलटणकर, पुणे**

**स्थापना : १९७०**

# आवाहन

प्रिय वाचकहो,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने **मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचा इतिहास** या ग्रंथलेखन प्रकल्पास मान्यता दिली आहे. त्यानुसार **हमीद दलवाई यांचा कालखंड** आणि **हमीद दलवाई यांच्या नंतरचा कालखंड** असे द्विखंडात्मक लेखनकार्य चालू आहे. आपणाकडे हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाशी निगडित कोणत्याही स्वरुपातील लेखन किंवा छायाचित्रे असल्यास, कृपया संपर्क करून सहकार्य करावे.


**प्रकल्प संपादक : डॉ. शमसुद्दीन तांबोळी**

अध्यक्ष, मुस्लीम सत्यशोधक मंडळ

फोन : ९८२२६७९३९१

tambolimm@rediffmail.com


## मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे विविध उपक्रम

**। मुस्लीम सत्यशोधक पत्रिका ।**

**। सत्यशोधक फातिमाबी शेख महिला मंच ।**

**। मुस्लीम महिला मदत केंद्र ।**

**। हमीद दलवाई स्टडी सर्कल । मुस्लीम सत्यशोधक युवा मंच ।**

**। तिमिरभेद मंच (मुस्लीम समाज अंधश्रद्धा निर्मूलनासाठी)**

# मुस्लीम सत्यशोधक मंडळ - ५३ वा वर्धापन दिन

**दि. २२ मार्च २०२३, सायंकाळी ५-३० वा.**

**स्थळ : एस. एम. जोशी सोशॅलिस्ट फाऊंडेशन, पुणे.**



: प्रमुख पाहुणे :

*सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रात सकारात्मक आणि सक्रीय भूमिका घेणाऱ्या सुप्रसिद्ध अभिनेत्री*

**मा. उर्मिला मातोंडकर**



: प्रमुख वक्ते :

*पटना येथील प्रसिद्ध पत्रकार, लेखक, सामाजिक सबलीकरणाच्या मुद्यावर भरीव योगदान देणारे कार्यकर्ते, ऑल इंडिया पसमांदा मुस्लीम समाजचे नेते आणि राज्यसभेतील माजी खासदार*

**मा. अली अन्वर**

---

## *समाजप्रबोधन पुरस्कार*

*अंजुमन इस्लाम शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष, राष्ट्र सेवा दलाचे कार्यकारी विश्वस्त*

**मा. डॉ. झहीर काझी**



*यांना शिक्षण, समाज आणि वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल*

## *सत्यशोधक फातिमाबी शेख कार्यगौरव सन्मान पुरस्कार*

*प्रतिकूल परिस्थितीशी सामना करून प्रशासकीय सेवेत रुजू झालेल्या अमरावतीच्या विद्यमान उपजिल्हाधिकारी*

**मा. वसीमा हैदरसाब शेख**



**- डॉ. शमसुद्दीन तांबोळी,** अध्यक्ष, मुस्लीम सत्यशोधक मंडळ




डॉ. नितीश नवसागरे बीजभाषण करताना.




चयन कार्यक्रमात डॉ. तांबोळी, डॉ. बाबा आढाव, अतुल पेठे, असिफ इकबाल.




तरंग, मुमताज, बेनझीर, शबाना आंतरधर्मीय विवाह सत्रात बोलताना...

Registered with Registrar of News Papers of India, New Delhi
Book-Post containing Printed Periodical **Regd. No. 24247 / 73**



आरोग्य सेना आणि समविचारी संघटनांच्या वतीने गुडलक चौक पुणे येथे कोयता गँग निमित्त निदर्शने.



डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांना साहित्यिक उत्तम कांबळे यांच्या हस्ते बाळासाहेब भारदे पुरस्कार. उपस्थिती : आ. लहु कानडे



धार्मिक सुसंवाद कार्यक्रमात नबाब अल्ताफहुसेन, अजीम पठाण, बिशप थॉमस डाबरे आणि प्रा. रवींद्र शाळू.

'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' हे त्रैमासिक मुद्रक व प्रकाशक श्री. शमशुद्दीन तांबोळी यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळासाठी साई समर्थ प्रिंटर्स, दुकान क्र. ४,विठ्ठल हाईटस्, हिंगणे खुर्द, पुणे ५१ येथे छापून सी ८/२३, स्टेट बँक नगर, पंचवटी, पाषाण, पुणे ८ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.